# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

## // महासभा बैठकीचे कार्यवृत्त //

**सभा क्रं. - ४८** **दि. २१/०४/२०२३**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.२१/०४/२०२३ शुक्रवार रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर. सौ.महाजन जयश्री सुनिल यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करून खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.महाजन जयश्री सुनिल, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| पाटील कुलभुषण विरभान, उपमहापौर | काळे दिपमाला मनोज | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर |
| नेरकर सरीता अनंत | सोनवणे अश्विन शांताराम | पाटील रेखा चुडामण |
| पोकळे दिलीप बबनराव | चौधरी मनोज सुरेश | सोनवणे सुरेखा सुदाम |
| सोनवणे कांचन विकास | पाटील चंद्रशेखर शिवाजी | पाटील राजेंद्र झिपरु |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | कापसे मयुर चंद्रकांत | नाईक प्रशांत सुरेश |
| शिंदे गायत्री उत्तम | कापसे प्रतिभा चंद्रकांत | काळे रेश्मा कुंदन |
| बाविस्कर किशोर रमेश | देशमुख प्रतिभा गजानन | आहुजा मनोज नारायणदास |
| सपकाळे रंजना भरत | पाटील विजय पुंडलिक | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| कोल्हे प्रविण रामदास | सोनवणे सुरेश माणिक | सोनार रंजना विजय |
| सनकत चेतन गणेश | बारी शोभा दिनकर | खडके विश्वनाथ सुरेश |
| सोनवणे भारती कैलास | भिल पार्वताबाई दामु | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| चौधरी चेतना किशोर | पाटील उषा संतोष | देशमुख सुन्नाबी राजु |
| भंगाळे विष्णु रामदास | कोल्हे सिंधु विजय | शेख सैईदा युसुफ |
| सोनवणे राखी शामकांत | कोल्हे ललीत विजय | पटेल इब्राहिम मुसा |
| तायडे ज्योती शरद | बरडे नितीन मनोहर | सोनवणे निता मंगलसिंग |
| लढ्ढा नितीन बालमुकुंद | बेंडाळे उज्वला मोहन | सोनवणे विक्रम किसन |
| चौधरी मंगला संजय | राणे गायत्री इंद्रजित | भापसे जिजाबाई अण्णासाहेब |
| काळे अमित पांडुरंग | जोशी अनंत हरिश्चंद्र | **स्विकृत सदस्य** |
| ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह | तायडे सुरेखा नितीन | विशाल राधेशाम त्रिपाठी |
| सोनवणे धीरज मुरलीधर | चव्हाण ज्योती बाळासाहेब | राजेंद्र नारायण मराठे |
| भोळे सिमा सुरेश | मराठे जितेंद्र भगवान | महेश रतन चौधरी |

सदर सभेस मा.आयुक्त, डॉ.विद्या गायकवाड, नगररचनाकार श्री.अशोक करवंदे, नगरसचिव तथा उपायुक्त, श्री.अभिजीत बाविस्कर, उपायुक्त श्री.गणेश चाटे, मुख्यलेखाधिकारी श्री.चंद्रकांत वानखेडे, सहा.आयुक्त(आरोग्य विभाग) श्री.उदय पाटील, शहर अभियंता, श्री.चंद्रकांत सोनगिरे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**मा.महापौर :-** नगरसचिव यांनी सभा कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** नमस्कार, सर्व सन्मा.सभागृहाचे स्वागत आहे. सर्व सन्मा.सभागृहाला विनंती करतो की, सर्वांनी वंदे मातरमसाठी उभे राहावे.

**सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.**

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता १) सन्मा.सदस्या सपकाळे मिना धुडकु २) कोळी दत्तात्रय देवराम यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते मा. पिठासिन अधिकारी महोदया यांनी मंजूर केलेले आहेत.

**(नगरसचिव यांनी श्रध्दांजलीच्या प्रस्तावांना वाचायला सुरुवात केली.)**

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०४९ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दाजंलीचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | श्रध्दांजलीचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | सौ.सिमा सुरेश भोळे | १)खासदार स्व.गिरीषजी बापट, २) स्व.चंद्रकांत मेंडकी यांच्या पत्नी स्व.विजया मेंडकी, ३) मनपा सहाय्यक आयुक्त, श्री.गणेश चाटे साहेब यांचे वडील स्व.रामचंद्र चाटे, ४) मनपा कनिष्ठ अभियंता श्री.आर.टी.पाटील यांच्या मातोश्री स्व.प्रभावती पाटील, ५) जळगांव जनता बँक अधिकारी श्री.सुनिल याज्ञिक यांचे वडील स्व.राजाभाऊ याज्ञिक, ६) बालरोग तज्ञ डॉ.मिलिंद राणे यांचे वडील स्व.डॉ.मार्तंड एस. राणे, ७) राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे श्री.बाळासाहेब नाईक यांच्या मातोश्री स्व.पुष्पा पांडुरंग नाईक, ८) राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जेष्ठ स्वयंसेवक स्व.अनिल भालचंद्र अभ्यंकर यांचे दुखद: निधनाबद्दल. |
| २. | श्री.विष्णू रामदास भंगाळे | १)भूषण कॉलनीतील रहिवासी श्री.लक्ष्मीकांत भागवत झोपे व श्री.भूषण भागवत झोपे यांचे वडील कै.भागवत माधव झोपे, २) जिल्हा परिषद कॉलनी खंडेराव नगर पिंप्राळा येथिल रहिवासी नूतन मराठा विदयालयातील शिक्षक श्री.मनोज मोरे, श्री.सतीश मोरे, श्री.जयंत मोरे यांचे वडील सेवानिवृत्त महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी कै.भाऊराव तानकु मोरे, ३) किसनराव नगर येथिल रहिवासी मनपा कर्मचारी श्री.विनायक नन्नवरे यांचे वडील कै.नारायण दगडू नन्नवरे, ४) पत्रकार कॉलनीतील रहिवासी कै.जयप्रकाश भिकचंद शर्मा, ५) एम एस सी बी स्टेशनच्या मागे विश्वविनायक नगर येथिल रहिवासी जिल्हा परिषद जळगांवचे सेवानिवृत्त केंद्रप्रमुख श्री.सुरेश ठाकुर आणि जिल्हा माहिती कार्यालयातील श्री.पंकज ठाकूर यांच्या आई कै.यशोदाबाई माधवराव ठाकूर, ६) जुने जळगांवातील रहिवासी जिल्हा बँक विशेष वसुली अधिकारी श्री.किरण खडके यांच्या आई कै.वत्सलाबाई भास्कर खडके, ७) जय किसनवाडीतील रहिवासी श्री.चंद्रकांत वाणी व श्री.सुभाष वाणी यांचे लहान बंधू श्री.सुमित बाविस्कर यांचे वडील कै.प्रकाश विठ्ठल बाविस्कर, ८) मनपा कर्मचारी श्री.संजय ठाकूर व श्री.विजय ठाकूर यांच्या आजी कै.द्रोपदाबाई नामदेव ठाकूर, ९) मनपा कर्मचारी श्री.बाबुलाल सपकाळे आणि श्री.राजेंद्र सपकाळे यांचे भाऊ शनिपेठ रिधुर वाडा येथिल रहिवासी कै.निळकंठ देवराम सपकाळे, १०) गणेश कॉलनीतील रहिवासी आंतरराष्ट्रीय सॉफ्टबॉल खेळाडू व प्रशिक्षक श्री.किशोर चौधरी आणि सेंट्रल स्पोटर्सचे श्री.प्रवीण चौधरी यांचे वडील कै.डॉक्टर पी.पी.चौधरी, ११) मायादेवी नगरातील रहिवासी श्री.जैन संघ नशिराबादचे अध्यक्ष श्री.मोहनलाल चोपडा यांच्या पत्नी कै.निर्मलाबाई मोहनलाल चोपडा, १२) पुष्पती गुलवे विदयालयाच्या मुख्याध्यापिका सौ.हेमलता पाटील आणि नंदिनी विदयालयाचे माजी उपमुख्याध्यपक श्री. आर. आर. पाटील यांचा मुलगा कै.समीर आर. पाटील, १३) रथ चौक,जळगांव येथिल रहिवासी महर्षी आश्रम शाळेचे संचालक श्री.मनोज सपकाळे व श्री.कवी सपकाळे यांचे लहान भाऊ कै.जितेंद्र शांताराम सपकाळे, १४) शाहुनगर येथिल रहिवासी श्री.एकनाथ रामदास मानकुंबरे, श्री.महेंद्र रामदास मानकुंबरे व श्री.ज्ञानेश्वर रामदास मानकुंबरे यांच्या आई व श्री.गोवर्धन मानकुंबरे आणि श्री.विनायक मानकुंबरे यांच्या काकू गं.भा.द्रौपदाबाई रामदास मानकुंबरे, १५) गौरी प्रेम अपार्टमेंट मानराज पार्क स्टॉप येथील रहिवासी स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस |

| | | |
|---|---|---|
| | | कॉन्स्टेबल कमलाकर बागुल यांच्या आई कै.दुर्गाबाई भालचंद्र बागुल यांचे दुखदः निधनाबद्दल. |
| ३. | श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा | १) मनपा सहाय्यक आयुक्त, श्री.गणेश चाटे साहेब यांचे वडील स्व.रामचंद्र चाटे यांचे दुखदः निधनाबद्दल. |

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दु:खद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दु:ख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दु:खात सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दु:ख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्याना श्रध्दांजली अर्पण केली.

**नगरसचिव :-** सर्व सभागृहाला विनंती करतो की, सर्वांनी दोन मिनीट श्रध्दांजलीसाठी उभे राहायचे आहे.

**मा.महापौर :-** प्लिज सगळयांनी बसुन घ्यायचे आहे आणि थोडी शांतता ठेवायची आहे. आज २९ एप्रिल १९४७ रोजी स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी दिल्लीतील मेडकफ हाऊस मध्ये नागरी सेवकांच्या पहिल्या गटाला संबोधीत केले होते आणि त्या दिवसाची आठवण म्हणुन सन २००६ पासुन हा नागरी सेवा दिन हा साजरा करण्यात येतो. प्रशासनाच्या सेवेमध्ये स्वत:ला सार्वजनिक सेवेकरीता अर्पित करण्यात आलेल्या सर्व लोकांच्या सन्मानाचा हा दिवस साजरा केला जातो. म्हणुन प्रशासक हा लोकशाहीचा अत्यंत महत्वाचा स्तंभ माणला गेलेला आहे. शासनाने घेतलेल्या लोक कल्याणकारी निर्णयाची योग्यरित्या आणि सर्व व्यापी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही प्रामुख्याने प्रशासनावर असते. देशाच्या कारभाराचा गाडा व्यवस्थीत चालवा त्यासाठी कित्तेक अधिकारी कर्मचारी अहोरात्र कार्य करत असतात. वेळ प्रसंगी आपल्या जिवावर उदार होऊन ते कर्तव्य पार पाडत असतात. देशाच्या विकासासाठी कार्य करत असलेल्या सर्व सरकारी अधिकारी कर्मचारी सर्व सेवक वर्गाला भारतीय सेवा दिनाच्या खुप खुप कोटी, कोटी शुभेच्छा.

(सन्मा.सदस्य श्री.मनोज चौधरी व श्री.विक्रम सोनवणे हे महापौरांना पत्र देण्याकरीता स्टेजवर आले.)

**श्री.मनोज चौधरी :-** मा.महापौर महोदया, सभागृहात गटनेता म्हणुन माझी नियुक्त करावी. मी धनुष्य बाणाकडुन आज निवडुन आलेलो आहे. तरी धनुष्य बाणाच्या चिन्हावर मी निवडुन आलेलो आहे तर गटनेता म्हणुन आपण मला स्विकारावे ही विनंती.

(सन्मा.सदस्य श्री.मनोज चौधरी शिवसेना या पक्षाचे महानगरपालिका जळगांव मधील गटनेता म्हणुन अधिकृत काम करणेविषयी दिलेल्या पत्रावर मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर यांनी सदर पत्राची नोंद इतिवृत्तात घेण्याचे निर्देश दिलेले असल्याने पत्राची नोंद घेण्यात येत असुन पत्र खालील प्रमाणे )

**प्रति,**
**मा.महापौर सो.,**
**शहर जळगांव महानगरपालिका,**
**जळगांव**

**विषय :-** शिवसेना (धनुष्यबाण) या पक्षाचे महानगरपालिका जळगांव मधील गटनेता म्हणुन अधिकृत काम करणेविषयी...

महोदया,

महाराष्ट्र राज्यात मा.मुख्यमंत्री श्री.एकनाथरावजी शिंदे साहेब हे शिवसेना (धनुष्यबाण) या पक्षाचे अध्यक्ष म्हणुन कामकाज पाहत आहे. तसेच मा.श्री.गुलाबरावजी पाटील साहेब पक्षाचे पक्षनेते म्हणुन कामकाज पाहत आहे. जळगांव महानगरपालिकेत शिवसेना (धनुष्यबाण) या चिन्हावर निवडुन आलेल्या व आज रोजी कामकाज पाहत असलेला मी सदस्य आहे. मी आज रोजी या पत्राद्वारे आपणास सुचित करतो की, शिवसेना (धनुष्यबाण) या पक्षाचा अधिकृत गटनेता मी आहे. या पुढील होणारे गटनेता संबंधीत कुठलेही कामकाजामध्ये (धनुष्यबाण) या पक्षाच्या वतीने मला कळविण्यात यावे. सोबत गॅझेटची प्रत जोडत आहे. धन्यवाद.

**सही/-**
**मनोज सुरेश चौधरी**
**नगरसेवक**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**

**नगरसचिव :-** श्री.नितीनभाऊ लढ्ढा यांनी लक्षवेधी मांडलेली आहे.
(सन्मा.सदस्य श्री.नितीन बालमुकूंद लढ्ढा यांनी सभागृहात मांडलेली लक्षवेधी इतिवृत्तात नोंद घेणेबाबत मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर यांनी निर्देश दिलेले असुन त्याप्रमाणे लक्षवेधी खालील प्रमाणे )

मा.महापौर ताई
स.नमस्कार,

जळगांव शहरातील रस्त्यांच्या कामांसाठी विविध योजनेद्वारे मिळणाऱ्या निधीमधुन प्रस्तावीत करण्यात येत असलेल्या कामाचे नियोजन अत्यंत चुकीच्या पध्दतीने होत असल्याने दिसुन येत आहे. तरी मी दि.२१/०४/२०२३ रोजी होणाऱ्या महासभेमध्ये आपले लक्ष वेधु इच्छितो की, या सर्व चुकीच्या नियोजनामुळे शासकीय पैशाचा अपव्यय होऊन विकास कामावर होणारा खर्च हा पाण्यात जाणार यामुळे हा अत्यंत गंभिर विषय असुन या सुचनाद्वारे मी आपले लक्ष वेधु इच्छितो व या गंभिर विषयावर अजेंडयाच्या वरील विषय सुरु करण्यापुर्वी मला चर्चा करण्याची परवानगी द्यावी ही नम्र विनंती.

आपला
सही/-

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्य श्री.नितीनभाऊ यांनी येथे लक्षवेधी मांडलेली आहे. अगोदर लक्षवेधी झाल्यानंतर तुम्ही बोला.
**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरताई, लक्षवेधीच्या संदर्भात, जळगांव शहराच्या रस्त्यांच्या कामासाठी विविध योजनेद्वारे मिळणाऱ्या निधी मधुन प्रस्तावीत करण्यात येत असलेल्या कामांचे नियोजन अत्यंत चुकीच्या पध्दतीने होत असल्याचे दिसुन येत आहे. तरी दि.२१/०४/२०२३ रोजी होणाऱ्या महासभेमध्ये मी लक्षवेधी मांडु ईच्छितो की, ह्या सर्व चुकीच्या नियोजनामुळे शासकीय पैश्यांचा अपवय होऊन विकास कामांवर होणारा खर्च हा पाण्यात जाणार आहे. हा अत्यंत गंभिर विषय असुन यासाठी मी लक्षवेधी देऊ ईच्छितो की, या गंभिर विषयाला प्रशासनाने परवानगी दिलेली आहे. जळगांव शहर महानगरपालिकेला आता पर्यंतच्या इतिहासात कधी नव्हे इतका भरभरुन निधी राज्य शासनाकडुन उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने मी प्रथमत: मा.ना.श्री.गिरीषभाऊ महाजन आणि मा.पालकमंत्री आदरणीय श्री.गुलाबराव पाटील यांचे मनापासुन आभार व्यक्त करतो. खऱ्या अर्थाने बघितले तर साधारणता आज २७-२८ वर्षापासुन मी या महानगरपालिकेमध्ये नगरपालिका असतांना पासुन मी जी परिस्थिती पाहत आहे. खऱ्या अर्थाने कुठेतरी एका पंचवार्षिक मध्ये इतक्या मोठया प्रमाणावरती निधी विकास कामांसाठी निधी उपलब्ध होण्याचे दृष्टीकोणातुन हे प्रथमत: दिसुन येते. अत्यंत आनंदाची बाब आहे परंतु मिळालेल्या निधीचे नियोजन जे आहे ते अत्यंत चुकीच्या पध्दतीने चाललेले आहे असे प्रथम दर्शनी डोळयांना दिसुन येतो. आणि तशी कागदोपत्री परिस्थिती बघाल आपण तर ती वस्तुस्थिती आहे. नाकारुन चालणार नाही. साधारणता ज्या वेळेला राज्यामध्ये २०१८ ला भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनेची सरकार होती. आणि जळगांव शहर महानगरपालिकेमध्ये भारतीय जनता पक्षाची सरकार होती. त्यावेळेला दि.१६ ऑगस्ट २०१८ रोजी १०० कोटी रुपयाचा तत्वता मान्यता मिळली होती. दि.१६ ऑगस्ट २०१८ ला १०० कोटी रुपये महानगरपालिकेला उपलब्ध करुन देण्यासंदर्भात मान्यता मिळालेली होती. तद्नंतर त्या १०० कोटी पैकी ४२ कोटी रुपयांना दि.०१ ऑगस्ट २०१९ ला त्याची प्रशासकीय मान्यता मिळाली. ४२ कोटी रुपयांना मान्यता मिळाल्यानंतर अंतीमत: दि.२२ मार्च २०२२ ला त्या ४२ कोटी पैकी ३८ कोटी २८ लक्ष रुपयांना कार्यादेश देण्यात आले. म्हणजे २०१८ ला निधी मिळाला १०० कोटी रुपये आणि १०० कोटी पैकी अंतीमत: ३८ कोटी २८ लक्ष रुपये आपल्याला दि.२२ मार्च २०२२ रोजी अंतीम मान्यता मिळाल्यानंतर कार्यादेश वितरीत करण्यात आला. ३८ कोटी २८ लक्षच्या कार्यादेशाच्या अनुषंगाने जळगांव शहरामध्ये विविध भागांमध्ये विकास कामांना सुरुवात करण्यात आली. विकास कामांचा एकंदरीत आढावा घेता, राज्य शासनाकडुन या ३८ कोटी पैकी साधारणता ९ कोटीचा एक हप्ता महानगरपालिकेला प्राप्त झाला, ज्याच्या मध्ये महानगरपालिकेचा हिस्सा ५ कोटी असे मिळुन साधारणत: १४ कोटी ३ लक्ष कोटी रुपये हे आपण सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग केले. १४ कोटी रुपये सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग केले, १४ कोटी रुपये सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग केल्यानंतर ३१ मार्च अखेर त्या पैकी

रु.९,१८,६२,४३७/- कामे ही पुर्णत्वास गेली. म्हणजे या रु.९,१८,६२,४३७/- युटीलाईजेशन सर्टीफिकेट हे मनपाकडे प्राप्त झाले, आणि तसे आपण शासनाकडेस कळविले, म्हणजे २०१८ ला मिळालेला १०० कोटीचा निधी आणि ३१ मार्च २०२३ म्हणजे संपुर्णत: ५ वर्षाचा कालावधी याच्यामध्ये झालेला आहे. आणि ५ वर्षाच्या कालावधी मध्ये. त्याच्यातली फक्त ९ कोटी १८ लक्ष रुपयांची कामे आता पर्यंत मार्गी लागलेली आहे. काही कामे प्रगती पथकावर असतील त्या बद्दल वाद नाही. परंतु या संदर्भात एका गोष्टीचे लक्ष वेधु ईच्छितो की, या ३८ कोटीचे कामांचे जे कार्यादेश देण्यात आलेले आहे. त्या कार्यादेशामध्ये बऱ्यापैकी कामे ही काही प्रमाणात सुरु झालेली आहे. आणि काही प्रमाणावरती त्याचा खर्च सुध्दा झालेला आहे. अश्या परिस्थिती मध्ये पुनश्च: एक ८५ कोटी रुपयांचा निधी सन्मा.आ.श्री.राजुमामा भोळे यांनी राज्य शासनाकडुन मंजुर करुन आणला त्यांचे ही मनापासुन अभिनंदन. परंतु ८५ कोटीच्या निधीच्या नियोजनावरती जर आपण लक्ष टाकले, तर ८५ कोटी रुपयाच्या कामामध्ये जी कामे प्रस्तावीत करण्यात आलेली आहे. त्या कामांपैकी उदाहरणार्थ तुम्हाला सांगतो. अजिंठा चौफुली ते नेरी नाका हे १ कि.मी.चा रस्ता कॉंक्रीटीकरण करणे, साधारणता त्या १ कि.मी.च्या रस्त्यावरती ३ कोटी ५० लक्ष रुपये प्रस्तावीत करण्यात आलेले आहे. ज्याची वृत्तपत्रात दै.दिव्यमराठी मध्ये बातमी सुध्दा आहे की, त्या कामांवरती राज्य शासनाकडुन फक्त ९%चा निधी हा वितरीत करण्यात आलेला आहे. आता मला सांगा, अजिंठा चौफुली ते नेरी नाका रस्ता कॉंक्रीटीकरण करणे या कामाची विरुत्ती होत आहे. हेच काम ३८ कोटीच्या कार्यादेशामध्ये टॉवर चौक ते अजिंठा चौफुली डांबरीकरणामध्ये ते काम प्रस्तावीत आहे. त्याचे कार्यादेश दिलेले आहे आणि ते वर्क ऑलरेडी खटोड यांच्याकडे आहे. आता मला सांगा एका कामावरती डांबरीकरणाचा खर्च मंजुर करण्यात आलेला आहे. तसा कार्यादेशही देण्यात आलेला आहे आणि त्याच कामावरती एका निम्म्य भागामध्ये पुन्हा. ३.५ कोटीचा कॉंक्रीटीकरणचा रस्ता ८५ कोटीमध्ये प्रस्तावीत करण्यात आलेला आहे. प्रशासकीय मान्यता ही मिळाल्याचे आजच्या वृत्त पत्रातुन दिसुन येते. म्हणजे एकाच कामावरती पुर्वी डांबरीकरणाचा ही निधी मंजुर आहे. आणि त्याच्यावरती पुनश्च कॉंक्रीटीकरणाचा निधी मंजुर करण्यामध्ये काय औचित्य आहे हे मला समजलेले नाही. त्याच पध्दतीने दुसरे काम त्या ८५ कोटीमधले, निमखेडी जुना हायवे ते सुरत रेल्वे गेट इतपर्यंतचे काम जे आहे योग्य आहे त्या बद्दल काही वाद नाही. तेच काम पुढे सुरत रेल्वे गेट ते शिवाजी नगर उड्डाणपुल ते टॉवर चौक मार्गे आसोदा रेल्वे गेटपर्यंतचा रस्ता कॉंक्रीटींग करणे, त्या कामी २१ कोटी रुपयांची कॉंक्रीटीकरणाची तरतुद या ८५ कोटी मधुन दर्शविण्यात आलेली आहे. मा.महापौर महोदया, सुरत रेल्वे गेटपासुन ते टॉवर पर्यंत या कामांवर सुध्दा त्या ३८ कोटीमध्ये कार्यादेश देण्यात आलेले आहे. नुसताच कार्यादेश देण्यात आलेला नसुन त्या कामाची प्रत्येक्ष सुरुवात सुध्दा झालेली आहे. तेथे बी.बी.एम.चा एक लेयर सुध्दा टाकण्यात आलेला आहे. ते काम बी.बी.एम.चा ते काम जर कधीपर्यंत सुरु राहिले असते तर ते काम जवळपास आज पुर्णत्वास गेले असते. परंतु ज्या ८५ कोटी मध्ये तेच काम पुन्हा कॉंक्रीटींगमध्ये दर्शविण्यात आल्यामुळे अलिखीत आदेश मक्तेदाराला देण्यात आलेले आहे की, आपण ते काम आहे त्या स्थितीमध्ये थांबवावे. मा.महापौर महोदया, एकामहिन्यानंतर पावसाळा सुरु होईल. एकामहिन्यानंतर पावसाळा सुरु झाल्यानंतर ना डांबरीकरणाचे काम पुर्ण करु शकाल तुम्ही. कॉंक्रीटीकरणाचे समजा १२ नंबरला सुरुआहे. मग अश्या परिस्थितीमध्ये अत्यंत शहरातील महत्वाचा रस्ता आहे. सुरत रेल्वे गेट ते टॉवर चौक पर्यंतचा रस्ता अत्यंत महत्वाचा रस्ता आहे. या संपुर्ण जळगांव शहराच्या विकासाचे नियोजन ज्यांनी केले होते. त्या आदरणीय सुरेशदादांचा बंगला तेथे आहे. आणि आज त्यांच्या बंगल्याच्या समोरची दुरदशा आपण बघाल तर निश्‍चित आपल्यालाही वाईट वाटेल. मग अश्या परिस्थितीमध्ये अश्या पध्दतीने चुकीचे नियोजन करुन चालु असलेली कामे थांबविण्यात येतात.आणि त्याच्यावरती खर्चीक कॉंक्रीटीकरणाचे कामे प्रस्तावीत करण्यात येतात.याचे अवचित्य जे आहे ते मला न कळण्यासारखे आहे. तोच रस्ता टॉवर चौक पासुन आल्यानंतर ८५ कोटीमध्ये तोच रस्ता आसोदा रोड पर्यंत नेण्यात आलेला आहे. परंतु टॉवर चौक पासुन ते पुढे कैलास आप्पांच्या घरापर्यंत म्हणजे बालाजी मंदिराचा चौक इथपर्यंतचा रस्ता आता गेल्या ३ महिन्यापुर्वी डांबरीकरणचा झालेला आहे. एक १५ दिवसापुर्वी त्याच्यावर अंतिमत: सिलकोट झालेले आहे. आणि त्याच्यावरती कॉंक्रीटींगचा रस्ता प्रस्तावीत केलेला आहे. म्हणजे हे नियोजन कश्या प्रकारचे नियोजन आहे. म्हणजे मला वाटते संपुर्ण जगामध्ये अश्या पध्दतीचे मुर्खपणाचे नियोजन कुठल्याच संस्था करत नसतील. कुठलाच व्यक्ती करत नसेल. किंवा कुठलेच राजकीय व्यक्ती अश्या पध्दतीचे निर्णय घेत नसतील, इतका हा मुर्खपणाचा निर्णय आहे की, जी कामे ऑलरेडी मंजुर आहे प्रगती पथावर आहे. काही प्रमाणात कामे पुर्णत्वास सुध्दा गेलेली आहे. त्याच्यावरती सुध्दा साधारणता २१ कोटी रुपयांचा खर्च प्रस्तावीत केलेला आहे. अश्या पध्दतीने या ८५ कोटीतला लुक्कड कॉर्नर ते मोहाडीकडे जाणारा रस्ता कॉंक्रीटीकरण करणेस रक्कम रु.५ कोटी या रस्त्याचे सुध्दा कार्यादेश खटोड यांच्याकडे आहे. मध्यंतरी जितुभाऊ मराठे यांच्याकडे कार्याक्रमाचे आयोजन होते

त्या वेळेला त्याच रस्त्याची मक्तेदाराकडुन त्या रस्त्याची दुरुस्ती करुन घेण्यात आलेली होती.याला सुध्दा अश्याच पध्दतीने अलिखीत आदेश देण्यात आलेले आहे.आपले हे काम आहे त्या स्थितीमध्ये थांबवावे. जेणे करुन या रस्त्यांवरती कॉंक्रीटीकरणाचे प्रस्ताव मंजुर केलेले आहे. मला सांगा हा ५ कोटी रुपयांचा खर्च पुन्हा चुकीच्या पध्दतीने प्रस्तावीत करण्यात आलेला आहे. जो की, मक्तेदाराला जर मुबा दिली असती काम सुरु ठेवण्याची तर आज तो रस्ता डांबरीकरणामध्ये पुर्णत:वास गेला असता.एकीकडे आपण त्या मक्तेदारावर दबाव निर्माण करत असतो की, आपण आपल्या दिलेल्या कार्यादेशाप्रमाणे कामे तातडीने मार्गी लागावी. आणि दुसरीकडे, आता काय आहे दोन्ही विभागामार्फत ३८ कोटी रुपयांचा कार्यादेश हा सार्वजनिक विभागाकडे देण्यात आलेला आहे. येणाऱ्या ८५ कोटी रुपयाचा रिपोर्ट सुध्दा. हा सार्वजनिक विभागच करत आहे. म्हणुन कुठल्या रस्त्यांची कामे करावी आणि कुठल्या रस्त्यांची थांबवावी. याच्या आधी सुध्दा यादी सार्वजनिक विभागार्फतच प्रस्ताव जातो. म्हणजे मा.महापौर महोदया, खऱ्या अर्थाने बघितले तर शहराचे नियोजन करण्याचा सर्वे करणे महानगरपालिकेचा आहे. परंतु येथे उल्टया दिशेने गंगा वाहत आहे. नियोजन प्राधिकरणाला एक ओपचारीका समजली जात असेल, आणि सर्व निर्णय औपचारीकता म्हणुन घेतले जात असेल. आणि सगळेच निर्णय शहराच्या नियोजनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग घेत असेल.तर मला वाटते, जळगांव शहर महानगरपालिका ही सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये विलीन करुन टाकण्यात यावी. जर कधी या महापालिकेच्या नियोजन प्राधिकरणाला त्यांच्या अधिकार कक्षातले निर्णय सुध्दा घेण्याचे अधिकार नसतील. तर मला सांगा या महानगरपालिकेला अर्थच काय उरत आहे. अश्या पध्दतीने अत्यंत चुकीच्या पध्दतीने हे संपुर्ण नियोजन आहे. या पध्दतीने या ८५ कोटींच्या कामांपैकी अजुन एक काम तुम्हाला सांगतो, पाचोरा रस्ता ते छत्रपती संभाजी नगर रस्त्याला जोडणारा मार्ग ३ कि.मी. खर्च रक्कम रु. १० कोटी आता या रस्त्याचे जर कधी आपण सर्व अभ्यास केला तर मग हा रस्ता अस्तीत्वात नाही. या रस्त्याची असलेली जमिन सुध्दा महापालिकेच्या ताब्यात नाही. हा रस्ता शिरसोली रोड वरुन झोन -७ मधुन गितांजली केमिकल्सकडे म्हणजे सुप्रीम कॉलनी मधुन अजिंठा रोडला मिळणारा हा रस्ता आहे. आता या रस्त्याचा झोन-७ चा राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने झोन-७ हा नो-डेव्हलप्मेंट झोन आहे. नो-डेव्हलप्मेंट झोन असल्याकारणाने यापुर्वी जेव्हा जळगांव शहराचा विकास आराखडा मंजुर करण्यात आला होता.त्यावेळेला राज्य शासनाने फक्त झोन-६ ला मान्यता दिलेली होती. आणि झोन-७ ला ग्रिन झोन म्हणुन डिक्लेअर केलेले होते. ग्रिन झोन म्हणजे की, आज शेती आहे. त्याचा जरी विकास आराखडयामध्ये ज्या वेळेला त्याचा डी.पी.आर. तयार केला होता. प्राईम फेसींग बघितल्यानंतर असे वाटेल, ६ व्या आणि ७ व्या झोन मध्ये डी.पी.रोड प्रस्तावीत दिसत आहे. परंतु ज्या वेळेला राज्य शासनाने फक्त ६ व्या झोनला मान्यता दिलेली आहे. ७ व्या झोन मध्ये डी.पी.शीट वरती, हे अस्तीत्वातील रस्ते जरी दिसत असले, तरी त्या कुठल्याही प्रकारची कायदेशीर मान्यता नाही. त्याला राज्य शासनाने हरीत क्षेत्रामध्येच ठेवलेले आहे. म्हणजे हा खर्च सुध्दा जो आहे. हा कागदावरतीच राहणार आहे. या खर्चाचे विनियोग दुर दुर पर्यंत होणे शक्य नाही. अश्या पध्दतीने जर नियोजन होत असेल. आणि अश्या पध्दतीचे नियोजनाने आपण वृत्तपत्रांच्या माध्यमातुन बातम्यांच्या माध्यमातुन किंवा चर्चेच्या माध्यमातुन या शहरातील नागरीकांना अश्वस्त करत असतो. अश्वस्त करुन कोटयावधीचे विकास कामे हे आपण त्यांना दाखवत असतो. परंतु प्रत्यक्षात २०१८ ला मिळालेल्या १०० कोटीचे उदाहरण तुम्हाला सुरुवातीला देण्याच्या मागचे प्रोव्हीजन हे होते. कारण जर तुम्ही बघाल, तर यापुर्वी मागच्या बॉडीमध्ये २५ कोटी रुपयांचा निधी मा.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेबांनी दिलेला होता. त्या २५ कोटीचे विनियोग करता करता आपल्याला ५ वर्षाचा कालावधी गेला, मागच्या बॉडीतला मंजुर झालेला निधी शेवटचे ४-५ कोटी, शिवाजी नगर उड्डाणपुल येथील पोल स्थलांतरीत करणे आणि काही किशोर बाविस्कर यांच्या वार्डातील कामे, असे आता एक वर्षापुर्वी त्याचा विनियोग झाला, म्हणजे तीच परिस्थिती या १०० कोटीच्या निधीच्या अनुषंगाने आज या कागदोपत्रावरुन सिध्द होते की, मंजुर झालेल्या १०० कोटी प्राप्त झालेल्या ३८ कोटी आणि ३८ कोटी पैकी कामे झालेले ९ कोटी आणि उर्वरित ३८ कोटीपैकी जी कामे आता मी तुम्हाला मोजुन दाखवली. दुध फेडरेशन पासुन शिवाजीनगर उड्डाणपुल ते टॉवर पर्यंतचा रस्ता, टॉवर चौक पासुन ते कैलास आप्पा यांच्या घरपर्यंतचा रस्ता, लांडोरखोरीचा रस्ता, या कामांना थांबविल्यामुळे तो ३८ कोटीचा निधी पुन्हा खर्च होईल की नाही या पावसाळयापुर्वी ही सुध्दा शंका आहे. राहिला प्रश्न या १०० कोटी पैकी ३८ कोटीचा हा निधी खर्च झाल्यानंतर, आपण ३८ कोटीचा विनियोग झाल्यानंतर साधारणता आपण आता ३ महिन्यापुर्वी या महासभेमध्ये उर्वरित ६२ कोटीचे नियोजन केलेले होते की, १०० कोटीस तत्वता मान्यता दिलेली आहे. ३८ कोटीची रक्कम प्राप्त झालेली आहे, काही कामे प्रगती पथावर आहे. आणि ६२ कोटी रुपयांचे नियोजन करुन तसा प्रस्ताव आपण सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठविलेला आहे. साधारणता दि.१९/०१/२०२३ ला, ६२ कोटीचा प्रस्ताव या सभेमध्ये चर्चेला आला असतांना त्या ६२ कोटीच्या प्रस्तावावर चर्चा झाली, त्यावेळेला अनेक सदस्यांची कामे जी होती ती काही घेण्याची राहुन गेली होती. म्हणुन ६२ कोटी रुपयांच्या

ऐवजी आपण साधारणता रु.८४,६१,२२,८०८/- चा प्रस्ताव त्या महासभेमध्ये मान्य केला. पण प्रस्ताव पाठविला फक्त ६२ कोटीचा परंतु सन्मा.सदस्यांचे आग्रह करता तो प्रस्ताव वाढत वाढत ८४ कोटी पर्यंत पोहचला, आणि ८४ कोटी रुपयांचा प्रस्ताव दि.१९/०१/२०२३ ला सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आपण तो प्रस्ताव सादर केला, कारण या संदर्भात या संपुर्ण कामाचे टेन्डर प्रक्रिया राबविणे, कामे करुन घेणेची जबाबदारी त्या १०० कोटीच्या आदेशामध्ये ही सार्वजनिक बांधकाम विभागावर सोपविलेली होती. आणि त्या अनुषंगाने फक्त या महापालिकेने ठराव करुन आपली ना-हरकतसह ८४ कोटी रुपयांचा प्रस्ताव जानेवारी -२०२३ ला त्या विभागाकडे पाठविला,गंमत अशी आहे. म्हणजे कश्या पध्दतीने सदस्यांच्या भावनांशी म्हणा किंवा या शहरातील नागरीकांच्या भावनांशी, कश्या पध्दतीने कागदोपत्री खेळ होतो. त्याचे हे एक चांगले उदाहरण आहे. जो ८४ कोटी रुपयांचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठविला, त्या प्रस्तावावरती काही पुढे प्रगती नाही. कुठलीच त्याच्यामध्ये प्रगती नाही. उलटपक्षी मा.ना.श्री.गिरीषभाऊ महाजन यांनी जो नविन १०० कोटी रुपयांचे धोरण मंजुर करुन घेतले, आणि १०० कोटीच्या याला तत्वता मान्यता आता देण्यात आली, ती साधारणता दि.५ एप्रिल २०२३ ला १०० कोटी रुपयांची तत्वता मान्यता देण्यात आली. त्यापैकी ५० कोटीचा पहिला टप्पा हा वितरीत करण्यात येईल.आणि त्याला तातडीने त्या कामांचे प्रस्ताव राज्य शासनाकडे मागविण्यात आले. १०० कोटीचा प्रस्ताव पाठविण्याच्या दृष्टीकोणातुन कधीही या सभागृहामध्ये चर्चा झाली नाही की, सन्मा.सदस्यांच्या काय गरजा आहे. त्याच्याकडील रस्त्यांची परिस्थिती काय आहे. कुठला रस्ता घेणे आवश्यक वाटतो, त्याचा कुठलाही विचार न करता, जो ८४ कोटी रुपयांचा प्रस्ताव आपण पाठविलेला होता तोच त्याला इनक्लोज करुन पाठविण्यात आला. लक्षात आला मॅडम, जो १०० कोटी २०१८ ला मिळालेले होते. त्या २०१८ पैकी ६४ कोटी मध्ये जो ८४ कोटीचा प्रस्ताव आपण पाठविलेला होता, त्याच्यामध्ये १६ कोटीचे कामे अजुन ॲड करुन तसा प्रस्ताव १०० कोटी म्हणुन शासनाकडे सादर करण्यात आला.म्हणजे काय झाले, जो ८४ कोटीचा प्रस्ताव पाठविलेला होता त्याला बगल देण्यात आली.आणि त्याच्यामध्ये १६ कोटी ॲड करुन नविन १०० कोटीच्या प्रस्तावामध्ये ती यादी मंत्रालयात पाठविण्यात आली, आणि त्याला मान्यता मिळुन जवळपास त्या प्रस्तावावर सद्या काम सुरु आहे. म्हणजे कुठेतरी संपुर्णत: या सभागृहाची पुर्णत: दिशाभुल केली जात आहे. या दिशाभुल करण्याच्या मागचे प्रयोजन काय ? हे माहित नाही. याच्यामध्ये कोणाचा वेगळा स्वार्थ असेल असेही नाही. फक्त आणि फक्त चुकीचे नियोजन, सभागृहाला विश्वासात न घेणे, महापालिकेची कुठेही दखलेचा अंदाज न घेणे, अश्या पध्दतीमुळे हा संपुर्ण १०० कोटीचा प्रवास, या ८५ कोटीचा प्रवास, पुर्वीच्या १०० कोटीचा प्रवास, म्हणजे याच्यातला खर्च अक्षरश: बघाल, तर टक्केवारी ही खुप कमी प्रमाणामध्ये आहे, त्याचा खरा फायदा जो नागरीकांना होत आहे तो खुप कमी प्रमाणात होत आहे. म्हणजे मला सांगा या सभागृहाच्या सदस्यांना कळत नाही की, नेमके चालले काय आहे. आज मी सांगतो या महानगरपालिकेच्या या सभागृहातील एकाही सदस्याला विचारा किंवा प्रशासनाच्या एकाही अधिकाऱ्याला विचारा की, कोणती कामे कोणत्या निधीतुन प्रस्तावीत आहे. तर प्रशासनाचा अधिकारी सुध्दा उत्तर देऊ शकणार नाही आणि सभागृहाच्या सदस्याला सुध्दा माहित नाही. प्रत्येकाला माहित आहे की, या नियोजनात काम चालु आहे. आज मला सांगा, या ८४ कोटीच्या प्रस्तावात जवळपास या सभागृहातील ७०%सदस्यांचे कामे प्रस्तावीत आहे. परंतु ती कामे पुर्वीच्या १०० कोटीत प्रस्तावीत न होता. जे नव्याने मिळत आहे त्या १०० कोटीत प्रस्तावीत आहे.म्हणजे आपण याचा अर्थ काय पकडायचा की, पुर्वीच्या १०० कोटी पैकी जे ३८ कोटी प्राप्त झाले, तिथेच त्याला पुर्णविराम देऊन टाकायचा का ? वास्तविक बघितले तर हा जो ८४ कोटीचा प्रस्ताव प्राप्त झाला हा स्वतंत्र प्रस्ताव राज्य शासनाकडे जाणे अपेक्षित होते. त्याला मान्यता मिळुन त्याच्या संदर्भातली, निविदा प्रक्रिया होऊन त्या कामाचा कार्यादेश होऊन ती कामे सुरु होणे अपेक्षित होते. आणि आज जे गिरीषभाऊंनी ५ एप्रिला १०० कोटीला मान्यता दिलेली आहे. त्याच्या संदर्भात वेगळे प्रस्ताव जाणे अपेक्षित होते. परंतु तसा कुठलाच प्रकार दिसुन येत नाही. म्हणजे हा फक्त कागदोपत्री कुठेतरी, एक कागदोपत्री खेळ ज्याला आपण म्हणु शकतो.असली परिस्थिती येत आहे. आता याच्या संदर्भात सदरहु प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यात आला आहे. त्याची एक प्राथमिक माहिती ज्या वेळेला घेतली, त्या १०० कोटीच्या कामातुन जर कधी आपण बघितले, तर २६७ कामांपैकी २२४ रस्त्यांवर अमृत जलवाहिणीचे कामे पुर्ण व ४३ रस्त्यांवर कामे प्रलंबित आहे. म्हणजे अमृत जलवाहिणींची साधारणता २६७ रस्त्यांपैकी ४३ रस्त्यांची कामे जी आहे अजुन जलवाहिणीचे प्रलंबित आहे. २६७ रस्त्यांपैकी फक्त ९१ रस्त्यांवरती मलनिस्सारणचे काम पुर्ण झालेले आहे. आणि १७६ रस्त्यांचे मलनिस्सारणचे कामे अजुन बाकी आहे. बाकी म्हणजे सुरुच झालेले नाही. म्हणजे २६७ पैकी १७६ म्हणजे साधारणता ७०-७५ टक्के कामे जी आहे मलनिस्सारण अभावी अजुन प्रलंबित आहे. अजुन २६७ पैकी २९ कामे इतर योजनेतुन मनपा निधीतुन ६ व एक काम यापुर्वीच झालेले आहे. म्हणजे साधारणता २९ कामे ही वेगवेगळया निधीतुन ऑलरेडी होऊन गेलेली आहे.

ते सुध्दा त्या १०० कोटी मध्ये प्रस्तावीत आहे. जी यादी राज्य शासनाकडे गेलेली आहे. अश्या पध्दतीने जर कधी या विकास कामांवर मिळणारे पैश्यांचे नियोजन होत असेल.

**मा.उपमहापौर :-** काहींचे जी.आर.झालेले आहे, काहींचे शासन निर्णय झालेले आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जी माहिती घेतली त्याच्या आधारावरती मी बोलत आहे. याव्यतिरिक्त असे अनेक कामे समोर येतील की, जी कामे ऑलरेडी दुसऱ्या निधीतुन प्रस्तावीत आहे. आणि ते १०० कोटीमध्ये सुध्दा आहे. अश्या पध्दतीने आता मला सांगा, २६७ कामांपैकी, जर कधी १७६ कामे ही मलनिस्सारण योजनेच्या प्रकल्पामुळे बाधीत होतील. म्हणजे काय त्या १७६ कामांवरती खर्च होणारा एक एक पैसा सुध्दा हा सतकारणी लागणार नाही. कारण या भुयारी गटार योजनेचा संपुर्ण अनुभव अर्ध्या जळगांव शहर वासियांनी ऑलरेडी घेतलेला आहे. संपुर्ण रस्त्यांची कश्यापध्दतीने भुयार गटारचे काम सुरु असतांना रस्त्याची गाळन कशी होऊन जाते आणि त्या रस्त्याची परिस्थिती कशी राहते. हे उघडया डोळयांनी आपण पाहिलेले ही आहे. अनुभवलेले आहे. आणि ती सत्य परिस्थिती आहे. मग अश्या वेळेला या २६७ कामांपैकी १६७ कामे कॉंक्रीटींग मध्ये प्रस्तावीत करणे हे कितपत व्यवहारीक आहे. मोठया महेनती प्रयासाने निधी मिळतो. नेत्यांचे काम आहे निधी वितरीत करुन देणे,शेवटी ज्यांनी कोणी हे नियोजन केलेले असेल, ही त्यांची नियोजनातुन जबाबदारी होती की, नियोजनात मिळणारे पैश्यांचे आपण काटेकोरपणे आणि योग्य पध्दतीने आपण विनियोग करायला पाहिजे, परंतु ते कुठेच करतांना दिसुन येत नाही. म्हणजे आज या १७६ कामांवरती होणारा खर्च जर कधी भुयारी गटारी वरील योजना, आज नाही सहा महिन्याने, एक वर्षानंतर, साधारणता २ वर्षानंतर ही योजना मंजुर होणार आहे. या योजनेला तुम्हाला या शहरासाठी काम करावच लागणार आहे. मग तश्या परिस्थितीमध्ये २ वर्षासाठी या रस्त्यांवरती कोट्यावधी रुपयांचा खर्च करायचा, आणि तो कोट्यावधी रुपयांचा खर्च, दोन वर्षानंतर पाण्यात टाकायचा, हे कुठल्या व्यवहारीकपणाचे लक्षण आहे. हे कुठेतरी, शासन देत आहे आणि म्हणत आहे, जसे, कर्मनेते आणि दैवनेते, दैवनेते आणि कर्मनेते, तसली परिस्थिती आहे की, शासन देतो आणि आपण त्या पैश्यांना पाण्यात टाकतो, असला तो प्रकार आहे. कुठेतरी या सगळया बाबींचे योग्य नियोजन होणे गरजेचे आहे. कॉंक्रीटीकरणाच्या कामांना आमचा विरोध नाही. कॉंक्रीटीकरणची कामे यांचा दिर्घआयुष्य असतो. साधारणता १५-२० वर्षे त्यांचे आयुष्यमान असते.नागरीकांना दिलासा ही मिळतो कॉंक्रीटीकरणाच्या रस्त्याने. त्या बद्दल दुमत नाही. परंतु ज्या रस्त्यांवरती आपण खर्च करतो आहे. ते कामाचे त्याचा आयुष्यमानच आपल्या हातानेच पुढच्या दोन तीन वर्षांमध्ये ते उधवस्त करण्याचे कारण होईल.मग तश्या पध्दतीचे नियोजन करण्यामध्ये काय शाहनपण आहे. मा.महापौर महोदया, अश्या पध्दतीने अत्यंत चुकीचे नियोजन मिळणाऱ्या शासनाच्या एक एक पैश्यांच अत्यंत चुकीच्या पध्दतीने सुरु आहे. हा माझा आरोप म्हणा किंवा माझा आक्षेप म्हणा, किंवा कोणाचा हा जो नियोजन असेल, ते नियोजन माफीला सुध्दा पात्र नाही. या शहरातील जनता ज्या वेळेला ही रस्त्यांची कामे मार्गी लागतील पुर्णत: कडे जातील.निश्चित त्यांच्या मनाला एक वेगळा आनंद मिळेल. पण २ वर्षानंतर ज्या वेळेला ते रस्ते खोदले जातील. शिव्यांची लाखोली या जनतेकडुन ज्या कोणी याचे नियोजन केला असेल, त्याला नागरीक व्हायले शिवाय राहणार नाही. या उपरांत योग्य पध्दतीने जर कधी नियोजन केले. मिळालेल्या पैश्यांचा योग्य पध्दतीने जर विनियोग केले. तर खुप चांगल्या पध्दतीने या शहराच्या विकासाचे नियोजन साध्य करता येऊ शकते. म्हणजे उदाहरणार्थ सांगतो की, आपल्याला माहित आहे की, पुढची पंचवार्षिक या गटार योजनेमध्ये, आपल्याला माहिती आहे. हे संपुर्ण नियोजन जे आहे हे नियोजन करण्याच्या मागचा हेतु , कोणाचा ही असो, आमचा असो, सभागृहात बसलेल्या प्रत्येक सदस्याचा असो.किंवा जो कोणी प्रतिनिधी असतील. या सर्वांचा हेतु एकच आहे की, पुढच्या चार महिन्यामध्ये महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीला सर्वांना सामोरे जायचे आहे. त्याच्या पुढच्या सहा आठ महिने वर्षभरानंतर आमदारकीला सामोरे जायचे आहे. तद्नंतर लोकसभेच्या निवडणुकीला सामोरे जायचे आहे. आणि कुठेतरी जनतेचा रोष विरोधात जाऊ नये. आणि कुठेतरी आपण जनतेसाठी काही तरी करतो आहे. हे दाखविण्याचे हे एक प्रयत्न आहे. प्रयत्न चांगला आहे हेतु चांगला आहे.परंतु नियोजन जे आहे ते अत्यंत चुकीचे आहे. अत्यंत चुकीचे नियोजन आहे. जर तुम्हाला निवडणुकीचा हेतु साध्य करायचा असेल. आणि कमी खर्चामध्ये जास्तीत जास्त या शहरातील नागरीकांना दिलासा देण्याच्या दृष्टीकोणातुन जर कधी विचार करायचा असेल.तर नियोजनाची दिशा तुम्हाला थोडीशी बदलावी लागेल. म्हणजे उदाहरणार्थ म्हणतो या १०० कोटीतुन कॉंक्रीटीकरणाची जी कामे प्रस्तावीत केलेली आहे. आपण साधारणता कॉंक्रीटीकरणावरती येणारा खर्च, ७ मिटर रुंदीचा रस्ता असला आणि ७ मिटर रुंदीचा रस्ता आणि १ कि.मी. त्याची लांबी असेल, तर त्याच्यावरती खर्च येतो कॉंक्रीटींगला २ कोटी ४५ लक्ष, ९ मिटरचा रस्ता असेल १ कि.मी. त्याची लांबी असेल. तर त्याला साधारणता खर्च येतो. ३ कोटी १५ लक्ष रुपये. आणि १२ मिटरचा रस्ता असेल १ कि.मी. त्याची लांबी असेल तर त्याला साधारणता खर्च येतो ४ कोटी २० लाख रुपये. या १०० कोटीचे जर आपण कॅलक्युलेशन केले तर साधारणता ७ मिटरचे रस्ते

४०.८१ कि.मी.चे रस्ते जवळपास कॉंक्रीटींगचे रस्ते या शहरामध्ये १०० कोटीतुन होऊ शकतात. ९ मिटरच्या रस्त्यांचे जर गणित केले. तर साधारणता ९ मिटरचे रस्ते ते ३२ कि.मी. होऊ शकतील १०० कोटीतुन. आणि १२ मिटरचे रस्ते असतील आणि १०० कोटीतुन या १२ मिटरच्या रस्त्यांचे नियोजन केले. तर १ कि.मी.ला येणारा खर्च ४ कोटी २० लक्ष. त्याप्रमाणे साधारणता २४ कि.मी.चे रस्ते या १०० कोटीतुन प्रस्तावीत होतील. ७ मिटरचे ४० कि.मी.चे रस्ते होऊ शकतात, ९ मिटरचे विचार केले तर ३२ कि.मी.चे रस्ते होऊ शकतात, १२ मिटरच्या रस्त्यांचा विचार केला तर साधारणता २३ कि.मी. होतील. या तुलनेमध्ये चांगल्या कॉलिटीची ॲसफाल्टींगची कामे जर कधी प्रस्तावीत केली गेली.चांगल्या कॉलिटीची म्हणजे ज्या वेळेला जळगांव शहरात १९९० ते १९९५ च्या दरम्यान अटलानटा कंपनीने कामे केली होती. त्या रस्त्यांचे आयुष्यमान १५ ते २० वर्ष म्हणजे आता पर्यंत चाललेले होता. ते ही या जळगांव शहराच्या नागरीकांनी बघितलेले आहे. प्रशासनाच्या संपुर्ण अधिकाऱ्यांनी बघितलेले आहे. या शहरातील नागरीकांनी बघितलेले आहे. त्या कॉलिटीचे रोड जर आपण कॉंक्रीटीकरणाच्या ऐवजी जर डांबरीकरणामध्ये घेतले तर ७ मिटरचा रस्ता १ कि.मी.ला खर्च येईल. ७७ लक्ष रूपये. साधारणता ७ मिटरचे रस्ते होतील त्याच्यातुन १२९ कि.मी. म्हणजे कॉंक्रीटीकरण केले तर ४० कि.मी. होतात. आणि डांबरीकरण केले तर १२९ कि.मी. होतात. ९ मिटरच्या रस्त्यांचा विचार केला. तर त्याला खर्च येतो १ कोटी १ कि.मी.ला. त्या तुलनेमध्ये १०० कोटीतुन रस्ते केले तर १०० कि.मी.चे रस्ते या शहरामध्ये होऊ शकता. आणि तुलनात्मक १२ मिटरचे रस्ते करण्याचा विचार केला १ कि.मी.ला खर्च येतो, १ कोटी २५ लक्ष, साधारणता १०० कोटीमध्ये ७५ कि.मी.चे रस्ते शहरामध्ये होऊ शकता. साधारणता आपण अपेक्षित असे धरून घ्या. साधारणता जवळपास नॉर्मली रस्त्यांची रुंदी जरी ९ मिटरचा रस्ता असला.तरी ७ मिटरचे रस्ते आपण तेथे विकसीत करु कारण दोन्ही बाजुने १-१ मिटर गटारींसाठी जागा सोडलेली असते. कुठे झाडे असतात.तर साधारणता कॉंक्रीटींगचे रस्ते ४० कि.मी. याच्या तुलनेमध्ये डांबरीकरणाचे १२९ कि.मी. चे रस्ते याच्या तुलनेमध्ये आपण या १०० कोटी मधुन प्रस्तावीत केले तर या शहरातील बहुसंख्य भागातील नागरीकांना चांगल्या दर्ज्याचे डांबरीकरणाचे रस्ते आपण देऊ शकतो. या रस्त्यांचे आयुष्मान सुध्दा जर हा रस्ता काही कारणाने नाही खोदला गेला. तर याचे सरासरी आयुष्मान ८ ते १० वर्ष राहु शकते. भविष्यात ५ वर्षानंतर जर कधी भुयारी गटार योजना जर मंजुर झाली. आणि हे रस्ते ही खोदले गेले, तरी साधारणता समजुन घ्या. तरी १२५ कि.मी.चे रस्ते या शहरातील नगारीकांना तुम्ही २ वर्ष ३ वर्ष ५ वर्ष उपभोगायला देऊ शकता. आणि कॉंक्रीटींगचे फक्त ४० कि.मी.चे रस्ते नागरीकांना देऊ शकतात. जास्तीत जास्त नागरीकांना योग्य पध्दतीने दिलासा कसा देता येईल. या दृष्टीकोणातुन नियोजन करणे आवश्यक आहे. पण आपण काही तरी वेगळे करत आहोत. आम्ही कॉंक्रीटींगचे रस्ते देतो आहे. कॉंक्रीटींगचे रस्ते देणे हे काही भुषण नाही. कॉंक्रीटींगचे रस्ते तुम्ही द्या. निश्चित द्या. परंतु केव्हा द्या ज्यावेळेला तुमच्या या योजना पुर्णत:वास जातील. नुसते पुर्णत:वास गेल्यानंतर तातडीने नाही. वर्ष दोन वर्षामध्ये त्या योजनांच्या अनुषंगाने, मी तुम्हाला आता परवाचे उदाहरण सांगतो. डी.मार्ट जवळचा रस्ता कॉंक्रीटींगचा पुर्ण झालेला आहे. ईच्छादेवी ते डी.मार्ट, त्या मक्तेदारांने मला एक व्हिडीओ पाठविला, रस्त्याच्या मध्य भागातुन रस्त्याच्या दोघी जॉईंटस मधुन पाण्याचे झरे वाहुन येत आहे. मी मा.आयुक्त मॅडमांना ही तो व्हिडीओ पाठविला, त्यानी पुढे येऊन सांगितले की, भाऊ १५ दिवसापासुन पाण्याचे झरेच्या झरे या रस्त्यामधुन वर येत आहे. तेथील आपली एक जुनी सी.एन.जी. पाईपलाईन होती ती लिकेज झाली. काम सुरु करण्यापुर्वी टेस्टींग केली होती. व्यवस्थीत टेस्टींग झाली होती. परंतु शेवटी काय होते, रस्त्यांचे काम चालु असतांना आपल्या ज्या जुन्या लाईनी आहे. ज्या जिर्ण झालेल्या आहे. ज्या वेळेला रस्त्याचे प्रेसींग करत असतांना मोठया ताकदीचे रोलर असतात व्हायब्रेटर रोलर च्या प्रेशरामुळे २०-२० ,२५-२५ वर्षापुर्वीच्या लाईनी सस्टेन करु शकत नाही. कुठेतरी ते रस्टेड झालेल्या असतात. आणि त्याच्यामुळे ते लिकेज झाले. लिकेज झाले गेल्या १५ दिवसापासुन आपण त्याच्यावरती काम ही करु शकत नाही का तर त्याच्यावरती आपला सद्याचा पाणी पुरवठा सुरु आहे. ते सुध्दा खंडीत करता येत नाही. ते होईल पुढच्या ८-१० दिवसांमध्ये.परंतु या १५ ते २० दिवसाच्या कालावधी मध्ये त्याच्यातुन जमिनीतुन येणाऱ्या पाण्यामुळे त्या कॉंक्रीटच्या रस्त्याच्या खालची माती ती बरीच वाहुन गेली असेल. त्या रस्त्याचा जो काही बेस असेल तो बेस लुज झालेला असेल.उद्या एखादे अवजड वाहन त्याच्यावरुन गेल्यानंतर तो कॉंक्रीटींगचा रस्ता कुठल्याही शणाला खालती बसुन जाईन. मग त्यावेळेला त्या कॉन्ट्रॅक्टरकडे बोट दाखविले जाईल. त्या कॉन्ट्रॅक्टरने उत्कृष्ट पध्दतीचे काम केले नाही.शेवटी तो त्याचा दोष नाही. दोष मनपाचा ही नाही. कारण मनपाने त्या वेळेला रस्त्याच्यापुर्वी सर्व टेस्टींग करुन सुव्यवस्थीत तिथे पाहिलेले आहे. परंतु अश्या तांत्रिक अडचणी कामे करतांना येत असतील तर मक्तेदार काय करतो महानगरपालिकेच्या विरोधात प्रेस कॉनफ्रन्स घेतो की, महानगरपालिकेने एन.ओ.सी.दिली होती आणि महानगरपालिकेने पुर्ण रस्ता खोदला, आता पाईप लाईन लिकेज झाली तर खोदावाच लागेल.पाईपलाईन जुनी असेल जिर्ण झालेली असेल, व्हायब्रेटर रोलरचा प्रेशर सस्टेन नाही करु शकली असेल. ती फुटली, हा तांत्रिक दोष

आहे. याच्यात कोणी अधिकाऱ्याला दोषी धरणे काही नाही किंवा त्याला कोणी जबाबदार आहे अश्यातला ही भाग नाही. किंवा कोणी तरी हेतुपुरस्कराने त्या कामामध्ये कुचुराई केलेली आहे असे ही नाही. परंतु यामुळे काय होते, या कामांवरती होणारा खर्च हा कुठेतरी वाया जातो. नागरीकांच्या टिकेला तोंड द्यावे लागते.ही संपुर्ण योजना जोपर्यंत २ वर्ष ३ वर्ष योग्य पध्दतीने की, कुठल्याच प्रकारचे लिकेजेस नाही, कुठल्याच प्रकारचे चोकअप नाही. याची संपुर्ण खात्री पटल्यानंतर त्याच्यावरती कॉंक्रीटीकरणाची कामे केली, अमृत योजनेची , भुयारी मलनिस्सारण योजनेची कामे पुर्ण झालेली आहे. त्या चेंबरची कामे पुर्ण झालेली आहे. आणि त्यानंतर सुरुवात केली कॉंक्रीटीकरणाला तर ते कमीत कमी योग्य राहील. त्याला आयुष्यमान ही राहील.मग अश्या पध्दतीने महापौरताई हे जे नियोजन चाललेले आहे. मला वाटते अत्यंत चुकीचे आहे. आणि सार्वजनिक बांधकाम विभगाला मा.महापौरताई आपण सक्त सुचना करण्यात याव्या. हे ३८ कोटी रुपये जरी त्याची इमप्लीमेंटींग अथॉरिटी ही जरी बी ॲण्ड सी ची असेल. कारण तो निधी जळगांव शहर महानगरपालिकेला मिळालेला आहे. आणि त्याच्या मधुन या महासभेने जे धोरण ठरवुन कामे निश्चित केलेली आहे. त्या निश्चित केलेल्या कामांना पावसाळयापुर्वी मार्गी लावणे अत्यंत गरजेचे आहे. त्याच्यानंतर दुध फेडरेशन पासुन शिवाजी नगर पुलापर्यंतचा रस्ता, टावर चौक पासुन ते अजिंठा चौफुली पर्यंतचा रस्ता, आज मला सांगा, जळगांव शहराचा सगळयात वर्दळीचा रस्ता आहे. संपुर्ण एम.आय.डी.सी.ला जाणारे लोकं तिकडुन जातात, संपुर्ण हायवेला जाणारी जळगांव शहराची ट्रॉफिक अजिंठा चौफुली ते टॉवर चौकापासुन त्या रस्त्यावरुन जातात. त्या रस्त्याची परिस्थिती अशी आहे, सोनगिरे साहेबांना सांगुन त्याचे खड्डे बुजवण्यात आले. मी मक्तेदाराच्या मागे लागलो की, शहराचा प्रमुख मार्ग आहे. हे प्रमुख मार्ग तातडीने पुर्ण करा.पण तो मक्तेदार म्हणतो की, आम्हाला मौखिक आदेश दिलेले आहे की, तुम्ही ते काम करायचे नाही. म्हणजे नियोजन प्राधिकरण कोण आहे. जी इमप्लीमेंटींग अथॉरिटी आहे ती आहे की, जळगांव शहर महानगरपालिकेची अथॉरिटी आहे. म्हणजे अश्या पध्दतीचे प्रशासनीक केंद्र वेगवेगळे असतील आणि अश्या पध्दतीने शहराच्या विकासामध्ये बाधा येत असेल तर निश्चितपणे ही गंभिर बाब आहे. आपण तातडीने सक्त सुचना या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्यात याव्या की, या दोन रस्त्यांचे कामे, तिसरा लांडोरखोरीचा रस्ता, मला सांगा, जितुभाऊ मराठे असतील.

**सौ.ज्योती चव्हाण :-** १५ दिवस झाले भाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महत्वाचा रस्ता आहे तुमचा, आज मला सांगा, अत्यंत उच्च गृहवस्ती आहे तेथे, मोहाडी गावापासुन तो तसा बघितला तर एक गावापासुन दुसऱ्या गावाला जोडणारा रस्ता आहे. आता बघितले तर ते काम पुर्णत:वास यायला पाहिजे होते. पावसाळयात ना कॉंक्रीटींग होणार आहे ना डांबरीकरण होणार आहे. काय निवडणुकीला तोंड दाखवतील, काय नागरीकांना हे समजवतील हे कॉंक्रीटींग मध्ये आहे हे याच्यामध्ये आहे हे त्याच्यामध्ये आहे. कोट्यावधीचे ठराव वृत्तपत्रातुन वाचुन वाचुन लोकांचा या महानगरपालिकेवरचा विश्वास तुटुन गेला आहे. म्हणुन माझी आपणास विनंती आहे. या सभागृहाला विनंती आहे की, ही अत्यंत गंभिर अशी बाब आहे. आणि हे अत्यंत चुकीचे हे नियोजन आहे. या संदर्भात आम्ही मा.ना.श्री.गिरीषभाऊ महाजन यांना सुध्दा भेटुन या शहरातील या व्यवस्थेच्या बाबतीत योग्य पध्दतीने होणेच्या संदर्भात आम्ही ही त्यांना साकडे घालु की, आपण इतक्या मोठया प्रमाणावर निधीची उपलब्धता करुन देत आहात.परंतु चुकीच्या नियोजनामुळे संपुर्ण या शहरामध्ये एक अराजकता माजलेली आहे. लोकं लोकप्रतिनिधींना शिव्या घालतात. आणि अश्या पध्दतीने वृत्तपत्रातल्या दिलेल्या जाहिरातींवरती नागरीकांचा आता विश्वास नाही. नागरीक म्हणतात आम्हाला प्रत्यक्षात कृती पाहिजे. तुम्ही कॉंक्रीटचा करा, डांबरीकरणाचा करा, परंतु आम्हाला आमच्या घरासमोरचा रस्ता हवा आहे. आता या पध्दतीने या दृष्टीकोणातुन विचार करायला पाहिजे ही माझी या सभागृहाला कळकळीची विनंती आहे. धन्यवाद.

**श्री.मनोज चौधरी :-** नगरसेवक नितीनभाऊ लढ्ढांनी जे मांडले, ते अतिशय खरं आहे पुर्ण जळगांव शहरात दुरदशा तशीच आहे. मी आमदार श्री.राजुमामा भोळे यांचे आभार मानतो. माझ्या प्रभागातले भरपुर कामे त्यांनी टाकलेले आहे. निधी मंजुर केलेला आहे. पण एक असे विचारायचे आहे आयुक्त मॅडमांना मला की, कचरा फॅक्टरी रोड चंदु अण्णा नगर ते कचरा फॅक्टरी रोडसाठी ३ कोटी २० लाखाचा ईस्टीमेट मंजुर झालेला आहे. तर ड्रेनेज गटारी झाल्याशिवाय तो रस्ता होईल का मॅडम, होईल तर कसा, त्याचे उत्तर मला पाहिजे, आणि नाही तो असेल तर तुम्ही मनपा फंडात ते काम टाका, आणि माझी विनंती राहील की, वारंवार मी आपल्याला सांगतो आहे की, तो रस्ता करा, आता नितीनभाऊंनी खुलासा केला, मी एवढा खुलासा करु शकत नाही. थोडक्यात मांडतो, नितीनभाऊंनी जे सांगितले ते सर्वांना समजले असेल की, काय परिस्थिती आहे. रस्ते मंजुर केले ती ही मान्य, निधी आणला ते ही मान्य, पण ड्रेनेज झाल्याशिवाय ड्रेनेज-१ आणि ड्रेनेज-२ समजा आपण जळगांव शहरातले गावातले तर घेऊ पण ते मेहरुण असेल, माझा प्रभाग असेल, आपला पिंप्राळा गांव असेल, त्यांना ड्रेनेज झाल्याशिवाय हे रस्ते होतील का ? त्याचा खुलासा मला

पाहिजे आहे. तसे असेल तर मॅडम आपण तो रस्ता मनपा फंडात किंवा कोणत्याही फंडात करा. जर तो रस्ता झाला नाही तर लोकांना त्याचा त्रास होत आहे मॅडम, मी वांरवार २ वर्षापासुन मांडत आहे दोन महिन्यापासुन सांगत आहे वारंवार त्या रस्त्याबद्दल आणि कोणत्याही नगरसेवकाची त्या रस्त्याबद्दल तक्रार नाही. मागच्या वेळेस मॅडमांनी मला सांगितले होते की, नगरसेवक विरोध करतील, एवढे पैसे एकच ठिकाणी कसे, पण तो मुख्य रस्ता आहे. जळगांव शहराचा पुर्ण कचरा माझ्या प्रभागात येतो. मी सगळया नगरसेवकांना विनंती करतो की, आपण एकमतानी या रस्त्यासाठी मॅडमांना विंनती करावी, आणि तो रस्ता मंजुर करण्यासाठी मनपा फंडात तो टाकण्यात यावा ही विंनती.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, आयुक्त महोदया, उपमहापौर महोदय, सर्व सन्मा.सभागृह आपले जेष्ठ सदस्य श्री.नितीनभाऊ लढ्ढा यांनी लक्षवेधीच्या माध्यमातुन जळगांव शहरात जो निधी आलेला आहे. त्याचा अपव्यय होत आहे असे त्यांचे मत झालेले मला दिसत आहे. खरं तर मा.ना.श्री.गिरीषभाऊ महाजन असतील, आपले जिल्ह्याचे पालकमंत्री श्री.गुलाबरावजी पाटील, आपले शहराचे आमदार श्री.राजुमामा भोळे यांच्या माध्यमातुन जळगांव शहरासाठी जो काही निधी आलेला असेल खरं त्यांचे अभिनंदन केले पाहिजे, मला वाटते बाळ रडल्याशिवाय आई सुध्दा बाळाला जवळ घेत नाही. आणि मला वाटते की, आपण न रडता आपल्या जळगांव शहराला हा निधी मिळत आहे. म्हणुन त्याचे आपल्याला... आणि ऐका ना. भाऊंनी जे सांगितले की, नियोजनामध्ये काही त्रृट्या आहेत. नक्की आहे. काही रस्ते डबल घेतले गेलेले आहे. काहींच डांबरीकरण झालेले असेल किंवा अर्धवट असेल किंवा प्रस्तावीत असतील, काहींचे कार्यादेश दिलेले असतील तसे आहे पण त्याच्या प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यामध्ये मला वाटते समनव्याचा अभाव दिसुन येतो. आता आपली महासभा निघते. महासभेत आयत्या वेळेला सुध्दा काही प्रस्ताव येतात विकास कामांचे. नगरसचिव साहेब घेत नाही. पण येतात, एक दिवस आधी दोन दिवस आधी आणि सन्मा.सदस्य, आपले शाखा अभियंता असतील, त्यांच्याकडे ईस्टीमेट बनवायला जातात.त्यांच्याकडे माहिती घेतात की, यापुर्वी हा जो मी रस्ता टाकतो आहे. हा घेतलेला आहे नाही घेतलेला आहे. बहुतेक शाखा अभियंतांना याची सुध्दा कल्पना नसते की, या रस्त्याचे स्टेटस काय आहे. मला स्वत:ला आलेले अनुभव आहेत. शहर अभियंता असतील यांच्याकडेही कामांच्या जबाबदाऱ्या आहेत. एक एक अधिकारीकडे २-२, ४-४ कामांच्या जबाबदाऱ्या त्यांच्याकडे आहे. आणि ते वारंवार आपल्या याच्यातुन सांगतात सुध्दा. असे असतांना याच्या नियोजन मध्ये काही त्रृटी राहिली असेल. तर त्रृटी आपल्याला त्याच्यात दुरुस्ती करता येईल. जे कामे आपण दिलेले आहे. आज आपल्याला निधी मिळालेला आहे. निधी मंजुर झालेला आहे. या निधीतुन शहराचे बरेच रस्ते केले जातील आणि सन्मा.सदस्यांनी जे प्रस्ताव दिलेले होते ते सर्व डांबरीकरणाचे दिलेले होते. परंतु आपले राज्याचे उपमुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस यांनी सांगितले की, डांबरीकरण काय करतात, मी तुम्हाला कॉंक्रीटीकरणसाठी निधी देतो. म्हणजे आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन डोळे, असा प्रकार हा आपल्यासाठी घडलेला आहे. तर ही आपल्यासाठी खुप आनंदाची बाब आहे. फक्त नियोजनामध्ये काही त्रृटी असेल,सर्व पक्षीय गटनेते आहे, सर्व प्रमुख पदाधिकारी आहे, आणि प्रशासन आपण एका ठिकाणी बसुन जी काही कामे प्रस्तावीत केलेली असतील. त्या कामांमध्ये आपण बदल करु शकतो. असे मला वाटते, जास्त मी वेळ घेणार नाही. आणि याच्यासाठी जलद गतीने आपल्याला काही कामात बदल करुन निधी कसा आपल्याला मिळुन घेता येईल.याच्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करावे धन्यवाद.

**मा.महापौर :-** नियोजन न होते किंवा अधिकाऱ्यांकडुन माहिती घेतलेली नाही. दुसरे जर आपल्याला कॉंक्रीटचे रस्ते करायचे असले तर मला वाटते, १०० कोटी हा अतिशय तोकडा निधी आहे. १००० कोटी सुध्दा जळगांव शहरासाठी अतिशय कमी पडेल. याच्यातुन तिप्पट डांबरीकरणाचे रस्ते होऊ शकता आणि कमीतकमी या शहराला दिलासा आपण जास्तीत जास्त एरियाला देऊ शकतो.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, आधीच सांगितले होते की, १००-१००-१०० असे ३०० कोटी सर्व शहरासाठी देणार. पण पहिले १०० कोटी खर्च होत नाही तर दुसरे १०० कोटी कुठुन येणार. आज आपले २५ कोटी भाऊंनीच मांडले. २०१५-१६ चे २५ कोटी अजुन ही आपण खर्च केले नाही.

**मा.महापौर :-** ३८ कोटी मंजुर झाले कामे सुध्दा मंजुर झाले, परंतु त्यातील काही कामे थांबविण्यात आले. आता जर ती थांबवली नसती तर कदाचित ते पुर्णत:वास आली असती. पुन्हा तीच कामे टाकली गेली.

**श्री.राजेंद्र पाटील :-** त्याच्यासाठी आपले नेते मंडळी नियोजन करणार नाही. प्रशासन आणि पदाधिकारी आपण मिळुन नियोजन केले पाहिजे.

**मा.महापौर :-** महापालिकेला कोणत्याही बाबतीत त्यांनी विश्वासात घेतलेले नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विश्वासात घेतले गेलेले नाही.

**मा.महापौर :-** कोणाला विचारले, कोणत्याही, नगरसेवकांनी मला सांगावे. सन्मा.सदस्यांनी की, आपल्याला बोलविण्यात आले होते.

**श्री.अश्विन सोनवणे :-** तुम्ही डांबरीकरणाचा विषय करत आहे. याच ४२ कोटीमध्ये जे डांबरी रस्ते झाले, ते डांबरी रस्ते ५५ ठिकाणी खोदले गेले. काय रस्ते टिकणार आहे. तुम्ही विषय करत आहात डांबरी रस्ते डांबरी रस्ते, ५५ ठिकाणी खोदले गेलेले आहे. एन.ओ.सी. देऊन सुध्दा रस्ते खोदले जात आहे. ज्या वेळेला तुम्ही रस्ते करतात. त्या वेळेला तुम्ही सर्व इंजिनिअर लोकांना बोलविले पाहिजे. तेथे काम चालु असते त्या ठिकाणी टेस्टींग व्हायला पाहिजे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मग कॉंक्रीटींगच्या रस्त्यांची परिस्थिती वेगळी राहिल का ?

**श्री.अश्विन सोनवणे :-** कॉंक्रीटींगच्या रस्त्यांमध्ये आपण त्याच्यावर मार्ग काढु शकतो. आपण दोघी साईडला जागा सोडुन मध्ये कॉंक्रीटीकरण करु शकतो. साईडने आपण सोडु शकतो ना जागा. त्या ठिकाणी पाईप टाकु शकतो.नागपुरच्या धरतीवर झालेले आहे. अंबरनाथला आहे. फक्त विरोध करायचे म्हणुन करु नका. डांबरी रस्ते तुमचे ५५ ठिकाणी खोदले गेलेले आहे. त्यावर काय उत्तर आहे उत्तर द्यायला लावा त्यांना. ५५ ठिकाणी खोदले रस्ते.काय रस्ते टिकणार आहे तुमचे. आता या पावसाळयामध्ये हे वाहुन जाणार. म्हणजे लोकांचे शिव्या आम्ही खायचे का ?

**नितीन लढ्ढा :-** महापौरताई, भुयार गटार ही रस्त्याच्या मध्ये भागातुनच जाते.

**श्री.अश्विन सोनवणे :-** भाऊ, अंबरनाथला, नागपुरला तसेच झालेले आहे. मध्ये पेव्हर ब्लॉक मग लाईन जोडुन मधली पट्टी डांबरी घेऊन आजुबाजुला कॉंक्रीटीकरण असे झालेले आहे ना. या धरतीवरच करणार आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अश्विनभाऊ मला एक सांगा, जसे आता राजेंद्रभाऊंनी सांगितले, आंधळा मागतो एक डोळा देव देतो दोन डोळे, दोन डोळे देतात परंतु या सभागृहाला धुतराष्ट्रच्या भुमिकेत बांधुन ठेवलेले आहे. राज्य कर्त्यांनी, या सभागृहातल्या सदस्यांना, मला सांगा हे १०० कोटीचे प्रस्ताव गेले. तुम्हाला तरी विश्वासात घेतले गेलेले आहे का ? तुम्हाला तरी कल्पना आहे का ? तुम्ही अंबरनाथच्या गोष्टी करत आहात, तुम्ही नागपुरच्या गोष्टी करत आहात.

**श्री.अश्विन सोनवणे :-** हे १०० कोटीसाठी आमच्या प्रभागातले कामे दिलेली आहे. आम्ही नावे दिलेली आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** परंतु त्याचे नियोजन ज्या पध्दतीने म्हणत आहात तुम्ही की, दोन्ही साईडला रस्ते सोडुन साईड पॅच करु आणि मध्येच कॉंक्रीटची स्ट्रीप होईल.

**श्री.अश्विन सोनवणे :-** नाही नाही, मध्ये ब्लॉक मग डांबराची पट्टी असे नागपुरच्या धरतीवर किंवा अंबरनाथच्या धरतीवर.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला सांगा पेव्हर ब्लॉकच्या संदर्भात किती टिकतात पेव्हर ब्लॉक.

**श्री.अश्विन सोनवणे :-** डांबरीकरणाची पट्टी

**श्री.नितीन लढ्ढा :-** मग पुर्ण डांबरीकरणच करा ना.

**श्री.अश्विन सोनवणे :-** अहो भाऊ, ५५ ठिकाणी रस्ते खोदले आहे. यांचे हेच चालले शेवटपर्यंत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी याच्यापुर्वीच काय बोललो. हे सगळे कामे करणे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** प्रकल्प अधिकारी कोण आहे या दोन्ही विषयांचा खुलासा करावा. किती वेळेस साईडवर जाऊन चक्कर मारले विचारा त्यांना. ऑफिस मध्ये खुर्चीवर बसुन राहतात. अंडरग्राऊंड ड्रेनेज असेल, अमृतची योजना असेल, विचारा ना. विचारा, तपास करा, ते आले आहेत का साईडवर.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** भाऊ, भाऊ. माझा एक विषय आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला सांगा नियोजनामध्ये महानगरपालिकेला, म्हणजे त्याचे ईस्टीमेट सुध्दा बी ॲण्ड सी करत आहे. कामाचे सुपरव्हिजन बी ॲण्ड सी करत आहे. म्हणजे फक्त काय आहे. दोषाचे खापर जे फोडायचे ते महानगरपालिकेवरती, मात्र नियोजन करायचे परक्यांनी. असे योग्य नाही.

**श्री.अश्विन सोनवणे :-** आले का ते साईडवर कोणी आले का ? आले कधी पाईप लाईट तुटत आहे फुटत आहे. आले कधी. रस्ते खोदले जात आहे. कोणीच येत नाही. मॅडम तुम्ही बोलायला पाहिजे. कार्यवाही करा ऐकत नसतील तर ते. त्यांचे काय आहे. हा हे ओरडतात महापालिकेत बाहेर जाऊन विसरुन जाता.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई, अश्विनभाऊंना एकच विचारतो की, या ८५ कोटीच्या नियोजनाच्या संदर्भात याच्यातल्या काय काय कमतरता या सभागृहाला निदर्शनास आणुन दिल्या. कोणी केले हे नियोजन,या सभागृहाने केले ? प्रशासनाने केले ? काय कोणी केले म्हणजे हे नियोजन करायला कोण जबाबदार आहे. आपण गेलो होतो, मी गेलो होतो, ललितभाऊ गेले होते की, तुम्ही गेले होते. मग अश्या पध्दतीने चुकीचे नियोजन होत असतील.आणि नंतर मग आपण कोणावरती खापर फोडायची याला काही अर्थच नाही. अत्यंत चुकीच्या पध्दतीने चाललेले आहे नियोजन हे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मला प्रशासनाला हेच विचारायचे आहे. आता ४.५ वर्ष होऊन गेले मला निवडुन यायला. या ४.५ वर्षामध्ये, आयुक्त मॅडम दोन मिनीट, या ४.५ वर्षामध्ये माझ्या प्रभागात किंवा जळगांव शहरातील प्रभागामध्ये कुठलेही हे अ,ब,क,ड कुठे आहे मला अजुन माहित नाही. मला हे सांगावे प्रशासनाने या ८५ कोटी मध्ये. २ अ, ४क, ५ड हे ठरविले कोणी, तुम्ही ठरविले, हे ईस्टीमेट बनवले कोणी. आपली एन.ओ.सी. घेतांना आपल्या अधिकाऱ्यांनी एन.ओ.सी. देतांना हे पाहिले नाही का ? महानगरपालिकेचे प्रभाग हे अ,ब,क,ड असे ठरलेले नाही ते पुर्ण प्रभाग आहे. एका मतदाराने ४ मते दिलेली आहेत. मग हे आले कुठुन हे बी ॲण्ड सी ला पण विचारा, तुम्ही हे ८५ कोटी येथे राबविणार आहात . काम करत आहात. ते बेकायदेशीर होणार आहे. एखाद्या गटार कामगाराला जर सांगितले की, गटार काढ तो सांगतो, माझे काम नाही. माझ्याकडे व्हिजीटला येणार आहे. आपल्या अधिकाऱ्यांना सांगितले की, साहेब हे थोडेसे काम करुन द्या ते म्हणतात. नियमात बसत नाही. कागदोपत्री नाही. मग हे अ,ब,क,ड चे नियम कुठुन आले. आता माझी पुर्ण प्रशासनाला ही मागणी आहे. आता महासभा संपल्यानंतर प्रत्येक वार्डात फिरवुन मला दाखवा हा अ आहे, ब आहे, मला दाखवा. आणि दाखवु शकत नसल हे अ,ब,क,ड आली कुठुन मागवा तेथुन माहिती.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** या ८५ कोटी मध्ये पण तसेच आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** लोकांना जाऊ द्या आम्हाला सांगा, आमचा अ आहे, आमच हा ब आहे, हा क आहे.

(अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना सभागृहात कोण काय बोलले स्पष्ट समजत नाही.)

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** कुठलाही गेलेला रस्ता हा अ मध्ये आहे, ब मध्ये आहे. ड मध्ये आला आहे हे तुम्ही कसे करणार. त्याचे बिल कसे बनविणार, त्याचे ईस्टीमेट कसे फायनल करणार. वर्कऑर्डर कशी देणार आणि हे इंजिनिअर की ते इंजिनिअर लाईन अप कशी देणार. हा ब मधला रस्ता आहे. येथे तु काम चालु कर.

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे बी ॲण्ड सी ने, जशी देशाची फाडणी झाली तशी प्रभागांची फाळणी करा ना.

**श्री.मनोज चौधरी :-** तुम्ही कायदेशीर डिक्लेअर करु शकतात का हे अ भाग आहे हे ब भाग आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** महानगरपालिकेने पत्र दिले का शासनाला बी ॲण्ड सी ला की, आपल्याकडे अ,ब,क,ड, अशी कुठलीही प्रथा नाही. असे कुठलेच भाग नाही. संपुर्ण प्रभाग एकच आहे. त्यांना नांव द्या पोकळेंच्या घरापासुन बाविस्करांच्या घरापर्यंतचा रस्ता अशी आपली प्रथा आहे. सर्व्हे नंबरची प्रथा आहे. अ,ब,क,ड कसे होईल ते सांगा, आणि या गोष्टीचा गांर्भियाने विचार करा. नाही तर आम्हाला परत सांगाव लागेल या गोष्टीवर.

**श्री.अनंत जोशी :-** महापौरताई, राजुभाऊंनी जसे आता सांगितले की, रडल्याशिवाय आई पण जवळ घेत नाही. अहो राजुभाऊ १० वर्ष झाले, आपण लोक प्रतिनिधी नाही नगरसेवकच नाही, जळगांवचा प्रत्येक व्यक्ती ठासुन ठासुन रडत आहे.आणि तुम्ही म्हणतात रडल्याशिवाय मिळाले. प्रत्येक व्यक्ती रडत आहे. दुसरा विषय आणि काही आया अश्या असतात की, बाळाला रडुच देत नाही. ती वेळच येऊ देत नाही काही आया असे पण असतात. दुसरा विषय तुम्ही सांगितला, आता आपण सगळे गटनेते बसुन ठरवु. हे सगळे बी ॲण्ड सी ने केव्हा ठरविले, का नेत्यांनी ठरविले, त्या वेळेस तुम्ही बोलविले असते ना सुरुवातीला तर ही वेळच आली नसती, आता म्हणत आहात सोबत बसु. मला एकच विषय म्हणायचे आहे. मी नितीनभाऊंना ही मगाशी सांगीतले. जसे आता भुयारी गटारींचा जो विषय आहे. माझ्या प्रभागात ही पेंडींग आहे. म्हणजे येणाऱ्या वर्ष दोन वर्षात माझ्याकडे पण रस्ते खोदले जाणार आहे. कॉंक्रीटीकरणाचे असो किंवा डांबरीकरणाचे असो. मी नितीनभाऊंना मगाशी तोच प्रश्न केला,जसे आपण जनरली बघतो, कॉंक्रीटचा रस्ता केलेला आहे. आणि ड्रेनेजसाठी तो रस्ता तोडला गेला, तर जेव्हा ती जी स्कीम आहे ती सेंटरलाच होते. ती जी योजना आहे मधुनच फोडतात सगळे रस्ते. पुर्णच रस्ता कामातुन जातो. जेव्हा कॉंक्रीटचा रस्ता फोडला जातो. तो सोनगिरे साहेब व्यवस्थीत मॅच होत नाही माझ्या मते. कॉंक्रीटचा रस्ता जर आपण रिपेअरींग केला तर ते व्यवस्थीत मॅच होत नाही. डांबरीकरणाचा रस्ता जरी सेंटर मधुन फोडला गेला, तर डांबरी रस्ता तरी त्या तुलनेमध्ये मॅच होतो. कॉंक्रीटचा रस्ता व्यवस्थीत मॅच होत नाही. दुसरी गोष्ट अर्ध्या शहरामध्ये जी ड्रेनेजची योजना राबवली गेली. ड्रेनेज

योजनेच्या पहिल्या फेज मध्ये रिपेअरींग घेतलेली नव्हती. सेकंड फेज मध्ये ते म्हणत आहे रिपेअरींग घेतले आहे. पण आणखी मी एक उदाहरण म्हणुन सांगतो, प्रभात कॉलनी म्हणुन माझ्या प्रभागातला एक एरिया आहे. तो एक मुख्य रस्ता आहे प्रभात कॉलनीतला, कॉंक्रीटचा रस्ता आहे, ललितभाऊ येथे बसलेले आहे. ललित भाऊंचे आजोबा ज्या वेळेस नगराध्यक्ष होते त्या वेळेचा तो रस्ता केलेला आहे. मला वाटते ५०-६० वर्ष झाले असतील. ५० वर्ष म्हणजे तो रस्ता आजही चांगला होता. कॉंक्रीटचा रस्ता, त्यांचे आजोबांनी केलेला आहे ५० वर्षापुर्वी तो रस्ता आजही चांगला होता, आता त्या ठिकाणी अमृतचे काम झाले साईडने, अजुन तर ड्रेनेज बाकीच आहे. त्या ठिकाणी अमृतचे काम झाले त्या ठिकाणी चारी खोदली गेली, आणि त्या अमृतच्या कॉन्ट्रॅक्टरने रिपेअरींग केली. ती रिपेअरींग अश्या पध्दतीने केलेली होती की, मला त्याच्याशी वाद घालुन भांडण करुन सहा आठ महिन्यानंतर परत रिपेअरींग करुन घ्यावी लागली. आता सहा आठ महिन्यानंतर त्या रस्त्याला रिपेअरींग केल्यानंतर माझ्याकडे तुमच्यापैकी कोणीही या मी तुम्हाला दाखवितो की, त्या रस्त्याची रिपेअरींग कशी आहे. सादी क्लीनींग करत नाही, पाणी टाकत नाही. त्याच्याशिवाय तो कॉंक्रीट टिकणार कसे. म्हणजे दोन वेळी त्या रस्त्यासाठी मी वाद घालुन भांडण करुन डबल रिपेअरींग करुन घेतली त्यांच्याकडुन. तरी सुध्दा ते कॉंक्रीटचा रस्त्याचे रिपेअरींग व्यवस्थीत होत नाही. तर माझे आणि नितीनभाऊ मगाशी एक तासापुर्वी जे सगळयांना समजुन सांगत होते. सर्व सभागृहाला सांगत होते किंवा आपण जी चर्चा करत होते. आमचे हेच म्हणणे आहे. नितीनभाऊंचे दोन विषय महत्वाचे आहे. एक कॉंक्रीटचे रस्त्यांवर जो खर्च आपण करणार आहोत. त्याच्या किमतीमध्ये डांबरीकरणाचे कि.मी.मध्ये त्यांनी सांगितले, खुप मोठया प्रमाणावर काम होईल. कमीत कमी ३ पट काम होईल. संपुर्ण शहरात रस्ते बऱ्यापैकी कव्हर होतील. सभागृहाला जो निर्णय घ्यायचा आहे तो निर्णय घ्या. ते आपण नाही ठरविणार. भुमिका नितीनभाऊंनी मांडली आपण मांडत आहे. दुसरा विषय असा आहे. कॉंक्रीटचे रस्ते केल्यानंतर त्यांनी सांगितले की, रिपेअरींगची जबाबदारी त्यांनी घेतलेली आहे पण कॉंक्रीटचे रस्ते आपल्याला माहित आहे. आणि जर रिपेअरींग राहिली नसती. आता ते म्हणत आहे रिपेअरींग आपण घेणार आहोत त्याच्यामध्ये. जर रिपेअरींग असली, तर आपली महापालिका रिपेअरींग करेल का ? आणि समजा त्याचा खर्च काय येईल रिपेअरींगचा. जर इकडुन परवानगी नाही मिळाली तर. तुलनेमध्ये काम जास्त होईल, नंतर डांबरीकरणाचे रस्ते खोदले गेले तर ते रिपेअर होतील. सगळयांनी मिळुन या विषयावर चर्चा केली पाहिजे. सगळया शहरात पाहिजे, सगळे ठिकाण रस्ते गरजेचे आहे. जसे नितीनभाऊ म्हणत आहे कॉंक्रीटचे रस्ते करुन हे दाखवणे की, आम्ही खुप काही करत आहोत जास्त. असे विचार न करता सर्व समावेशक विचार करुन जास्तीत जास्त काम कसे करता येईल याच्यावर एक मत केले पाहिजे, असे माझे मत आहे धन्यवाद.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** रस्त्यांवरती चर्चा सुरु असतांना डांबरीकरण पाहिजे कॉंक्रीटीकरण पाहिजे. किंवा नियोजकाचा अभाव, ज्या गोष्टी नितीनभाऊ इतक्या पोटतिळकीने बोलले, तितके अभ्यासु व्यक्तीमत्व आहेच.कारण त्यांना ते अनुभव हा २७ वर्षाचा या महापालिकेचा आहे. आणि आताची जी परिस्थिती आपली जळगांव महापालिकेची आहे किंवा होती. देवेंद्रभाऊ पुर्वी मुख्यमंत्री असतांना सन २०१५-१६ ला २५ कोटी या जळगांव शहराला मंजुर केले. तो निधी खर्च होता होता थोडा त्रास झाला. नियोजनाच्या पुढेच काही गोष्टींमध्ये बदल होत असतो. जसे राजुभाऊंनी सांगितले, अश्विनभाऊंनी सांगितले की, पर्याय आपल्याकडे सगळया गोष्टींचा आहे. फक्त आपण पॉझिटीव्ह घ्यायचा विषय आहे की, डांबरी की कॉंक्रीट याच्यावर वादावाद न करता जे शासनाने आपल्याला, उपमुख्यमंत्री देवेंद्रभाऊ असतील, शिंदे साहेब मुख्यमंत्री आहे. पालकमंत्री गुलाबभाऊ आहे, गिरीषभाऊ आहे. शहराचे आमदार राजुमामा आहे. सगळे जणे या शहराची काळजी घेणेसाठी पोटतिळकीने व आपल्यासाठी निधी मंजुर करुन आणुन देत आहे. जो काही निधी आहे २००, ३००, ३५० कोटी आता पर्यंत, त्याची एकदा टोटल मारली आपण तर मला वाटते ३०० कोटीच्या वर निधी आहे जळगांव शहराला शासनाने दिलेली आहे. मी पुर्वीच्या महासभेत ही वारंवार बोलत आलेलो आहे. जसे नितीनभाऊंनी सांगितले की, इतिहासात पहिल्यांदा या जळगांव शहरात असे होत आहे की, ३०० कोटी रुपये आपल्याला मिळत आहे. त्यांचे नियोजनात काही चुकले असेल, राजुभाऊंनी सांगितले, सर्वांनी बसुन आपण नियोजन करुन काही बदल असतील, याच्या पुर्वीही केलेले आहे आपण बदल, काही चुका झाल्या असतील किंवा कामात बदल झाल्या असतील. तर आपण त्याच्यात बदल करुन शासनाकडुन, राजुमामा आपले शहराचे आमदार आहे. श्री.गिरीषभाऊ पालकमंत्री आहे, सांगुन तातडीने ते बदल करुन त्या कामाचे नियोजन करु शकतो. पण हे जेव्हा ३०० कोटी मिळत आहे. माझा उद्देश एकच आहे, विनंती आहे की, याच्यावर न चर्चा करता, न भांडता, ते ३०० कोटी रुपये जे शासनाने

आपल्याला दिले आहे. पण आपली महापालिकेची सगळयात महत्वाची जबाबदारी आहे की, आपण किती रस्ते लोकांना देतो आहे. महापालिकेच्या निधीतुन किती रस्ते झाले. मागे शुचितताई हाडांनी सांगितले होते सभागृहात की, महापालिकेच्या निधीतुन किती रस्ते झाले त्याची श्वेतपत्रिका काढा, सांगण्याचे तातपर्य हा आहे की, शासन देत आहे उदार मनाने तर त्याचे युटिलाईजेशन करुन घेणे आपले काम आहे. आणि आपण त्याच्यासाठी येथे चर्चा करणे किंवा नितीनभाऊंनी लक्षवेधी मांडुन सभागृहाच्या निदर्शनात आणले, काही अपव्यय होत आहे, काही डबल रस्त्यांवर कामे होत आहे. हे एकदम योग्य आहे. यासाठी प्रशासन आणि गटनेते बसले पाहिजे. कोणाला वाटत असेल डांबरीचे रस्ते सन्मा.नगरसेवकांना नको असेल, त्यांनी पत्र दिले पहिजे. याच्यात बदल करा, आपण शासनाला विनंती करु. पाठपुरावा करु. पण याच्यावरती चर्चा न करता कामांवरती नियोजन करुन त्याच्यावरती तातडीने कसे आपल्याला बसता येईल. आपण महापालिकेच्या भरोश्यावर राहिले. हे मनोजभाऊ चार महासभेपासुन बोलत आहे. त्याचा साधे ईस्टीमेट तयार होत नाही. झाले का त्याचे ईस्टीमेट मनोजभाऊ, तुम्ही ४ महासभांमध्ये बोलले. तो चतकोर न करता तो खत फॅक्टरीच्या कारखान्याचा रस्ता, ईस्टीमेट झाले नाही. अश्या बऱ्याच गोष्टी आहे तर या बऱ्याच गोष्टींकडे माझी एवढीच विनंती आहे सभागृहाला, याच्यावर चर्चा न करता याच्यावर मार्ग काढण्यासाठी आपण बसलो आहे. आपल्याला विश्वासात घेतले नाही. सरकार आपले मायबाप आहे. त्यांनी आपल्याला विश्वासात घेतले नाही. याचा अर्थ असा नाही. पण त्यांनी आपल्याला दिले. तर त्याचे युटीलाईजेशन करुन घेणे आपली जबाबदारी आहे. तर माझी एवढीच विनंती आहे सभागृहाला की, नितीनभाऊंनी सांगावे की, केव्हा बसायचे, कोणा कोणाला बसवायचे, प्रशासनाला बसवायचे. राजुमामा सांगतील आपण राजुमामांना बोलवु. त्यांच्या सोबत बसु. तिथुन झाले की, पालकमंत्री गुलाबभाऊ, गिरीषभाऊ सोबत बसु आणि काय बदल करायचे असेल काय नियोजन करायचे असेल तर करता येईल ना. माझी सभागृहाला एवढीच विनंती आहे. या निधीचे आपण लवकरात लवकर युटीलाईजेशन करण्यासाठी बसु आणि हे करु.

**श्री.अनंत जोशी :-** (आवाज स्पष्ट नसल्यामुळे काय बोलले समजत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा :-** आमचे दुखणेच हे आहे. या गोष्टीचे दुख होते की, निधी भरभरुन दिला जात आहे. आम्ही सुरुवातीला ज्यांनी ज्यांनी उपलब्ध करुन दिले त्यांचे आभार व्यक्त केले. आणि जो देईल त्याचे निश्चितपणे या महापालिकेवरती या शहरावरती ऋणी राहील. त्या बद्दल कोणाला वेगळे बोलायची आवश्यकता नाही.परंतु जसे आता विशालजींनी सांगितले की, मनोज भाऊ बऱ्याच महासभेपासुन सांगत आहे की, कचरा फॅक्टरीचा रस्ता तातडीने व्हायला पाहिजे. आमचे म्हणणे हेच आहे की, ज्या वेळेला आपण नियोजन करतो. तसेच ८५ कोटी रुपयांचे नियोजनाच्या संदर्भात भुमिका मांडली की, अनेक कामे त्याच्यामध्ये डबल डबल झालेले आहे. जी कामे दुसऱ्या कार्यादेशामध्ये समाविष्ट आहे. तिच कामे त्याच्यामध्ये प्रस्तावीत केलेली आहे. जर कधी या सभागृहातील सदस्यांना त्या ८५ कोटीच्या कामांचे नियोजन करण्याच्या संदर्भात विश्वासात घेतले असते. तर मनोजभाऊ त्यांचाही रस्ता त्याच्या मध्ये समाविष्ट करु शकले असते ८५ कोटी मध्ये. राजुभाऊंची जी व्यथा होती. राजुभाऊंनी त्यांचा मेहरुण रामेश्वर कॉलनीचा रस्ता त्याच्यामध्ये समावेश केला असता. परंतु मी म्हणतो ना की, हा जो निर्णय होता, या सभागृहाला विश्वासात न घेता होता, हेच आमचा दुख आहे. आम्हाला कोणावर टिका करायची नाही. जे जे या शहरासाठी प्रयत्न करत आहे निधी उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात आम्ही निश्चितपणे त्यांचे खुल्या मनाने त्यांचे आभार व्यक्त करतो. आम्ही मनापासुन त्यांचे ऋणी आहोत.परंतु ज्या पध्दतीचे नियोजनाबाबत आमचा आक्षेप जो आहे. तो या नियोजनावरती आहे. आणि ज्या पध्दतीचे नियोजन चाललेले आहे.ते खुप काही समाधानकारक नाही. हीच आमची कळकळीची विनंती आहे.

**श्री.अनंत जोशी :-** मा.विशालभाऊ, येणाऱ्या निवडणुकीत जेव्हा हात जोडायला जाऊ ना त्यावेळेस वर्कऑर्डरचे कागद हातात घेऊन जावे लागेल. तसे नका करु रस्ते दिसले पाहिजे. नाही तर कागद दाखवत आहात मंजुर आहे बरं, मंजुर आहे बरं.

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेवरी विषयांना सुरुवात करण्यात येत आहे.

**नगरसचिव :- विषय क्र. ०१ :-** दि.२१/०३/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या विशेष महासभा व दि.२१/०३/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता संपन्न झालेल्या सर्वसाधारण महासभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महासभेचे कार्यवृत्त कायम करण्यात यावे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौर महोदया, आयुक्त मॅडम, दि.२१/०३/२०२३ ला जी महासभा झाली. त्याच्यामध्ये ७ वा वेतन आयोगावर बऱ्याच वेळ चर्चा झाली आणि त्यावेळी बाविस्कर साहेब असतील, वानखेडे साहेब असतील, आयुक्त मॅडम असतील, महापौर मॅडम असतील सगळयांचे मी अभिनंदन करते की, त्या दिवशी मनपा आपला वर्धापन दिवस होता त्या दिवशी आणि त्याच दिवशी ठराव पाठविला, सर्व सन्मा.सदस्यांची मागणी होती. त्याच दिवशी त्यांनी वेळेवर तयार करुन पाठविला. त्याबद्दल मी सर्वांचे अभिनंदन करते, त्याच्यानंतर काय परिस्थिती आहे आता. कारण फॉलोअप घेतल्याशिवाय कुठलेही काम होणार नाही. मंत्रालयातील मी परिस्थिती बघितली परवाच्या दिवशी. म्हणुन मला माहिती हवी आहे. आता आपण ठराव तर पाठविलेला आहे पण आता या एका महिन्यामध्ये तो कुठल्या स्टेजला आहे त्याची माहिती जर आपल्याला असेल तर ती मला द्यावी.

**मा.आयुक्त :-** लेखापरिक्षणाच्या बाबतीत माहिती मागितली होती त्या बाबतीत बोलत आहात आपण.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** हो.

**मा.आयुक्त :-** ती माहिती आपण मंत्रालयातील नगरविकास विभागाकडे पुटअप करुन DAE कडे पाठविलेली आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** काय.

**मा.आयुक्त :-** त्यांच्या विभागातल्या DAE कडे पाठविलेली आहे. सर्व सामान्य विभाग त्यांच्याकडे पाठविलेली आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** आणि सर्वांचे आहे का ? जेवढयांचे आक्षेप घेतलेले आहे. ते पुर्ण आहेत का?

**मा.आयुक्त :-** पुर्ण तर नाही. लेखापरिक्षण विषयी अहवाल पाठविलेला आहे. आपण जो पाठविलेला आहे तो. पुर्ण पुर्ण.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** हे फॉलोअप कोण घेत आहे.

**मा.आयुक्त :-** फॉलोअप आपले कर्मचारी घेतात.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** कोणाला जबाबदारी तर दिली असेल ना. ७ व्या वेतन आयोगाचे डॉक्युमेंट्स कुठे पाठविले जातात. कोणी तरी एक घेत असेल ना. एक व्यक्ती त्यांच्या कडुन माहिती घेईल आणि कसा पत्र व्यवहार झाला काय नाही.याचा कोणी ना कोणी फॉलोअप घेत असेल ना. कोण घेतो.

मा.आयुक्त :- आस्थापना विभागाकडुन प्रस्ताव पाठविले जातात. आणि मग मा.उपसचिवांकडे आस्थापना विभागामार्फत विचारना होते.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** पण आपल्याकडे जी माहिती पुरवली जाते ती योग्य प्रकारे पुरवली जाते का ?

**मा.आयुक्त :-** आस्थापनाच्या सगळयांच्या सह्या होऊनच ती माहिती पुरवली जाते. मग ती तपासुनच पुरविली जाते.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** दुसरा एक विषय आहे की, जेव्हा जेव्हा आपल्याकडे काही पत्र व्यवहार येतात मंत्रालयामधुन, त्याचा पाठपुरावा म्हणजे जे जे खालील जे अधिकारी आहे. ते वर पर्यंत पोहचवत नाही. हा माझा आरोप आहे त्यामुळे आपण स्ट्रीक्टली जरी थोडेसे जे कोणी असतील. त्यांच्याकडुन वेळोवेळी माहिती घेऊन ७ वा वेतन आयोग आपल्या कर्मचाऱ्यांना कश्या पध्दतीने लवकरात लवकर लावण्यात येईल याच्यासाठी प्रयत्नशील असावे. एवढी विनंती आहे.

**नगरसचिव :- विषय क्र. ०२ :-** जळगांव नगररचना योजना क्र.०२,प्लॉट नं.११८/१ व ११८/२ या वरील तथागत गौतम बुध्द व भारतरत्न डॉ.बाबा साहेब आंबेडकर यांच्या पुतळयाची जागा स्मारकासाठी आरक्षित करुन भुसंपादन करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** टी.पी.स्कीम क्र.०२ अंतिम भुखंड क्र.११८/१ व २ येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाच्या संदर्भात एक वाद उपस्थित झालेला होता. आणि ते वाद उपस्थित झाल्यानंतर संपुर्णत: जी घटना घडली होती. ती अत्यंत निषेधार्थ अशी घटना होती. ज्या बाबासाहेबांनी या देशाला संविधान दिलेले आहे. आणि अश्या पध्दतीने कुठलीच कायदेशीर प्रक्रिया न राबविता, तो पुतळा तेथुन हटवण्याच्या संदर्भातला, जो काही प्रकार झाला, तो अत्यंत निंदणीय आहे. या सगळया गोष्टींचा विचार करता, निश्चितपणे बाबासाहेबांवरती या देशाच्या प्रत्येक नागरीकाची आस्था आहे.आणि विशेषत: आमचे जे दलित बांधव आहे. त्यांच्या भावनांना मोठया प्रमाणावरती ठेच पोहचलेली आहे. आणि त्या दृष्टीकोणातुन रिपब्लीकन ऑफ इंडिया यांचे पदाधिकारी यांच्या अनेक संस्थांनी अश्या पध्दतीचे निवेदने

महानगरपालिकेला दिलेली आहे. आमचे मित्र राजेशभाऊ झाल्टे, सन्मा.सदस्य श्री.सुरेशभाऊ सोनवणे, प्रत्येक पक्षाच्या सदस्यांना भेटुन पर्सनली विनंती केलेली आहे की, हा आमच्या सामाजिक भावनेचा विषय असल्या कारणाने त्याचा सकारात्मक विचार होऊन या संदर्भात हा भुखंड बाबासाहेबांच्या पुतळयासाठी आरक्षीत करण्याच्या संदर्भात विनंती केलेली आहे. या सगळया गोष्टींचा विचार करता, नगररचना क्र.०२ अंतिम भुखंड क्र.११८ मध्ये अंतिम भुखंड क्र.११८/२ हा भुखंड भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पतळयासाठी संपादन करण्याच्या संदर्भात प्रशासनाने प्रस्तावीत केलेली रक्कम जी आहे. २,८१, ३३,७२०/- या विषयाला मान्यता देण्यात यावी. आणि या संदर्भात एक शिस्त मंडळ मा.जिल्हाधिकारी साहेबांना भेटायला गेलेला असतांना मा.जिल्हाधिकारी महोदयांनी, या संदर्भात महानगरपालिकेची आर्थिक परिस्थितीचा विचार करता, या संदर्भात लागणारा निधी नियोजन मंडळाकडुन सुध्दा उपलब्ध करुन देता येईल. अश्या पध्दतीचे वक्तव्य वृत्तपत्रातुन वाचण्यात आले. तर या पध्दतीने भुसंपादन सुरु करण्याच्या संदर्भातला निर्णय ही सभा घेत आहे. पर्यायी येणारा जो काही खर्च आहे रु.२,८१,३३,७२०/- या संदर्भात या खर्चाची परिपुर्तता करण्यासाठी ही रक्कमची मागणी जिल्हा नियोजन मंडळातर्फे करण्यात यावी. या संदर्भात राजेशभाऊ झाल्टे आणि सुरेशभाऊ ज्या वेळेला आले होते. त्यांनाही ही वस्तुस्थिती मान्य आहे. आणि त्यांनी सांगितले की, हा निधी उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात मा.पालकमंत्री महोदयांना विनंती करु. आणि मला वाटते की, मा.पालकमंत्री महोदय ही या नाजुक विषयाच्या संदर्भात आर्थिक मदत देण्याच्या दृष्टीकोणातुन विचार करतील. असे वाटत आहे. आणि त्या दृष्टीकोणातुन हा प्रस्ताव मान्य करुन संदर्भीय निधी ज्या वेळेला या निधीची भुसंपादनाच्या संदर्भात रक्कम भरण्याची प्रक्रिया सुरु होईल. त्यावेळेला नियोजन मंडळाला निधीची मागणी करण्यात यावी. अश्या पध्दतीचा ठराव पारित करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.सुरेश सोनवणे :-** हा जो प्रस्ताव आलेला आहे सर्व प्रथम मी सन्मा.सदस्य यांचे मनापासुन अभिनंदन आणि धन्यवाद करतो. आणि माझ्याकडुन मागच्या वेळेस प्रशासन आयुक्त मॅडम बद्दल काही बोलले गेले असेल, त्या बद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो. तो जो भुखंडाचा प्लॉट आहे तो महापालिकेने मोजुन मापुन घ्यावा कारण त्याच्या आजुबाजुला अतिक्रमण चाललेले आहे, अतिक्रमण झालेले आहे. तर माझे एकच म्हणणे आहे, ते भुसंपादन करुन महासभेच्या माध्यमातुन सर्व गटनेते असतील पालकमंत्री असतील,आमदार श्री.राजुमामा भोळे, श्री.गिरीषभाऊ असतील, त्या बद्दल राज्य शासनाला एक ठराव पाठवण्यात यावा आणि तेथे बाबासाहेबांचा जिल्ह्यामध्ये संविधान भवन बांधण्यात यावे.हीच माझी सभागृहाला विंनती राहील. जय भिम.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्य नितीनभाऊ आणि सुरेशभाऊ यांनी मांडलेल्या ज्या सुचना आहे त्याची प्रशासनाने नोंद घ्यावी आणि तसा ठराव तयार करावा. विषय क्र.२ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१०५१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव नगररचना योजना क्र.०२,प्लॉट नं.११८/१ व ११८/२ या वरील तथागत गौतम बुध्द व भारतरत्न डॉ.बाबा साहेब आंबेडकर यांच्या पुतळयाची जागा स्मारकासाठी आरक्षित करुन भुसंपादन करणे बाबत या विषयास अनुसरुन जिल्हाधिकारी जळगांव यांचे कार्यालयात दि.२८/०३/२०२३ रोजी बैठक संपन्न झालेली असून त्यानूसार अर्ज प्राप्त झालेले असून त्या अनुषंगाने अहवाल खालील प्रमाणे,

१) जळगांव शहरातील टी.पी.स्किम नं.०२ अंतिम भुखंड क्र.११८ याचे एकुण क्षेत्र मंजुर पुस्तिकेनुसार ११७८.४० चौ.मी. असे असुन, सदर प्लॉटची मालकी श्री.वसंत रामचंद्र शर्मा या नावे नोंद आहे. नगररचना योजनेच्या मंजुर स्किम नकाशानुसार व जळगांव शहराकरीता शासनाने अधिसुचना क्र.टी.पी.एस.३५८८/१९४/सि.आर.-९७/युडी-९ दि.०६/०१/१९९३ अन्वये सुधारीत विकास योजना जळगांव (जुनी हद्द) मंजुर केलेली असून उक्त विकास योजना दि.१५/०२/१९९३ पासुन अंमलात आलेली आहे. व सदर मंजुर वि.यो.नकाशात सदरची जागा/प्लॉट रहिवास प्रयोजनार्थ दर्शविलेली आहे.

२) अभिलेखातील उपलब्ध संचिके नुसार सदर जागे बाबतची पार्श्वभूमी खालील प्रमाणे,

अ) तत्कालीन न.पा.ठराव क्र.५६४ दि.२८/०२/२००० नुसार सदर जागा म्युनिसीपल पर्पज करीता प्रयोजन करणे बाबत पारीत झाला या नुसार भुसंपादन प्रस्ताव दि.२५/०४/२००० रोजी जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सादर करण्यात आला.

ब) पुनश्च तत्कालीन नगरपालिकेने ठराव क्र.११८अ दि.१५/०४/२००० अन्वये सदर जागेचे प्रयोजन म्युनिसीपल पर्पज ऐवजी “कला, हस्त कौशल्य, सांस्कृतिक केंद्र व वस्तु संग्रहालय” करीता संपादन करणेस मंजुरी प्रदान केली व त्यानुसार अंतिम भुखंड क्र.११८ क्षेत्र ११७८.४० चौ.मी. जागा भुसंपादनाचा भुसंपादन प्रस्ताव जमिन भुसंपादन अधिनियम १८९४ चे तरतुदीनुसार जिल्हाधिकारी यांचेकडे संदर्भ क्र.५६३ दि.२६/०६/२००० अन्वये सुधारीत भुसंपादन प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर अंतिम भुखंड क्र.११८ हा कला, हस्त कौशल्य, सांस्कृतिक केंद्र व वस्तु संग्राहलयासाठी भुसंपादन अधिनियम १८९४ अन्वये संपादन करण्यास हरकत नसल्याचे नाहरकत पत्र सहाय्यक संचालक नगररचना शाखा कार्यालय,जळगांव यांनी त्यांचेकडील संदर्भ पत्र क्र.वियो/जळगांव/नरयो क्र.०२/अ.भु.क्र.११८/ससं-जळ/१३९३ दि.२३/०६/२००० अन्वये नगरपालिकेस कळविले.

क) विशेष भुसंपादन अधिकारी यांनी कलम ४ ची अधिसुचना दि.३०/०९/२००० रोजी शासकीय राजपत्रात प्रसिध्द केली.

ड) पत्र क्र.५४६ दि.२७/०८/२००१ अन्वये उपविभागीय अधिकारी जळगांव यांना अंतिम भुखंड क्र.११८ चे संदर्भात कलम ०६ ची अधिसुचना प्रसिध्द होण्याची कार्यवाही करणेबाबत पत्र व्यवहार करण्यात आला तसेच नर/१०६८ दि.२७/११/२००१ अन्वये सुध्दा अप्पर जिल्हाधिकारी जळगांव यांना कलम ०६ ची अधिसुचना प्रसिध्द करणे संदर्भात पुनश्च पत्र व्यवहार करण्यात आला.

इ) अंतिम भुखंड क्र.११८/१ क्षेत्र ४६७.७५ चौ.मी. चे मालक अब्दुल हुसेन गुलामअली अम्रेरेलीवाला यांनी भुसंपादन कलम ४ चे कार्यवाही विरोधात मे.उच्च न्यायालयात रिट पिटीशन नं.१७०३७/२००१ अन्वये दावा दाखल केला.

ई) श्री.अब्दुलहुसेन गुलामअली अम्रेरीलीवाला व श्री.अजगरअली गुलामअली अम्रेरीलीवाला यांनी जमिन भुसंपादन अधिनियम १८९४ मधील कलम ४ बाबत नगरपालिकेमार्फत सुरु करण्यात आलेल्या कार्यवाही बाबत हरकत घेतलेली असल्याचे व शासन विरुध्द मे.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपिठात दावा क्र.३६७४/२००१ दाखल केलेला असुन कलम ०४ चे कार्यवाहीला दि.१३/०२/२००२ पर्यंत स्थगीती मिळालेली असल्याबाबत कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना संदर्भ पत्र क्र.२००९ दि.१६/०३/२००२ अन्वये कळविण्यात आले.

प) श्री.ए.जी.अम्रेरेलीवाला यांनी दि.१७/०१/२००५ रोजी सभापती, स्थायी समिती, जशमनपा जळगांव यांना टीपी-०२ मधील अ.भु.क्र.११८/१ ची एक्वायर करण्याची कार्यवाही सुरु आहे ती रद्द करणेबाबत अर्ज केला त्यावर स्थायी समिती, ठराव क्र.४० दि.२६/०४/२००५ अन्वये भुसंपादन कार्यवाही रद्द करणे योग्य होणार नाही या बाबत आयुक्त यांचे प्रस्तावानुसार कार्यवाही करणेस मंजुरी देण्यात आली.

फ) श्री.अब्दुल हुसेन गुलाम अमरेलीवाला व इतर यांनी महाराष्ट्र शासन विरुध्द रिटीपिटीशन (क्र.८५९६/२००५) अन्वये अ.भु.क्र.११८/१ क्षेत्र ४६७.७५ चौ.मी. क्षेत्र भुसंपादना बाबत याचिका दाखल केली त्या अनुषंगाने उपायुक्त, म.न.पा.जळगांव यांनी स्थायी समिती ठराव क्र.४० दि.२६/०५/२००५ नुसार भुसंपादन प्रक्रिया रद्द करणे योग्य होणार नसलयाबाबत ठराव पारीत केलेला असल्याने व सहाय्यक संचालक, नगररचना शाखा कार्यालय,जळगांव यांनी संदर्भ क्र.१३९३ दि.२३/०६/२००० अन्वये भुसंपादन करण्यास नाहरकत दिलेली असल्याचे व सदर रिटपिटीशन खारीज करणे बाबत चे प्रतिज्ञापत्र मे.उच्च न्यायालयात दि.११/०९/२००७ रोजी सादर केले मे.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपिठ यांनी रिटपिटीशनर यांनी रिट याचिका मागे घेतल्याने दि३.०७/०४/२००८ रोजी सदरची याचिका खारीज केली.

भ) मुळ संचिकेचे अवलोकन केले असता भुसंपादन अधिनियम १८९४ चे रुपांतर नवीन भूसंपादन अधिनियम २०१३ मध्ये झाल्यानंतर भुसंपादनातील योग्य नुकसान भरपाईचा अधिकार व स्थानांतरण, पुर्नस्थापना, आणि पुर्नवसन अधिनियम २०१३ अन्वये उक्त जागेचा भूसंपादन प्रस्ताव पाठविण्यात आलेला असल्याचे दिसून येत नाही.

३) टि.पी.स्किम नं.०२, अ.भु.क्र.११८ या भुखंडाचे एकुण क्षेत्र ११७८.४० चौ.मी व सदर प्लॉटचे सब-डिव्हीजन संदर्भ क्र.५९४ दि.२१/०८/१९७६ अन्वये सहाय्यक संचालक, नगररचना शाखा कार्यालय जळगांव यांचेकडून अनुक्रमे अंतिम भुखंड क्र.११८/१ क्षेत्र ४६७.७५ चौ.मी. व भुखंड क्र.११८/२ क्षेत्र ७१०.६५ चौ.मी. असे मंजुर असल्याचे दिसुन येते.

४) टी.पी.स्किम नं.०२ अंतिम भुखंड क्र.११८/१ च नविन मालक स्पार्क इन्फ्रास्ट्रक्चर जळगाव चे भागीदार श्री.शैलेश शरद कासट व इतर यांना सदर भुखंडावर प्रस्तावित लोअर बेसमेंट + अप्पर बेसमेंट + ग्राउंड फ्लोअर अशी एकुण २९६.०१ चौ.मी. बांधीव क्षेत्रफळा करीता वाणिज्य प्रयोजनार्थ सहायक संचालक नगररचना यांनी संदर्भ क्र.टीपी/बीपी/०६९१ दि.२२/०९/२०२१ अन्वये बांधकाम परवानगी देण्यात आली असल्याचे दिसुन येते व जागेवर बांधकाम सुरु असल्याचे दिसुन येते.

५) टी.पी.स्किम नं.०२ अंतिम भुखंड क्र११८/२ क्षेत्र ७१०.६५ चौ.मी. या जागे संदर्भात श्री.प्रशांत शरद देशपांडे यांनी सदर जागेवर असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अनाधिकृत पुतळा काढणे संदर्भात जिल्हाधिकारी जळगांव यांना दिलेला अर्ज अप्पर जिल्हाधिकारी जळगांव यांचे मार्फत त्यांचे संदर्भ पत्र क्र.दंडप्र/०२/तक्रार/कावि/२०२२/३१२०३ दि.२७/०६/२०२२ अन्वये जळगांव महानगरपालिकेकडे प्राप्त झाल्यानुसार अप्पर जिल्हादंडाधिकारी यांना ‘ सदर मिळकत खाजगी स्वरुपाची असल्याने व पुतळा बसविण्यास परवानगी देण्यात आल्याचे दिसुन येत नसल्याबाबत ’ चे अभिप्राय जा.क्र./नर/१२९६ दि.२०/१२/२०२२ अन्वये कळविलेले आहे.

६) आता वर नमुद संदर्भीय अर्जानुसार विविध संस्थांनी तसेच सन्मा.नगरसेवक श्री.सुरेश माणिक सोनवणे प्रभाग क्र.१०अ यांनी सदर जागा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व तथागत गौतम बुध्द यांच्या स्मारकासाठी आरक्षित करुन भुसंपादन करणेबाबत विनंती अर्ज केलेला आहे. तथापि वरील बाबी विचारात घेता सदर जागेवर म्हणजेच अंतिम भुखंड क्र.११८ क्षेत्र ११७८.४० चौ.मी. वर “ कला हस्तकौशल्य, सांस्कृतिक केंद्र व वस्तुसंग्राहलयासाठी” प्रयोजना करीता यापुर्वीचे ठराव पारीत आहेत. मात्र भु.क्र.११८/१ क्षेत्र ४६७.१५ चौ.मी. या भुखंडावर बांधकाम परवानगी देते वेळी सदरची बाब विचारात घेतलेली असल्याचे दिसुन येत नाही.

उर्वरीत अंतिम भुखंड क्र.११८/२ क्षेत्र ७१०.७० चौ.मी. हे सुची क्र.०२ नुसार १) श्री.अमित एकनाथ पाटील २) श्री.प्रशांत शरद देशपांडे यांच्या मालकीची असल्याचे दिसुन येते. त्यामुळे अंतिम भुखंड क्र.११८/२ ची जागा संपादीत करावयाची झाल्यास त्यास प्रचलीत रेडीरेकनर दरानुसार (७१०.७० चौ.मी. x १९८००/- x २ ) रु.२,८१,४३,७२०/- इतका अंदाजित खर्च अपेक्षित राहिल व उक्त जागेवरील प्रयोजन निश्चित करणे कामी निर्णय होणे आवश्यक आहे.

तसेच जिल्हाधिकारी जळगांव यांचे अध्यक्षतेखाली दि.२८/०३/२०२३ रोजी भारतरत्न डॉ.बाबा साहेब आंबेडकर व भगवान गौतम बुध्द यांचा महानगरपालिका हद्दीतील नगररचना योजना क्र.०२ अंतिम भुखंड क्र.११८ या जागेतील पुतळयाबाबत बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत उपरोक्त जागेत सन १९८३ मध्ये डॉ.बाबा साहेब आंबेडकर यांचा पुतळा बसविलेला असले बाबत तसेच या ठिकाणी सन १९९९ पर्यंत झोपडपट्टी होती. तथापि झोपडपट्टी पुर्नवसन मध्ये सदर जागेतील नागरिकांना दुसरीकडे जागा दिल्याने नागरिक दुसरीकडे राहायला गेलेत तथापि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा त्याच जागी आजही आहे. त्यामुळे सदर जागेचे संपादन करुन त्या जागेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा कायम ठेवावा अशी मागणी समस्त बांधव, बौध्द वसाहत सेवा संघ, मा.जिल्हाध्यक्ष समता सैनिक दल, मा.युवक महानगर अध्यक्ष, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया व मा.नगरसेवक श्री.सुरेश माणिक सोनवणे यांनी दि.२७/०३/२०२३ च्या पत्रान्वये केली आहेत. त्या अनुषंगाने व बैठकीत ठरल्यानुसार महानगरपालिकेने भुसंपादनाचा प्रस्ताव सादर करावा अशा सुचना जिल्हाधिकारी यांनी बैठकीत दिल्या.

त्या अनुषंगाने, नगररचना योजना क्र.०२ अंतिम भुखंड क्र.११८ मध्ये वर नमुद केल्याप्रमाणे पुर्वीपासुन भारत रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आहे. सदर जागा खाजगी मालकीची आहे. या जागे पैकी अंतिम भुखंड क्र.११८/१ मध्ये सन २०२१ मध्ये महानगरपालिकेने बांधकाम परवानगी दिलेली आहे. म्हणजेच आता अंतिम भुखंड क्र.११८/२ हा भुखंड डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळयासाठी संपादन करणेसाठी शिल्लक असल्याने अंतिम भुखंड क्र.११८/२ हा भुखंड भुसंपादन करणेस तसेच सदरची जागा तथागत गौतम बौध्द व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाची जागा स्मारकासाठी आरक्षित करणेस तसेच मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनूसार जळगांव नगररचना योजना क्र.०२,प्लॉट नं.११८/१ व ११८/२ या वरील तथागत गौतम बुध्द व भारतरत्न डॉ.बाबा साहेब आंबेडकर यांच्या पुतळयाची जागा स्मारकासाठी आरक्षित करुन भुसंपादन करणे कामी येणारा खर्च हा जिल्हा नियोजन मंडळामार्फत करणेस व त्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडेस प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर जागेचे मोजमाप करुन घ्यावे व सदर जागेवर संविधान भवन बांधण्यात यावे.

**सर्वानुमते मंजुर**

| | | |
|---|---|---|
| **अनुकूल -** | **६०** | |
| **सूचक** | **:-** | **लढ्ढा नितीन बालमुकुंद** |
| **अनुमोदक** | **:-** | **पाटील कुलभुषण विरभान** |

**नगरसचिव :- विषय क्र. ०३ :-** प्रभाग क्र.०२ अंतर्गत कालंकामाता मंदिरापासुन ते सदगुरु किराणा स्टोअर्स पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे कामी अंदाजीत रक्कम रु.३६,९५,८६४/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरताई, विषय क्र.३ ते विषय क्र.५ हे तिन्ही विषय विकास कामांचे आहे आणि सारखेच आहे. तर विषय क्र.३,४,५ हे मान्य करण्यात यावे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**ॲड.शुचिता हाडा :-** विषय क्र. ३,४,५ विकास कामांचे विषय असल्यामुळे त्यास विरोध नाही त्यांना मंजुरीच आहे. पण या निमित्ताने पुन्हा मला प्रशासनाला हे विचारायचे आहे की, वारंवार आम्ही सगळे सदस्य मागणी करत आहोत की, महानगरपालिका फंडात झालेल्या प्रत्येक प्रभागातील कामांची श्वेतपत्रिका आपण कधी काढणार आहे. आता हे नविन आर्थिक वर्ष सुरु झालेले आहे आयुक्त महोदया, ही जे कामे आपण प्रभाग क्र.२ मध्ये टाकलेले दिसत आहे. जवळपास ३६,३७,३८, ४० लाखाचे कामे हे दिसत आहे. या नविन आर्थिक वर्षात जे मनपा फंडात आपण टाकलेले आहे. यापुर्वीचे गेल्या आर्थिक वर्षातले, मनपा फंडातले कोणत्या प्रभागात कोणते किती कामे झाली, याची एक श्वेतपत्रिका आपण कधी देणार. या महापालिकेला याची आज तारीख आपण निश्चित करावी. जेणे करुन सगळया सदस्यांच्या लक्षात येऊ शकेल की, मनपा फंड कश्या पध्दतीने वापरला गेलेला आहे. आणि निदान येथुन पुढे तरी काही गोष्टींना आळा घातला जाऊ शकतो. दुसरी गोष्ट या बजेटमध्ये नगरसेवक निधी एक नविन लेखाशिर्ष उघडलेला आहे. या नविन लेखाशिर्षानुसार प्रत्येक प्रभागामध्ये एक समसमान वाटा आपण त्या नगरसेवकांना देणार आहोत. आयुक्त महोदया मला हे विचारायचे आहे की, मनपा फंडाच्या अंतर्गत प्रत्येक प्रभागात चालणाऱ्या कामांबद्दलचे काही स्वतंत्र रजिष्टर आपण मेनटेन करत आहात का ? आम्हाला या बद्दलची माहिती कशी आणि कुठुन उपलब्ध होणार. आपल्यालाही सुचना आहे की, या चालु आर्थिक वर्षाचे एक स्वतंत्र दप्तर आपण मेनटेन करावे मनपा फंडातील कामाचे.आणि मागच्या आर्थिक वर्षाची श्वेतपत्रिका आपण कधी देणार आहे.

( आवाज स्पष्ट नसल्यामुळे व चित्रीकरण न दिसल्यामुळे कोण काय बोलले समजले नाही.)

**ॲड.शुचिता हाडा :-** दोन मिटींग नाही त्याच्या फार पुर्वीपासुन आपण मागणी करत आहोत.पुर्वीपासुन आपण सर्वीकडुन मागणी करत आहे. पहिले एखादा सदस्य मागणी करत होता. पण अजुन ही प्रशासन देतच नाही.

**मा.आयुक्त :-** मनपा फंडात जी कामे केली जातात. ती सर्व अभिलेख्यांची माहिती असते. रस्त्याची माहिती असते, कोणत्या फंडातुन कोणता रस्ता केला जातो.तर त्याची माहिती आपण जे.ई.कडुनच शहर अभियंत्यांकडे संकलीत केली जाते.कुठेच माहिती नाही असे नाही. माझ्याकडे मी एक एक्सट्रा सेट तयार करुन ठेवत असते. मी आयुक्त झाल्यानंतर किती जे.एम.सी.फंडातुन कामे झाली आहे. तर असे नाही की, याची नोंद कुठेच नाही. आपल्या जे.ई. निहाय याची नोंद असते. दुसरा मुद्दा आहे की, इक्वल डिस्ट्रीब्युशन ऑफ फंड होत नाही. तर या मध्ये असे आहे की, जो निधी मनपाचे स्वहिस्स्याशी रिलेटेड होता. म्हणजे शासनाने ७०% निधी मंजुर केला आणि ३०% त्याला जे.एम.सी.फंड जोडलेला आहे. त्या जे.एम.सी.फंडच कदाचित एखाद्या प्रभागानिहाय जास्त असु शकतो.परंतु प्रत्येक जे.एम.सी. प्रभाग निहाय आपण मार्जीन दिलेली असते, अॅकॅर्डींग टु जेवळा निधी आपल्याला मिळतो. त्याप्रमाणे २० ते २५ लाख रुपये आपण खर्च करु शकतो का ? ५० लाखापर्यंत खर्च करु शकतो का ? आणि त्याप्रमाणे आपण प्रत्येक प्रभागामध्ये काम करतो. हा जो तुम्ही निधी दिसत आहे की, एखाद्या प्रभागामध्ये खुप जास्त एम.सी.फंड दिलेला आहे. तो तिथेच दिलेला आहे जिथे शासकीय निधी दिलेला आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मॅडम हा जो निधी आहे आमच्या वार्डातला सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकानुसार हा मागचा बजेट आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** विरोध नाही त्या विषयाला.

**ॲड.शुचिता हाडा :-** आयुक्त महोदया, आपल्याकडे माहिती उपलब्ध आहे तर श्वेतपत्रिका काढायला काय लागत आहे. जर हे सगळ उपलब्ध आहे तर श्वेतपत्रिका प्रशासन का देत नाही.

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई मनपा फंडाच्या संदर्भात, नितीनभाऊ आपण वेळोवेळी जे सांगतात, रस्ते खोदले जातात हे होतं. आता कोणालाही विकासाच्या कामांना कोणाचाच विरोध नाही. आता आमच्या प्रभागामधील रस्ते त्यांची वर्कऑर्डर मिळालेली आहे. त्या ठिकाणी रोड क्रॉसींगचे कल्व्हर्ट तयार करण्यासाठी, रस्ता बनवायच, परत फोडायचे कल्व्हर्ट करायच. त्याचे एक पुर्व नियोजन मी दोन तिन महिन्यापासुन मॅडमांच्या मागे लागुन मी करत आहे. साद्ये ८-९ लाखाच्या निधीला सुध्दा परवानगी मिळत नाही. काल अक्षरश: शेवटच्या टोकाला बोलल्यानंतर त्यांनी ते प्रसिध्दीसाठी पाठविले,जर तिन तिन महिने तुम्ही या कामांकडे लक्ष देणार नाही. आता मी मनपा निधी संदर्भात माहिती मिळावी पुर्ण शहराची.दि.२४/०३/२०२३ ला मी पत्र दिलेले आहे शहर अभियंत्यांना. आजची तारीख काय आहे २१, आता तिन दिवस झाले की, एक महिना पुर्ण होईल या गोष्टीला. अजुन पर्यंत महिती मिळालेली नाही. सदस्यांना जर तुम्ही मोजत नसाल,ते लोकप्रतिनिधी म्हणुन नागरीकांच्या समस्या येथे घेऊन येतात ना.आम्हाला जर तुम्ही हे देत नसाल तर नागरीकांना काय देतील ? ज्या वेळेला घरपट्टी विभागामध्ये भाऊ, एखाद्या कडुन रु.२५००/- चा भरणा चुकीने जास्त झाला, ऑनलाईन झाला दिसत नाही ऑफलाईन केला, त्याच्यासाठी अडीच हजार खुप मोठे आहे. तो त्यांना सांगतो प्रभाग अधिकाऱ्यांना की, हे आपण समाविष्ट करा किंवा आम्हाला परत रिफंड करा. रिफंड पण करत नाही समाविष्ट पण करत नाही. चार चार त्यांचे अर्जफाटे एन.ओ.सी.असता, यांना जर फिरवायचेच आहे, आता अश्विनभाऊ बोलले एकही अधिकारी त्या ठिकाणी स्पॉट व्हिजीटला येत नाही. हे ऑफिसमध्ये बसलेले असतात. मग हे काम तर ऑफिस मधलेच आहे. पण हे काम तरी त्यांनी तत्पर्तेने केले पाहिजे ना. एक एक महिना होतो, नगरसेवक तुमच्याकडे निधीची माहिती मागतो,शुचिताताई श्वेतपत्रिकेच्या संदर्भात माहिती विचारता, ज्योतीताई चार चार वेळा बोलत आहे. पोरखेळ चालु असेल, जर तुम्हाला सदस्यांच्या बाबतीत गांभिर्य नसेल, तर आपण या ठिकाणी स्पष्ट एक मत मांडतो की, आपल्या कुठल्याच पत्राला आम्ही माहिती पुरवुच शकत नाही.हे बघा माहिती घ्यायला गेलो कार्यालयामध्ये तर एका तासात मिळेल, कुठलेही पत्र न देता, पण मला लेखी स्वरुपातली माहिती हवी आहे. जर ते आपले ऐकत नसतील तर आम्ही करायचे काय ? कुठेच तुम्ही गांभिर्य घेत नाही. ते कल्व्हर्ट तुम्हीच करतात, आता रस्त्याचे काम सुरु होईल.आता परवा आम्ही एक रस्त्याची पाहणी करत होतो.अमृतचे, ड्रेनेजचे लोकं होते. बोरोले साहेब वगैरे सगळे होते. भाऊ त्या रस्त्याच्या कामाची सुरुवात करायची आहे. तेथुन ड्रेनेज गेलेले आहे. ते ड्रेनेज चेंबर वर करायचे आहे. त्या ठिकाणी आता नागरीक ज्यांची जोडणी करायची बाकी आहे ड्रेनेजच्या आता त्या ठिकाणी फिरत असतांना आम्हाला सांगितले की, नागरीकांनी हे खर्च करायचे आहे. तेथे संध्याकाळी मी नागरीकांची बैठक घेतली, नागरीकांना हा विषयच माहित नाही. नागरीकांचा उलट लोकप्रतिनिधीवर आक्षेप तयार झालेला आहे. याच्यामागे तुमच काही तरी दिसत आहे. मग नागरीकांपर्यंत तुम्ही ते कळवा ना.आता माझ्याच प्रभागामध्ये डांबरीकरण होऊन गेले आता त्याच्यामध्ये जोडण्या बाकी आहे. आता परत ते रस्ते खोदायचे. मग तुम्ही हे लोकांना कळवा ना की, याचा खर्च तुम्हाला करायचा आहे की, महापालिकेला करायचा आहे. हे आपण माध्यमातुन कळवा ना सगळयांना.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** सन्मा.सदस्यांचे मला पत्र मिळालेले आहे, आणि महापालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये आता सर्वांना सांगायचे तर माझ्या कडील स्टॉफ खुप कमी आहे. माझ्याकडे फक्त दोन लिपीक आहे. एक मनपाचे काम करतो एक निधीचे काम बघतो, मनपाच्या सार्वजनिक विभागामध्ये दोन रजिष्टर असतात, जी कामे मंजुर झाले त्यांची वर्कऑर्डर देण्यात आली, त्यांची वर्कऑर्डर रजिष्टर मध्ये नोंद आहे. ते कन्टीन्यु चालते.वर्षवाईज त्याची रजिष्टरमध्ये नोंद होते.

**श्री.जितेंद्र मराठे :-** साहेब तुमच्यापेक्षा माझ्याकडे पण २० हजार मतदार संख्येचा प्रभाग आहे. तुमच्यापेक्षा आम्हाला ही जास्त ताण आहे प्रभागामध्ये. आम्ही कारणे नाही दाखवत, आम्ही नागरीकांना हे कारणे सांगु का ? अधिकाऱ्यांकडे कर्मचारी नाही.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** कारणे नाही मी वस्तुस्थिती सांगत आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** वस्तुस्थिती नाही, हे बघा आम्ही निवडुण आल्यापासुन आम्हाला माहित आहे. कर्मचारी नाही, यांच्याकडे दोन दोन तीन जबाबदाऱ्या आहे. देऊ नका, सोडा ना जबाबदाऱ्या सोडा, बाजुला व्हा, दुसरे येतील तेथे, काय लावले आहे प्रत्येक वेळेस, याचा लोड आहे, त्याचा लोड आहे, नागरीकांना सांगु का आम्ही.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** तुम्ही जी माहिती मागितली होती, २०१९ पासुन ती पाच वर्षाची माहिती होती. ती माहिती कॉमप्युटराईज करायला मी माणुस लावला सकाळीच, आणि ते अश्या वेळेला लावला की, आपल्याकडे सगळयात जास्त टेन्डर प्रक्रियेचे काम चालु होते. आता सन २०२२-२३ मध्ये २०० कामांचे वर्कऑर्डर आणि टेन्डर झ ाालेले आहे. आणि आता जे ५-७ कामे आहे त्यांची प्रोसेस चालु आहे. म्हणजे त्या २०० कामांच्या वर्कऑर्डर करणे, शेड्युल-बी करणे, करारनामे वगेरे सगळे करणारे दोन व्यक्ती आहे माझ्याकडे, त्याच्याकडे कामाचा लोड होता त्याला जसा वेळ मिळेल शनिवार रविवार येऊन त्याला हे सगळ कॉमप्युटराईज सिस्टीममध्ये करायला सांगितले होते. आणि ते कालच्या तारखेमध्ये २०१९ पासुन ते सगळी ही कॉमप्युटराईज यादी तयार आहे. आता तुम्ही केव्हा ही जर मागितली तर १० मिनीटात मी ती देऊ शकतो, आता राहिला श्वेतपत्रिकेचा विषय, तर आयुक्त मॅडम त्या बद्दल शास्वती देतीलच, आता आमच्या विभागाकडे जी काही माहिती तयार करायची होती. ती माहिती माझ्याकडे तयार आहे. माझी विनंती आहे की, त्यांनी ती माहिती महासभेनंतर घेऊन घ्यावी.

**ॲड.शुचिता हाडा :-** प्रसिध्द करुन टाका श्वेतपत्रिका.

**श्री.नितीन बरडे :-** सोनगिरे साहेब, त्यांना तुमच्या ऑफिस मध्ये आणा त्यांना किती असतील तुम्हाला माहिती आहे. तुम्हाला सर्व माहित आहे. तुमच्या बांधकाम विभागात युनिटवर फुकट पगार घेणारे किती आहे. ऑफिसला बोलवा त्या सर्वांना, सह्या करुन घरी जातात. त्यांना एकदा ऑफिसला पाठवुन द्या ना. तुम्हाला माहित आहे. कोण कोण आहे.

**मा.आयुक्त :-** मी जेव्हा सकाळी ६.०० ला ७.०० ला व्हिजीट दिली तरीही मला सापडले नाहीत.

**श्री.नितीन बरडे :-** तुम्ही सांगुन द्या तसे.

**मा.आयुक्त :-** नाही, नाही, नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अधिकाऱ्यांचे फोन चालले जातात.

**मा.आयुक्त :-** मी जेथे जाते सांगुनच जात नाही.

**श्री.नितीन बरडे :-** मॅडम तुम्ही युनिटला पाहुन घ्या. कुठे गेले आहे का गेले आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** माझी तर पहिल्या पासुन मागणी आहे की, तेथे एक हालचाल रजिष्टर ठेवा की, कर्मचारी कुठे गेले, केव्हा आले, हजर कधी झाले,

**मा.आयुक्त :-** हालचाल रजिष्टर कंपलसरी ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत.

(आवाज स्पष्ट नसल्यामुळे कोण काय बोलले समजत नाही)

**मा.आयुक्त :-** मग कोणी जायचे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मॅडम तुम्ही जाण्याच्या पहिले फोन चालले जातात.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** रेतीवाल्यांसारखा प्रकार झालेला आहे तो. तहसीलदार आणि तलाठी निघाले की, फोन चालले जातात.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** बाकी नगरसेवक, कसे आहे. छुप छुप के नही बोलना, डायरेक्ट ओपन बोलायला पाहिजे. आमच्या वार्डातील ही नागरीक महापालिकेचे कर भरतात की नाही भरतात. सगळे जळगांव शहराचे लोकं आहे ते कर भरतात. परंतु विशिष्ट नगरसेवकांच्या वार्डात अशी कामे करण्यात येतात. आमच्या वार्डात का करण्यात येत नाही. आम्ही १०-१० वेळी फोन करतो आहे, ३ महिने झाले, फक्त जे.सी.बी.साठी सुध्दा त्यांच्याकडे टाईम नाही. नगरसेवकांसाठी, पाईप येऊन पडलेले आहे. त्यासाठी ३ महिन्यापासुन आम्ही फोन करतो आहे. साहेब आमच्याकडे लक्ष द्या. फक्त आम्ही येतो बोलतो, निघुन जातो. आपण हे केलेले आहे परंतु ते आकडेवाईज न राहता, कागदोपत्री जर ते अस्तीत्वात आले तर बरं होईल. फक्त डिक्लेअर झाले, तसे न करुन आमचे जी कामे आहे ते प्रस्तावीत करुन पाठवा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मागच्या ज्या तीन महासभा आहे, या तीन महासभांच्या आदी आपण एक आदेश केलेला होता. त्या ओदशांचे जर महापौरांचे या सभागृहात पालन होत नसेल, तर त्याच्यावरती काय कार्यवाही केली पाहिजे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** (आवाज स्पष्ट नसल्यामुळे काय बोलले समजत नाही)

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नितीनभाऊ कर्मचाऱ्यांची कमतरता म्हणजे हा काही विषय फार छोटा आहे की, त्याच्यासाठी फार कर्मचारी लागणार आहे याच्यातला भाग नाही. आपण या सभागृहामध्ये शहर अभियंत्यांना एक आदेश केलेला होता. सुचना विनंती नाही की, या शहरातल्या चौकांची यादी आणि रस्त्यांना दिलेले नावांची यादी बनविण्याचा विषय आहे. याला काय कर्मचारी लागणार आहे. प्रत्येक युनिटला इंजिनिअर आहे, रस्ते त्या ठिकाणी आहे, चौक त्या ठिकाणी आहे. ते कुठे शोधायचे आहे. याच्यावरती काय. म्हणजे प्रशासनाला आपण बोलतो, कधी ही प्रशासनाला आजच्या बॉडीने किंवा मागच्या बॉडीने देखिल प्रशासनाचीच बाजु घेतलेली आहे. या सभागृहात.मग त्यांचे विविध विषय असतील, सगळया विषयांना या सभागृहाने एकमुखी पाठिंबा दिलेला आहे. एक मुखी मान्य केलेले आहे. पण बॉडीची अपेक्षा नाही का ? सभागृहाची अपेक्षा नाही का ? याच्यावरती काय निर्णय घ्यायचा आता महापौर साहेबा तुम्ही घ्या आता. जर माझ्या महापौरांचे आदेश सभागृहात मानले जात नसेल, तर मला खुप त्यास व्यत्यय होणार आहे. असे नाही.

**मा.महापौर :-** प्रशासनाने याचे उत्तर द्यावे.

**मा.आयुक्त :-** या अनुषंगाने ज्या वेळेला आमची बैठक झाली. इंजिनिअर्सने करायची की, बिल कलेक्टर्सने, तर एक मुखाने असे ठरले की, बिल कलेक्टर याची यादी करतील.म्हणजे आपली वसुली ही होईल. बिल कलेक्टर्सला ही जर ३१ मार्चमुळे वसुलीचा लोड असला तरी असे ठरले की, मागच्या आढावा बैठकीत ही मी विचारले की, ८-१५ दिवसामध्ये मला तुम्ही ते यादी करुन द्या.या मंथ एन्ड पर्यंत ती यादी पुर्ण होऊन जाईल.

**मा.महापौर :-** याबाबत लवकरात लवकर कार्यवाही करुन सन्मा.सदस्यांकडे यांनी प्रकाशित करावी. विषय क्र.३,४,५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१०५२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.०२ अंतर्गत कालंकामाता मंदिरापासुन ते सदगुरु किराणा स्टोअर्स पर्यंत रस्ता खुपच खराब झाल्याने ते नव्याने करणे आवश्यक आहे याबाबत सन्मा.नगरसेवक श्री.किशोर बाविस्कर यांनी लेखी पत्र दिले असून त्या अनुशंगाने प्रभाग क्र.०२ अंतर्गत कालंकामाता मंदिरापासुन ते सदगुरु किराणा स्टोअर्स पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणेचे काम मनपा निधी नविन रस्ते या लेखाशिर्षातुन करुन घेणेसाठी येणाऱ्या अंदाजीत रक्कम रु.३६,९५,८६४/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

| | | |
|---|---|---|
| **अनुकूल** | **-** | **६०** |
| **सूचक** | **:-** | **लढ्ढा नितीन बालमुकुंद** |
| **अनुमोदक** | **:-** | **पाटील कुलभुषण विरभान** |

**नगरसचिव :- विषय क्र. ०४ :-** प्रभाग क्र.०२ उज्वल चौकापासुन ते श्री.भगवान सोनवणे यांच्या घरापासुन ते प्रशांत चौका पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे कामी अंदाजीत रक्कम रु.३८,०३,३१६/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषयास मान्यता देण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०५३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.०२ उज्वल चौकापासुन ते श्री.भगवान सोनवणे यांच्या घरापासुन ते प्रशांत चौका पर्यंतचा अस्तित्वातील रस्ता अमृत पाणी पुरवठा योजना तसेच भुयारी गटारी

मुळे खराब झाल्याने तो नव्याने करणे आवश्यक आहे. तथापी याबाबत सन्मा.नगरसेवक श्री.किशोर बाविस्कर यांनी लेखी कळविले असून त्या अनुषंगाने सदर भागात डांबरीकरण करणेचे रक्कम रु.३८,०३,३१६/- मात्रचे अंदाजत्रक B&C चे SSR २०२२/२३ अन्वये तयार करण्यात आले असून प्रभाग क्र.०२ उज्वल चौकापासुन ते श्री.भगवान सोनवणे यांच्या घरापासुन ते प्रशांत चौका पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणेचे काम मनपा निधी नविन रस्ते या लेखाशिर्षातुन करुन घेणेसाठी येणाऱ्या अंदाजीत रक्कम रु.३८,०३,३१६/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

| | | |
|---|---|---|
| **अनुकूल** | **-** | **६०** |
| **सूचक** | **:-** | **लढ्ढा नितीन बालमुकुंद** |
| **अनुमोदक** | **:-** | **पाटील कुलभुषण विरभान** |

**नगरसचिव :- विषय क्र. ०५ :-** प्रभाग क्र.०२ मधील उस्मानिया पार्क स.नं.४१८ मधील प्रमुख मार्ग खडीकरण करणे कामी अंदाजीत रक्कम रु.३९,२६,५११/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषयास मान्यता देण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १०५४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.०२ मधील उस्मानिया पार्क परिसरातील नागरिकांनी त्यांना पावसाळयात रस्त्याने ये जा करणे शक्य होत नसल्याने त्यांच्या सोई करीता त्या परिसरातील प्रमुख तीन रस्त्यांचे खडीकरण करणेची मागणी करणेकामी आयुक्त यांचे कडेस मोर्चा आणला होता. त्या अनुषंगाने तीन रस्ते खडीकरणाच्या कामाचे अंदाजपत्रक दर सुची सन २०२२-२३ चे दरानुसार रक्कम रु.३९,२६,५११/- मात्रचे तयार करण्यात आले असून प्रभाग क्र.०२ मधील उस्मानिया पार्क स.नं.४१८ मधील प्रमुख मार्ग खडीकरण करणेचे काम मनपा निधी नविन रस्ते या लेखाशिर्षातुन करुन घेणेसाठी येणाऱ्या अंदाजीत रक्कम रु.३९,२६,५११/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

| | | |
|---|---|---|
| **अनुकूल** | **-** | **६०** |
| **सूचक** | **:-** | **लढ्ढा नितीन बालमुकुंद** |
| **अनुमोदक** | **:-** | **पाटील कुलभुषण विरभान** |

**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय क्र.३,४,५ आणि ६

(एकास वेळी सभागृहात अनेक सन्मा.सदस्य बोलत असतांना कोण काय बोलले समजत नाही. )

**ॲड.शुचिता हाडा :-** श्वेतपत्रिकेसाठी जी यादी त्यांच्याकडे तयार आहे. गेल्या आर्थिक वर्षात किती खर्च मनपा निधीतुन कोणत्या प्रभागात झाले, तर ही विषय घेऊ त्याच्यात.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** त्याच्यात काही बाकी आहे. ते ॲड करावे लागतील.

**मा.उपमहापौर :-** मग तुम्ही सांगा सभागृहाला की, तुम्ही किती दिवसात देणार ते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ते सगळे अपडेट करून घ्या.

**श्री.जितेंद्र मराठे :-** ताई ते भुयारी गटारीच्या संदर्भात स्पष्ट करा ना की, नागरीकांनी द्यायचे का ?

**मा.आयुक्त :-** सोनगिरे साहेब, एकदा प्रोसेस एक्सप्लेन करा ना. परंतु आदेश काढु.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** सभागृहाला मी या ठिकाणी नमुद करु ईच्छितो की, आपल्या अंडरग्राऊड ड्रेनेजच्या सिस्टीममध्ये कॉन्ट्रॅक्टरला जे जे कामे दिले होते. त्यामध्ये हाऊस होल्ड पासुन ते बाहेरच्या चेंबरपर्यंत जोडणी ही त्या

घर मालकाने जेथे रहिवास करत आहे त्यानी करायची आहे. आपण त्या चेंबर पासुन मेन चेंबर पर्यंत जोडणी केलेली आहे. आणि रस्त्याच्या सेंटरची जी लाईन आहे ती मेन लाईन आहे. फक्त हाऊस पासुन चेंबर पर्यंत.

**श्री.अनंत जोशी :-** साहेब, एकच मिनीट, हे तुम्ही आम्हाला सांगत आहे. तुम्हाला गंमत माहित आहे का ? आपल्याकडे अमृतचे कनेक्शन झाले, माझ्या प्रभागातला विषय सांगतो तुम्हाला, आपल्याकडे टेस्टींग झाले, फ्लशींग झाले आपण अमृतची लाईनही सुरु केलेली आहे. जुनी लाईन आपण बंद करत आहोत. काही भागांमध्ये एकाच वेळी जुनी लाईन पण सुरु ठेवावी लागते. अक्षरशः घरांच्या बाहेर अमृतची लाईन मधुन पाणी रोज वाहत असते. रोज लोकं जोडत नाही का ? लोकांना वाटते की, महापालिका जोडुन देणार आहे. हा पाण्याचा विषय झाला. सेम विषय घरापासुन ते ड्रेनेजच्या चेंबरला जोडायचे हे नागरीकांना माहित नाही. हे आम्हाला माहित आहे हे आम्ही प्रत्येक घरात जाऊन सांगु नाही शकत. आपण ही प्रेस नोट दिली पाहिजे. लोकांना कळवा, लोकं आजही वाट पाहत आहे. अमृतचा कनेक्शन का जोडत नाही लोकं. गटारीत पाणी वाहत आहे रोज. आजही.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** जुन्या गावातला जो रस्ता केला. त्या रस्त्याच्या वेळेस ड्रेनेज करुन जोडणीचे काम केलेले आहे. आता तसे पेपरलाही जाहिर करु. ज्या ज्या भागात रस्ते होतील, त्या त्या भागातील लवकरात लवकर जोडणी झाली पाहिजे.

मा.महापौर :- साहेब, आपण जे हाऊसहोल्ड पासुन ते ड्रेनेजपर्यंत जे जोडायचे म्हणत आहे. ते बऱ्याच ठिकाणी जोडुन झाले आहे. आणि अक्षरशः पाणी चेंबर मधुन वरती येत आहे. आपले AHTP हे कार्यान्वीत नाही. मग कुठे जाणार ते पाणी. मग तुम्ही ही चुकीची माहिती होत आहे ना. ते जोडुन घेतील आणि मग नंतर ही वरती पाणी येत आहे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** जिथे रस्ता करायचा आहे तेथे जोडुन घ्यावा लागेल.

**मा.उपमहापौर :-** असे कसे चालेल. तुम्ही माहिती पुर्ण द्या ना सभागृहाला. एक मिनीट एक मिनीट, तुम्ही सभागृहाला व्यवस्थीत माहिती द्या.

**मा.महापौर :-** आपल्या मेहरुण मध्ये वाहत आहे पाणी चेंबर्स मधुन,

**मा.उपमहापौर :-** आपले ईस्टीमेट सद्या कार्यान्वीत नाही. जोपर्यंत आपला रिपोर्ट होऊन जात नाही. तो पर्यंत हे होऊ शकत नाही तुम्ही हे सांगा ना.

**श्री.अनंत जोशी :-** अहो मॅडम,

**श्री.मनोज चौधरी :-** बंटीभाऊ एक मिनीट, बंटीभाऊ एक मिनीट, नागरीकाचा फोन आलेला आहे. ( हा बोला, पाणी किती दिवसापासुन आलेले नाही तुम्हाला. पाण्यासाठी तुम्ही फोन करत आहात तुम्ही सकाळ पासुन मला, नागरीक : पाणी येतच नाही आम्हाला, श्री.मनोज चौधरी : अमृतची लाईन जोडली गेलेली आहे. नागरीक : लाईन जोडली गेलेली आहे पाणी येत नाही. श्री.मनोज चौधरी : ठिक आहे बोलतो मी.) मॅडम आमच्याकडे अशी परिस्थिती आहे की, अमृतची लाईन जोडली गेलेली आहे. पण काही काही भागांमध्ये पाणीच जात नाही. मी आमचे इंजिनिअर असतील पाणी पुरवठयाचे. तायडे साहेब आजारी आहे. नंतर जैन वाल्यांचे वानखेडे साहेब असतील. ही फक्त चुकी कर्मचाऱ्यांची आहे. पाईप लाईन जोडल्यानंतर मॅडम एक मिनीट ऐकुन घ्या शांततेत. कनेक्शन दिले गेलेले आहे सगळे व्यवस्थीत झालेले आहे पण पाण्याचे नियोजन नाही. आमच्याकडचे जे व्हॉलमन आहे ते रिटायरमेंटला आहे. मी तक्रार करेल. एक दोन वर्षासाठी, मी तायडे साहेबांना बोललो सगळया व्हॉलमन लोकांना बोलवा, ते सकाळ पासुन ते संध्याकाळ पर्यंतकाम  करत होते जेव्हा आपल्या नगरपालिकेच्या लाईन चालु होत्या. आता फक्त दिवसात दोन ते तिन तास करता ते आणि घरी जातात. आता असे आहे की, एका व्हालवर ४-४, ५-५ कॉलन्या जोडल्या आहे. मी त्यांना वारंवार सांगतो आहे की, एका तासात दोनच कॉलन्या करा. त्यानंतर दुसरी कॉलनी करा. तरच ते पाणी लोकांपर्यंत जाईल, म्हणजे ऐवढया खालच्या भाषेत ते लोकं बोलतात ना मॅडम, म्हणजे असे ऐकावे लागते म्हणजे अमृत योजना होऊन काहीच उपयोग झालेला नाही असे वाटते आम्हाला. खरी गोष्ट आहे ही. डॉक्टर साहेब खंर आहे की नाही.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** खरं आहे खंर.

**श्री.मनोज चौधरी :-** मॅडम, याच्यावर आपण कार्यवाही केली पाहिजे. पहिल्यांदा त्यांना समजुन सांगा, ते सिनियर आहे, त्यांचे रिटायरमेंट जवळ आलेले आहे. म्हणुन आम्ही तक्रार करत नाही. त्यांनी नाही ऐकले तर आम्ही तुमच्याकडे कायदेशीर तक्रार करु. आम्हाला असे सांगण्यात येत आहे की,३-३, ४-४ कॉलन्यांमध्ये एक व्हॉलमन आहे. तर त्याच्यात चुकी आमची आहे का मॅडम. आम्ही नागरीकांना काय सांगायचे.

**श्री.अंनत जोशी :-** मॅडम, मगाशी आपण म्हटले की, असे नाही म्हणुन. हे सत्य पण आपण मान्य केले पाहिजे, सगळया चुका प्रशासनाचे नाही त्याच्यात कॉन्ट्रक्टर पण जबाबदार असतो. आपल्याकडे कुठेतरी नियोजनाचे अभाव किंवा दुर्लक्ष होत आहे हे तर आपण मान्य केले पाहिजे. मगाशी अश्विनभाऊ म्हटले दिव्य मराठीला बातमी होती. ५५ रस्ते खोदले गेले, मॅडम आपली मिटींग झाली जेव्हा माझ्या प्रभागाचा विषय झाला, त्या वेळेस आपण मला अश्वस्त केले होते की, यापुढे होणार नाही आपण काळजी घेऊ. कॉन्ट्रक्टरने मला त्यांच्या ऑफिसला बोलवुन सांगितले की, तुमचे कामे फटाफट उरकुन देतो. पुढे असे होणार नाही. जसे नितीनभाऊंनी सांगितले, आता पाण्याची जी लाईन आहे. लिकेज होऊन काही तरी फॉल्ट होईल. काही ना काही प्रॉब्लम असतोच. भविष्यात ही होईल ठिक आहे ते आपण समजु शकतो. ते होणार नाही असे नाही म्हणत. पण वाईट हे वाटते की आज रस्ता झाला आहे आणि दुसऱ्या दिवशी खोदला जातो. जर काही नॅचरल फॉल्ट झाला अशीन तर ती गोष्ट वेगळी आहे. पण त्यांच्याकडुन राहिलेल्या गोष्टीमुळे हे राहिले ते राहिले, पाईप लाईनचे राहिले. त्यांच्या चुकांमुळे रस्ते खोदले जात आहे. कसे आहे. माहित आहे का आपल्याशी बोलुन झाले अनेक वेळा बोलुन झाले, नेमाडे साहेबांशी बोलणे झाले, संजय पाटील इंजिनिअर आहे आमचे त्यांच्याशी बोलणे झाले. त्यांच्या हातात पण सगळे नाही. पण विषय आता काय आहे माहित आहे का ? आता मी ठरविलेले आहे. रस्ता फुटतो नागरीकांचा फोन येतो. दोन दिवसापुर्वी तो रस्ता केला, आता खोदला गेलेला आहे. मी काय करतो मी त्या गल्लीत जातच नाही. का वाईट वाटुन घ्यायचे. तेथे जायचे आणि जिव जाळायचा. कोणाला काही फरक पडत नाही. आपल्याला पडत नाही, कॉन्ट्रॅक्टरला पडत नाही. आम्हाला नागरीक म्हणतात, चारच दिवस झाले, रस्ता परत फोडला, तेथे जाणेच बंद करुन टाकतो. जायचेच नाही. २०-२० वर्षानंतर रस्ते होत आहे. याला नियोजनाचा अभावच म्हणतात. द्या ना त्यांना, ताकीद द्या ना, का बोलत नाही तुम्ही. ही कुठली पध्दत आहे काम करायची.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, दत्ता नगर असेल, परत श्रीराम माध्यमिक विद्यालय असेल, या परिसरामध्ये जे अंडरग्राऊंड ड्रेनेजचे चेंबर आहे. मेन चेंबर त्यातुन पाणी वर येत आहे. आणि त्याच्यामुळे रोड सुध्दा खराब होत आहे. रोडावर घाण पाणी येत आहे तर रोडाला खड्डे पडत आहे. बऱ्याचश्या नागरीकांनी आपल्या घराला ड्रेनेजचे पाणी त्या चेंबरमध्ये जोडुन दिलेले आहे. आपले शाखा अभियंता त्याच्याकडे पाहायला तयार नाही. सुचना देऊन ही त्याच्याकडे लक्ष दिले जात नाही. बरं दुसरा विषय पाण्याच्या बाबतीत रामेश्वर कॉलनी मध्ये अमृतच्या माध्यमातुन पाण्याची टाकी बांधलेली आहे. मला वाटते तेथे वॉश आऊट पण झाले आहे आणि टेस्टींग पण झाली आहे टाकीची, त्या प्रभागामध्ये हनुमान नगर असेल, महाजन नगर असेल, रेणुका नगर असेल, परत सर्व्हे नं. २५०, २७१ या परिसरात नागरीकांना पाण्याची खुप समस्या भेसाळते, काही नागरीकांना कमी प्रेशरने पाणी मिळते. काहींना पिण्याचे पाणी होत नाही, काहींना पाणीच मिळत नाही. आजुबाजुच्या नळातुन ते पाणी घेतात. खुप महिला पाण्यासाठी वनवन याच्याकडे त्याच्याकडे जातात. आणि आपण दोन दिवसाच्या आड पाणी पुरवठा करतो, दुसरा पुरवठा येई पर्यंत त्यांच्या घरात पिण्याचे पाणी नसते. मग माझ्याकडे १०-१०, २०-२० महिला घरी येतात, फोन करतात.आम्ही संबंधीत अभियंता असेल त्यांच्याशी त्याबाबत बोलतो, व्हालमन ला विनंती करतो, त्याला सांगतो, एक तासाच्या एवजी सव्वा तास ठेव. दिड तास ठेव. आणि परिस्थिती तेथे अशी आहे की, तेथे पाण्याची टाकी नाही. रामेश्वर कॉलनी मध्ये पुर्वीपासुन वाघुर वरतुन पाणी डायरेक्ट नागरीकांच्या नळांना येतो, आणि रेमंड चौकात लिग्रॅन्ड जवळ आपला पंप आहे बुस्टर आहे, कधी तेथे लाईट असते, कधी नसते, लाईट असली तर थोडफार बऱ्या प्रमाणात प्रेशर असतात पाण्याचे. आणि लाईट नसली, शनिवारी तर नसतेच. त्या दिवशी जर पाणी पुरवठा असला आमच्या प्रभागात तर कुठल्याच नळांना पाणी येत नाही. नागरीक म्हणतात. लाईट आल्यावर पाणी सोडा. पुर्ण दिवसभर लाईट बंद असते. तेथे एकतर जनरेटर ठेवा, नाही तर त्याला

पर्यायी ईलेक्ट्रीकची व्यवस्था करा. एम.आय.डी.सी.ची जर लाईट गेली तर रेसिडेंशियल परिसर तेथुन जवळच आहे. तेथुन जर आपण ४-५ ईलेक्ट्रीक पोल टाकले तर तितपर्यंत ईलेक्ट्रीकची व्यवस्था होईल आणि नागरीकांना पाणी मिळेल.आणि हे होत नसेल तर कमीत कमी ती पाण्याची टाकी तरी सुरु करा. जेणे करुन नागरीकांना पाणी मिळेल. पाणी पुरवठा इंजिनिअर असे मला वाटते नेमाडे साहेब आहेत. साहेब टाकीचे स्टेटस काय ?

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** आज भरली जाणार आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** मी मार्च महिन्यात पत्र दिलेले आहे, महापौर महोदयांना आणि आयुक्त महोदयांना, आणि आज सुध्दा एक स्मरणपत्र दिले आहे टाकीच्या बाबत, तर ती टाकी लवकरात लवकर सुरु करा. मला वाटते आठ दहा दिवसात होईल सुरु.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** आज भरुन वॉश आऊट केली जाईल.

**श्री.राजेंद्र पाटील :-** मी आपले संबंधीत जे अधिकारी आहे. त्यांच्याकडुन ऐकतो महिन्याभरात चालु होईल, भाऊ १५ दिवसात टाकी चालु होईल. आम्ही या पध्दतीने नागरीकांना आश्वासन देतो. आणि नागरीक आम्हाला म्हणतात की, तुम्ही सहा महिने झाले आम्हाला सांगत आहे. महिन्या भराने चालु होईल पंधरा दिवसांनी चालु होईल. आता ही चार दिवसापुर्वी महिला घरी आल्यात. मी प्रभागात गेलो असतांना तोपर्यंत घरपर्यंत मोठया संख्याने महिला जमा झाल्या होत्या. त्यांना मी १५ दिवसाचे आश्वासन दिलेले आहे. १५ दिवसात टाकी नाही सुरु झाली नेमाडे साहेब, तर आपल्या महापालिकेवर त्या प्रभागातील हंडा मोर्चा मी येथे आणणार.

**मा.महापौर :-** भाऊ.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** ड्रेनेजचे कनेक्शन जे देत आहे, पेपरात ही प्रसिध्द केले की, हुडकोचे जे रु.१८५०/- देऊन कनेक्शन देणार, पिंप्राळा हुडको असो की, शिवाजी नगर हुडको असो की, जैनाबाद असो. ते आता पर्यंत का केलेले नाही. परवा अमृत योजना झाल्यानंतर त्या लोकांना पाणी नाही भेटणार. घरकुलवाले आमच्या घरी आले, तर त्या लोकांना कनेक्शन केव्हा देणार तुम्ही. अमृतचे कनेकशन बाकी लोकांना भेटत आहे, जुने कनेक्शन बंद केल्यामुळे त्या लोकांना पाणी नाही मिळाले. आता त्या लोकांचा निर्णय कसा घेणार तुम्ही.

**मा.महापौर :-** बऱ्याच ठिकाणी राहिलेले आहे. अपार्टमेंटचे ही राहिलेले आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** माझी एक विनंती आहे. आपण दोघी याच विषयांवर बोलु. फक्त अमृत आणि ड्रेनेज या विषयांवर संबंधीत ठेकेदार अशीन, संबंधीत अधिकारी, प्रकल्प अभियंता, सर्व सन्मा.सदस्यांना मागणी करता येईल, सर्व अडचणी मांडता येईल. आणि त्या ठेकेदारासमोर हा विषय होईल. आपण विशेष महासभेचे आयोजन करावे.

**मा.महापौर :-** महासभा न घेता मिटींग घेता येईल ना आपल्याला, सर्वांना बोलु ना आपण.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** नाही, मिटींग नाही, मिटींग घेतली ना तर कार्यवाही करता येत नाही. महासभा घ्या आणि तेथेच ठरवा. एकतर त्या ठेकेदारावर जबाबदारी द्या, एकतर अधिकाऱ्यांवरती जबाबदारी द्या, एकतर आमच्यावर जबाबदारी द्या. लोकं शिव्या आम्हाला देत आहे. लोकांना कळवु द्या.

**सौ.ज्योती चव्हाण :-** आणि दोघी कामांची पध्दत आम्हाला सांगा, एक मिटींग घ्या वाटलस तर.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौर ताई.

**श्रीमती सरिता नेरकर :-** भाऊ दोन मिनीट, महापौरताई.

**मा.महापौर :-** भाऊ त्यांना बोलवुन घेऊ द्या.

**श्रीमती सरिता नेरकर :-** महापौर मॅडम, महावीर नगर मध्ये जेथे ईन्ट्री करतो प्रभाग क्र.१, मागे मॅडमांना सांगितले होते, मध्ये ती पाईपलाईन गेलेली आहे त्या ठिकाणी जाण्याचा रस्ता आहे. तर २००-२५० घरे तिकडे आहेत. त्या ठिकाणी खड्डा ४ ते ५ महिने पासुन आहे तेथे काहीही काम केलेले नाही.मागच्या महिन्यात परत तीच परिस्थिती झाली होती.मनपातील अमृतकर साहेब इंजिनिअर ते स्वत: येजा करतात तेथुन त्यांना विचारा. मला जायला रस्ता नाही. आता ही ८ ते १० दिवसात पुर्ण रस्त्याचे काम केले तरीही आणि आता परत तिच स्थिती झालेली आहे. आणि फोन उचलायला तयार नाही. फोन लावला नेमाडे साहेबांना, तर तायडे साहेब आजारी आहे. आणि बरेचशे लोकं तिकडे

राहतात. आणि सगळ पाणी घाण येत आहे. बोरोले साहेब फोन उचलत नाही. मला याचे उत्तर द्या नेमाडे साहेब पण माझा फोन घेत नाही. फोन घेत नाही का घेत नाही.

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई, त्याच्या संदर्भातच आहे. बोलु मी. महापौरताई, रायसोनी नगर हा नविन विस्तारीत झालेला परिसर आहे. तेथे रस्ते पासुन गटारी पासुन सगळया समस्या आहे. नितीनभाऊ त्या ठिकाणी अमृतच्या पाईप लाईन आता सगळीकडे झालेल्या आहे. त्या लोकांना पाणी मिळत नाही. मी माझे टँकर आहे, दर महिन्याला असे समजुन चला २० ते २५ वेळी माझे टँकर पाठवावे लागते तेथे. एक टँकर पोहचवायला भाऊ रु.७००/- खर्च येतो. स्वत:चे जरी असले तरी. डिझल वगैरे सगळ पकडुन, दर महिन्याला हा खर्च येतो, याच्यासाठी मी अमृतच्या अधिकाऱ्यांना, त्या संदर्भात जे जे अधिकारी असतील, त्यांना सोबत घेऊन फिरलो, नविन टाकी त्या ठिकाणी झाली, आयुक्त मॅडम, महापौर मॅडम, त्या टाकीला फक्त जोडणी करून जोडणी पण अमृत वाल्यांनी करुन दिली, आठ दिवसाच्या आत जोडुन देतो म्हणुन त्यांनी करुन दिली. फक्त महापालिकेचे आता विज कनेक्शन राहिले भाऊ, आता १५ दिवस झाले विज कनेक्शनसाठी फिरतो आहे. त्या संबंधीत अधिकाऱ्यांचा फोन स्विच ऑफ आहे, आता त्या भाऊचा फोन जो पर्यंत चालु होणार नाही तो पर्यंत तेथे पाणी पोहचवायचे नाही का आपण. सगळे झाले फक्त विज कनेक्शनसाठी थांबलेले आहे. आता नेमाडे साहेबांसमोर बोलतो, त्या संबंधीत अधिकाऱ्याचा फोन बंद येत आहे. मग ही कारणे आम्ही नागरीकांना सांगु का तेथे. नागरीक आम्हाला ते जार खांद्यावर घेऊन फोटो टाकतात आम्हाला. म्हणजे अक्षरश: लाज वाटते भाऊ कारण सहाजीकच आहे. सगळया लोकांना या पाण्याचा प्रॉब्लम झेलावा लागत आहे. फक्त काय त्या विज कनेक्शनसाठी बस, महापौरताई आणि आयुक्त मॅडम आपण थोडी कठोर भुमिका घ्या या संदर्भात, आज काय सांगतील हे झालेले आहे, हे होणार आहे. महासभा टाळणे पुर्तता असे उत्तर आपल्याला देतील. याच्यापुर्वी जे पण आहे तुम्ही बघा वाचा मागचे अजेंडे, त्यांनी सांगितले याच्यापर्यंत होणार आहे होऊन गेलेले आहे, काम अजुन पर्यंत झालेले नाही. फक्त उडवा उडवीचे उत्तरे देतात. आम्हाला तर देताच. पण तुम्ही महापौर असुन आयुक्त असुन सुध्दा असे उत्तर देतात ते.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** नेमाडे साहबांना विचारा की, अमळनेर रेल्वे लाईनची परवानगी मिळालेली आहे. आता पर्यंत का जोडल्या नाही त्या.

**मा.आयुक्त :-** पाणी पुरवठयाच मी एकत्रीत उत्तर देते.

**मा.महापौर :-** नेमाडे साहब उत्तर देत आहे, ताई तुम्ही बोला,

**सौ.पार्वताबाई भिल :-** अमृत योजनेच्या बद्दल बोलायचे आहे ताई. वाघ नगर पासुन ते राजीव गांधी नगरचे पुर्ण नागरीक पावती फाडायले ईच्छुक आहे. तर त्यांच्या कन्डीशन आहेत, आता काल परवा पण मी दोन दोन तीन तीनदा म्हटली त्यांला, तर त्या कन्डीशन द्यायला पाहिजे. आणि जी त्यांची जुनी लाईन आहे ना, रोडावर पाणी आहे. रोडावर खड्डे आहे. मी दोन ते तीन सभा झाल्या आरोडया मारत आहे. सोनगिरे साहेबांना ही फोन लावला मी. तर ते रोडची काही विल्लेवाट लावतच नाही.

**श्री.विक्रम सोनवणे :-** महापौरताई आपला सिध्दार्थ नगरचा विषय होता, पाणी पुरवठयाची तेथे पण पाईप लाईन बाकी आहे.

**सौ.पार्वताबाई भिल :-** महापौरताई जेवढे कनेक्शन आहे तेवढे कनेक्शन द्यायला लावा ना त्यांना.

**श्री.अश्विन सोनवणे :-** महापौर महोदया, आता येथे सकाळचे पत्रकार बसलेले आहे. जवळ जवळ ३ महिन्यापासुन ते अमृतचे कनेक्शन मागत आहे. पण त्यांना दिले जात नाही. म्हणजे पत्रकार बांधवांना फिरवले जाते तर बाकीच्यांच काय विषय आहे. अमृतचे कनेक्शन कधी पुर्ण होणार आहे.

**मा.आयुक्त :-** सगळयांचे उत्तर देते मी, तुम्ही मधेच प्रश्न अँड करतात तर त्याचे उत्तरच देता येत नाही. हा बोला.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** सन्मा.व्यासपीठ, रायसोनी नगरच्या टाकीची जॉईनींग करण्यात आली. त्याचे वॉशआऊटचे काम अद्याप बाकी आहे. वॉशआऊट नंतर, तेथे पंपासाठी भाऊंचा फोन आला, त्यासाठी विकास पाटीलांना फोन केला, त्याच्यानंतर विकास पाटीलांना परत फोन केले, त्यांनी सांगितले तेथे जोडणी सगळी रेडी

झालेली आहे. आपले पाणी तेथे पोहचल्यानंतर आपल्याला सप्लाय चालु करता येणार आहे. त्यांनी संध्याकाळीच फॉलोअप घेऊन तो विषय मार्गी लावला, त्याची जोडणी होऊन गेलेली आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** काम थांबले कशामुळे आहे जोडणी झालेली आहे तर.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** वॉशआऊटसाठी

**श्री.जितेंद्र मराठे :-** अहो, वॉश आऊट केले तेव्हा तुम्ही होते का तिथे. मी होतो तेथे.

**मा.आयुक्त :-** वॉशआऊट झाले की नाही.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** वॉशआऊट झाले आहे तेथे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** काय केले त्या ठिकाणी सांगा बरं वॉशआऊट झाल्यावर.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** वॉशआऊट झाल्यानंतर ती दोन ठिकाणीचे लिकेज आढण्यात आली.

**श्री.जितेंद्र मराठे :-** तुम्हाला कसे माहित की, लिकेज झाली दोन ठिकाणी, तुम्ही तर नव्हते त्याठिकाणी.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** दोन ठिकाणी लिकेज झाली, त्या लिकेजचे काम झाल्यानंतर

श्री.जितेंद्र मराठे :- ठिकाण सांगा ना कुठे लिकेज झाली, तुम्ही ठिकाण सांगा ना. मॅडम हे फक्त अंधाधुद कामे चालतात. हे काही नाही फक्त फोनवर बोलतात फोनवर, स्पॉटवर येत नाही. व्हिजीट करत नाही. एकीकडे सांगातात की, आम्ही व्हिजीटला आहे. कार्यालयातील कामे करत नाही. हे होते का स्पॉटवर सांगतात, आम्ही होतो ५-५ तास, विचारा, बोरोले साहेब होते, संजय पाटील साहेब होते.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** मी स्वत: तेथे जोडणी करुन घेतली.

**श्री.जितेंद्र मराठे :-** लिकेजचे ठिकाण सांगा साहेब म्हणजे मी समजुन जाईन की, तुम्ही होते. प्रमुख ठिकाण आहे सांगा, कशाला खोटे बोलत आहेत साहेब, जे आहे ते सत्य मांडा ना.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** जे होते ते लिकेज काढुन झालेले आहे आता,

**श्रीमती सरिता नेरकर :-** साहेब किती फॉलोअप द्यायचा.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** आणि नेरकर मॅडमांचा मागच्या १५ दिवसात काही एकही फोन आला नाही.

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई आपण पिठासीन अधिकारी आहे. आपण गांभिर्याने याच्यात लक्ष घाला, हे जे सांगत आहे ना, त्या स्पॉटवर नव्हते. समतानगरच्या टाकीची पण तशीच बोंब झालेली आहे. रायसोनी नगरची जोडणी काय? यांना काहीच माहित नाही. नुस्ते फोनवर विचारतात हे. प्रत्येकाचे उत्तर हेच असतं. आमच्याकडे कर्मचारी नाही. लोड आहे ते आहे.

**मा.महापौर :- कुठेच पुर्ण काम झालेले नाही.**

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** मी स्वत: तेथे जावुन जोडणी कशी करायची ते दाखवत आहे त्यांना, आणि काम करुन घेत आहे.

**मा.आयुक्त :-** नेरकर मॅडमांचे काय आहे.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** नेरकर मॅडमांचे फोन आले नाही.

**श्रीमती सरिता नेरकर :-** (आवाज स्पष्ट नसल्यामुळे काय बोलले समजत नाही.) तुम्ही म्हणत आहात फोन नाही आला, तुम्ही मला उत्तर काय दिल, तुमच्या पुरते बोला म्हणे. हे माझ्याजवळ रेकॉर्ड आहे. पण हे योग्य नाही असे म्हणु नका तुम्ही. आता मी तुम्हाला कंटाळुन फोनच करत नाही. आता मी बऱ्याच जणांना फोन करत नाही.

मा.आयुक्त :- अमृतकर साहेब काय विषय आहे.

**श्री.अमृतकर, कनिष्ठ अभियंता :-** महावीर नगरच्या रस्त्याला पाईपलाईन क्रॉस झालेली आहे. पाईपलाईन जोडली तर लिकेज झालेली आहे.

**श्रीमती सरिता नेरकर :-** सारखं सारखं होत आहे.

**श्री.अमृतकर, कनिष्ठ अभियंता :-** व्हॉल वांरवार लिकेज होतो त्याठिकाणी,

**श्रीमती सरिता नेरकर :-** त्यांच्याकडे अनुभवी लोकं नाही.

**मा.महापौर :-** ताई, बसुन घ्या, उत्तर देत आहे, भाऊ तुम्ही बोला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** एका गोष्टीचा विचार करा, मक्तेदाराने बऱ्याच भागातील काम पुर्ण केलेले आहे. योजना हस्तांतरीत करण्यासंदर्भात वांरवार मक्तेदार महानगरपालिकेला सांगत आहे. परंतु महानगरपालिका प्रशासन योजना ताब्यात का घेत नाही. तर योजना ताब्यात यासाठी घेत नाही की, महानगरपालिकेकडे अपुर्ण मनुष्यबळ आहे. आणि अपुर्ण मनुष्यबळ असल्याकारणाने हा जो सगळा तक्रारींचा पहाडा वाचला जात आहे. त्याला मुख्य कारण तेच आहे. मनुष्यबळ, प्रशिक्षित मनुष्यबळ, अधिकारी वर्ग याची मोठया प्रमाणावरती कमतरता आहे. या संदर्भात प्रशासन मेनटेनन्सच्या संदर्भात निविदा काढण्याच्या विषयावर प्रशासनासोबत बऱ्याच वेळेला चर्चा झालेली आहे. कारण ऐवढी मोठी योजना अपुर्ण असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बळावरती ही योग्य पध्दतीने राबवली जाऊ शकत नाही. आपल्याकडे जर प्रशिक्षित मनुष्यबळ असते, आणि अतिरिक्त मनुष्यबळ असतं, तर निश्चितपणे आज जो तक्रारींचा पहाडा वाचतो आहे. त्या तक्रारींचे निराकरण झालेले असते. परंतु अपुर्ण मनुष्यबळ असल्याकारणाने, या तक्रारी वारंवार वाढतच राहतील. तर या अनुषंगाने प्रशासनाने ऑपरेशन आणि मेनटेनन्स करण्याच्या संदर्भात काय भुमिका स्विकारलेली आहे.

**मा.आयुक्त :-** सगळयांचा जो आरोप आहे, फॉलोअप होत नाही. इंजिनिअर जागेवर जात नाही. तेथुन सुरुवात करुया आपण.

**श्री.धीरज सोनवणे :-** मॅडम, माझा ही प्रश्न घ्या. मग सोबत उत्तर द्या आपण.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** भाऊंचा ३ दिवसापुर्वी फोन आला होता. एका अपार्टमेंटला १ इंची २ कनेक्शन दिले होते.

**श्री.धीरज सोनवणे :-** दिले म्हणजे तेथे नागरीकांची मागणी नव्हती.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** नागरीकांची मागणी नव्हती. मागच्या धोरणानुसार तेथे १ इंची ०.७५ इंची कनेक्शन दिले होते. आता त्या नागरीकांची व्ययकतीक नळ कनेक्शनची मागणी आहे. आता व्ययकतीक नळ कनेक्शन द्यायचे कसे ही साहेबांची विचारना होती. अपार्टमेंटचे ब्लॉक आहे.

**श्री.धीरज सोनवणे :-** एका अपार्टमेंटला १२ ब्लॉक असे आहे ते. आता कसे आहे की, आपण त्यांना १-१ इंचीची त्यांची मागणी नसतांना व रस्त्यांचे काम करण्यासाठी काही तरी धोरण ठरविले ईमरजन्सी आणि कनेक्शन दिले. त्यांची लेखी मागणी वगैरे काही नाही. पण दिलेले कनेक्शन एक तर आपल्याला ते रद्द करावे लागतील किंवा बंद करावे लागतील. आता त्याच्यामध्ये मी संबंधीत पाणी पुरवठा अभियंत्यांशी बोललो तर त्यांचे असे म्हणणे आहे की, ते रद्द करण्यासाठी त्याची काही फि ठरलेली आहे. ती भरावी लागेल. फी विचारली तर काही तरी २०-२५ हजार रुपये फी आहे. म्हणजे जे पाणी वापरलेच नाही, ज्या नळाची मागणीच दिली नाही त्याचे २० हजार ते लोकं कसे भरतील. त्याचे ही काही तरी लवकरात लवकर निर्णय घ्या. कारण आता तो आकाशवाणी टाकीचा पहिला टप्पा या उन्हाळयात व पावसाळया अगोदर सुरु करण्याचे नियोजन आहे.त्याच्यामुळे लवकरात लवकर निर्णय घ्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरताई याच्यामध्ये किती कनेक्शन द्यायला पाहिजे या संदर्भातले लिखीत धोरण अजुन पर्यंत ठरलेले नाही. प्रत्येक वेळेला कुलकर्णी साहेब असल्यापासुन तर आतापर्यंत, गिरगांवकर साहेब मध्यंतरी आले होते. त्यांनी एक पॉलिसी ॲडॉप्ट केली, नविन शहर अभियंता किंवा पाणी पुरवठा अभियंता आले ते एक पॉलिसी ठरवितात. प्रशासन एक पॉलिसी ठरवितो. नागरीकांचा संभ्रम होतो, सदस्यांचा संभ्रम होतो. कुठेतरी एक धोरण जे आहे ते कागदोपत्री यायला पाहिजे की, जेणे करुन त्या धोरणाच्या आधारे प्रशासन म्हणेल ती पॉलिसी ठरवली जाईल. आणि या अनुषंगाने तुम्हाला कनेक्शन मिळेल. साधारणता या विषयावर अनेकदा चर्चा झाल्या. परंतु इतक्या वेळेतही त्याच्यावर धोरण का ठरत नाही. जे काही असेल धोरण. परंतु त्या धोरणाची स्पष्टता पाहिजे. आणि ते धोरण सर्व सामान्य नागरीकांपर्यंत पोहचले पाहिजे. की जेणे करुन प्रशासनाने हे धोरण ठरविलेले आहे. कोणी नगरसेवक एक पॉलिसी ठरवितो, कोणी अधिकारी एक पॉलिसी ठरवितो. याच्यामध्ये मोठया प्रमाणावर संभ्रम निर्माण झालेला आहे. म्हणुन याचे काय धोरण असेल तेही निश्चित करण्यात यावे.

**श्री.अनंत जोशी :-** मॅडम आमच्याकडे पाणी पुरवठा होत आहे त्या ठिकाणी काही लिकेज निघत आहे मागेही मी आपल्याला व्हिडीओ पाठविला होता. हजारो लिटर रोज पाणी नाल्यातुन वाहते आपल्याकडे, ते ट्रिट केलेले पाणी आहे, पिण्याचे पाणी आहे. गेल्या अनेक वर्षापासुन वाहत अशीन, माहित नाही कशामुळे वाहत आहे. त्याचे कारण सापडत नाही. आणि आपले अधिकाऱ्यांना मी दाखविले सुध्दा पण त्यांना ती जागाच सापडत नाही की, ते वाहते कुठुन, ते मग जर आपण सोडुन दिले की, नविन अमृतची लाईन सुरु होईल आयुक्त मॅडम ते इतके वर्षापासुन वाहत आहे, त्या नाल्याचे काम करतांना लक्षात आले की, ते हजारो लिटर स्वच्छ पाणी वाहुन जात आहे. पण आपण सोडले की, अमृत सुरु झाले की, बंद होईल ती जुनी लाईन आहे ते थांबुन जाईल. आता एक नविन प्रकार सुरु झालेला आहे आमच्याकडे. रोज रात्री ११ ते ०१ च्या दरम्यान काही तरी ओव्हरफ्लो होते टाकीचे असे आमचे संजय पाटील साहेब म्हटले, ११ ते ०१ च्या दरम्यान रोज रात्री किंवा दोन दिवसांनी समजा, पुर्ण पाणी ओंकारेश्वर मंदिराच्या चौकामध्ये पाणी साचतो. गुडग्यापर्यंत, आणि तेथे जी दुकाने आहे ते रोज पाण्यात असतात, दोन तास तिन तास ते बिचारे सामान काढुन पाणी साफ करतात. मागे मी नेमाडे साहेबांना ही बोलविले दाखविले तर ते म्हणत आहात की, टाकी ओव्हरफ्लो होत आहे. पुर्वी असे होते की, भाऊंच्या उद्यानाचे जे सिक्युरीटी गार्ड आहे ते फोन लावुन गिरणा टाकीवर कळवायचे. टाकी भरत आहे म्हणुन तसे ते ऑपरेट करायचे. आता कळविले जात नाही किंवा ते कॉन्टॅक्ट होत नाही. म्हणुन ती टाकी ओव्हरफ्लो होत आहे आणि पाणी वाहत आहे. रस्त्यावर पाणी वाहत आहे, अक्षरश: गुडग्यापर्यंत पाणी आहे. रोज रात्री ११ ते ०१ मध्ये पाणी वाहते. आणि त्या लोकांच्या दुकानांमध्ये पाणी साचते. मी शोधायला तेथे गेलो तर मला म्हणतात की, जो रात्री स्टॉफ असतो हे सगळयांचे मोबाईल नंबर आणि नाव आहे हे तुम्ही भाऊचे उद्यानाचे जे सिक्युरिटी गार्ड आहे. मग ते कळवतील भाऊ. ही कुठली पध्दत आहे. आपली टाकी ओव्हरफ्लो होते, हजारो लिटर पाणी रस्त्यावर वाहते, लोकांच्या घरात दुकानात पाणी साचते. एक साधा ओव्हरफ्लो बंद करु शकत नाही. आणि मला नंबर पाठविले की, हे त्या सिक्युरिटी गार्डला द्या. हे कळवतील गिरणा टाकी वाल्यांना, आणि पाणी बंद करतील, याच्यावर विचार करा मॅडम.

**सौ.रंजना सोनार :-** प्रभाग क्र.१७ अयोध्यानगर, या ठिकाणी अमृत योजनेचा विषय चालु आहे म्हणुन तोच विषय आहे मॅडम,शांतीनिकेतन सोसायटीमध्ये ती पुर्ण टाकी तयार झालेली आहे. पुर्णत:वाकडे आहे. पण अयोध्या नगर मध्ये अमृतचे पाणी कोणालाच मिळालेले नाही. त्या ठिकाणी ८०% कामे झालेली आहे. २०% कामे अजुन बाकी आहे. आणि दुसरे असे की, जो आमचा आयोध्यानगर मधील मेन रस्ता आहे. सागर शॉपी जवळचा, दातांच्या दवाखान्यापासुन ते जानव्ही हॉटेल पर्यंतचा, हा रस्ता झालेला आहे पण त्या ठिकाणी पुन्हा पुन्हा डागडुगी करावी लागत आहे रस्त्याची. त्याचे डांबरीकरण होणार आहे कारण तृप्ती कॉर्नर पासुन ते आयोध्या नगर पर्यंतचा हा मुख्य रस्ता झालेला आहे परंतु तृप्ती कॉर्नर पासुन ते हनुमान नगर चार दिवसापुर्वी हा एक रस्ता झालेला आहे. पण जो मेन रस्ता आहे तो फार जरुरी आहे. त्या ठिकाणी प्रत्येक वेळेस जेव्हा तो रोड करायला घेतो, त्या प्रत्येक वेळेस अमृत योजनेतुन तो रोड खोदला जातो. मग ते काम पुन्हा थांबुन जात आहे. ते अमृत योजनेचे काम आहे ना मॅडम एकदा बघुन घ्या. तर तो रोड लवकर तयार होऊन जाईल.

**मा.आयुक्त :-** जवळपास मी मे २०२२ मध्ये चार्ज घेतलेला होता. ।ग ते ३महिने गॅप झाला, सुरुवात याच्यासाठी करत आहे. त्यानंतर फेब्रवारी ते आता एप्रिल म्हणजे दहा महिने झाले किमान १० जनरल बॉडी मिटींग अटेन्ड केल्या असतील आणि या दहा जनरल बॉडी मिटींगचा आता माझा अनुभव आहे की, सर्व सन्मा.सदस्य प्रश्न मांडतात, ॲग्रेसीव्ह पण प्रश्न मांडतात. पण जेव्हा उत्तर द्यायची वेळ असते तेव्हा कोणाला ऐकायची ईच्छा नसते. जसे बंटी भाऊ म्हटले की, मी त्या रस्त्यावर जाणे सोडुन दिले. सर आपण तसे जाणे सोडुन देत नाही. जो काही प्रॉब्लम आहे एन्ड पर्यंत आम्ही अटेन्ड करतो.आणि एक सॉल्युशन नाही निघाल तर दुसरं, दसरं नाही निघाल तर तिसर. दिवस रात्र काढण्याचे प्रयत्न करतो. तुम्ही जसे सांगितले, तुम्ही जसा अनुभव सांगितला सेम अनुभव सांगते. आयुक्तांच्या बंगल्यामध्ये एक व्हॉल आहे. रात्री १२.०० पर्यंत आपले कर्मचारी ते रिपेअर करत होते. आगोदर ते रिपेअर करायला गेले, तो गंजलेला होता, मग तुटला, मग जे.सी.बी. आणला, मग पुन्हा तेथे पाणी साठला, त्याच संपआऊट करत होते.

जितक्या चांगल्या पध्दतीने, हे बघा सगळेच कर्मचारी वाईट नाही तर सगळे काही चांगले पण नाही. पण याच अर्थ अस नाही ना की, सगळेच वाईट आहे म्हणुन जे कामे करत आहे त्यामुळे सिस्टम रन होत आहे. एक दिवस आपण खर्च सिस्टीम स्टॉप करुन बघु म्हणजे कळेल आपल्याला की, सिस्टम काय काम करतो. मी असे म्हणत नाही की, कर्मचारी चुकत नाही म्हणुन कर्मचारी चुकत ही असेल. काही कर्मचारी आत्मतेने काम करतात, काही कर्मचारी रात्री २.०० वाजता पाणी सोडायला असतात. आणि त्यामुळे काय होतो. जो काम करतो त्याला ही वाटत की, काम करुनही नगरसेवक आम्हाला शिव्याच देतात म्हणुन

**श्री.अश्विन सोनवणे :-** चांगल्या अधिकाऱ्यांना कोण बोलत आहे मॅडम,

**मा.आयुक्त :-** मला वाटते, माझे उत्तर होऊन जाऊ द्या. आपल्याला डिबेट नाही करायचे आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** तुम्ही तर म्हणत आहात ना की, सिस्टीम स्टॉप करु म्हणजे तुम्ही धमकी देत आहात.

**मा.आयुक्त :-** असे नाही म्हणायचे आहे मला.

**श्री.अश्विन सोनवणे :-** बोलले ना तुम्ही. एक दिवस सिस्टीम स्टॉप करु बोलले ना ते. आम्ही चांगल्या कर्मचाऱ्यांबद्दल थोडी बोलले जे काम करत नाही त्यांच्या बद्दल बोलत आहात ना.

**ॲड.शुचिता हाडा :-** सगळयात जास्त नगरसेवकच शिव्या खातात.

**मा.आयुक्त :-** फक्त नगरसेवक नाही मॅडम, माझ्याकडे ही व्हिजीटर असतात. प्रत्येक व्हिजीटरला अटेन्ड करते की, ते फक्त नगरसेवकांना शिव्या नाही देत ते प्रशासनाला ही देण्तात.

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना कोण काय बोलले समजत नाही. )

**श्री.अनंत जोशी :-** अधिकाऱ्यांशी वागणे वेगळे असते, आपल्याशी वागतांना नागरीक थोडं व्यवस्थीत वागतात. आम्हाला कुठल्या भाषेत आणि कोणत्या पध्दतीने बोलतात आम्हाला माहित आहे. दुसरी गोष्ट आम्ही सगळयांना एक सारखे म्हणत नाही. मी मागच्या मिटींगलाही सांगितले होते. आज ही सांगतो. संजय पाटील साहेब, पाणी पुरवठा इंजिनिअर म्हणुन आहे. अतिशय महेनतीने काम करत आहे. ते आले म्हणुन माझे अमृतचे बरेच प्रॉब्लम सॉल्व झाले. तो माणुस रात्रीच्या ८.०० - ९.०० वाजता घरी जातो. मी त्यांना ॲप्रीशिएट करतो ना. मी मागच्या मिटींगमध्ये ही बोललो होतो. सगळी चुक संजय पाटील साहेबांची आहे असे अजिबात नाही. ते महेनत करत आहे मी गेल्या ४ महिन्यापासुन बघत आहे. आम्ही दोष देत नाही पण जी सत्य परिस्थिती आहे ती मांडायला नको का आम्ही. तुमच्याशी बोलण वेगळ असतो मॅडम आमच्याशी नागरीकांचे बोलणे खुप वेगळे आहे. आम्हाला सालदार समजतात. नगरसेवक हा या पृथ्वीवरचा सगळयात तुच्छ प्राणी आहे. आणि चोर आहे. तो फक्त चोऱ्या करायला आलेला आहे. तो फक्त पैसे कमवायला आलेला आहे. तो फक्त ठेके घ्यायला आलेला आहे.

**मा.आयुक्त :-** आम्ही उल्लेख करतांना सन्मा.सदस्य असे म्हणतो. आपण सन्मानीय आहात.

**श्री.अनंत जोशी :-** तुमचे नाही म्हणत आहे मी, नागरीकांच्या मनात आमची प्रतिमा काय आहे ते सांगत आहे मी. या पृथ्वी दलावरचा सगळयात तुच्छ प्राणी म्हणजे नगरसेवक.

**मा.आयुक्त :-** आपण पुढे जाऊ या आता. एस.टी.पी.च सगळयांना माहित आहे, अटेन्शन लाईनचे जे कनेक्शन द्यायचे होते. त्याचे एस.एन.डी.सी.ला अजुन एक विषय प्रलंबित आहे. जो प्रयत्न एस.टी.पी. ॲक्टीवेट होत नाही. तो पर्यंत आपल्याला कनेक्शन देता येत नाही. कनेक्शन देत असतांना नागरीकांना जे पैसे भरायचे आहे. त्याच्या चार्जेसचा विषय जो आहे जी.बी.मध्येच येणार आहे. अजुन ते चार्जेस फिक्स झालेले नाही. ज्या दिवशी आपले एस.टी.पी. ॲक्टीवेट होईल. त्यावेळेस जी.बी.ला ठराव येईल मग आपण कनेक्शनला सुरुवात करु. त्यानंतर मग तो टेन्डर निघेल. भाऊंनी जसा O&M चा प्रश्न मांडला, तर भाऊ आपला ऑपरेशन आणि मेनटेनन्सचा टेन्डर करणे सुरु आहे. मागच्यांशी मी चर्चा केली होती, टेक्नीकल पर्सनशी. ते ही मदत करत आहे आपल्याला. ऑपरेशन आणि मेनटेनन्सचा एक टेन्डर आपण फायनल केले होते. एक्झीक्युशन वेगळ असावा आणि फिल्डवरचा वेगळा असावा. पण ते आपण कॅनसल केले. आणि ओवरऑल एकच ऑपरेशन आणि मेनटेनन्स असावे. जे एक्झीक्युशन बघणार आहे आणि बाहेरच ही बघणार आहे. या पध्दतीने आपण टेन्डरचा हे काम बघणार आहोत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** किती वेळ लागेल मॅडम. खुप वेळेपासुन हा विषय प्रलंबित आहे.

**मा.आयुक्त :-** सर आमच टारगेट होता की, एप्रिल एन्ड पर्यंत आपली योजन अँड होऊन जायला पाहिजे. जेव्हा आपण स्वत: ऑपरेट करु तो पर्यंत आपल्या हातात एजन्सी असली पाहिजे. त्या पध्दतीने आम्ही ते काम सुरु केलेला आहे. वर्कीगच्या बाबतीत जे नगरसेवक प्रत्येक गल्लीचे नाव घेऊन सांगतात. त्या अनुषंगाने सांगते. १७ झोन आहे आपले. १७ झोन मधले गेंदालाल झोनचे ५०% फ्लशींग झाले आहे. ५०% बाकी आहे. रेमंड झोनचे ८०% झाले आहे, २०% बाकी आहे. एम.आय.डी.सी. झोनचे १००% फ्लशींग झाले आहे परंतु तेथे सप्लाय करणे बाकी आहे. सुप्रीम झोनचे दोन झोन आहे त्याच्यात सुप्रीम-१ आणि सुप्रीम-२, सुप्रीम-१ मधील १००% फ्लशींग टेस्टींग झाले आहे. सुप्रीम-२ चे १००% बाकी आहे. ड्रीमलॅन्डचे ८०% फ्लशींग टेस्टींग झालेले आहे. २०% बाकी आहे. सिंधी कॉलनीचे ६०% झालेले आहे ४०% बाकी आहे. शामा प्रसादचे ७५% झालेले आहे २५% बाकी आहे. समतानगरचे १००% फ्लशींग आणि टेस्टींग बाकी आहे. डिस्ट्रीब्युशन १००% कमप्लीट आहे. नित्यानंद नगरचे ६०% फ्लशींग झाले आहे. ४०% बाकी आहे. हे वाचण्याचा उद्देश असा आहे की, प्रत्येक झोनचे जर तुम्ही ऑबजर्व केल तर १०,२०,३०,४० अश्या पध्दतीने आपल्या फ्लशींग आणि टेस्टींग बाकी आहे. जेव्हा आपण करत जातो तेव्हा आपल्याला आहे तो सप्लाय सांभाळुन या टेस्टींग कराव्या लागतात.आणि ते करत असतांना ते लिकेजेस वगैरे निघतात.डिस्ट्रीब्युशन आपला झालेला आहे.आता बॅलेन्सवर्क मध्ये मी तुम्हाला सांगते. पाईपलाईन वर्क मध्ये कनेक्टींग वर्क ५० एम.एम.डायाचे, पाईप लाईन २०० मिटर, न्यु डी.एस.आर.ला कनेक्टींग बाकी आहे. कनेक्टींग वर्क ८०० एम.एम. डायाचे अपटु एकझीस्टींग लाईन आणि डी.एस.आर.चे बाकी आहे. कनेक्टींग ववर्क ८०० एम.एम. डायाचे अप्टु एकझीस्टींग लाईन पिंप्राळा डी.एस.आर. बाकी आहे. ४०० एम एम एच.डी.पी.पाईपचे सुप्रीमला प्रपोज केलेले आहे. डी.एस.आर.ला २ कि.मी.चे इन प्रोग्रेस आहे. ४०० एम एम बॅलेन्सलाईनचे एच.डी.पी.वर्क न्यु सुप्रीम डी.एस.आर.च बाकी आहे. ते काम चालु आहे. २५० एम.एम. डी.आय पाईप टु एकझीस्टींग डी.एस.आर. समता नगर हे पुढच्या आठवडयामध्ये होत आहे. दर बुधवारी आमची बैठक होते. पाणी पुरवठयाचे इंजिनिअर असतात. जैन इरिगेशनचे इंजिनिअर असतात.आणि कॉमन आम्ही तयार करतो की, काय काय बाकी आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** चांगला केला आहे तुमचा प्रोव्हीजन पण लोकांच, लोकांचे डिस्ट्रीब्युशनचे काय ? भरपुर लोकांना मिळालेले नाही.

**मा.आयुक्त :-** आता ते सांगते.एकुण आपल्या डि.पी.आर. मध्ये ६८००० कनेक्शन होते. आतापर्यंत आपण ७०००० कनेक्शन दिलेले आहे. हे वाढीव आहे. याच्या व्यतिरिक्त वाढीव आपण डिस्ट्रीब्युशन सुध्दा केलेले आहे. मला वाटते ते पण २० कि.मी. आपले डिस्ट्रीब्युशन झालेले आहे. त्यामुळे मी काय सांगितले त्यांना, ३१ मार्चला आपल्याला क्लोजींगचा स्टेटमेंट आला होता. पी.एस.यु.कडुन की, आपला डी.पी.आर.पुढचा सॅन्क्शन करायचा असला तर वन क्लोज करा.

**श्री.अश्विन सोनवणे :-** आता १० घरं आहे, ५ घरांना तुम्ही लाईन देतात आणि ५ घरांना तुम्ही वाढीव देतात असे कसे काय ?

**मा.आयुक्त :-** हा फरक का असतो सर जेव्हा डी.पी.आर. बनतो. आणि शासनाकडे सॅन्क्शनला जातो. नंतर मंजुर होऊन येतो. टेन्डर होतो आणि वर्क सुरु होतो.या मध्ये जे घरे वाढलेले असतात. ते त्या डी.पी.आर.मध्ये येत नाही.

**श्री.अश्विन सोनवणे :-** ते १० घरे आहे कधीपासुन त्याच्यामध्ये ५ च घरांना भेटत आहे. ५ घरांना नाही मिळाले.

**मा.आयुक्त :-** माझ्या माहितीनुसार.

**श्री.अश्विन सोनवणे :-** त्यांचे असेल डी.पी.आर.मध्ये पण मिळालेले नाही. असा विषय आहे ते.

**मा.आयुक्त :-** डी.पी.आर.मध्ये आहे आणि डिस्ट्रीब्युशन झालेले नाही. असे बॅलेन्सवर्क किती आहे. योगेश बोरोले आणि सोनगिरे. डी.पी.आर.मध्ये डिस्ट्रीब्युशन आहे पण झालेले नाही असा त्यांचा प्रश्न आहे.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** वाढीव मधील असेल.

**मा.आयुक्त :-** वाढीव मधले नाही. मुळ डि.पी.आर. मधले आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** रेग्युलर.

**मा.आयुक्त :-** सांगा काय आहे त्याचे उत्तर.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** डी.पी.आर.मध्ये नसेल, वाढीव मध्ये असेल.

**मा.आयुक्त :-** सोनवणे सर मी तुम्हाला याच्याचसाठी सांगते. हा जो गॅप झालेला आहे ना, त्याच्यामुळे वाढीव परत सॅन्क्शन करुन घेतले, आणि वाढीवचे काम राहिले असतील.

**श्री.अश्विन सोनवणे :-** पण आमच्या प्रभागात बाकी आहे ना.

**मा.आयुक्त :-** म्हणुन सांगते, मी पहिला प्रश्न काय विचारला, मुळ डी.पी.आर.मधील काही कामे बॅलेन्स राहिले का हे विचारले, ते म्हणत आहे. नाही. फक्त वाढीवचे राहिलेले आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** आमच्या प्रभागात बाकी असुन तुम्ही आम्हाला खोटे ठरवतात असे झाले.

**मा.आयुक्त :-** बरं. मी पुढच्या आढाव्याच्या वेळेस पुन्हा तुम्हाला एकदा खात्रीने प्रत्येक नगरसेवकाचे नांव घेऊन...

**श्री.अश्विन सोनवणे :-** एक गोष्ट तुमच्या लक्षात आणुन देतो मॅडम, हे जे रिपेअरींग करत आहे. रिपेअरींग करतांना वरचा कारपेट खाऊन जात आहे. तसे चालणार नाही.आता आमच्या वार्डात फक्त रिपेअरींग केले वरचे कारपेट केलेलेच नाही. आणि बिल रिकॉर्ड झालेला आहे. नुकसान होतो मनपाच. कारपेट खाऊन गेलेला आहे तो.

**मा.आयुक्त :-** रिकॉर्ड पाहुन करतात.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** (आवाज स्पष्ट नसल्यामुळे काय बोलले ते समजत नाही.)

**श्री.अश्विन सोनवणे :-** मागे त्या नेवे इंजिनिअरने कमप्लेंट केली होती.मी तो विषय येथे मांडला, त्या नेवेला नंतर बोलले, त्याला झापले,कसे काय तु तो विषय नगरसेवकांना सांगितला, तो महासभेत मांडला, हे असे काय आहे. चुकीचे आहे ना हे.

**मा.आयुक्त :-** तुम्ही जो रस्ता सांगत आहात. त्याची एम.बी. मी क्रॉस चेक करते आणि तुम्हाला सांगते.

**श्री.अश्विन सोनवणे :-** आमच्या प्रभागातला कारपेट खाऊन गेलेले आहे. आणि अजुन भरपुर जणांना कनेक्शन मिळालेले नाही. ते सांगतात. कमप्लीट झालेले आहे. ते आले का तेथे. आम्ही आहे ना आम्ही फिरता ना तिथे. आम्हाला माहित आहे लोकं आम्हाला फोन करतात.

**मा.आयुक्त :-** तुमच्या वार्डात जे काही रोड रिपेअरींगचे एम.बी. रिकॉर्ड झालेली आहे. त्याची मी पर्सनली,

**श्री.अश्विन सोनवणे :-** कनेक्शनही बाकी आहे भरपुर कनेक्शन द्यायचे ही बाकी आहे.

**मा.आयुक्त :-** कनेक्शनच्या बाबतीत सांगितले की, डी.पी.आर. मध्ये ६८००० मंजुर होते, ७०००० कनेक्शन दिलेली आहे. वाढीव कनेक्शनची पुन्हा एम.जी.पी.कडुन आपल्याला मंजुरी घ्यायची आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** आमच्या प्रभागातच कसे काय वाढले मॅडम.

**मा.आयुक्त :-** याच्या आधारे सांगिते की, जास्तीत जास्त आपण मे एन्ड, म्हणजे १५ मे सांगितलेले आहे पण मे एन्ड टाग्रेट पकडलेले आहे. फक्त रेल्वेच्या कामाचा आपला क्रॉसींगचा झालेला नाही.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** रेल्वे वाल्यांनी परवानगी दिली ना मागच्या दोन महिन्यापुर्वी

**मा.महापौर :-** पुढच्या विषयाला सुरुवात करा.

**नगरसचिव :- विषय क्र. ०६ :-** मनपा निधी अंतर्गत युनिट क्रं.१० वार्ड क्रं.६३ अशोक किराणा पासुन ते एकनाथ नगर पर्यंतच्या वियो रस्त्यालगत आर.सी.सी.गटार बांधणे कामाची मक्तेदार श्री.सुधाकर कृष्णा कोळी यांची मनपा खजिन्यात जमा रक्कम रु.७२,८४०/- मात्र सुरक्षा अनामत परत करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सुरक्षा अनामत परत करण्याच्या संदर्भात आलेला प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री.नितीन बरडे :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.०६ सर्वानुमते मंजुर करण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१०५५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा निधी अंतर्गत युनिट क्रं.१० वार्ड क्रं.६३ अशोक किराणा पासुन ते एकनाथ नगर पर्यंतच्या वियो रस्त्यालगत आर.सी.सी.गटार बांधणे कामी मक्तेदार श्री.सुधाकर कृष्णा कोळी यांची सुरक्षा अनामत पावती क्रं.१६३८३ दि.०१/१२/२०१६ अन्वये रक्कम रु.७२,८४०/- मात्र सुरक्षा अनामत म्हणुन मनपा अर्थ विभागात जमा आहे.

मक्तेदार यांनी सदरचे काम कार्यादेशानुसार दिलेल्या मुदतीत दि.०८/०७/२०१५ रोजी पुर्ण करुन दिलेले असुन सदरचे काम पूर्ण होवून ५ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने मक्तेदार यांनी वर नमुद प्रमाणे रक्कम रु.७२,८४०/- मात्र सुरक्षा अनामत म्हणुन जमा रक्कम परत मिळण्याची मनपा सा.बा.आ.क्रं.२७२१ दि.१३/१२/२०१८ अन्वये मागणी केलेली असून सदरची सुरक्षा अनामत ०३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने मक्तेदार श्री.सुधाकर कृष्णा कोळी यांचे नमुद कामाचे देय्यकातुन पावती क्रं.१६३८३ दि.०१/१२/२०१६ नुसार जमा सुरक्षा अनामत रक्कम रु.७२,८४०/- मात्र महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता २०११ मधिल नियम २९९ नुसार मक्तेदार श्री.सुधाकर कृष्णा कोळी यांना परतावा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

| | | |
|---|---|---|
| **अनुकूल** | **-** | **६०** |
| **सूचक** | **:-** | **लढ्ढा नितीन बालमुकुंद** |
| **अनुमोदक** | **:-** | **बरडे नितीन मनोहर** |

**श्री.मनोज चौधरी :-** (आवाज स्पष्ट नसल्यामुळे काय बोलले ते समजत नाही.)

**मा.महापौर :-** तुम्ही एक पत्र देऊन टाका की, १०० कोटीतुन नामंजुर करण्यात यावा आणि जे.एस.मी.फंडातुन करण्यात यावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हे दुर्दैव आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** फक्त कचरा फॅक्टरी रोडापुरता बोलतो मी. बाकीच्यांचे होत राहतील. तो मुख्य रस्ता आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मनोजभाऊ तुमची वैथा मी मान्य करतो.

**श्री.चंद्रकांत पाटील :-** मॅडम, १०० कोटीमध्ये गटारी नाही ते पण घेऊन टाका आणि रस्ते होत असेल तर करुन टाका.कारण पावसाळा आहे पुढे आता.

**मा.आयुक्त:-** दोन मिनिंट ऐका ना मग १०० कोटी जरी निधी आला तरी ते झाले, १३ एप्रिलला कलेक्टर साहेबांकडे मिटींग झाली. तर मी साहेबांना बोलली की एक न्युज देण्यात यावी कारण समन्वय साधुन त्यांची जबाबदारी असुन तुम्ही एक बैठक लावा. आता १४ एप्रिलला एक बैठक लावली तर १४ एप्रिलला मा.आमदार महोदय, PWD चे अधिकारी, मनपाचे अधिकारी, आम्ही उपस्थित होतो. त्याच्यामध्ये आम्ही ४ कामांचे डिस्ट्रीब्युशन केलेल होते की जिथे वॉटर सप्लाय देण्याचे काम आहे तर फर्स्ट प्रायोरिटीने ते वर्क करायचे , सेकंड जे आहे की ज्याचे वॉटर सप्लायचे ड्रेनेज झालेले आहे तर ते काम आपण शासनाला MC ला, MJP ला किंवा कुठल्यातरी एजन्सीला देवु. परंतू अजुन ते काम मान्य नाही झालेल किंवा त्याची वर्कऑर्डर नाही झालेली आहे म्हणजे ती काम आहेत आपली आणि ज्या कामामध्ये वॉटर सप्लाय मध्ये ड्रेनेज झालेले आहेत तर त्याची वर्कऑडरही झाली आहे आणि कामही सुरू आहे. तर अशा विषयी आपल्याला काम बदलता येईल का असा एक विचार झाला. परंतू आम्ही काय केले की MJP कडून यादी घेतली त्याची ३४ ईस्टिमेट त्यांनी आपल्याला दिले आणि आपल्या इंजिनियरने आणि त्यांच्या इंजिनियरने सोबत करून घ्यायचे. आपले इंजिनियर स्वत: फिरले परंतू त्यांना त्या कामांचे नांव सापडत नाहीत कारण की मोघम नाव दिलेले आहेत. पुन्हा प्रशासनाशी बोललो की तुमचाच इंजिनियर आम्हाला द्या तर काम सापडतील आणि जो डाटा आपल्याकडे MJP चा आलाय तर त्याच्यामध्ये कचरा फॅक्टरीचा असेल तर आपण त्याच्यामध्ये प्रायोरिटीने करायला हरकत नाही.

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही तो घ्या प्रायोरिटीने कारण की काय आहे की अत्यंत वाईट परिस्थिती आहे. यांच्या प्रभागात १०० कोटीमधुन ४ कोटी रूपयांचे ठिकठिकाणी कॉंक्रींटींगची काम प्रस्तावित करण्यात आली आहे. तरी सुध्दा काय झालय की परवाच्या वृत्तपत्रामध्ये ४०/४० लाख रूपयाचे दोन ईस्टिमेट मनपा निधीतुन कॉंक्रींटींगचे मंजुर करण्यात

आलेले आहेत.मी सन्मा सदस्य कैलास आप्पांना म्हंटल की आप्पा की ४ कोटी रूपये कॉंक्रीटींगचे १०० कोटीमधुन टाकले गेलेले आहेत. मग तुम्ही हा निधी का व्यर्थ घालवता आहेत म्हंटल तर केव्हा काय होईल याचा भरोसा नाहीये म्हणाले. हे शाश्वती नाहीये, शाश्वत नाही, असु द्या याची चर्चा अवांतर आहे परंतू मला एक दुख: वाटत या गोष्टींच की आमचे सन्मा. सदस्य कैलासआप्पा आज सभागृहाच कामकाज मागच्या सिटवर बसुन पाहता आहेत. त्यांनाही यातना होत असतील की, मी चर्चेमध्ये पार्टीसिपेट करू शकत नाही आणि आम्हालाही वाईट वाटत आहे की नगरपालिकेपासुन ते महानगरपालिकेपर्यंतचा ज्येष्ठतेचा सगळ्यात जास्त जर कधी कोणी असेल तर सदस्य तर ते सन्मा. कैलासआप्पा आहेत आणि न्यायालयीन लढ्यामध्ये त्यांना या सभागृहामध्ये बसता येत नाही. परंतू ही खंत सांगतो की कैलासआप्पांचा अनुभव आमचे ढेकळेसाहेब तेही ज्येष्ठ सदस्य, सर्वात ज्येष्ठ सदस्य आहेत ते सभागृहाचे, कैलास आप्पा पाहीले तर ते लास्ट ऑफ टु आहेत ते मी जे काही असेल ते कैलासआप्पांकडून शिकलो. पण आज मनाला कुठेतरी दुख: वाटतय की ते आज या बेंचवर न बसता मागे बसता आहे. तर मी हा सहज विषय केला तर नितीनभाऊ काय बोलले की ते अश्वथामा आहेत म्हणाले. त्यांची मोहमाया या महापालिकेच्या याच्यमधुन मुक्त होणार नाही. अशी काही टायटल असेल मॅडम की सभागृहात ठराव पारीत करून त्यांना या जागेवर बसु देण्याच्या संदर्भातील काही कायदेशिर तरतूद असेल तर तशा पध्दतीचा अभ्यास करून ठराव करावा.

**नगरसचिव, विषय क्रं.०७ :-** महानगरपालिका मालकीची १० नग वाहने व २३ नग ट्रॉली (कालबाहय / निर्लेखित चा ई-लिलावव्दारे आलेले उच्चतम (H1) Chandamrut Enterprises, Jalgaon यांचे रक्कम रु.२०,८७,९४५/- मात्र दर स्विकारणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा. अशा पध्दतीचे अजुन जे काही भंगार वाहने असतील तर त्या वर्षानुवर्षे त्याचा विनियोग आपण करत नाही. जागा आपल्या व्यापल्या जातात आणि परिस्थिती अशी असते की महानगरपालिकेच्या प्रांगणात वर्षानुवर्षे तशा पध्दतीच साहित्य पडुन असत आणि ते दिसायलाही घाण दिसते. तर या अनुषंगाने अशा पध्दतीच जे काही भंगार साहीत्य असेल त्याचा सुध्दा तातडीने लिलाव करून त्याचा निर्णय लवकरात लवकर घेण्यात यावा.

**मा. आयुक्त** :- याच्याच अनुषंगाने आपल्या अस लक्षात आहे की आपल्या काही दादांच्या काळामध्ये दर शनिवारी काहीतरी साहीत्य जमा करायचे आणि एकत्र लिलाव करायचे अस काहीतरी लिलाव करायचे तर मला अस वाटत की ती एक चांगली पध्दत होती जाहीर लिलाव करायची की सगळ भंगार साहीत्य एकाच ठिकाणी जमा करायच आणि लिलाव करायला बोलावायच.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- मॅडम दर सहा महिन्यांनी लिलाव करायचा हा सगळा

**मा.आयुक्त** :- हो ती सिस्टम पुन्हा एकदा सुरू करायला हरकत नाहीये अस माझ मत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- पुन्हा सुरू करण्यात यावी.

**श्री.अश्विन सोनवणे** :- बरोबर आहे म्हणजे भंगार पडुन राहणार नाही.

**मा.आयुक्त** :- हो म्हणजे दर सहा महिन्यांनी लिलाव करायचा.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- अश्विनभाऊंच्या टाईमाला लिलाव व्हायचा

**मा.आयुक्त** :- हो भंगार साहित्याचा ओपन लिलाव करू.

**श्री.नितीन लढ्ढा** :- मॅडम याच्यात आहे ना जे अधिकारी आहेत ना त्यांना सुचना देण्यात याव्या.

**मा.आयुक्त** :- सोनगिरेसाहेब ओपन लिलाव करायचा प्लॅन तयार करा.

**श्री.अश्विन सोनवणे** :- मॅडम दर सहा महिन्यांनी लिलाव करा तिथे

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ७ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०५६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका मालकीची कालबाहय/निर्लेखित १० नग वाहने, २३ नग ट्रॉली ई-लिलावाने विक्री करणे कामी ई-निविदाव्दारे दर मागविणे बाबत आयुक्त यांचे

दि.१५/११/२०२२ रोजीच्या समक्ष मान्यतेअंती ई-निविदा प्रक्रीया राबविणे कामी प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार आयुक्त यांचे मान्यतेने उक्त कामाची ई-निविदा सुचना क्रं.१८६ सन २०२२-२३ दि.१७/०१/२०२३ अन्वये सदर निविदा सुचना महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. तसेच ई-निविदा सुचना मनपा पत्र जा.क्र./ज.श.म.न.पा./वाहन वि./१३३/२०२२-२३ दि.१७/०१/२०२३ नुसार ई-निविदा सुचना क्रं.१८६/२०२२-२३ दैनिक सकाळ वृत्तपत्रात दि.१८/०१/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती.

सदर ई-निविदा सुचना क्रं.१८६ सन २०२२-२३ दि.१७/०१/२०२३ रोजी प्रसिध्द केली असता दि.३१/०१/२०२३ रोजी विहीत मुदतीमध्ये ०८ निविदा संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहेत. सदर निविदा सहा.आयुक्त (वाहन) यांचे समक्ष मान्यतेने लिफाफा क्रं.१ (दस्ताऐवज) डाऊनलोड करण्यात आलेले असून संकेतस्थळावर प्राप्त झालेले निविदाधारकांची नांवे व लिफाफा क्रं.१ (दस्ताऐवज) पडताळणी अंती Bidder चे Status खालील प्रमाणे :-

| Sr No | Bid Number | Bidder Name | Status |
|---|---|---|---|
| 1 | 4735729 | Sidra Corporation Mumbai | Rejected |
| 2 | 4737120 | Deepak Traders Ulhasnagar | Accepted |
| 3 | 4737929 | Tawakkul Enterprises Khamgaon | Accepted |
| 4 | 4738357 | Kamran Steel Traders Jamner | Accepted |
| 5 | 4738476 | Zahid Trading Co Amravati | Rejected |
| 6 | 4738484 | Chandamrut Enterprises Jalgaon | Accepted |
| 7 | 4738764 | SS Steel Traders Jalgaon | Accepted |
| 8 | 4738885 | Classik Auto Deal Khamgaon | Accepted |

वरील प्राप्त निविदाधारक यांनी निविदेत सादर केलेले दस्तऐवजांचा तुलनात्मक तक्ता निविदा समितीसमोर पडताळणी करिता सादर केले असता निविदा समितीने अनुक्रमांक २, ३, ४, ६, ७ व ८ हे निविदाधारक पात्र असून उर्वरित अनुक्रमांक १ व ५ हे निविदाधारक अपात्र असून लिफाफा क्र.२ उघडणेस निविदा समितीने मान्यता दिल्यानूसार दि.०८/०३/२०२३ रोजी लिफाफा क्रं.२ उघडण्यात आला त्यामध्ये खालील प्रमाणे Bid Rank (BoQ1) दर्शविण्यात आलेली आहे.

| Sr No | Bidder Name | Amount | Bid Rank | Bid Higher Rank |
|---|---|---|---|---|
| 1 | Kamran Steel Traders Jamner | 11,37,777/- | L1 | H6 |
| 2 | Classik Auto Deal Khamgaon | 11,40,000/- | L2 | H5 |
| 3 | SS Steel Traders Jalgaon | 12,51,000/- | L3 | H4 |
| 4 | Tawakkul Enterprises Khamgaon | 12,51,313/- | L4 | H3 |
| 5 | Deepak Traders Ulhasnagar | 18,00,251/- | L5 | H2 |
| 6 | Chandamrut Enterprises Jalgaon | 20,87,945/- | L6 | H1 |

उपरोक्त दराचा Bid Rank (BoQ1) दर्शविण्यात आल्याप्रमाणे दराचा तुलनात्मक तक्ता पाहता लिफाफा क्रं.२ (दराचा लिफाफा) पृष्ठ क्रं.२० प्रमाणे स्वतंत्रपणे संकेतस्थळावर भरलेल्या दराप्रमाणे H1 Chandamrut Enterprises Jalgaon यांनी उच्चतम दिलेल्या दरानुसार कार्यादेश देण्यास हरकत नाही. सदर कार्यादेशामध्ये खालील प्रमाणे कालबाहय वाहने व कालबाहय ट्रॉली संबंधीतांच्या ताब्यात देण्यात येत आहे.

| Sr No | Vehicles No | Description | Year of Manufacture | Name of Make company | Rates to be Quoted to Tender (H1) |
|---|---|---|---|---|---|
| 1. | MH-19 C 1613 | Tractor | Oct-1992 | Masy Ferguson | 20,87,945/- |
| 2. | MH-19 C 3451 | Tractor | Dec-1995 | Masy Ferguson | |
| 3. | MWD-9348 | Tractor | May-1988 | Masy Ferguson | |
| 4. | MH-19 C 1231 | Tractor | May-1992 | Masy Ferguson | |
| 5. | MH-19 C 3459 | Tractor | Dec-1995 | Masy Ferguson | |
| 6. | MH-19 C 1609 | Tractor | Oct-1992 | Masy Ferguson | |
| 7. | MH-19 J 0028 | Water Tanker | May-1995 | Tata Motors | |
| 8. | MWD-6597 | Truck | 1982 | Tata Motors | |
| 9. | MH-19 M 5866 | Electrical Ladder | Dec-1995 | Tata Motors | |
| 10. | MH-19 M 0169 | Ambassador | Feb-2003 | Hindustan Motors | |
| 11. | MH-19 -3693 | Trolley | 1991 | Tractors & Farm Eq. | |
| 12. | MH-19 -3694 | Trolley | 1991 | Tractors & Farm Eq. | |
| 13. | MH-19 -3692 | Trolley | 1991 | Tractors & Farm Eq. | |
| 14. | MH-19 -3785 | Trolley | 1992 | Tractors & Farm Eq. | |
| 15. | MH-19 -4023 | Trolley | 1992 | Tractors & Farm Eq. | |
| 16. | MH-19 -4024 | Trolley | 1992 | Tractors & Farm Eq. | |
| 17. | MH-19 -4025 | Trolley | 1992 | Tractors & Farm Eq. | |
| 18. | MH-19 -4026 | Trolley | 1992 | Tractors & Farm Eq. | |
| 19. | MH-19 -4027 | Trolley | 1992 | Tractors & Farm Eq. | |
| 20. | MH-19 -9934 | Trolley | 1995 | Tractors & Farm Eq. | |
| 21. | MH-19 -9960 | Trolley | 1995 | Tractors & Farm Eq. | |
| 22. | MH-19 -9936 | Trolley | 1995 | Tractors & Farm Eq. | |
| 23. | MH-19 -9935 | Trolley | 1995 | Tractors & Farm Eq. | |
| 24. | MH-19 -9961 | Trolley | 1995 | Tractors & Farm Eq. | |
| 25. | MH-19 -9946 | Trolley | 1995 | Tractors & Farm Eq. | |
| 26. | MH-19 -9943 | Trolley | 1995 | Tractors & Farm Eq. | |
| 27. | MH-19 -9959 | Trolley | 1995 | Tractors & Farm Eq. | |
| 28. | MH-19 -5684 | Trolley | 1996 | Tractors & Farm Eq. | |
| 29. | MH-19 -5719 | Trolley | 1996 | Tractors & Farm Eq. | |
| 30. | MCC - 2305 | Trolley | 1989 | Tractors & Farm Eq. | |
| 31. | MCC - 888 | Trolley | 1988 | Tractors & Farm Eq. | |
| 32. | MCC - 944 | Trolley | 1988 | Tractors & Farm Eq. | |
| 33. | MWD - 9204 | Trolley | 1986 | Tractors & Farm Eq. | |
| Total Amount | | | | | 20,87,945/- |

उपरोक्त नमूद अनुक्रमांक १ ते ३३ (कालबाहय १० वाहने + २३ ट्रॉली) ताब्यात देण्यापुर्वी Chandamrut Enterprises Jalgaon यांचे कडून रक्कम रु.२०,८७,९४५/- मात्रचा भरणा (GST करासह) महानगरपालिका अर्थ विभागात रोखीने / धनादेश / RTGS व्दारे तात्काळ भरणा करण्याकामी संबंधीतांना पत्र / कार्यादेश देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महापालिका मालकीचे इतर काही भंगार साहित्य असत्यास तसेच जे वेळोवेळी भंगार साहित्य जमा होईल त्याचा प्रशासनाने दर सहा महिन्यांनी लिलाव करावा.

**सर्वानुमते मंजुर**

| | | |
|---|---|---|
| **अनुकूल** | **-** | **६०** |
| **सूचक** | **:-** | **लढ्ढा नितीन बालमुकुंद** |
| **अनुमोदक** | **:-** | **पाटील कुलभुषण विरभान** |

**नगरसचिव, विषय क्रं.०८ :-** अतिक्रमण विभागास आवश्यकतेनुसार मजुर पुरवठा करणे कामी सेवा शुल्क मागविणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रशासनाने दिलेल्या प्रस्तावामध्ये समसमान निविदा धारक जे आहेत ते आलेले आहेत. एक ओम साई असोसिएट आणि एक रॅपिड सिक्युरिटी अॅन्ड सर्विसेस, तर रॅपिड सिक्युरिटी अॅन्ड सर्विसेस यांच्या कामाचा अनुभव पाहाता त्यांना कार्यादेश देण्याच्या संदर्भात मान्यता देण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- सन्मा.सदस्य नितीनभाऊंनी दिलेल्या सुचनांची प्रशासनाने नोंद घ्यावी. विषय क्रं. ८ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०५७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, आयुक्त यांचे दिनांक २३/०९/२०२२ रोजी अतिक्रमण निर्मुलन विभागाकडेस आवश्यकतेनुसार ५० मजुर पुरविणेची मान्यता मिळाली असून किमान कायदयाचे प्रति मजुरांस ६०१/- रु.दर चालु असल्याने ५० कामगार लावणेस अतिक्रमण विभागाकडेस बजेट तरतुद कमी असल्याने अतिक्रमण विभागाकडील बजेट तरतुद रु.४०,००,०००/- पाहता एकुण २० मजुर लावणेस अंदाजे ३२,४०,०००/- खर्च येत असल्याने त्यास महासभेची मान्यता आवश्यक असल्याने महापौर यांनी दिनांक १३/१०/२०२२ रोजी कार्योत्तर मान्यता दिल्याने आयुक्त यांनी दि.४/११/२०२२ रोजी ई निविदा प्रसिध्द करणेस मान्यता दिली असता ई निविदा दि.११/११/२०२२ रोजी निविदा क्र.४ प्रसिध्द करुन निविदा धारकांकडुन सेवा शुल्क ची मागणी करण्यांत आली सदर निविदेची दि.१२/११/२०२२ च्या दैनिक सकाळ पेपरात प्रसिध्द देण्यांत आली.

ई निविदा क्र.ची मुदत २४/११/२०२२ अखेर असल्याने मुदतीत ई निविदेत एकुण ५ निविदा धारकांनी भाग घेतल्याचे दिसुन आले त्या अनुषंगाने निविदा समितीची मान्यता घेवुन लिफाफा क्र.१ तांत्रिक पाकीटे उघडण्यात आले त्यात प्राप्त

१) ओम साई असोसिएट
२) रॅपिट सेक्युरिटी अॅण्ड सर्व्हीस
३) एस.के.कॉन्टक्टर्स
४) श्री.गजानन एंटरप्रायजेस
५) सत्यनारायण सिक्युरीटी फोर्स

यांनी तांत्रिक कागद पत्राची पुर्तता केल्याने ५ ही निविदाधारक पात्र झाल्याने निविदा समितीच्या मान्यतेने लिफाफा क्र.२ दराचा उघडण्यांस मान्यता दिल्याने त्यात

१) ओम साई असोसिएट - यांचे सेवा शुल्क दर - ०.००१
२) रॅपिट सेक्युरिटी अॅण्ड सर्व्हीस - यांचे सेवा शुल्क दर - ०.००१
३) एस.के.कॉन्टक्टर्स - यांचे सेवा शुल्क दर - २४.७१०
४) श्री.गजानन एंटरप्रायजेस - यांचे सेवा शुल्क दर -०.०१०
५) सत्यनारायण सिक्युरीटी फोर्स - यांचे सेवा शुल्क दर -०.०१०

असे सेवाशुल्क दर प्राप्त झाले असता सर्वात कमी दर

१) ओम साई असोसिएट - यांचे सेवा शुल्क दर - ०.००१
२) रॅपिट सेक्युरिटी अॅण्ड सर्व्हीस - यांचे सेवा शुल्क दर - ०.००१

वरील दोन्ही निविदा धारक एल-१ असुन सभागृहात झालेल्या चर्चेनुसार रॅपिट सेक्युरिटी अॅण्ड सर्व्हीस यांचे दर स्विकृत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव, विषय क्रं.०९ :-** शेख तरन्नुम मोईनुद्दिन, उपशिक्षिका म.न.पा.उर्दू शाळा क्र.१२, जळगांव यांच्या एकतर्फी आंतरजिल्हा बदलीस नाहरकत प्रमाणपत्र मिळणेसाठी प्रशासन अधिकारी, म.न.पा.शिक्षण मंडळ, जळगांव यांचेकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- मला वाटत की या शिक्षीकेचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा. पण कस आहे की प्रशासनाने याच्यामध्ये जी सुचना मांडलेली आहे की, सदर शिक्षीकेस आंतरजिल्हा बदलीस मान्यता देण्यात यावी. या आर्थिक वर्षात मनपा फंडातील ५० टक्के देण्याचा प्रश्न उदभवु शकतो या अनुषंगाने मान्यता देण्यात यावी.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ९ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०५८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, म.न.पा. शिक्षण मंडळ आस्थापनेवरील कार्यरत श्रीमती शेख तरन्नुम मोईनुद्दिन, उपशिक्षिका म.न.पा. शाळा क्र.१२, जळगांव येथे दि.२१/०१/२००९ पासून सेवेत कार्यरत असून ते मुळगांव जिल्हा नाशिक येथील रहिवासी असून त्यांचे मुळगांव नाशिक ते जळगांव शहरापासूनचे अंतर २०० ते २५० किलोमीटर आहे म्हणून संबंधीतांनी महानगरपालिका नाशिक या आस्थापनेवर आंतरजिल्हा एकतर्फी बदली होणेसाठी नाहरकत प्रमाणपत्र मिळणेकरिता दि.११/०३/२०२० रोजी विनंती अर्ज व प्रस्ताव म.न.पा.शिक्षण मंडळ,जळगांव यांचेकडेस सादर केलेला आहे.

तथापि, अर्जदार शेख तरन्नुम मोईनुद्दिन यांची कोणतीही विभागीय चौकशी सुरु नसून म.न.पा. उर्दू माध्यम शाळांमध्ये विदयार्थ्यांची पटसंख्या व शिक्षकांची संख्या खालील तक्त्यात नमुद केलेली आहे.

| क्र. | माध्यम | विदयार्थी पटसंख्या | कार्यरत शिक्षक संख्या |
|---|---|---|---|
| | उर्दू | ३०८८ | ८४ |

वरील तक्त्यात नमुद विदयार्थी पटसंख्या प्रमाणे शिक्षकांची संख्या ही नियमानुसार ३५:१ म्हणजे ३५ विदयार्थी मागे एक शिक्षक असणे महत्वाचे आहे. उर्दू माध्यमाची विदयार्थी संख्या व कार्यरत शिक्षक एकूण ८४ प्रमाणे ३५X८४=२९४० होत आहे. त्यामुळे एकूण उर्दू माध्यमांच्या विदयार्थ्यांची पटसंख्या लक्षात घेता उर्दू माध्यम शिक्षक संख्या आजच्या स्थितीत पुरेशी आहे.

तसेच सामान्य प्रशासन विभागाकडील शासन परिपत्रक दि.२७ नोव्हेंबर,१९९७ मधील १ (क) नुसार व शासन निर्णय २० मार्च, २००७ अन्वये जेथे अपवादात्मक परिस्थितीमुळे बदली करणे आवश्यक आहे अशी सक्षम प्राधिकाऱ्यांची खात्री झाल्यास, मात्र तसे करतांना तत्संबंधीची कारणे नमूद करण्यात यावी असे असून महिला कर्मचाऱ्यांची असाहय परिस्थिती अशी कारणे नमुद केली आहे.

तथापि, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१८/प्र.क्र.३८९/नवि-२० दि.१६/०२/२०२१ च्या शासन निर्णयामधील अट क्र.१ ते ११ नुसार संबंधीतांना नियम व अटी मान्य असल्याबाबत कळवित असून सेवा वर्ग करण्याबाबत मान्यता देण्याचे अधिकार हे आयुक्त,महानगरपालिका यांना आहे. तरी संबंधीत उपशिक्षिकेला बदली ठिकाणाचे नाहरकत प्रमाणपत्र मिळत नाही व या आस्थापनेवरुन आयुक्त, म.न.पा. जळगांव कार्यमुक्त करीत नाही तो पर्यंत संबंधीत उपशिक्षिका या याच आस्थापनेवर कार्यरत राहतील. त्यामुळे विदयार्थ्यांचे कोणतेही प्रकारचे शैक्षणिक नुकसान होणार नाही.

उक्त शिक्षिकेस आंतरजिल्हा बदलीस मान्यता मिळाल्यास म.न.पा.वरील खालील रकान्यात नमूद केलेप्रमाणे रक्कम रु.२,९४,०००/- मात्रचा ५० टक्के आर्थिकबोजा एक वर्षाकरीता कमी होऊ शकतो.

| क्र. | शिक्षकाचे नांव | शाळा क्रमांक | मासिक वेतन | वार्षिक वेतन | शिक्षण सेवक मानधन | शिक्षणसेवक वार्षिक मानधन | जादा वेतन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | शेख तरन्नुम मोईनुद्दिन | १२ | ५५००० | ६६०००० | ६००० | ७२००० | ५८८० |
| | एकूण १०० टक्के वेतन | - | ५५००० | ६६०००० | ६००० | ७२००० | ५८८० |
| | म.न.पा.५० टक्के वेतन | - | २७५०० | ३३०००० | ३००० | ३६००० | २९४० |

श्रीमती शेख तरन्नुम मोईनुद्दिन, उपशिक्षिका, म.न.पा.उर्दू शाळा क्र.१२, जळगांव यांना महानगरपालिका शिक्षण मंडळ, नाशिक विभाग त्यांच्या आस्थापनेवर सामावून घेण्यास तयार असल्याच्या अटीवर नाहरकत प्रमाणपत्र देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव, विषय क्रं.१० :-** ११ एचडब्ल्युसी पैकी १ एचडब्ल्युसीला हिंदु ह्रदय बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना नाव देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रशासनाने प्रस्तावित केल्याप्रमाणे एचडब्ल्युसी क्रं. ११ ,जळगांव या एक एचडब्ल्युसीला हिंदु ह्रदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना असे नामकरण करणेस मान्यता देण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**श्री.महेश चौधरी**:- महापौरताई हा जो विषय आहे हिंदु ह्रदय सम्राट बाळासाहेब ठाकरे या नावाला आपल्याला सर्वांना मिळुन मंजुरी द्यायची आहे आणि हा राज्य शासनाने घेतलेला जो निर्णय आहे तो खुप चांगला निर्णय आहे. तर हा निर्णय घेत असतांना उर्वरित जे आपले १० दवाखाने आहेत. तर त्या दवाखान्यांना आपल्या थोर पुरूषांचे आणि लोकनेत्यांचे नांव दिले पाहीजे अशी आमची विनंती आहे. तर नंबर एकचा जो आहे त्यास सरदार वल्लभभाई पटेल, नंबर दोनला डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम, नंबर-३ महर्षि वाल्मिक, नंबर-४ छत्रपती शिवाजी महाराज, नंबर-५ स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयी, नंबर -६ गोपीनाथरावजी मुंडे, नंबर-७ महाराणा प्रताप सिंह , आपले ८ नंबर झाले आहे, नंबर-९ संत सेवालाल महाराज, नंबर-१० समाज सुधारक सावित्रीबाई फुले आणि नंबर- ११ राजमाता जिजाऊ अशा पध्दतीने आपण सर्व ठिकाणी आपण थोर पुरूषांची, लोकनेत्यांची नाव दिली पाहीजे अशी विनंती आहे आणि तो कागद मी आपल्याला सादर करतो आणि तसेच माझी एक दुसरी विनंती आहे महापौरताई आणि आयुक्त मॅडम केंद्र शासन असो की राज्य शासन असो मुलांच्या आरोग्यासंदर्भात खुप सिरियस आहे. आपण नेहमी पाहतो की केंद्राच्या योजना येतात, राज्याच्या योजना येतात. आपण त्याखाली फॉलो होत असतो. आता नविन योजना आली जळगांव शहरासाठी २५ दवाखाने सुरू झाले तर हि खुप मोठी गोष्ट आहे. तर त्या सर्व २५ दवाखान्यांसाठी आपण जागा बघितली आणि त्याचेही अभिनंदन पण जे दवाखाने महापालिकेचे कार्यरत आहेत. तर त्या दवाखान्यांसदर्भात सुध्दा आपण व्हिजीट दिली पाहीजे. जे डॉक्टर चांगले काम करत आहेत त्यांचं मी १०० टक्के अभिनंदन करतो. पण जिथे काम होत नसेल तिथे आपण लक्ष दिले पाहीजे. जिथे पाच-पाच , सात-सात वर्ष एकाच ठिकाणी बसलेले आहेत. जिथे काहीच प्रोग्रेस नाही त्याची आपण दखल घेतली पाहीजे. तिथे महा-लॅब आहे जळगांव महापालिकेच्या दवाखान्यामध्ये जिथे महा-लॅब आहे. ५० ते ६० प्रकारच्या ज्या टेस्ट आहेत त्या सर्व मोफत आहेत. नागरीकांना त्याची माहितीच नाही. आपण प्रायव्हेट लॅबला जा तिथे लाईन लागलेली असते. आपल्या महापालिकेकडे कोणी पाहात नाही. सेम प्रोसिजर आपल्या लॅबचीपण आहे महापालिकेचे सुध्दा लॅब आहेत. एका दवाखान्यामध्ये दोन लॅब आहेत तरी सुध्दा तिथे कोणी भेट देत नाही. दुर्देव आहे हे आपण डॉक्टर आहेत असे असुन सुध्दा त्याच्याकडे लक्ष दिले जात नाही. तसेच प्रसुति विभागासंदर्भात मी ४ वर्षापासुन सांगतोय. पण त्याकडेही पुर्ण लक्ष दिले जात नाही. तर ईच्छाशक्तिचा अभाव मला अस वाटत की होतोय. तर केंद्र सरकार, राज्य सरकार त्याच्यावर एवढ्या गांभिर्याने विचार करत तर आपण सुध्दा याच्यावर गांर्भीयाने विचार करावा. जळगांव शहर महापालिकेचे दवाखाने सुस्थितीत आणावे. अशी माझी नम्र विनंती आहे. पुर्वी एक जाहिरात आली आता महापौर म्हणता, आता एखाद्या माणसाने टेस्ट करायची आहे तर त्याने काय करावं आणि प्रत्येक ठिकाणी स्पॉट आहे आपण प्रत्येक ठिकाणी कराव अशी माझी विनंती आहे.

**मा.आयुक्त :-** करण्यात येईल.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** खोटे नगर परिसरात ज्या ६ हेल्थ पोस्ट आहेत त्याच काय झाल.

**मा.आयुक्त :-** त्याच आहेत ना , सोनगिरे साहेब काय

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** ११ पैकी ६ ज्या आहेत त्याची काय प्रोसिजर चालु आहे ते सांगा.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** हेल्थ पोस्ट संदर्भात सांगु ईच्छितो की जे महापालिकेच्या जागेवर ज्या हेल्थ पोस्ट आहेत. त्या जागेवरंच टेंडर आज आयुक्त मॅडमांच्या सहिने प्रसिध्दीला येईल आणि भाड्याच्या ज्या जागा आहेत त्या जागांच्या संदर्भात त्या घरमालकांनी जे दर दिलेले आहेत. त्या ठिकाणच्या रेडीरेकनरच्या हिशोबाने तपासुन घ्यायचे आहेत आणि मग जे योग्य दर असतील त्या दराचे आपल्याला फायनल करून करारनामा करून चालु करता येईल.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** आता याला जवळपास सहा महिने झाले आहे साहेब.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** भाऊ मराठे साहेबांनीही याचा पाठपुरावा केलेला आहे आणि आता त्याच उदघाटन करायचे आहे. तेव्हा आता हे सगळ कंम्पलीट करून घेवु.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** आपल्याला केंद्र शासनाने, राज्य शासनाने लिमिट दिली होती.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** भाऊ याची जी मान्यता होती ती मान्यता आता आली म्हणुन उशिर झालेला आहे आणि आता आपण सुरू करणार आहेत.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** आता उन्हाळा सुरू आहे. पावसाळा सुरू होणार आहे तर याचा विचार करायला पाहीजे.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** भाऊ महासभेची याला मान्यता मिळाली की आपण लगेच सुरू करू.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** आता एका महिन्याच्या पुर्वी सुरू करावे.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** हो एक महिन्यात होवुन जाईल. ते एक जे आहे त्याचे उदघाटन होवुन जाईल आणि आपले काम चालु होवुन जातील.

**मा.महापौर** :- विषय क्रं. १० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०५९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सहसंचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे कडील पत्र राआसो/राकाव्य/१५th FC/आपला दवाखाना/१६१८००-१६२३८०/२३ दिनांक २१ मार्च २०२३ च्या पत्रानुसार व केंद्र शासनाचे दि.३०/०५/२०१८ रोजीचे पत्र या संदर्भीत पत्रान्वये मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये प्रत्येक तालुक्यात एक याप्रमाणे ३५५ हिंदु ह्रदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना केंद्र स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत.

१५ वा वित्त आयोग अंतर्गत स्थापन करण्यात येणाऱ्या शहरी आरोग्यवर्धीनी केंद्रापैकी प्रत्येक तालुक्यातील एक शहरी आरोग्यवर्धीनी केंद्राचे रुपांतर हिंदु ह्रदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना केंद्रात करावे.

त्यानुसार जळगांव शहर महानगरपालिकेतील एकुण १७ हेल्थ पोस्ट मंजुर झाले असुन त्यापैकी मनपा हद्दीतील ११ शासकीय जागेवर व ६ भाडे तत्वावर करण्यासंबंधी प्रक्रिया सुरु असुन सहसंचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे कडील पत्र राआसो/राकाव्य/१५th FC/आपला दवाखाना/१६१८००-१६२३८०/२३ दिनांक २१ मार्च २०२३ च्या पत्रानुसार व त्यामध्ये दिलेल्या ११ एचडब्ल्युसी पैकी मनपा बालवाडी क्र.५, शिवकॉलनी,जळगांव या एचडब्ल्युसीला " हिंदु ह्रदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना " असे नाव देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

| | | |
|---|---|---|
| **अनुकूल** | - | **६०** |
| **सूचक** | :- | **लढ्ढा नितीन बालमुकुंद** |
| **अनुमोदक** | :- | **पाटील कुलभुषण विरभान** |

**नगरसचिव, विषय क्रं.११ :-** जळगांव शहर महानगरपालिकेतील सन्मा.सदस्य यांचेकडून मा.महापौर, मनपा,जळगांव यांचेकडेस विविध विकास कामे करून मिळणेबाबत प्रस्ताव प्राप्त झालेले असून सोबतचे यादीतील एकूण ०१ ते २१० कामे विविध शासकीय योजनांच्या निधीमधुन करणेबाबत मा.महापौर ,मनपा,जळगांव यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- अ.क्रं. १ ते २१० या कामांना मंजुरी देण्यात यावी तसेच मा.सदस्य ललीतभाऊ कोल्हे यांनी सुध्दा एक प्रस्ताव दिलेला आहे. तरी एकुण २११ च्या प्रस्तावास याला मान्यता देण्यात येत आहे.

**श्री.नितीन बरडे** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- आयत्या वेळेचा विषय आहे ना हा.

**श्री.नितीन बरडे** :- फक्त ॲड करायचे आहे महापौरताई

**श्री.राजेंद्र पाटील** :- महापौर महोदया, प्रत्येक महासभेमध्ये डि-मार्ट ते स्मशानभुमि ते आदित्य चौकापर्यंतचा रस्ता याबाबत माहिती मागत असतो.

**श्री.नितीन लढ्ढा** :- या रस्त्याकरीता निधी साठी मागणी करता येईल. शासकीय निधीची मागणी करता येईल याला.

**मा.महापौर** :- आयत्या वेळेचा विषय

**मा.आयुक्त** :- आपण जळगांवची जी प्रथा केलेली आहे की आयत्या वेळेचे विषय घेत नाहीत म्हणुन कार्योत्तर मंजुरी देवुन देवु आणि मग शासनाकडे पाठवुन देवु.

**श्री.नितीन लढ्ढा** :- खर तर वेळ नाहीये कारण काय आहे की शासन स्तरावर निधी मागण्याच्या संदर्भात

**मा.महापौर** :- ठराव करतांना त्यात हि नोंद करावी कि वेळेवर हा विषय घेण्यात आला आणि हा विषय घेणे गरजेचे आहे आणि आयत्या वेळेचा विषय आपण घेत नाही. म्हणजे हा मुद्दा याच्यामध्ये आला पाहीजे.

(सभागृहामध्ये अनेक सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.महापौर** :- आमची तयारी असते पण प्रस्ताव येत नाही. भाऊ मी तुम्हाला सांगते की दोन दोन महिने होतात यासंदर्भात माझ गोराणेसाहेबांशी बोलण होतय.

**श्री.मनोज चौधरी** :- आमचा तर प्रस्ताव आला आहे ना महापौरताई

**मा.महापौर** :- तुमचे आले भाऊ पण इतरांचे आले का त्यांनाच विचारा तुम्ही आता.

**श्री.मनोज चौधरी** :- दोन - दोन महिने होवुन जातात तरी पण वर्कऑर्डर देत नाहीत आता पर्यंत तर काम चालु व्हायला पाहीजे होते.

**मा.आयुक्त** :- सोनगिरे साहेब तुमच्याकडे आलेले प्रस्ताव ईमिजेटली पाठवा. कारण महापौर मॅडम नियोजन करत आहेत. सन्मा.सदस्यांची अशी सुचना आहे की दर १५ दिवसांनी सभा झाली पाहीजे. तर लवकर पाठवा ते

**मा.महापौर** :- रियल फॅक्ट सगळ्यांना माहिती आहे मॅडम तर काम केलेल आपल्याला पण माहिती आहे की

**श्री.मनोज चौधरी** :- सगळ्यांना माहिती आहे की आणि मान्य आहे पण काय होत की

**मा.महापौर** :- काय आहे की आज जर महासभा निघाली तर परत १५ दिवसांनी त्यांना हे कराव लागत पण काय म्हणते की दोन दिवसांत जर येणार असतील प्रस्ताव तर दोन दिवस वेटिंग करूया हा माझा प्रामाणिक हेतू येथे असतो.

(सभागृहामध्ये अनेक सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.महापौर** :- आता हा एक विषय आहे जसा आपला

**श्री.मनोज चौधरी** :- महापौरताई १५/ १५ दिवस नाही झाले दोन दोन महिने झाले आहेत वर्कऑर्डरला, दोन महिने झाले आहे जवळपास

**मा.आयुक्त** :- सोनगिरे साहेब डि-मार्ट च्या रस्त्याच्या बाबतीत माहिती द्या.

**श्री.राजेंद्र पाटील** :- मला वाटत पुर्ण पंचवार्षिक संपेपावेतो माहिती नाही पण हे काम होईल का सोनगिरेसाहेब

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** भाऊ मी याबाबतीत मी आर.टि. पाटील यांनाही बोललो होतो आणि व्हॉटसअॅप वरही काही टाकलेले आहे मला वाटत. तर ऑलरेडी तो रस्ता आपण प्रस्तावित केलेला आहे. तर पाटील म्हणाले की आपण जो थोडासा एक अर्धा टप्पा केलेला आहे आणि तिथुन जो राहीलेला आहे. त्याचे काम आता पुढच्या याच्यामध्ये घेणार आहोत.

**श्री.राजेंद्र पाटील** :- हे आपण मागच्या वेळेसपण सांगीतले आहे.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** हो

**श्री.राजेंद्र पाटील** :- पण नेमका कोणत्या निधीत प्रस्तावित आहे तो आता कुठे आहे. त्याच स्टेटस काय आहे ती माहिती मागतो मी आणि ती माहिती मिळत नाही.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** भाऊ आपण जी माहिती मागीतलेली होती.

**श्री.नितीन लढ्ढा** :- सोनगिरे साहेब काय आहे माहिती आहे का जी माहिती मागतली ना ती देत चला.

**श्री.राजेंद्र पाटील** :- नाही तुम्ही जे म्हणता ना भाऊ, त्याच्यात त्रुट्या आहेत ना तर आतापर्यंत तो रस्ता मला टाकावा लागलेला आहे. कारण मला माहिती मिळत नाही म्हणुन तो परत घ्यावा लागला आहे. उद्या तो कुठेतरी मंजुर होईल आणि परत हे या ठिकाणी टाकले गेले आपले असे दिसेल.

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही सोनगिरे साहेब काय असेल तो प्रस्ताव संध्याकाळ पर्यंत पुर्ण करावा आणि द्या.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** भाऊ मंजुरीला आहे तो रस्ता आर.टी.पाटील यांच्याशी बोललो

**श्री.राजेंद्र पाटील** :- कुठल्या याच्यात आहे हे मागच्या वेळेस पण विचारले होते साहेब

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** कुठल्या टेबलावर थांबले आहे ते पाहुन घेतो भाऊ आणि सांगतो.

**श्री.राजेंद्र पाटील** :- हे मी मागच्या एक वर्षापासुन विचारतो आहे साहेब तुम्हाला आजपर्यंत

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** भाऊ आर.टी. पाटील यांच्याशी चर्चा झाली.

**श्री.नितीन लढ्ढा** :- सोनगिरे साहेब राजुभाऊ घुगे पाटील आहेत ना मी तुम्हाला सांगतो की हे सन्मा.आमदार साहेब यांच्या गळयातले ताविज आहेत आणि त्यांना जर का वर्ष-वर्षभर तुम्ही अशा पध्दतीने मदत करू शकत नाही.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** भाऊ बजेटचे पण हे पाहाव लागत ना

**श्री.नितीन लढ्ढा** :- आता बजेटच सोडा आणि बाकीचे प्रस्ताव सोडुन त्या आणि त्यांचा प्रस्तावाची निविदा प्रक्रीया तातडीने सुरू करा.

**मा.आयुक्त** :- सर माझ एक सबमिशन राहील की जे काम येथे प्रस्तावित केलेले आहेत. तर ते जर याच्यात होत असतील तर होवू द्या.

**श्री.राजेंद्र पाटील** :- मॅडम

**मा.आयुक्त** :- सेम आले तर काय होईल.

**श्री.राजेंद्र पाटील** :- मॅडम मागे आपल्याला मागे सांगीतले होते आणि महापौरांना त्या रस्त्याची अवस्था माहिती आहे की ज्याप्रमाणे ईच्छादेवी चा आहे त्याप्रमाणेचे रस्ता खराब होता त्याच्यापेक्षाही वाईट अवस्था त्या रस्त्याची आहे. जवळजवळ त्याचे एक एक फुट जे आपले अंडरग्राऊंड त्याचे चेंबर आहेत ते दिड फुट उंच आहे तर रस्ता होण्याची वाट पाहता आहे ते चेंबर सुध्दा , कि लेव्हल केव्हा होईल याची चेंबर सुध्दा वाट बघत आहेत. किती वेळा बोलायचे आता तोपर्यंत उत्तर मिळत नाही.

**श्री.नितीन लढ्ढा** :- आज संध्याकाळ पर्यंत देतील ते उत्तर

**मा.महापौर** :- नितीनभाऊ हा जो रस्ता आहे हा रस्ता नामंजुर झाला आहे वाटत विभागीय आयुक्त कार्यालाकडुन , त्यामुळे तो गेला पुन्हा या निधीमध्ये तो रस्ता लावलेला आहे.

**श्री.राजेंद्र पाटील** :- मला उत्तर मिळालेले आहे की आयुक्त कार्यालयामध्ये गेलेला आहे आणि मग आता मनपा फंडातुन आपण करत आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही नाही राजुभाऊ काय झाल आहे की एका शासकीय निधीमधुन तो प्रस्ताव पाठवला होता परंतू त्याला विभागीय आयुक्तांकडून मंजुरी मिळाली नाही. मंजुर जरी झाला असेल तरी त्याची पोझिशन काय असेल आणि नसेल तरी त्याला मनपा फंडातुन त्याला प्रस्तावित करू.

**श्री.नितीन बरडे** :- आयुक्त मॅडम आपण नंदनवन कॉलनीत गेले होते. तो पुल पडलेला आहे बघा रस्ताच राहात नाही.

**मा.आयुक्त** :- आपण MC फंडात घेतला आहे ना तो

**श्री.नितीन बरडे** :- मॅडम फाईल तुमच्याकडे पडलेली आहे बघा तो मंजुर करून द्या. नाहीतर पावसाळ्याच्या आधी रस्ता नाही राहणार तिथे मॅडम

**श्री.राजेंद्र पाटील** :- आयुक्त मॅडम आता आठ ते दहा दिवसांमध्ये मला याच्यामध्ये समाधानकारक उत्तर आणि कार्यवाही झालेली दिसली पाहीजे.

**मा.महापौर** :- सोनगिरे साहेब या रस्त्याचे ईस्टिमेट तयार आहे का, काय विषय आहे तो मार्गी लावा लवकरात लवकर आणि MC फंडातुनच टाका. बाकी कोणत्याच शासकीय निधीवर आता विश्वास नाहीये. त्यामुळे लवकरात लवकर तो रस्ता MC फंडात करा. आता नविन बजेट सुरू झाले आहे तर ते आता करावे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ११ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०६० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका सर्व सन्मा.नगरसेवकांनी विकास कामांचे प्रस्ताव सादर केलेले असुन ते विविध शासकीय योजनांतुन घेणे बाबत विनंती केलेली आहे. सदर विकास कामे जिल्हा नियोजन मंडळ तसेच राज्य शासनाच्या निधीतुन घेणेबाबत मा.महापौर कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केलेले आहेत. जिल्हा नियोजन मंडळातील, नागरी दलितेत्तर, नगरोत्थान, दलितवस्ती सुधारणा योजना, ठक्कर बाप्पा आदिवासी योजना, नॅशनल क्लिन एअर प्रोग्राम निधी, नविन्यपुर्ण इत्यादी तसेच

राज्य शासनाच्या नगरविकास विभागातुन ही मुलभुत सुखसुविधा, नगरोत्थान, विशेष निधी, नाविन्यपुर्ण तसेच वैशिष्ट्यपुर्ण योजना,शासनाच्या प्रादेशिक पर्यटन विकास योजना निधी, जळगांव मनपा निधीतुन कामे सुचविलेली असुन त्यास मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर केलेले आहे. तरी या सोबत सादर केलेल्या यादीतील अ.क्र.०१ ते २१० या विकास कामांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे

तसेच वेळेअभावी मा.पिठासिन अधिकारी यांनी सभागृहात दिलेल्या सूचनेनूसार व सभागृहातील चर्चेच्यावेळी सन्मा.सदस्य श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा यांच्या सूचनेनूसार सन्मा.सदस्य,श्री.ललित विजय कोल्हे यांनी पत्रातील सूचविलेल्या खालील प्रमाणे नमूद केलेल्या कामांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

शासन निर्णय क्र.मनपा-२०२२/प्र.क्र.१२१(०६)/नवि-१६ दिनांक २१/०५/२०२२ अन्वये वार्ड क्रमांक ११ व १४ मध्ये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोईसुविधांचा विकास योजना अंतर्गत शासनाने रुपये ०५.०० कोटीचा निधी देणेबाबत शासन निर्णय पारित केलेला आहे, मात्र शासन शुध्दीपत्रक क्रमांक -मनपा-२०२२/प्र.क्र.१२१(०६)/नवि-१६ मंत्रालय मुंबई ३२ दिनांक १२/०४/२०२३ नुसार कामे रद्द करुन त्याऐवजी यासोबत जोडलेल्या विवरणपत्राप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णयात अट क्र.३ मध्ये प्रकल्प खर्चाच्या ७५ टक्क्याचा शासनाचा व मनपा हिस्सा २५ टक्के राहणार आहे. मात्र अशी धारणा आहे कि, शासनाने ७५ टक्के प्रमाणे सदर योजने अंतर्गत रुपये ०५.०० कोटी निधी वितरीत करण्यास मान्यता देतांना रुपये ०५.०० कोटी ही ७५ टक्के रक्कम ही शासनाची राहील व याव्यतिरिक्त २५ टक्के म्हणजेच रुपये १.२५ कोटीची उर्वरीत कामे मनपा निधीतील असतील करीता शासन निर्णयात नमुद ०५ कामांव्यतिरिक्त खालील प्रमाणे ०२ कामे मनपा २५ टक्के हिश्यापोटी कामे घेण्यात यावी.

वरील शासन निर्णयाच्या व्यतिरिक्त जळगांव मनपाच्या २५ टक्के निधीतील कामे

| | | |
|---|---|---|
| १ | प्र.क्र.१४ मेहरुण सर्वे नं.२७१ व २७२ मध्ये आरसीसी गटार बांधणे. | ८५,५४,९२३/- |
| २ | प्र.क्र.१४ मेहरुण सर्वे नं.२६५ व २६६ मध्ये आरसीसी गटार बांधणे. | ५९,६७,८५८/- |

शासन निर्णय क्र.मनपा-२०२२/प्र.क्र.१२१(०६)/नवि-१६ दिनांक १२/०४/२०२३

| | | |
|---|---|---|
| १ | प्र.क्र.१४ मधील स.नं.२५१ मधील रस्ते कॉंक्रीटीकरण करणे. | १.२५,००,०००/- |
| २ | प्र.क्र.१४ मधील स.नं.२६७ व २७० जकात सोसायटी मधील रस्ते खडीकरण व डांबरीकरण करणे. | २,०४,२१,८३६/- |
| ३ | प्र.क्र.१४ मधील स्मशानभुमी रोड ते जय दुर्गा शाळेपर्यंत नाल्याला लागुन रस्ता डांबरीकरण करणे. | ४५,००,०००/- |
| ४ | प्र.क्र.११ मध्ये ११५, ११७ व ११९ मध्ये आरसीसी गटार व स्लॅब कल्व्हेट बांधणे. | ५०,००,०००/- |
| ५ | प्र.क्र.११ मध्ये १४१ मध्ये रस्ता डांबरीकरण करणे. | ७५,००,०००/- |

तसेच सदर कामी शासनाने निश्चित केलेली ०५ कामे वरील प्रमाणे २५ टक्के मनपा हिश्यातील ०२ कामे अशी एकत्रित ०७ कामांची निविदा प्रक्रिया राबविणे कामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- बरडे नितीन मनोहर**

**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव.**

| अ.क्र. | सन्मा.सदस्य/ सदस्या | प्र.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.दिलीप पोकळे | 1 | नामदेव नगर मध्ये आर.सी.सी. गटार बांधणे व कर्व्हटर टाकणे | 3200000 |
| 2 | 6,95,00,000 | | इंद्रप्रस्थ नगर मध्ये आर.सी.सी. गटार बांधणे व कर्व्हटर टाकणे | 3100000 |
| 3 | | | केशर बाग मध्ये आर.सी.सी. गटार बांधणे व कर्व्हटर टाकणे | 3500000 |
| 4 | | | शिव शंकर कॉलनी व दत्तात्रय नगर मध्ये आर.सी.सी.गटार बांधणे व कर्व्हटर टाकणे | 5500000 |
| 5 | | | सिध्दी विनायक पार्क व हरी ओम नगर मध्ये आर.सी.सी. गटार बांधणे व कर्व्हटर टाकणे | 4500000 |
| 6 | | | त्रिभुवन कॉलनी मध्ये आर सी सी गटार बांधणे व कर्व्हटर टाकणे | 2700000 |
| 7 | | | के सी पार्क मध्ये आर. सी. सी गटार बांधणे व कल्व्हटर टाकणे | 4200000 |
| 8 | | | ज्ञानगंगा शाळे जवळील परिसरात आर सी सी गटार बांधणे व कटर टाकणे | 7000000 |
| 9 | | | राधाकृष्ण नगर मध्ये आर सी सी गटार बांधणे व कर्व्हटर टाकणे | 5500000 |
| 10 | | | महावीर नगर मध्ये आर सी सी गटार बांधणे व कर्व्हटर टाकणे | 3100000 |
| 11 | | | नारायणी पार्क मध्ये आर. सी. सी. गटार बांधणे व कर्व्हटर टाकणे | 1100000 |
| 12 | | | राजमालती नगर मध्ये आर सी सी गटार बांधणे व कर्व्हटर टाकणे | 3000000 |
| 13 | | | पिवळी चाळ मध्ये आर. सी. सी. गटार बांधणे व कर्व्हटर टाकणे | 2500000 |
| 14 | | | भारत नगर मध्ये आर. सी. सी. गटार बांधणे व कर्व्हटर टाकणे | 2100000 |
| 15 | | | सिटी कॉलनी मध्ये आर. सी. सी. गटार बांधणे व कर्व्हटर टाकणे | 6000000 |
| 16 | | | पुष्पाजली कॉलनी मध्ये आर.सी.सी. गटार बांधणे व कर्व्हटर टाकणे | 6000000 |
| 17 | | | धनाजी काळे नगर मध्ये आर. सी. सी. गटार बांधणे व कर्व्हटर टाकणे | 6000000 |
| 18 | | | खडके चाळ मध्ये आर सी सी गटार बांधणे व कर्व्हटर टाकणे | 500000 |
| 19 | श्री.किशोर बाविस्कर | 2 | प्रभाग क्रं. 2 मधील कला वसंत नगर परिसरा मध्ये नविन कॉक्रीट रस्ता तयार करणे. | 5000000 |
| 20 | 4,13,00,000 | | प्रभाग क्रं. 2 मधील वृदावन कॉलनी मध्ये कॉक्रीट रस्ता तसेच आर.सी.सी. गटार तयार करणे. | 5000000 |
| 21 | | | प्रभाग क्रं. 2 मधील पवन नगर मध्ये कॉक्रीट रस्ता तसेच आर.सी.सी. गटार तयार करणे. | 7000000 |
| 22 | | | प्रभाग क्रं. 2 मधील कांचन नगर परिसरातील ठिकठिकाणी आर.सी.सी. गटार तयार करणे. | 8000000 |
| 23 | | | प्रभाग क्रं. 2 मधील घरकुल व छन्नु कोळी यांच्या घरापासुन ते नाल्यापर्यंत आर.सी.सी. गटार तयार करणे. | 4000000 |
| 24 | | | प्रभाग क्रं. 2 मधील सुनिल पाटील ते सदगुरु किराणा तसेच आजुबाजुस नविन हायमस्ट लहान मोठे पोल उभारुन त्यावर एल.इ.डी लाईट व्यवस्था करणे. | 900000 |
| 25 | | | प्रभाग क्रं. 2 मधील घरकुल चौक ते उज्वल चौका पर्यंत तसेच आजुबाजुस नविन हायमस्ट लहान मोठे पोल उभारुन त्यावर एल.इ.डी लाईट व्यवस्था करणे. | 900000 |
| 26 | | | प्रभाग क्रं. 2 मधील दोन्ही घरकुल ते गणेश ठाकरे यांच्या घरापर्यंत तसेच दर्गाच्या आजुबाजुस नविन हायमस्ट लहान मोठे पोल उभारुन त्यावर एल.इ.डी लाईट व्यवस्था करणे. | 900000 |
| 27 | | | प्रभाग क्रं. 2 मधील हरिओम नगर व बहिणाबाई कॉलनी तसेच कला वंसत नगर तसेच आजुबाजुस नविन हायमस्ट लहान मोठे पोल उभारुन त्यावर एल.इ.डी लाईट व्यवस्था करणे. | 900000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 28 | | | प्रभाग क्रं. 2 मधील उज्वल चौक ते प्रशांत चौक व वाणी मंगल कार्यालय तसेच आजुबाजुस नविन हायमस्ट लहान मोठे पोल उभारुन त्यावर एल.इ.डी लाईट व्यवस्था करणे. | 900000 |
| 29 | | | प्रभाग क्रं. 2 मधील पवन नगर ते वृदांवन कॉलनी तसेच आजुबाजुस नविन हायमस्ट लहान मोठे पोल उभारुन त्यावर एल.इ.डी लाईट व्यवस्था करणे. | 900000 |
| 30 | | | प्रभाग क्रं. 2 मधील प्ले सेंटरच्या आजुबाजुस असलेल्या परिसरात नविन हायमस्ट लहान मोठे पोल उभारुन त्यावर एल.इ.डी लाईट व्यवस्था करणे. | 900000 |
| 31 | | | प्रभाग क्र.2 मधील आरक्षण क्र.61 मनपा मालकीच्या जागेत पत्र्याचे शेड व एलईडी लाईट व्यवस्था करणे | 3000000 |
| 32 | | | प्रभाग क्र. 2 मधील गोटू रिक्षावाले यांचे घरापासून ते जैस्वालदादा यांचे घरापर्यंत तसेच मनोज गाढवे यांचे घरापासून ते काजल किराणा व परिसरातील बंटी गवळी, दत्तु चहावाले, अशाताई यांची गल्लीत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 3000000 |
| 33 | सौ.गायत्री शिंदे | 2 | प्र.क्र.2 दाळफड (राजवाड्या जवळील) ते शिवाजी हुडको पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | **4850000** |
| | 48,50,000 | | | |
| 34 | श्री.नवनाथ दारकुंडे | 2 | प्रभाग क्रं. 2 मधील गायत्री प्रोव्हीजन पासुन ते शाम शिंदे यांचे घरापासुन ते संभाजी चौका पर्यंत रस्ता डांबरी करण करणे. | 2500000 |
| 35 | 2,98,00,000 | | प्रभाग क्रं. 2 मधील संभाजी चौक ते कन्या छात्रालय रस्ता डांबरी करण करणे. | 2500000 |
| 36 | | | प्रभाग क्रं. 2 मधील पठाण साहेब यांचे घरापासुन ते पिटवे यांचे घरापर्यंत रस्ता डांबरी करण करणे. | 2500000 |
| 37 | | | प्रभाग क्रं. 2 मधील मंजुर खान यांचे घरापासुन ते ठाकरे यांचे घरापर्यंत रस्ता डांबरी करण करणे. | 2500000 |
| 38 | | | प्रभाग क्रं. 2 मधील नागला किराणा ते प्रल्हाद पोळ यांचे घरापर्यंत रस्ता डांबरी करण करणे. | 2500000 |
| 39 | | | प्रभाग क्रं. 2 मधील सावंत यांचे घरापासुन ते बगीच्या पर्यंत रस्ता डांबरी करण करणे. | 2500000 |
| 40 | | | प्रभाग क्रं. 2 मधील श्री मोटर्स ते गोविंद ओझा यांचे दालफळ पर्यंत रस्ता डांबरी करण करणे. | 3500000 |
| 41 | | | प्रभाग क्रं. 2 मधील केदार भुसारी यांचे घरापासुन ते भिकन पाणीवाले यांचे घरापर्यंत रस्ता डांबरी करण करणे. | 2500000 |
| 42 | | | प्रभाग क्रं. 2 मधील श्री मोटर्स पासुन ते राजवाडा कोपऱ्यापर्यंत आर.सी.सी. गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | 1300000 |
| 43 | | | प्रभाग क्रं. 2 मधील राजवाडया पासुन ते मकरा अपार्टमेंन्ट पर्यंत रस्ता कॉक्रीटी करण करणे | 1500000 |
| 44 | | | प्रभाग क्रं. 2 मधील श्री मोटर्स पासुन ते राजवाडा कोपऱ्यापर्यंत रस्ता कॉक्रीटी करण करणे | 3000000 |
| 45 | | | प्रभाग क्र. 02 मधील जळगांव स.नं. 342/6ब, 342/6अ/1, 342/6अ/2 येथील ओपन स्पेस असलेली जागेवर वॉचमन क्वॉटर तसेच जागा विकसित करणे | 3000000 |
| 46 | सौ.मिना सपकाळे | 3 | प्र.क्र.3 अंतर्गत स.नं.53 व 57 श्रावण नगर मनिषा राजेंद्र पाटील यांच्या घरापासून माधव नगर प्लॉ.नं. 66 पर्यत राजेंद्र पाटील यांच्या घरापर्यत व परिसरात रस्ते डांबरीकरण करणे | 5500000 |
| 47 | 1,55,00,000 | | प्र.क्र.3 अंतर्गत खेडी आंबेडकर नगर व परिसरात रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 5000000 |
| 48 | | | प्र.क्र.3 अंतर्गत सरस्वती नगर, प्रेमचंद नगर व परिसरात रस्ते डांबरीकरण करणे | 5000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 49 | श्री.प्रविण कोल्हे | 3 | प्रभाग क्रमांक 3 निवृत्ती भोळे यांच्या घरापासून ते काशिनाथ नगर व शिवा महाराज यांच्या घरापर्यत दोन्ही बाजू मुख्य रस्त्याच्या आरसीसी गटार बांधणे | 1500000 |
| 50 | 7,55,00,000 | | प्रभाग क्रमांक 3 हरी ओम नगर व सर्व्हे नं. 3 परिसरात रस्ता डांबरीकरण करणे | 4500000 |
| 51 | | | प्रभाग क्रमांक 3 खेडीगांव निलगिरी अर्पाटमेंट पासून ते मराठी शाळा भिमराव वाल्मीकराव देशमुख पर्यत नाल्यास संरक्षण भिंत बांधणे | 20000000 |
| 52 | | | प्रभाग क्रमांक 3 खेडीगांव मराठी शाळा भिमराव वाल्मीकराव देशमुख शाळेपासून ते आंबेडकर वाड्यापर्यत नाल्यास संरक्षण भिंत बांधणे | 20000000 |
| 53 | | | प्र.क्र.3 अंतर्गत गट नंबर 57, 53, 59 मध्ये व परिसरात आरसीसी गटारी बांधणे | 3200000 |
| 54 | | | प्र.क्र.3 अंतर्गत खेडी शिवार गट नंबर 10 मध्ये परिसरात आरसीसी गटारी बांधणे | 2000000 |
| 55 | | | प्र.क्र.3 अंतर्गत हॉटेल एवन पासुन श्री.उमाकांत भंगाळे यांच्या घरापर्यत व परिसरात रस्ते डांबरीकरण करणे | 6000000 |
| 56 | | | प्र.क्र.3 अंतर्गत मनियार यांच्या खळ्यापासून ते कोल्हे गोडावुन जवळील सार्व. शौचालयापर्यत व मेस्कोमाता नगर फलकापासून ते बालाजी मंदीर संचलित धमार्थ दवाखान्या पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 9800000 |
| 57 | | | प्र.क्र.3 अंतर्गत गोदावरी कॉलेज समोरील तनय हॉटेल पासून ते ग्यानचंद अर्पाटमेंट पर्यत व परिसरातील रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 5000000 |
| 58 | | | प्र.क्र.3 सदाशिव नगर मधील श्री.निवृत्ती भोळे यांच्या घरापासून काशिनाथ नगर श्री.शिवा महाराज यांचे घरापर्यत आरसीसी गटार व स्लॅब कल्व्हेट बांधणे | 3500000 |
| 59 | सौ.रंजना सपकाळे | 3 | प्र.क्र.3 विनायक नगर गट नंबर 10 मध्ये आरसीसी गटार बांधणे | 2700000 |
| 60 | 3,27,00,000 | | प्र.क्र.3 श्रीराम नगर मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 4000000 |
| 61 | | | प्र.क्र. 3 दिनकर नगर मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 10000000 |
| 62 | | | प्र.क्र.3 श्रीराम कॉलनी ते दशरथ नगर रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 6000000 |
| 63 | | | प्र.क्र.3 अंतर्गत मनियार यांच्या खळ्यापासून ते कोल्हे गोडावुन जवळील सार्व. शौचालयापर्यत व मेस्कोमाता नगर फलकापासून ते बालाजी मंदीर संचलित धमार्थ दवाखान्या पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 10000000 |
| 64 | सौ.राखी सोनवणे | 5 | प्र.क्र.5 मध्ये ठिकठिकाणी रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 20000000 |
| | 2,00,00,000 | | | |
| 65 | सौ.मंगला चौधरी | 6 | प्रभाग क्रं. 6 गणेशवाडी ते सुपारी कारखाना ते रुख्मा टेंट हाऊस पर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे. | 700000 |
| 66 | 31,00,000 | | प्रभाग क्रं. 6 इंदौर हेड ते चिरमाडे यांचे घरापर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे. | 500000 |
| 67 | | | प्रभाग क्रं. 6 पंचमुखी हनुमान मंदीर ते सुपारी कारखाना, शुभम टेंन्ट पर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे. | 700000 |
| 68 | | | प्रभाग क्रं. 6 गणेशवाडी चंदन महाजन ते शुभम टेंन्ट हाऊस पर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे. | 300000 |
| 69 | | | प्रभाग क्रं. 6 मंजुषा ते मुक्तांगण हॉल पर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे. | 500000 |
| 70 | | | प्रभाग क्रं. 6 आहुजा ते डामरे अप्पा यांचे घरापर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे. | 400000 |
| 71 | श्री.धिरज सोनवणे | 6 | प्र.क्र.6 मधिल श्री.सानप यांच्या घरापासून ते लेवा भवन पर्यतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 15000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 72 | 3,00,00,000 | | प्र.क्र.6 अंतर्गत गंगा बिल्डींग ते सिंधी कॉलनी रोड पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 73 | | | प्र.क्र.6 अंतर्गत बाबा हरदासराम सोसायटी येथील श्री.शंकर तलरेजा यांच्या घरासमोरील रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 74 | | | प्र.क्र.6 अंतर्गत बाफना हाऊस ते सार्वजनिक बांधकाम विभाग क्वॉर्टर पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 75 | | | प्र.क्र.6 अंतर्गत सिंधी कॉलनी रोड ते श्री.धोबी यांच्या घरापर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 76 | | | प्र.क्र.6 अंतर्गत श्री.धोबी यांच्या घरापासून ते पाण्याच्या टाकी पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 77 | | | प्र.क्र.6 अंतर्गत अथर्व हॉस्पिटलच्या पश्चिमेकडील रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 78 | | | प्र.क्र.6 अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभाग कॉर्टर समोरील रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 79 | | | प्र.क्र.6 अंतर्गत श्री.तळवेलकर गुरुजी यांच्या घरासमोरील दक्षिणी भागातील रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 80 | | | प्र.क्र.6 अंतर्गत विवेकानंद व्यायाम शाळे समोरील रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 81 | | | प्र.क्र.6 अंतर्गत स्वामी नारायण हॉस्पिटल समोरील रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 82 | | | प्र.क्र.6 अंतर्गत स्टेट बँक ऑफ इंडिया ते टायटन हॉस्पिटल पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 83 | | | प्र.क्र.6 अंतर्गत टायटन हॉस्पिटल ते अथर्व हॉस्पीटल पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 84 | | | प्र.क्र.6 अंतर्गत विवेकानंद व्यायामशाळे पासून ते नोबेल हॉस्पिटल पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 85 | | | प्र.क्र.6 अंतर्गत संतुलन हॉस्पिटल ते श्री.झोपे यांच्या घरापर्यत पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 86 | | | प्र.क्र.6 अंतर्गत स्वामी एकता चौक ते गोरक्ष सायकल मार्ट पर्यतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 87 | डॉ.अश्विन सोनवणे | 7 | प्र.क्र.7 मध्ये एलआयसी कॉलनी व विविध परिसरात रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 60000000 |
| 88 | 11,00,00,000 | | प्र.क्र.7 मधिल विविध रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 50000000 |
| 89 | प्रा.डॉ.सचिन पाटील | 7 | प्र.क्र.7 वर्धमान हाईट ते डॉ.बरकले यांच्या घरापर्यत डांबरी रस्ता तयार करणे | 6000000 |
| 90 | 1,45,00,000 | | प्र.क्र.7 मारोती पार्क ते हरिविठ्ठल नगर नाल्यापर्यत रस्ता डांबरीकरण करणे | 6500000 |
| 91 | | | प्र.क्र.7 गट नं. 53 शिव कॉलनी मधील खुल्या जागेला विकसित करुन चेनलिंक फेन्सींग करणे | 2000000 |
| 92 | श्री.मनोज चौधरी | 8 | प्रभाग क्र. 8 मधील चंदुअण्णा नगर स्टॉप पासून पवार पार्कच्या पुढपर्यत रस्ते डांबरीकरण करणे | 19998669 |
| 93 | 5,14,38,669 | | प्रभाग क्र. 8 मधील निमखेडी शिवार गजानन कॉलनी गट नं. 19 मध्ये आरसीसी गटारी बांधणे | 600000 |
| 94 | | | प्रभाग क्र. 8 मधील निमखेडी शिवार इंद्रनिल सोसायटीच्या समोर ऑक्सिजन पार्क शेजारी आरसीसी गटारी बांधणे | 600000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 95 | | | प्रभाग क्र. 8 मधील दिव्या अर्पाटमेंट पासुन बालाजी अर्पाटमेंट पर्यत रसता डांबरीकरण करणे श्रीराम मंदीरापासून जुन्या हायवे पर्यत | 3500000 |
| 96 | | | प्रभाग क्र. 8 मधील खोटे नगर पोलीस लाईन मधील रस्ते कॉक्रीट करणे | 2000000 |
| 97 | | | प्रभाग क्र. 8 मधील निमखेडी गावठण रस्ते कॉक्रीट करणे | 3000000 |
| 98 | | | प्रभाग क्र. 8 मधील आव्हाने शिवार ग.नं.766/2/1 श्रीकृष्ण कॉलनी रस्ते डांबरीकरण करणे | 3500000 |
| 99 | | | प्रभाग क्र. 8 मधील गुड्डुराजा नगर आणि इतर परिसरात रस्ते डांबरीकरण करणे | 4200000 |
| 100 | | | प्रभाग क्र. 8 मधील प्रेम नगर आणि इतर परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे | 6000000 |
| 101 | | | प्रभाग क्र. 8 मधील श्राराम मंदीरापासून शैलेंद्र इंगळे यांच्या घरापर्यत ते जुना हायवे पर्यत रस्ता डांबरीकरण करणे | 4000000 |
| 102 | | | प्रभाग क्र. 8 मधील गट नं. 94/1 जय हिंद कॉलनी ओपन स्पेसमध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे जॉगींग ट्रॅक तयार करणे | 2500000 |
| 103 | | | प्रभाग क्र. 8 मधील निमखेडी गट नं. 118/ड मध्ये गटारी आरसीसी बांधणे | 940000 |
| 104 | | | प्रभाग क्र. 8 मधील गजानन कॉलनी गट नं. 106, 107 आरसीसी गटारी बांधणे | 600000 |
| 105 | सौ. प्रतीभा देशमुख | 9 | प्रभाग क्रं. 9 मध्ये अष्टभुजा गेटापासुन ते टि रोडापर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे. | 3000000 |
| 106 | 2,15,00,000 | | प्रभाग क्रं. 9 मध्ये मानवसेवा शाळेपासुन ते मांगीलाल मदीरापर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे. | 4000000 |
| 107 | | | प्रभाग क्रं. 9 मध्ये गट नं. 4/2 मानवसेवा शाळेजवळ आर.सी.सी. गटार बांधणे. | 1000000 |
| 108 | | | प्रभाग क्रं. 9 मध्ये गट नं. 2/2/2ब मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे. | 3000000 |
| 109 | | | प्रभाग क्रं. 9 मध्ये इंद्रनिल सोसा. मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे. | 4000000 |
| 110 | | | प्रभाग क्रं. 9 मध्ये परिसरात मिनी हायमस्ट पोल उभारणे. | 1000000 |
| 111 | | | प्रभाग क्रं. 9 मध्ये द्रोपदी नगर मध्ये आर.सी.सी. गटार बांधणे. | 3000000 |
| 112 | | | प्रभाग क्रं. 9 मध्ये एस.एम.आय.टी कॉलेज पासुन ते प्रकाश पाटील यांचे घरापर्यंत नाला बांधकाम करणे. | 2500000 |
| 113 | श्री.मयुर कापसे | 9 | प्र.क्र.9 शंकरआप्पा नगर व परिसरातील रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 4000000 |
| 114 | 5,00,00,000 | | प्र.क्र.9 दांडेकर नगर अतुल डेअरी ते नाना सोनार यांच्या घरापर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 6000000 |
| 115 | | | प्र.क्र.9 ज्ञानेश्वर गुजर बाबा - भोई बाबा दांडेकर नगर रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 4000000 |
| 116 | | | प्र.क्र.9 दांडेकर नगर ग्रामविकास शाळेच्या मागील रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 4000000 |
| 117 | | | प्र.क्र.9 दांडेकर नगर मातोश्री प्रोव्हीजन समोरील रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 4000000 |
| 118 | | | प्र.क्र.9 अजिंक्य देसाई ते परमार्थ निकेतन पर्यतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 8000000 |
| 119 | | | प्र.क्र.9 देवकिनंदन हॉल प्रा.अजित वाघसर यांची गल्ली द्रैापदी नगर परिसरातीलकॉक्रीटीकरण करणे | 10000000 |
| 120 | | | प्र.क्र.9 द्रौपदी नगर व्हि.बी. सुर्यवंशी व परिसरातील रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 10000000 |
| 121 | सौ.शोभाताई बारी | 10 | प्र.क्र.10 गट नं.190/1 व 183/1 रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 3500000 |
| 122 | 5,60,30,550 | | प्र.क्र.10 गट नं. 183/1 आरसीसी गटारी बांधणे | 2000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 123 | | | प्र.क्र.10 गट नं.190/5 रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 2500000 |
| 124 | | | प्र.क्र.10 गट नं.187/1 रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 2500000 |
| 125 | | | प्र.क्र.10 आशाबाबा नगर पुलापासून ते खंडेराव नगर पुलापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | 2000000 |
| 126 | | | प्र.क्र.10 गणपती नगर येथे रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 5000000 |
| 127 | | | प्र.क्र.10 गट नं.277 सोनी नगर रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 5030550 |
| 128 | | | प्र.क्र.10 गट नं.219 मध्ये आरसीसी गटारी बनविणे | 25000000 |
| 129 | | | प्र.क्र.10 मध्ये 120 खेल्यांमध्ये (पिंप्राळा हूडको) मध्ये आरसीसी गटारी बनविणे | 5500000 |
| 130 | | | प्र.क्र.10 ग.नं. 187/1 व गट नं.186 येथे नविन पुल बनविणे | 3000000 |
| 131 | श्री.सुरेश सोनवणे | 10 | प्र.क्र.10 ग.नं. 186 रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 2500000 |
| 132 | 5,01,13,800 | | प्र.क्र.10 पिंप्राळा गावठाण रथमार्ग आरसीसी गटार बांधणे | 3000000 |
| 133 | | | प्र.क्र.10 पिंप्राळा गावठाण पेव्हरचे रस्ते तयार करणे | 2500000 |
| 134 | | | प्र.क्र.10 पिंप्राळा गावठाण चौधरीवाडा, कुंभारवाडा, कोळीवाडा पेव्हरचे रस्ते तयार करणे | 2500000 |
| 135 | | | प्र.क्र.10 पिंप्राळा गावठाण चौधरीवाडा, कुंभारवाडा, कोळीवाडा येथे आरसीसी गटारी बांधणे | 2500000 |
| 136 | | | प्र.क्र.10 खॉजामिया नगर येथे रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 9088350 |
| 137 | | | प्र.क्र.10 आजाद नगर येथे रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 7025450 |
| 138 | | | प्र.क्र.10 ग.नं.194/1/1 येथे आरसीसी गटारी बांधणे | 2500000 |
| 139 | | | प्र.क्र.10 ग.नं.190/4 येथे आरसीसी गटारी बांधणे | 2500000 |
| 140 | | | प्र.क्र.10 पिंप्राळा मेनरोड व असावा नगर येथे आरसीसी गटारी बांधणे | 4000000 |
| 141 | | | प्र.क्र.10 संत मिराबाई नगर येथे रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 6000000 |
| 142 | | | प्र.क्र.10 खंडेराव नगर मध्ये विविध ठिकाणी रस्ते पेव्हरचे बनविणे | 4000000 |
| 143 | | | प्र.क्र.10 खंडेराव नगर मध्ये विविध ठिकाणी आरसीसी गटारी बांधणे | 2000000 |
| 144 | सौ.उषाताई पाटील | 11 | प्र.क्र.11 अंतर्गत गट नं. 128, 129 मध्ये रस्ते डांबरीकरण करणे | 15000000 |
| 145 | 6,25,00,000 | | प्र.क्र.11 अंतर्गत गट नं. 155, 158, 159, 160 मध्ये रस्ते डांबरीकरण तसेच आरसीसी गटारी बांधणे | 25000000 |
| 146 | | | प्र.क्र.11 अंतर्गत गट नं. 119 मध्ये रस्ते डांबरीकरण करणे | 5000000 |
| 147 | | | प्र.क्र.11 अंतर्गत हरिविठ्ठल नगर परिसरात मध्ये रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 10000000 |
| 148 | | | प्र.क्र.11 अंतर्गत गट नं. 128, 129, 140 मध्ये 3 खुल्या जागेत चेंनलिंक फेन्सींग करणे | 7500000 |
| 149 | सौ.पार्वताबाई भिल | 11 | प्र.क्र.11 गट नं. 116, 117, 118,119 पिंप्राळा शिवार कॉक्रीट रस्ता तयार करणे | |
| 150 | 0 | | प्र.क्र.11 तडवीवाडा भागातील दोन गल्ल्यांचे कॉक्रीटीकरण रस्ता करणे | |
| 151 | | | प्र.क्र.11 मारुती मंदीर चौक ते सार्व. शौचालय या मार्गावर एका बाजुस आरसीसी गटार बांधणे व रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करणे | |
| 152 | | | प्र.क्र.11 धनगर वाड्यातील दोन रस्ते कॉक्रीटीकरण करणे | |
| 153 | | | प्र.क्र.11 नवनाथ चौक परिसरातील दोन गल्ल्या कॉक्रीटीकरण करणे | |
| 154 | | | प्र.क्र.11 वडारवाड्यातील दोन गल्ल्या कॉक्रीटीकरण करणे | |
| 155 | | | प्र.क्र.11 वाघ नगर ते खंडेराव नगर पुलापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे | |
| 156 | श्री. ललित कोल्हे | 11 | प्र.क्र. 11 अंतर्गत गट नंबर 139 मधील रस्ते डांबरीकरण करणे | 15000000 |
| 157 | 11,51,33,003 | | प्र.क्र. 11 अंतर्गत जुनी भगवान नगर नेरकर टेलर नाल्यालगत वॉल रिटेनिंग करणे | 3000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 158 | | | प्र.क्र. 11 अंतर्गत विवेकानंद सायली प्ले सेंटर चौकात नाल्यावर नविन कॉक्रीटी पुल उभारणे | 2518549 |
| 159 | | | प्र.क्र. 11 अंतर्गत हॉटेल सनराईज श्री.तळेले यांचे घरापर्यंत रस्ते डांबरीकरण करणे | 3037098 |
| 160 | | | प्र.क्र. 11 अंतर्गत श्री.तळेले ते पॉलिटेक्निक रोड पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 3910461 |
| 161 | | | प्र.क्र. 11 अंतर्गत भगवान नगर, भुषण कॉलनी, विवेकानंद नगर, यशवंत नगर, विद्युत कॉलनी, सनराईस हॉटेल शिव रोड, डिगंबर सोसायटी 100 फुटी रोड लगत व ग.नं. 104 मधील इत्यादी ठिकाणी आरसीसी गटार बांधुन स्लॅब कल्व्हेट टाकणे | 5000000 |
| 162 | | | प्र.क्र. 11 गट नं. 154/2 मध्ये ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सींग करणे व कॉक्रीटकरण पाथवे करणे | 1966256 |
| 163 | | | प्र.क्र. 11 मध्ये गट नं. 116 मध्ये रस्ता डांबरीकरण करणे | 9663910 |
| 164 | | | प्र.क्र. 11 मध्ये गट नं. 106 मध्ये ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सींग करणे व कॉक्रीटकरण पाथवे करणे | 2079158 |
| 165 | | | प्र.क्र.11 मध्ये ग.नं. 116 मध्ये आरसीसी गटार बांधणे | 2073753 |
| 166 | | | प्र.क्र. 11 मध्ये पिंप्राळा गट नं. 132 मध्ये चेनलिंक फेन्सींग करणे व कॉक्रीटकरण पाथवे करणे | 2539067 |
| 167 | | | प्र.क्र. 11 मध्ये पिंप्राळा गट नं. 140/1 मध्ये चेनलिंक फेन्सींग करणे व कॉक्रीटकरण पाथवे करणे | 1856152 |
| 168 | | | प्र.क्र. 11 मध्ये पिंप्राळा गट नं. 146 मध्ये चेनलिंक फेन्सींग करणे व कॉक्रीटकरण पाथवे करणे | 2611015 |
| 169 | | | प्र.क्र. 11 मध्ये पिंप्राळा गट नं. 148 मध्ये चेनलिंक फेन्सींग करणे व कॉक्रीटकरण पाथवे करणे | 3617549 |
| 170 | | | प्र.क्र. 11 मध्ये पिंप्राळा गट नं. 147 मध्ये चेनलिंक फेन्सींग करणे व कॉक्रीटकरण पाथवे करणे | 1706130 |
| 171 | | | प्र.क्र. 11 मध्ये गट नं. 129,130 मध्ये रस्ते डांबरीकरण करणे | 10061392 |
| 172 | | | प्र.क्र. 11 मधील पिंप्राळा गट नं. 140, 141 मध्ये रस्ते डांबरीकरण करणे | 7000000 |
| 173 | | | प्र.क्र. 11 पिंप्राळा गट नं. 154 मध्ये रस्ते डांबरीकरण करणे | 8799345 |
| 174 | | | प्र.क्र. 11 अंबिका हौसींग सोसायटी पिंप्राळा गट नं. 107 व 106 मध्ये रस्ते डांबरीकरण करणे | 11193168 |
| 175 | | | प्रभाग क्रमांक 11 अंतर्गत पिंप्राळा शिवार ग.क्र.140 मध्ये रस्ते डांबरीकरण करणे | 10000000 |
| 176 | | | प्रभाग क्रमांक 11 अंतर्गत पिंप्राळा शिवार ग.क्र.112 मध्ये रस्ते डांबरीकरण करणे | 7500000 |
| 177 | श्री.नितिन बरडे | 12 | प्रभाग क्र.12 मधील मेहरुण सर्व्हे क्र. 467 हनुमान को-ऑप. सोसा. मकरंद कॉलनी परिजात को-ऑप. सोसा. मधील रस्ते डांबरीकरण करणे | 5410308 |
| 178 | 93,28,744 | | प्रभाग क्र. 12 मधील मेहरुण सर्व्हे नं. 468/2 महाबळ कॉलनी परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे | 3918436 |
| 179 | सौ.उज्ज्वला बेंडाळे | 12 | प्रभाग क्र. 12 मधील स.नं. 483/1 पार्वती नगर, श्रध्दा कॉलनी येथील व सानेगुरुती कॉलनी बगिचा थील खुला भुखंड विकसित करणे | 5000000 |
| 180 | 1,05,00,000 | | प्रभाग क्र. 12 मधील आराधना कॉलनी, पोस्टल कॉलनी, नविन भुषण कॉलनी परिसरात आरसीसी गटार व स्लॅब कल्व्हेट बांधणे | 5500000 |
| 181 | सौ. ज्योती चव्हाण | 13 | प्र.क्र.13 मधी आदर्श नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे | 15000000 |
| 182 | 1,50,00,000 | | | |
| 183 | सौ.सुरेखा तायडे | 13 | जाकीर हुसैन कॉलनी येथे गटार बांधणे | 500000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 184 | 35,00,000 | | समता नगर येथे वंजारी टेकडी भागात गटार बनविणे | 500000 |
| 185 | | | रायसोनी नगर येथील स.नं. ५७, ५८, ५९ येथील भागात गटार बनविणे | 1500000 |
| 186 | | | देवेंद्र नगर येथे गटार बनवुन दौलत नगर येथे घरा जवळ गटार बांधणे | 500000 |
| 187 | | | डॉ. सुतार दौलत नगर यांचे घरा जवळ गटार बनविणे | 500000 |
| 188 | श्रीमती रेखा पाटील | 14 | प्र.क्र.14 मधील मंगलपुरी ते राज शाळे पर्यत रोड साईडला आरसीसी गटार बांधणे | 950000 |
| 189 | 1,34,50,000 | | प्र.क्र.14 मधील स.नं. 250 मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 12500000 |
| 190 | श्री. राजेंद्र घुगे-पाटील | 14 | प्रभाग क्रं १४ मधील आदित्य चौक ते स्मशानभुमि मार्गे मुक्ताई मंदिरापर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | 10000000 |
| 191 | 8,23,02,537 | | प्रभाग क्रं. १४ मधील मेहरूण शिवार सर्वे नं. २७० व २६७ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | 20421000 |
| 192 | | | प्रभाग क्रं. १४ मधील मेहरूण शिवार सर्वे नं. २७२ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | 3500000 |
| 193 | | | प्रभाग क्रं. १४ मधील मेहरूण शिवार सर्वे नं. २७१ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | 6200000 |
| 194 | | | प्रभाग क्रं. १४ मधील मेहरूण शिवार, आदर्श नगर सर्वे नं. ४३९ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | 5000000 |
| 195 | | | प्रभाग क्रं. १४ मधील आर.टी.ओ कार्यालय ते विश्वकर्मा हौसिंग सोसायटी, अख्तर अली काझी यांचे बंगल्यासमोरील रस्ता डांबरीकरण करणे. | 1500000 |
| 196 | | | प्रभाग क्रं. १४ मधील डि मार्ट मागील एस के क्लासिक अपार्टमेंट ते मोहाडी रोड ते रुस्तुमची शाळेकडे जाणाऱ्या रस्त्यापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | 2500000 |
| 197 | | | प्रभाग क्रं. १४ मधील गणपती नगर मेहरुण शिवार सर्वे नं. ४२६, ४२७, ४३४ व ४३५ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | 9337850 |
| 198 | | | प्रभाग क्र. १४ मधील गायत्री नगर, विनोबा नगर मेहरूण शिवार सर्वे नं. ४१७ + ४२० परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे. | 12343687 |
| 199 | | | प्रभाग क्रं. १४ मधील श्रीकृष्ण मेडीकल (नमस्कार मॉल) पासुन चावरीयांचा बंगला १,००,०० ते मंगलपुरी पाटचारी पर्यतचा रस्ता डांबरीकरण करणे. | 10000000 |
| 200 | | | प्रभाग क्रं. ८ निमखेडी गट नं. ७९/१ टिळक नगर प्लॉट नं. १ ते ७ पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | 1500000 |
| 201 | श्री.सदाशिवराव ढेकळे | 14 | प्र.क्र.14 मधील मेहरुण सर्व्हे नं. 416 जिवनमोती सोसायटी परिसरातील ठिकठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे | 6098050 |
| | 60,98,050 | | | |
| 202 | श्री.मनोज आहुजा | 16 | प्र.क्र.16 टि.एम. नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे | 8000000 |
| | 80,00,000 | | | |
| 203 | सौ.रेश्मा काळे | 16 | प्र.क्र.16 मध्ये रणछोडदास नगर, ढाकेवाडी, मुकूंद नगर, ईश्वर कॉलनी, लक्ष्मी नगर, नविन जोशी कॉलनी मधील भागातील रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 15000000 |
| 204 | 2,70,00,000 | | प्र.क्र.16 मध्ये रणछोडदास नगर, ढाकेवाडी, मुकूंद नगर, ईश्वर कॉलनी, लक्ष्मी नगर, नविन जोशी कॉलनी मधील भागात आरसीसी गटारी बांधणे | 6000000 |
| 205 | | | प्र.क्र.16 मध्ये नविन जोशी 517/2 ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सींग, पेव्हर ब्लॉक व सामाजिक सभागृह बांधकाम करणे | 4000000 |
| 206 | | | प्र.क्र.16 मध्ये ईश्वर कॉलनी दत्त मंदीर ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सींग, पेव्हर ब्लॉक बसविणे | 2000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 207 | श्री.रियाज बागवान | 18 | प्रभाग क्रं. 18 मध्ये स.नं. 10/1, 10/2 संपुर्ण परिसरात रस्ते कॉक्रीटी करण करणे | 7000000 |
| | 95,00,000 | | प्रभाग क्रमांक 18 अंतर्गत सारा हॉस्पिटल ते संतोषी माता मंदीर रिक्षा स्टॉप पर्यत दोन्ही बाजुने आरसीसी गटार बांधणे | 2500000 |
| 208 | श्री. इब्राहीम पटेल | 18 | प्रभाग क्र.18 मध्ये मेन मास्टर कॉलनी मध्ये रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 209 | 30,00,000 | | प्रभाग क्र.18 मध्ये ममता हॉस्पिटल ते शेरा चौक मदिना शॉप ते नाल्या पर्यत रोड वर नविन पोल टाकणे | 1000000 |
| 210 | | | प्रभाग क्र.18 मध्ये सर्व्हे नं.16 मुफ्ती हारुण नदवी गल्ली व हारुण पटेल यांचे घराची गल्ली मध्ये कॉक्रीट रस्ते करणे | 1000000 |
| | 1,04,11,45,353 | | | 1041145353 |

**नगरसचिव, विषय क्रं.१२ :-** पिंप्राळा गावठाण कुंभारवाडा येथे लोकसहभागातुन स्वागत कमान उभारणेबाबत मा.उपमहापौर, श्री.कुलभुषण विरभान पाटील यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. १२ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०६१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, पिंप्राळा गावठाण कुंभारवाडा येथे लोकसहभागातुन स्वागत कमान उभारणेबाबत सदर परिसरातील नागरीकांकडुन मागणी होत असल्याने सदर जागी सुरक्षा व वाहतुक इत्यादीस कोणताही अडथळा होणार नाही याची खातरजमा करुन तसेच मनपा अटी-शर्तीस बंधनकारक राहून पिंप्राळा गावठाण कुंभारवाडा येथे लोकसहभागातुन स्वागत कमान उभारणे कामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

शहर अभियंता यांनी यापूर्वी उपरोक्त ठिकाणी स्वागत कमान उभारणेस व नाव देणेबाबत महासभेने ठराव पारीत केलेला आहे किंवा कसे ? याची खातरजमा करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव, विषय क्रं.१३ :-** जळगांव मनपाच्या प्रशासकिय इमारतीच्या प्रांगणात लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा बसविणेबाबत मा.विरोधी पक्षनेता, श्री.सुनिल सुपडू महाजन यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. १३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०६२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका प्रशासकिय इमारतीच्या प्रांगणामध्ये लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुर्णाकृती पुतळा कॅप्सुल लिफ्टजवळ बसविणेबाबत यापुर्वी धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. मात्र पुतळा बसविण्याच्या आवश्यक मान्यता, ना-हरकती घेणेची कार्यवाही सुरु करतांना नियमानुसार पुतळयाची उंचीनुसार वरिल निश्चित ठिकाणी पुतळा स्थापन करता येणार नाही असे दिसून आले.

जळगांव शहर महानगरपालिका प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणामध्ये लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुर्णाकृती पुतळा कॅप्सुल लिफ्ट जवळ बसविणे ऐवजी त्यासमोरील झेंडा परिसरात बाजुला

आवश्यक चबुतरा उभारुन व त्याबाजूस सुशोभिकरण करुन पुतळा स्थापन करणे आवश्यक असल्याने मनपा प्रशासकिय इमारत वाहनतळावरील राष्ट्रध्वज परिसरात लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा स्थापित करणेसाठी चबुतरा उभारणे, सुशोभिकरण तसेच याकामी आवश्यक असलेल्या ना-हरकती, मान्यता घेणेच्या तत्सम कामास अंदाजित रक्कम रुपये २५.०० लक्ष मात्रचे खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव, विषय क्रं.१४ :-** भाडेपट्टा मुदत न संपलेल्या व्यापारी संकुलातील गाळयांचे हस्तांतरण (नाव बदल) करताना महासभा ठराव क्रमांक ८०७ दि.३०/०५/२०२२ अन्वये आकारण्यात येणारा दंड कमी करणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- ज्या गाळेधारकांना २५ हजार रूपयांची दंडाची आकारणी करण्यात आलेली होती. ती रद्द करण्यात यावी जेणेकरून आपण जसे मागच्या वेळेस योजना राबवली होती आणि त्यांना सांगीतले होते की तुम्ही भरणा करा, याच्यात काय झाल होत की मागच्या वेळेला हा निर्णय घेतांना एक कालबध्दता निश्चित केलेली होती की या काळानंतर जो कोणी भरणा करायला येईल त्याला २५ हजार रूपयांची शास्ती लावण्यात येईल. परंतू २५ हजार रूपयांची शास्ती छोटे उत्पन्न असलेले जे गाळेधारक आहेत आणि २५ हजार रक्कम जी आहे ती त्या दृष्टीकोनातुन खुप अवास्तव आहे. अल्प उत्पन्न असल्याकारणाने वेळेत जी आपण त्यावेळेला जी कालमर्यादा निश्चित केलेली होती. त्या कालावधीमध्ये ते पैसे भरू शकत नव्हते किंवा भरले गेले नाही म्हणुन त्यांनी जी हि २५ हजार रूपयांची शास्ती जी आहे आपण लावलेली ती माफ करण्यात यावी आणि याला पुर्वलक्षी प्रभावाने त्यांना सुट देण्यात यावी.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आणि ज्यांनी भरली असेल त्यांना

**श्री.नितीन लढ्ढा** :- म्हणुन पुर्वलक्षी प्रभावाने

**मा.आयुक्त :-** परंतू सर आता योजना राबवली होती कारण की लोक अप्रोच होतील आपल्याकडे जी अभय योजना होती म्हणुन लोक अप्रोच होतात. दुसर अस की दंड असल्यामुळे त्यांच्यामध्ये काहीतरी भिती राहाते आणि मग ते आपल्याकडे अप्रोच करतात. तर त्याला शुन्य न करता मिनिमम दंड पाहीजे अस प्रशासनाच मत आहे. जेणेकरून ते लोक आपल्याकडे अप्रोच करतील.

**श्री.नितीन लढ्ढा** :- काय आहे मॅडम की हे छोटे गाळेधारक आहेत. त्यांना कुठलच मोठ उत्पन्नाच साधन नाहीये.

**मा.आयुक्त :-** परंतू सर एकदम माफ नका करू.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** त्यांना सरसकट माफी द्या आणि पुर्वी काही लोकांनी भरलेले आहेत त्यांना लाभ द्या.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** दंड प्रकारचा विषय केव्हा येईल जेव्हा नाही भरले तेव्हा, दंडाची प्रोसिजर आपणच चालु केलेली आहे त्यांची चुक नाहीये चुक आपली आहे.

**मा.आयुक्त :-** काहीतरी ठेवा.

**श्री.नितीन लढ्ढा** :- काय आहे मॅडम जेव्हा तुम्ही त्यांची परिस्थिती बघाल ना, त्यांचे डेलिगेशन कलेक्टर साहेबांकडेही जाऊन आले होते, लोकप्रतिनिधीं कडेही जावुन आले. शेवटी काय असत की परिस्थिती या वर्षातील आजची खुप वाईट आहे.

**मा.आयुक्त :-** नाही काय आहे शेवटी ऑडीटचा ही प्रश्न येईल २५ हजार रूपयांवरून एकदम शुन्य नाही करू शकत.

**श्री.नितीन लढ्ढा** :- लोकप्रतिनिधींनी व महासभेने केलेली शास्ती आहे ती जस शास्ती साठी सुट देतो त्यांना

**मा.आयुक्त :-** सर कमीत कमी पाच हजार तरी ठेवा.

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही ना, तशी परिस्थिती असती तर आपण निश्चितपणे सांगीतल असत की ५ हजार नाही पुर्ण २५ हजार घ्या. परंतू एकत्रित पुर्ण कोविड पासुन या संपुर्ण व्यावसायिकांची परिस्थिती जी आहे ती अत्यंत हलाखीची झालेली आहे. कर्जबाजारी झालेले व्यावसायिक आहेत. दोन वर्ष कोविडमध्ये संपुर्ण व्यवसाय त्यांचा ठप्प झालेला होता.

**मा.आयुक्त :-** सर आपण पाच सहा महिने अनुभव घेवु जर अप्रोच झाले नाही तर मग आपण ठरवु.

**श्री.जितेंद्र मराठे :-** मॅडम दोन वर्षापासुनच हे काम करायला पाहीजे होत ना

**मा.आयुक्त :-** नाही ते अप्रोच झाले नाही तर आपण दंड आकारू

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही, एक काम करा ना हि शास्ती जी आहे. तिन तिन महिने टाकुन द्या म्हणजे तिन महिने

**मा.आयुक्त :-** हो यस

**श्री.नितीन लढ्ढा** :- की जे कोणी गाळेधारक तिन महिन्यांच्या आंत हस्तांतरण करतील त्यांना हि माफी राहील आणि तिन महिन्यांनंतर पुन्हा त्याच्यावर रुपये ५ हजार याप्रमाणे पुढील सहा महिने दंड आकारला जाईल.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- भाऊ त्या चारशे लोकांनी पहिले भरलेले आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा** :- त्यांना पुर्वलक्षी प्रभावाने समाविष्ट करून घेण्यात यावे. कारण त्यांनी आपल्या शब्दावर पैसे भरलेले आहेत.

**मा.आयुक्त :-** हो चालेल, परंतू सहा महिने आपण फ्रि ऑफ कॉस्ट करू आणि सहा महिन्यांच्या नंतर दंड आकारू.

**श्री.नितीन लढ्ढा** :- हो, हो

**मा.महापौर** :- सन्मा.सदस्य नितीनभाऊ यांनी मांडलेल्या सुचनांनुसार आणि सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रशासनाने नोंद घेवुन विषय क्रं. १४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०६३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेच्या भाडेपट्टा मुदत न संपलेल्या व्यापारी संकुलातील गाळयांचे हस्तांतरण (नाव बदल) प्रक्रिया ही सन २०१३ पासून पुढील आदेश होई पावेतो स्थगीत केलेली होती. सदरची प्रक्रिया ही महासभा ठराव क्रमांक ६३५ दिनांक १५/१२/२०२१ अन्वये पुन:श्च सुरु करण्यात आलेली आहे.

सन २०१३ पूर्वी गाळे हस्तांतरण फी ही रु.२५,०००/- अशी होती परंतु महासभा ठराव क्रमांक ६३५ दि.१५/१२/२०२१ अन्वये गाळेहस्तांतरण फी ही रेडीरेकनर नुसार गाळयाच्या होणाऱ्या मुल्यांकनाच्या १० ते १५ टक्के अशी (२,५०,०००/- ते ३,५०,०००/-) अशी करण्यात आलेली आहे. तसेच ज्या गाळेधारकांनी सन २०१३ नंतर गाळे हस्तांतरणाकरीता महानगरपालिकेत प्रस्ताव सादर केलेले आहेत अशा गाळेधारकांना त्यांचे हस्तांतरण नियमीत करणे कामी महासभा ठराव क्रमांक ८०७ दि.३०/०५/२०२२ अन्वये रु.२५,०००/- दंड देखील आकारण्यात येत आहे.

सन २०१३ मध्ये गाळे हस्तांतरण (नाव बदल) प्रक्रिया हि महानगरपालिका प्रशासनाकडून बंद करण्यात आलेली होती. त्याकरीता गाळेधारक कोणत्याही प्रकारे जबाबदार नाहीत. गाळेधारक पूर्वीही महानगरपालिकेने निश्चित केलेले हस्तांतरण (नाव बदल) फी भरण्यास तयार होते व आजही तयार आहे. गाळे हस्तांतरण (नाव बदल) फी मध्ये महासभा ठराव क्रमांक ६३५ दि.१५/१२/२०२१ नुसार झालेली वाढ ही देखील अत्याधिक आहे. गाळा हस्तांतरण (नाव बदल) करताना महासभा ठराव क्रमांक ८०७ दि.३०/०५/२०२२ अन्वये आकारण्यात येणारा रु.२५,०००/- दंड हा जर कमी करण्यात आला, तर जास्तीत जास्त गाळेधारक गाळा हस्तांतरण करण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद देतील.

त्यामुळे महासभा ठराव क्रमांक ८०७ दि.३०/०५/२०२२ अन्वये आकारण्यात येणारा दंड रक्कम रु.२५,०००/- रद्द करणेस व त्यानुसार अभय योजना राबविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. मात्र प्रशासनाने सदर अभय योजनेचा कालावधी सहा महिन्याचा ठेवावा तसेच ज्या गाळेधारकांनी यापूर्वी पैसे भरलेले असतील त्यांना पुर्वलक्षीप्रभावाने सदर योजनेचा लाभ दयावा व गाळेधारकांनी दंडाची भरलेली रक्कम पुढील मागणी बिलात समायोजीत करावी. तसेच ६ महिन्यानंतर यापूढे जे गाळेधारक महानगरपालिकेची परवानगी न घेता गाळे हस्तांतरण करतील त्यांना २५,०००/- रुपये प्रमाणे दंड आकारण्यात यावा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव, विषय क्रं.१५ :-** जळगांव शहराचे वैभव असलेला मेहरुण तलाव प्रर्दुषण मुक्त करणेबाबत उपाय योजना करणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा व मा.उपमहापौर,श्री.कुलभुषण विरभान पाटील यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- मेहरूण तलाव परिसरातील वाढती लोकसंख्या आणि वाढती वस्ती पाहाता तिथे संपुर्ण पाण्याचा जो निचरा आहे तो मेहरूण तलावामध्ये होत असतो आणि त्याच्यामुळे जे मेहरूण तलावाचे जे सौदंर्य आहे ते हि बाधीत होत आणि पाणी जे आहे ते प्रदुषित होत आहे. तर या अनुषंगाने एक स्वतंत्र डिपीआर तयार करण्यात यावा. जेणेकरून त्या भागात होणारी डेव्हलपमेंट त्या डेव्हलपमेंटला पाहाता तिथल्या सांडपाण्याचा निचरा होण्याच्या दृष्टीकोनातुन तिथे कुठलीही पर्यायी व्यवस्था नसल्याने आणि सांडपाण्याचा प्रश्न हा दिवसेंदिवस वाढतच जाणार आहे. त्यामुळे त्याचा एक स्वतंत्र डिपीआर तयार करून पर्यायी येणाऱ्या खर्चाला सुध्दा मान्यता देण्यात यावी आणि तो डिपीआर झाल्यानंतर ते काम सुरू करण्याच्या संदर्भातील कार्यवाही पुढची हि प्रशासनाने तत्परतेने करावी.

**ॲड.शुचिता हाडा :-** महापौरताई मला बोलायच आहे की, आता नितीनभाऊंनी जो मुद्दा मांडला हा गंभीर मुद्दा आहे. विषय आवश्यक आहे. नितीनभाऊ आता गणेश घाटाचे काम त्यांच्याच कार्यकाळात झाल त्यावेळेला सुध्दा तिथे पाईपलाईन टाकण्याचा विषय सुध्दा पुढे आलेला होता. पण त्यालाही विरोध झाला आणि मग पुढे आणि आता हा विषय ईथे आलेला आहे. आता आपण अमृत-२-O च्या टप्प्यावर आलो आहे. खर तर मागच्या महासभेमध्ये बहुमताने एजन्सीला नेमुण टाकलेल होत. त्या एजन्सीने संभाव्य धोका दर्शविलेला होता की जे प्रिझेंटेंशनला आले नाही तर ती भविष्यात काम करायला येईल का ? त्या एजन्सीने नकार कळवला असो तो भाग वेगळा आहे. आता ज्या एजन्सीचा पत्रव्यवहार सुरू आहे प्रशासनाचा किंवा सुरू असेल अस मला कळल. तर मुळात आता अमृत-२-O चे च पार्ट सुरू असणार आहे. तर आपण यासाठी पुन्हा वेगळा खर्च का करतो आहोत. आता जी एजन्सी नेमणार आहोत. प्रशासनाचा हा सगळा सोपस्कार आटोपल्यानंतर तर प्रशासनाने हे सगळ लक्षात ठेवाव आणि त्या एजन्सीकडून काम करून घेण्याकरीता डिपीआर तयार करतांना मेहरूण तलाव येथील सांडपाण्याचा प्रश्न हे सगळ अमृत-२-O पॉंईटचेच पार्ट असणार आहे. तर आपण वेगळा डिपीआर का करतो आहे आणि एजन्सी का नेमतो आहे याची मला गरज वाटत नाही. अमृत-२-O अंतर्गतच हे काम झाल पाहीजे आणि त्याच्याकडूनच हे काम करून घेतल पाहीजे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- ताई याच्यामध्ये मी थोडासा खुलासा करू ईच्छितो की आपण आता हे काम एजन्सीकडून करून घेण्याच्या संदर्भातील आपली जी भुमिका होती की पाणी पुरवठ्याच्या वाढीव कामाच्या अनुषंगाने ती मर्यादा आपण ठरवलेली होती. अजुन आपण मलनिस्सारण...

**ॲड.शुचिता हाडा :-** भाऊ आपण आता हा प्रस्ताव जो आहे की पाणीपुरवठा आणि मलनिस्सारण म्हणत आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा** :- बरोबर आहे.

**ॲड.शुचिता हाडा :-** आता जर प्रशासन ठरवेल की एजन्सी कोणती, आपण एकत्रित का करू ना, एकत्रित सगळ काम देवु आणि अमृत-२-O चा पार्टही हा आहे तर त्यासाठी आपण प्रयोग का करतो आहोत. ते मला लक्षात येत नाही.

**श्री.नितीन लढ्ढा** :- ताई याच्यामध्ये काय आहे की , आयुक्त मॅडम याच्यामध्ये जो एल-१ आला त्याने नकार दिला काम करायला आणि काही टर्म आणि कंडिशन घातल्या तर मला वाटत त्या टर्म ॲन्ड कंडिशन ज्या आहेत त्या मेनटेन करु शकत नसल्याकारणाने आपण त्याचा विचार करत नाहीये. सेंकड लोयेस्ट जो होता औरंगाबादची एक कंन्संलटंट एजन्सी त्याच्या संदर्भातील आपला पत्र व्यवहार झालेला आहे आणि त्याला काम देण्याच्या संदर्भातील आपल नियोजन केलेले आहे. पंरतू आपण त्या कामाचे कार्यादेश देतांना अमृत-२ मध्ये पाणी पुरवठा आणि मलनिस्सारण ची कामे प्रस्तावित करणार आहोत का?

**ॲड.शुचिता हाडा :-** प्रशासकीय प्रस्ताव हा आलेला नाही आणि

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही ताई

**ॲड.शुचिता हाडा :-** मागे आपल्याकडे हा प्रशासकीय प्रस्ताव आलेला होता. जेव्हा अमृत-२ चा तेव्हा आपण लोकांनी याची निविदा प्रक्रीया राबवावी अशी मागणी केलेली होती. तेव्हा आपल्याला काही प्रशासकीय घोळ झालेला आहे असे माहिती नव्हते. तर कसा करणार आता मध्यंतरीच्या काळामध्ये तो अर्धवट करून टाकला तेव्हा सभागृहाला कुठेच विश्वासात घेतले जाते नाहीये. नियमाप्रमाणे तर मौखिक योजना करून त्याच्यामध्ये आपण सगळ अंर्तभुत करू आणि

**श्री.नितीन लढ्ढा** :- ताई

**ॲड.शुचिता हाडा :-** आणि अमृत-२-O चा पैसा हा सर्व केंद्र शासनाकडुनच येणार आहे ना नितीनभाऊ आपण आता आज जे म्हणता आहात की एक वेगळी एजन्सी आपण नेमू आणि डिपीआर आपण स्वतंत्र तयार करू हा सगळा खर्च आपल्याला कशातुन अभिप्रेत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही नाही हा तर मनपा निधीतुनच होईल. परंतू

**ॲड.शुचिता हाडा :-** हो ना पण मग मनपा निधीतुनच होईल पण मग अमृत-२ चा पार्ट जो आहे अमृत-२-O तर आपण पुर्ण त्याच्यावरच फोकस करू आणि चांगल्या पध्दतीने पार पाडू

**श्री.नितीन लढ्ढा** :- माझ म्हाणण तेच आहे ताई याच्यामध्ये काय आहे की, आपण आता एजन्सी नेमली आहे त्यांच म्हणण आहे की पाणी पुरवठ्याच्या संदर्भात त्यांच्याकडून डिपीआर करून घेण अपेक्षित केलेले आहे.

**ॲड.शुचिता हाडा :-** का पण आपण वेगळा करतोय मलनिस्सारणचा पार्टही आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- आपण मलनिस्सारण

(सभागृहामध्ये अनेक सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.आयुक्त :-** अजुन जागा अंतिम झाल्या नाहीत.

**ॲड.शुचिता हाडा :-** आपण प्रॉपर एजन्सी नेमणार होते ते सुध्दा ईमिजेट होणार आहे तर येथे प्रशासकीय ईच्छाशक्तिचा अभाव हेच कारण आहे मॅडम येथे आणि आपण कितीदा म्हणणार की जागा अंतिम झाल्या नाहीत. काय नियोजन काय आहे यासाठीच मला तर वाटत की नितीनभाऊ हा अमृत-२-O जो पार्ट जो आहे हा प्रकल्प वेगळा करण्याची गरज नाहीये. उलट आपण अमृत-२-O वर फोकस करायला हव.

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही ताई आपल्याला त्याच्याबद्दल काहीच अडचण नाहीये पण काय आहे की हा प्रस्ताव अजुन काही काळ पडून राहू नये म्हणुन आपण हा प्रस्ताव ठेवला आहे. कारण काय आहे की त्या भागात नागरी वस्ती ही खुप झपाट्याने वाढते आहे आणि जिथे नागरी वस्ती झपाट्याने वाढते आहे तर तिथल्या सांडपाण्याचा वापर सुध्दा त्या तलावामध्ये चालु आहे आणि पुर्वी जी परिस्थिती होती त्या परिसरात खुप कमी प्रमाणात इमारती होत्या. पण आता त्या परिसरात वास्त्यव्याची संख्या वाढते आहे.

**ॲड.शुचिता हाडा :-** नितीनभाऊ आपण म्हणता आहेत ते बरोबर आहे पण

**श्री.नितीन लढ्ढा** :- जर कधी प्रशासन मलनिस्सारणाचा डिपीआर आणि पाणी पुरवठ्याचा डिपीआर या दोघांच्या बाबतीत जर कधी एकच निर्णय घेत असेल तर आपण या विषयावर निर्णय घेवु शकतो

**ॲड.शुचिता हाडा :-** नितीनभाऊ आपल्याला ते गरजेचच आहे त्याच्यावर प्रशासनाने निर्णय घ्यावा आता

**मा.आयुक्त :-** या अनुषंगाने जागेच्या बाबतीत जर आपण प्रशासनाच्या माध्यमातुन जागेच्या बाबतीत बऱ्याच ठिकाण बघितल्या परंतू आता आपल्याला ज्या पाहीजे त्या टेक्निकली मिळत नाहीये. दुसरा प्रश्न की जेव्हा मंत्रालय स्तरावर चर्चा झाली तेव्हा मलनिस्सारण चा डिपीआर फायनल करण्यासाठी तर त्यांच अस डिसिझन आल की जो पर्यंत जागा निश्चित होत नाही तोपर्यंत वॉटर सप्लाय तरी फॉरवर्ड करायला पाहीजे. तर आपण कंन्संलंटस्नीच्या मागे लागलेलो होतो. तर त्यांचे जे पत्र आलेले आहेत ते पण सोनगिरेसाहेब वाचुन दाखवु शकतात. जे आले आहेत ते आणि मॅडम हा डिपीआर चा उद्देश असा आहे की आता वेगवेगळ्या टेक्नॉलॉजी ज्या आहेत तर ते छोटे छोटे ईस्टिमेट पण खुप चांगल्या पध्दतीने कार्यरत आहेत. तर अशा पध्दतीने मेहरूण तलावाचा वेगळ्या पध्दतीने विचार करू ईस्टिमेट तयार करून

**ॲड.शुचिता हाडा :-** मॅडम काय आहे की मलनिस्सारणाचे सगळ्या सदस्यांना काय गरज होती हा अशासकीय प्रस्ताव आणण्याची हा प्रशासकीय प्रस्ताव का नाही आला सभागृहासमोर, प्रशासनाला जर अस वाटते आहे की हे ईमिजेट व्हायला हव आणि हे वेगळ करायला हव तर प्रशासकीय प्रस्ताव म्हणुन सादर करा सभागृहासमोर

**श्री.नितीन लढ्ढा** :- मॅडम याला प्रशासकीय प्रस्ताव म्हणुन येवु द्या सभागृहासमोर कारण काय आहे की मुलभुत सोई सुविधा पुरविले जातील.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- नितीनभाऊ एक मिनिंट, मॅडम विषय असा आहे की मेहरूण तलाव परिसरात बांधकाम प्रमिशन देतांना आपण मागे एक ठराव केलेला आहे दहा वर्षांपुर्वी की त्याला STP प्लँट त्या ठिकाणी बसविणे कंम्पलसरी आहे . त्याची पण अंमलबजावणी झाली पाहीजे तर तो जर करत नसेल तर त्याला नोटीस दिली पाहीजे किंवा त्याला जनजागृती केली पाहीजे की तुम्ही बसवा अस मला आठवत आहे. आपण पुर्वी केला आहे असा ठराव

**श्री.राजेंद्र पाटील** :- महापौरताई, आता तलावाच्या पश्चिम दिशेने वस्ती आहे. त्याच्यामुळे तलाव प्रदुषित होतो आहे. आता तलावाच्या तिघही बाजुने दहा वर्षांमध्ये पुर्ण वस्ती होणार आहे. दहा वर्षांमध्ये तुम्हाला सगळ्या पुर्ण भागात वस्ती झालेली दिसेल. फक्त उत्तरेकडुन पाणी येणार नाही ड्रेनेजच, बाकी पुर्व दिशा असेल, पश्चिम दिशा असेल किंवा दक्षिण दिशा असेल. या तिघ बाजुचा नैसर्गिक फ्लो जो आहे. तो तलावाच्या दिशेने आहे आणि त्याच्यावर आपण उपाययोजना जर का नाही केल्या. तर जैवविविधता जी आहे ती टिकणार नाही आणि तलावाचे जे सौंदर्य आहे ते नष्ट होईल. आज आपल्या जळगांव शहरात मला अस वाटत की जो एकच तलाव असा आहे की आपण बालकांपासुन ते वृध्दांपर्यंत आपण आपलं जे टेंशन आहे. ते मुक्त करण्यासाठी त्या परिसरात जातो. तर त्यासाठी आपण याच्यावर गांर्भीयाने विचार केला पाहीजे आणि लवकरात लवकर कुठल्याही पध्दतीने आपल्याला डिपीआर करायचा असेल आता भाऊंनी सांगीतल, ताईंनी सांगीतल. त्याच्यावर लवकरात लवकर अंमलबजावणी करण्यात यावी.

**श्री.चंद्रशेखर पाटील** :- श्री सोसायटीचा विषय आहे जे आपण पाणी सोडण्याचा त्या अपार्टमेंटचा मागच्या दोन वर्षापासुन प्रलंबित आहे. आता पुढच्या महिन्यापासुन जवळपास पाऊस चालु होईल आता परत ते पाणी लोकांच्या घरात जाणार आहे. खुप दुषित पाणी त्या लोकापर्यंत जात आहे. तर त्याच्यावर काहीच निर्णय झाला नाहीये अजुन, सोनगिरेसाहेब काय विषय आहे कधी मार्गी लागणार आहे हा विषय

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- या संदर्भात आपण स्पॉटवरही जावुन आलो होतो मला आमदार साहेबांचाही फोन आलेला होता आणि मी प्रत्यक्ष त्या जागेवरही जावुन आलो आहे तर त्याठिकाणी मेन जो प्रॉब्लेम आहे हा हायवे वाल्यांचा प्रॉब्लेम आहे. आपले जे फ्लो होते ते त्यांनी बंद करून टाकलेले आहेत आणि ठराविक ठिकाणी त्यांनी हायवेवर ठेवलेले आहेत. तर साहेबांचे त्या ठिकाणी राजुमामांनाही सांगीतलेले आहे.

**श्री.मनोज चौधरी** :- सोनगिरेसाहेब तुम्ही माहिती व्यवस्थित देत नाही. ते सांडपाणी जे येत आहे ना त्याचा फ्लो त्याबाजुने काढला आहे म्हणजे बिल्डिंगच्या डाव्याबाजुने काढला आहे आणि आता ते पाणी तिथेच काढु शकतो आपण नाल्यामध्ये लक्षात घ्या आधी माझा विषय

(सभागृहामध्ये अनेक सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.मनोज चौधरी** :- तुम्ही जो सर्वे केला ना साहेब

**श्री.चंद्रशेखर पाटील** :- ते पाणी काढणाऱ्याला थोडीशी अक्कल पाहीजे होती की पाणी कुठे काढायचे, लोकांच्या घरात म्हणजे त्या सोसायटीचे पाणी गरीब माणसांच्या घरात सोडल जातय. अत्यंत वाईट परिस्थिती आहे.

**श्री.मनोज चौधरी** :- २५ वर्षापुर्वीचे घर आहेत त्याठिकाणी आणि त्यांची लेव्हल आज खाली गेली आहे

(सभागृहामध्ये अनेक सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.मनोज चौधरी** :- ते पाणी डाव्याबाजुला जावु शकत ना

**श्री.चंद्रशेखर पाटील** :- साहेब आज निर्णय घ्यावा लागेल तुम्हाला हायवेच्या बाबत किंवा PWD च्या प्रकरण आहे, आपल्याला अधिकार आहेत ते आपल्याकडे घरपट्टी , पाणीपट्टी भरत आहेत. आपण त्या बिल्डिंगला परवानगी दिली आहे. आपल्याला शहर अभियंता म्हणुन याचा निर्णय घ्यावा लागेल.

(सभागृहामध्ये अनेक सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.मनोज चौधरी** :- त्या डाव्याबाजुला एक नाला आहे पुढे २०० मिटरच्या जवळपास एक नाला आहे तर ते पाणी तिकडे काढु शकतो ना त्या नाल्यामध्ये

**मा.आयुक्त** :- मागच्या पावसाळ्यामध्ये जेव्हा मी पाहणी केली होती.

**श्री.मनोज चौधरी** :- मॅडम

**मा.आयुक्त** :- सर ऐका ना एक मिनिट मागच्या वेळेस ३१ मार्चमध्ये DPC मध्ये आपल्याला निधी देणार होते. तेव्हा त्याचा एक प्रस्ताव तयार करून आपण DPC ला पाठवला होता. तर PWD ला निधी वर्ग , देणार होते परंतू तो निधी लॅप्स झाल्यामुळे म्हणजे संपल्यामुळे या आर्थिक वर्षात देतो तेच सांगते आहे.

**श्री.चंद्रशेखर पाटील** :- मॅडम आपण पत्रव्यवहार केलेला आहे का

**श्री.मनोज चौधरी** :- मॅडम आपण चारी करून त्या नाल्यामध्ये पाणी सोडु शकतो ना , तो निधी उपलब्ध होत नाही तोपर्यंत

**मा.आयुक्त** :- सर तो जागेचा प्रश्न आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- त्याच काय आहे भाऊ की याच्यासंदर्भात सांगतो आदरणिय सुरेशदादांचाही बंगला आहे त्याच्या परिसरातच या सगळ्या इमारती उभ्या आहेत. तर त्याचेच पाणी येत. आदरणिय सुरेशदादांनी पालकमंत्री महोदयांना फोन केला होता. २७ मार्चला आणि त्यांनी सांगीतले की अशा पध्दतीने त्या भागातील नागरीकांची गैरसोय होते आहे आणि त्याला जिल्हा नियोजन मंडळातुन निधी उपलब्ध करून द्या. तर त्या संदर्भात दि.२९/०३ ला पत्रव्यवहार जो झालेला आहे. दि.२९/०३/२०२३ जिल्हा नियोजन अधिकारी, नगरपालिका शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय जळगांव. जिल्हा नियोजन निधी अंतर्गत जळगांव शहरातील पिंप्राळा शिवार सर्वे नं ३३८ ते सर्वे नंबर ३४२ पर्यंतच्या विकास रस्ते योजनेस निधी मिळणेबाबत , मा.आयुक्त सो यांचे पत्रव्यवहार, उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, मा.आयुक्त यांनी पिंप्राळा शिवारातील सर्वे नं.३३८ ते सर्वे नं. ३४२ पर्यंतच्या १८ मिटर रूंद रस्ता हा विकास कामांमध्ये होणेकामी निधी अभावी होत नाहीये. सांडपाण्याचा निचरा होत नसल्याकारणाने बांधकाम करणे व रस्त्याचे डांबरीकरण करणे आवश्यक आहे. जिल्हा नियोजन समिती मधुन उपलब्ध निधीमधुन उपरोक्त कामे करण्याच्या संदर्भातील पत्र या कार्यालयाकडे प्राप्त झाले असुन सदर पत्र आपल्या कार्यालयाशी निगडीत असल्यामुळे म्हणुन सदर पत्र यासोबत योग्य त्या निर्णयास्तव जोडून पाठवत आहे. म्हणजे यासंदर्भात मा.गुलाबरावांनी शिफारस केलेली आहे. फक्त रस्ता हा अंतिम म्हणजे शेवटच्या क्षणाला पत्रव्यवहार केलेला आहे. म्हणजे साधारणत: ३० मार्चला आणि तोपर्यंत जो काही निधी होता त्या निधीचा सगळा विनियोग झालेला होता. त्यामुळे गुलाबरावांनी सांगीतले की याला पुढच्या म्हणजे या आर्थिक वर्षामध्ये निधी उपलब्ध होईल आणि त्यांनी मान्य केले. तोपर्यंत त्यासंदर्भात कुठलीही अडचण निर्माण होवू नये. या कामांमध्ये आता तर तिथे पाईप टाकुन ते पाणी बिबा नगरच्या साईडने वळवण्यात यावे.

**श्री.चंद्रशेखर पाटील** :- नितीनभाऊ मागच्या वेळेस सभेमध्ये सांगीतले होते बिबा नगरच्या साईडला पाईपही आले. पण झाले काय माहिती की त्याच्यामध्ये गैरसमज झाला आणि उलट्या दिशेने लेव्हल काढत चालले होते.

**श्री.नितीन लढ्ढा** :- बरोबर आहे. या साईडला लेव्हल आहे त्यासाईडला काढत नाहीये तर योगेश बोरोलेंना सांगीतले की योग्य पध्दतीने त्या कामाच नियोजन करून घ्यावे आणि येत्या १५ दिवसांत ते काम पुर्णही होईल.

**श्री.चंद्रशेखर पाटील** :- आता एक दोन महिन्यात पाऊस पडणार आहे आता भाऊ म्हणत आहेत की, त्या प्रोसिजर ला तिन महिने चार महिने लागतील त्या प्रोसिजरला, शेवटी प्रशासनाच काम कस राहत आपल्या सगळ्यांना माहिती आहे. त्याच्यापुर्वी जर पाणी पडले आणि लोकांच्या घरात पाणी जाईल तर आपली तात्पुरती व्यवस्था काय आहे यासाठी आपली.

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही मी म्हणतोय ना की येत्या १५ दिवसांत काम पुर्ण होईल.

**श्री.चंद्रशेखर पाटील** :- त्यात काय झालय नितीनभाऊ की त्या सोसायटीच्या बॅक साईडला खुप मोठा नाला होता. पण आता काय आहे की नविन डेव्हलपर तिकडे आलेले आहे जो नाल्यावर अतिक्रमण करतो आहे त्याठिकाणी आता खुप छोटा नाला झाला आहे. तो जर ओव्हर फ्लो झाला तर लोकांच्या घरात १०० टक्के पाणी जाणार आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- काय आहे पावसाळ्याच्या अनुषंगाने आता

(सभागृहामध्ये अनेक सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.मनोज चौधरी** :- भाऊ पाईप टाकुन तो कच्चा तर करून घ्या तुम्ही

**श्री.नितीन लढ्ढा** :- योगेश करून द्या तेवढे

**श्री.चंद्रशेखर पाटील** :- मॅडम त्याठिकाणी जे कमर्शियल प्रोजेक्ट आहेत. त्यांना नोटीस द्या की नागरीक ज्या भागात आहेत तिथे पाणी सोडू नका. आम्हाला उत्तर द्याव लागत रोज

**श्री.नितीन लढ्ढा** :- बरोबर आहे तुम्ही बिल्डिंग परमिशन देतात. बिल्डिंग परमिशन देतांना नियमानुसार दिल्यानंतर पाणी ते रस्त्याच्या पर्यंत आणुन देऊ शकतो. रस्त्यावर आल्यानंतर त्याची जबाबदारी कुणाची आहे. महापालिकेची आहे तुम्ही नागरीकांना कळवाल की तुम्ही पाणी बंद करा अस तुम्ही करू शकणार नाही. शेवटी ज्या जबाबदाऱ्या समजा उद्या माझ्या एका प्लॉटवर पाण्याचा निचरा होत नसेल तर मी म्हणेल की तुम्ही नाल्यापर्यंत पाईपलाईन टाकुन घ्या अस होत नाही ना, कायद्याने ज्या-ज्या गोष्टी ज्याच्यावर बंधनकारक आहेत तशा पध्दतीनेच बोलाव लागेल. आपण नगरसेवक म्हणुन काहीही मुद्दा मांडला म्हणजे तो मुद्दा मान्य करून टाका.

**श्री.चंद्रशेखर पाटील** :- भाऊ हा विषय आताचा नाहीये मी मागच्या तिन वर्षापासुन रिक्वेस्ट करतो आहे मी.

**श्री.नितीन लढ्ढा** :- हो मान्य आहे ना विषयांना कायदेशीर मागणी करावी ना

**श्री.चंद्रशेखर पाटील** :- भाऊ नागरीकांच्या घरात पाणी घुसतय. गुडघ्यापर्यंत पाणी आहे अत्यंत दुषित पाणी आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- मग मागील तिन वर्षांपासुन केल काय आपण मग

**श्री.चंद्रशेखर पाटील** :- भाऊ तिन वेळा गेलो ना भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा** :- मग जाव तर लागेलच ना

**श्री.चंद्रशेखर पाटील** :- भाऊ किती दिवसांपासुन सांगतोय मी

**श्री.नितीन लढ्ढा** :- मग जे चाललेले आहे ते १५ दिवसांमध्ये कार्यान्वित होतील.

**श्री.चंद्रशेखर पाटील** :- मागील दोन वर्षांपासुन काहीच केलेल नाहीये भाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा** :- मी तेच म्हणतोय आता योगेश उत्तर देईल त्याच

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता** :- भाऊ त्याच टेक्नीकल ड्रॉईंग तयार करून ठेवलेले आहे सगळ करून ठेवलेले आहे. त्या इमारतीपासुन हायवेच्या पुढे थोडया अंतरावर तलावापासुन हायवेपर्यंतचा जो नाला आहे. तिथपर्यंत जोडणी करण्यासाठी पोजिशन ओके आहे.

**श्री.चंद्रशेखर पाटील** :- झाल काय त्याच मग

**श्री.मनोज चौधरी** :- साहेब किती दिवसात करणार आहे ते सांगा.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता** :- साधारण १५ दिवसात पुर्ण होवुन जाईल.

**श्री.चंद्रशेखर पाटील** :- हि पोजिशन मागच्या तिन वर्षापुर्वी पण होती आणि आजपण तिच आहे मग काय केल आपण तिथे

**श्री.मनोज चौधरी** :- जोपर्यंत मंजुऱ्या होत नाही चार पाच महिन्यामध्ये काम करू शकत नाही का तुम्ही

**श्री.नितीन लढ्ढा** :- मी काय म्हणतोय की या संदर्भात काय आहे की, आपल्या ज्या ज्या योजना चालु आहेत ना त्या मक्तेदाराकडे लेबर अव्हेलेबल नाहीये म्हणुन त्याच्यामुळे आता आठ दहा दिवसांमध्ये ते आले की त्या लेबर कडुन प्रॉपर लेव्हल मेंटेन करून पाईप सुध्दा टाकले जातील.

**श्री.चंद्रशेखर पाटील** :- साहेब १० तारखेपर्यंत हे काम झाल पाहीजे.

**श्री.मनोज चौधरी** :- भाऊ १५ दिवसांत होवुन जाईल का हे काम

**श्री.नितीन लढ्ढा** :- हो १०० टक्के होईल १५ दिवसांत

**मा.महापौर** :- विषय क्रं. १५ हा पुढील महासभेमध्ये शासकीय म्हणुन आला पाहीजे आणि पुढीलच महासभेमध्ये हा आला पाहीजे. जास्त विलंब होता कामा नये. त्या अनुषंगाने विषय क्रं. १५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०६४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सभागृहात झालेल्या चर्चेनूसार व मा.पिठासिन अधिकारी यांनी दिलेल्या सूचनेनूसार जळगांव शहराचे वैभव असलेला मेहरुण तलाव प्रर्दुषण मुक्त करणेबाबत उपाय योजना करणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा व मा.उपमहापौर,श्री.कुलभुषण विरभान पाटील यांनी दिलेला प्रस्ताव हा अशासकीय असल्याने सदरचा प्रस्ताव हा पूढील सभेत प्रशासनाने प्रशासकीय प्रस्ताव सादर करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

| | | |
|---|---|---|
| **अनुकूल** | **-** | **६०** |
| **सूचक** | **:-** | **लढ्ढा नितीन बालमुकुंद** |
| **अनुमोदक** | **:-** | **पाटील कुलभुषण विरभान** |

**नगरसचिव, विषय क्रं.१६ :-** खुला भुखंड कराची अवास्तव आकारणीची मागणी निर्लेखीत करणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा व मा.उपमहापौर,श्री.कुलभुषण विरभान पाटील यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- मा.महापौर महोदया, या संदर्भात असे आहे की खुला भुखंड अपडेट होत नाही. पर्यायाने काय आहे की आपण कायद्याने सहा वर्षांपर्यंतची मागणी जी आहे ती मागणी करण्याच्या संदर्भातील डिमांड कायदेशीर रित्या आपण मागणी करू शकतो. परंतू काय होत की बऱ्याचश्या वर्षांपासुन या विभागाच्या मागण्या अपडेट होत नाही. या याचे बिल कुठे खुला भुखंडला कुठेतरी दिले जात नाही आणि तिथे सुध्दा जो कोणी खुला भुखंड धारक

ज्यावेळेला मागणी करायला जातो त्यावेळेला मागील दहा-दहा, पंधरा -पंधरा वर्षापुर्वीच्या मागण्या वरुन त्याच्याकडून पैसे वसुल केले जातात. तर ते तस बेकायदेशीर आहे. या अनुषंगाने प्रशासनाने तातडीने मागील सहा वर्षांपर्यंतच्या मागण्या अपडेट करून अतिरीक्त ज्या मागण्या असतील त्या निर्लेखित करण्याच्या संदर्भातील भुमिका प्रशासनाने स्विकारावी.

**मा.आयुक्त** :- सर याच्यामध्ये काय आहे की खुला भुखंड टॅक्समध्ये काय आहे ते आपण चेक करून ते याच्यातच घेवुन टाकु. सांगा काय आहे ते दावे.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त(महसुल)** :- आपल्या ज्या वादग्रस्त रक्कमा ज्या आहेत. त्याची यादी तयार केली आहे आणि अशा प्रकारचे जे वसुल होत नाही अशा रक्कमा पण निर्लेखित करून ते करून द्या.

**श्री.नितीन लढ्ढा** :- तसा प्रस्ताव द्या ना तसा प्रस्ताव द्या तो मान्य करून घेवु.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त(महसुल)** :- चालेल.

**श्री.नितीन लढ्ढा** :- कारण काय होत की याप्रमाणे आपले डिमांड जे आहे ते फुगिर दिसते आणि वसुल होत नाही. या खुला भुखंड संदर्भातील वास्तविक बघितले तर मोठ्या प्रमाणावर गोंधळ आहे. सामान्य नागरीकाला या संदर्भातील कुठलीच कल्पना नसते आणि आपले कर्मचारी कुठल्या तरी एखाद्या कागदावर त्याला काढुन देतात. पक्क बिल आपण ईश्यु करत नाही आणि पक्के बिल ईश्यु करत नसल्याकारणाने ती डिमांड तो जस सांगेल ती डिमांड ग्राह्य पकडली जाते परंतू ती डिमांड जी आहे त्या सामान्य नागरीकाला कुठेतरी दिशाभुल करणारी डिमांड दर्शवली जाते आणि त्याच्यानंतर जर काही त्याच्यामध्ये काही तडजोड जर झाली तर त्या तडजोडी अंती ते डिमांड कलेक्ट करून त्याच्याकडून पैसा घेतला जातो. तर यास्तव जे आहे डिमांडही अपडेट व्हायला पाहीजे आणि ज्या डिमांड निर्लेखित करण्यासंदर्भातील असेल तर त्या सगळ्या डिमांड एकत्रिकरण करून त्या डिमांड निर्लेखित करण्यासंदर्भातील प्रस्ताव प्रशासनाने मान्यतेस्तव महासभेसमोर ठेवावे.

**मा.आयुक्त** :- मध्यंतरी पाणीपुरवठ्याच्या संदर्भातील हुडकोच्या विषयाच्या संदर्भात एक विषय घेतला पाहीजे एक जे आहे की ज्यांना जुने कनेक्शन आहेत. सगळ्यात महत्वाच आपण नांव तर बदलणारच नाही ते आपण कायदेशीर दृष्टया बदलु शकत नाही. तर त्यांना कनेक्शन जोडून देण्यात येईल तिथे जो कोणी राहात असेल ज्याच्या नावाने अलॉटमेंट झाले असेल त्याच्याच नावाने पावती फाडली जाईल. जुन कनेक्शन असेल तर त्याला मागील किमान एका वर्षाची तरी थकबाकी भरावी आणि नविन कनेक्शन द्यायची वेळ असेल तर त्याने कनेक्शन चार्जेस भरावे थकबाकी आपण नंतर घेवु अस एक डिसीजन पुढच्या महासभेत घेवु पण हुडकोचा हा निर्णय अंतिम करावा.

**श्री.नितीन लढ्ढा** :- यापुर्वी ज्या-ज्या तक्रारी असतील तर तशा पध्दतीचे प्रस्ताव प्रशासनाने द्यावेत.

**मा.आयुक्त** :- चालेल.

**श्री.नितीन लढ्ढा** :- आणि त्याच्यावर ताबडतोब निर्णय घ्यायला पाहीजे.

**मा.आयुक्त** :- अंतिम करू आपण

**श्री.नितीन लढ्ढा** :- कस आहे की रस्त्यांची काम त्याच्यामुळे बदलली जातात.

**मा.आयुक्त** :- नाही बऱ्याच सदस्यांना अस आहे की मान्य नाही पण किती दिवस आपण थांबणार मान्य करायला.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- ज्या लोकांच्या ताबा पावत्या आहेत त्यांना द्या पण त्यांची थकबाकी चार टप्प्यात भरून घ्या आणि नळ कनेक्शन द्या.

**मा.आयुक्त** :- हो तेच सांगीतले ना आता

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- नविन जे कनेक्शन घ्यायला येतील ज्यांनी आता घर घेतले आहे. त्यांना आता तुमची पावती दाखवा आणि घ्या तुम्ही

**मा.आयुक्त** :- नेमाडे साहेब पुढच्या मिटींगला हा प्रस्ताव आला पाहीजे स्लमच्या घरकुलांचा

**श्री.नितीन लढ्ढा** :- मॅडम शनिपेठ परिसरात गुरूनानक नगर परिसरात सुध्दा सेम पोजिशन आहे याच कारणामुळे त्याचाही हि तसा या प्रस्तावामध्ये समावेश करावा.

**मा.आयुक्त** :- ज्या-ज्या सन्मा.सदस्यांचे असे कनेक्शन जे आहेत ना, मला व्हॉटसअप टाका मी टाकुन घेईल.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. १६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०६५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेची खुला भुखंड कराची मागणी मोठया प्रमाणात थकबाकी झालेली आहे. याबाबत चौकशी करता असे निर्दशनास आलेले आहे की, खुल्या भुखंड कराची आकारणी करतांना खुला भुखंड ज्या वेळेस अस्तित्वात आला अर्थात भुमी अभिन्यास मंजूर झाला त्यावेळेपासून त्यावर आकारणी केली गेली आहे अनेक प्रकरणात ही आकारणी मागील १५ ते २० वर्षापासून करण्यात आलेली आहे. तसेच आजतागायत संबंधीत भुखंडधारक यांना त्यासंबंधाचे मागणी बिले सुध्दा बजावण्यात आलेले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे ज्यावेळेस नागरिक स्वत:हून खुला भुखंडकर भरण्यास येतात तेव्हा त्यांना सदर अवास्तव आकारणी संबंधात समजते व ते सदर अवास्तव आकारणी भरण्याचे टाळतात त्यामुळे वसुलीवर परिणाम होत आहे. वास्तविक पाहता शासनाच्या आदेशाप्रमाणे व कायदयाच्या तरतूदीनुसार तसेच संदर्भात न्यायालयाचे वेळोवेळी झालेले निर्णय पाहता कोणत्याही परिस्थितीत आकारणी मागील ६ वर्षापेक्षा जास्तीचा कालावधीसाठी करता येत नाही ते बेकायदेशीर ठरते त्यामुळे अशा प्रकारे मागील ६ वर्षापेक्षा जार्स्त कालावधीची केलेली आकारणी ही बेकायदेशीर असल्याने ती निर्लेखित करणे गरजेचे व आवश्यक आहे.

अशा प्रकारे झालेल्या आकारणीमुळे मागणी रजिष्टरला मागणी प्रचंड वाढलेली असून नागरिक सुध्दा मागील आकारणी भरणेस तयार नाहीत त्यामुळे खुल्या भुखंड कराचे वसुलीचे प्रमाण फारच कमी असल्याचे दिसून येत आहे.

यास्तव खुल्या भुखंडाची मागील ६ वर्षाच्या कालावधीपेक्षा जास्त कालावधीची आकारणी निर्लेखित करणेस व त्याप्रमाणे सुधारीत बिले संबंधीतांना बजाविण्यास तसेच वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द देवून खुल्या भुखंड कराच्या वसुलीसाठी अभय शास्ती योजना पुढील कालावधी प्रशासन ठरवेल अशावेळपर्यंत अवलंब करण्यात येवून नागरीकांना कराची रक्कम भरणेसाठी आवाहन करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने वादग्रस्त मालमत्ताकरा संदर्भात तसेच मनपा घरकुलांचे कराचे मागणी संदर्भात अशाप्रकारचे जे काही प्रस्ताव असतील त्या सर्वांचा एकत्रित प्रस्ताव तयार करुन पूढील महासभेपूढे सादर करावा.

**सर्वानुमते मंजुर**

| | | |
|---|---|---|
| **अनुकूल** | **-** | **६०** |
| **सूचक** | **:-** | **लढ्ढा नितीन बालमुकुंद** |
| **अनुमोदक** | **:-** | **पाटील कुलभुषण विरभान** |

**नगरसचिव, विषय क्रं.१७ :-** भाऊंचे उदयानाचे विस्तारीकरण करणेसाठी त्यालगत असलेले यावल वन विभागाचे कार्यालय व उपप्रादेशिक परिवहन विभागाचे कार्यालय स्थलांतरीत करणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.नितीन मनोहर बरडे व सन्मा.सदस्य,श्री.अनंत हरिश्चंद्र जोशी यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- महापौर महोदया, भाऊंचे उद्यानाशेजारी यावल वन विभागाचे व उपप्रादेशिक परिवहन विभागाचे कार्यालय असुन ती जागा मागणी करण्याच्या संदर्भातील हा त्या उद्यानाचे असुन चांगल्या पध्दतीने विस्तार करून त्याठिकाणी सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील यासंदर्भातील प्रस्ताव मान्य करण्यात यावा आणि याच्या संदर्भात मा. पालकमंत्री महोदय यांच्याकडे पाठपुरावा करून ती जागा उपलब्ध करून घेण्यात यावी.

**मा.आयुक्त** :- आपण मागणी करून घेवु.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. १७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०६६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मंजुर विकास योजनेनुसार जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील मेहरुण शिवारातील सर्व्हे नंबर ४४० या शासकीय जागेवर आरक्षण क्रमांक १५६ मध्ये बगीचा विकसित करणेबाबत मनपाचा ठराव क्रमांक ४७१ व जिल्हाधिकारी,जळगांव यांचेकडील आदेशानुसार जैन इरिगेशन

सिस्टीम्स् लि. या कंपनीस परवानगी देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने शहरातील नामांकीत संस्थेने स्व:खर्चाने 'भाऊंचे उदयान' नामक बगीचा नव्याने विकसित करुन सामाजिक बांधिलकीच्या नात्याने शहरातील व स्थानिक नागरिकांना शारीरीक व मानसिक विकासाकामी अत्यंत चांगल्या सोयी व सवलती उदयानाच्या माध्यमातुन सार्वजनिकरित्या विनामुल्य उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

आज सदर उदयानात रोज हजारोंच्या संख्येने शालेय व महाविदयालयीन विदयार्थी, युवावर्ग तसेच ज्येष्ठ नागरिक भेट देऊन तेथील सुखसोयी व सवलतींचा आनंद घेत असतात. तेथे येणाऱ्या प्रत्येक नागरिकाचा शारीरीक विकासासोबतच शैक्षणिक, बौध्दिक, सांस्कृतिक व मानसिक विकाससुध्दा व्हावा या उद्देशाने एक ग्रंथालयाची व एक ॲम्पी थिएटरची उभारणी व्हावी असे वाटते, परंतु जागेच्या अभावामुळे ते आजपर्यंत शक्य होऊ शकले नाही. जर विषयांकीत उदयानालगत असलेले यावल वन विभाग व उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाची जागा सदर उदयानाच्या विस्तारीकरणासाठी उपलब्ध झाल्यास तेथे सामाजिक बांधिलकीच्या नात्याने स्व:खर्चाने ग्रंथालयाची उभारणी करुन तेथे अभ्यास वर्ग सुरु करणेबाबत, शहराचे शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे हित जोपासण्यासाठी महात्मा गांधी उदयानात असलेल्या धर्तीवर सभागृह उभारणेबाबत त्याचबरोबर लहान मुलांच्या दृष्टीने अतिरिक्त आधुनिक खेळणी बसविण्याच्या उदात्त हेतूने मे.जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि. व भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन फाऊंडेशन या संस्थांनी होकारसुध्दा दर्शविलेला आहे. कारण भाऊंच्या उदयानासोबतच लगतच्या जागेत ग्रंथालय, ॲम्पी थिएटर व त्यासंलग्न बाबी सुरु करुन त्याची योग्य देखभाल करणे त्यांना सोईचे होणार आहे.

ज्याप्रमाणे भाऊंच्या उदयानाची जागा जिल्हाधिकारी,जळगांव यांचे आदेशाने महापालिकेस वितरीत करण्यात आलेली आहे व त्यानंतर महापालिकेकडुन मे.जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि. या कंपनीस दीर्घ मुदतीकरीता कराराने देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे उदयनालगत असलेली यावल वन विभाग व उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाची जागासुध्दा वरील प्रयोजनासाठी उपलब्ध होणे जरुरीचे आहे. जेणेकरुन शहरातील शालेय व महाविदयालयीन विदयार्थी, युवावर्ग, जेष्ठ नागरिक व शहरातील सर्व सामान्य नागरिकांना वाचन संस्कृतीव्दारे बौध्दिक व मानसिक विकास होण्यास सहाय्यभूत ठरेल. याकामी विकासक म्हणून मे.जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि. व भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन फाऊंडेशन या संस्थाच्या माध्यमातून ग्रंथालयाचा, सांस्कृतिक कार्यक्रमांच्या दृष्टीने ॲम्पी थिएटरचा व या संलग्न इतर बाबींचा नवीन उपक्रम राबविल्यास त्याचा फायदा नक्कीच सर्वांना होणार आहे. ज्याव्दारे जळगांव शहर महानगरपालिकेचा आपोआपच नावलौकीक होईल.

आज जळगांव शहरातील मध्यवर्ती भागात भाऊंच्या उदयानालगत असलेल्या उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात दररोज मोठया प्रमाणात नागरिकांची विविध कामांसाठी वर्दळ सुरु असते. त्यामुळे त्याठिकाणी सतत गर्दी व वाहनांच्या वर्दळीमुळे रस्ता जाम होत असतो. तसेच नजीकच्या परिसरात असलेल्या शाळा, महाविदयालये येथे जाणाऱ्या विदयार्थ्यांना रहदारीमुळे अडथळा निर्माण होत असतो व त्यामुळे तेथे नेहमीच छोटे मोठे अपघात घडत असतात. तसे पाहीले तर उपप्रादेशिक परिवहन कार्यालयासाठी मोहाडी परिसरातील नवीन जागा देण्यात आलेली आहे त्यां जागेवर सदर कार्यालय बांधून स्थलांतरीत केल्यास भाऊंचे उदयानानजीक दिवसा निर्माण होणारा वाहतुकीचा खोळंबा कायमस्वरुपी थांबविता येईल. त्यासाठी नवीन उपप्रादेशिक परिवहन कार्यालय बांधणेसाठी शासनाकडून अगर जिल्हा नियोजन मंडळाकडून निधी उपलब्ध करता येवू शकतो. त्यामुळे महानगरपालिकेने जिल्हा नियोजन मंडळातून निधी उपलब्ध करुन देणेसंबंधात मा.पालकमंत्री यांचेकडेस प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे भाऊंचे उदयानालगत असलेले यावल वन विभागाचे कार्यालय जळगांवात असणे हेच मुळात गैरसोयीचे आहे. त्यामुळे सदर कार्यालय हे यावल शहर अगर परिसरात स्थलांतरीत करणेसाठी सुध्दा प्रस्ताव शासनास सादर करुन यावल येथे वन

विभागाचे कार्यालयासाठी नवीन जागा उपलब्ध करुन देवून त्याठिकाणी शासनामार्फत सदर विभागाला कार्यालय बांधून देणेबाबतचा प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबींचा सकारात्मक विचार होऊन भाऊंच्या उदयानालगत असलेली यावन वन विभाग व उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाची जागा भाऊंचे उदयानाचे वरील प्रयोजनार्थ विस्तारीकरण करणेसाठी स्थलांतरीत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव, विषय क्रं.१८ :-** छत्रपती शिवाजी महाराज उड्डाण पुल खालील ओपन जिम व प्लेवर ब्लॉक बसविणेसाठी येणारा अंदाजित रक्कम रु.२०/-लक्ष मात्रचा खर्च मनपा किंवा शासकीय निधीतून करणेस मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.राजेंद्र नारायण मराठे यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- आता हा जो प्रस्ताव ठेवलेला आहे. त्याची जागा निश्चित केलेली आहे का की कोणत्या ठिकाणी ठेवणार आहे

**मा.आयुक्त** :- अशासकीय प्रस्ताव आहे हा.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- मॅडम मी सांगतो की रेल्वे वाल्यांनी तिकडच्या साईडला पुलाखालील जागा आहे.

**श्री.राजेंद्र मराठे** :- पुलाखालची जागा आहे ती

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- पुलाखालची जागा आहे

**श्री.राजेंद्र मराठे** :- काहीच अडचण नाहीये.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- आपल्या पुला खालचा रस्ता आहे ५ मिटरचा पुलाखाली जी झोपडपट्टी होती. तो डिपी रस्ता आहे.

**मा.उपमहापौर** :- याच्यामध्ये सन्मा.सदस्यांचा जो प्रस्ताव आहे त्याच्यामध्ये त्या ठिकाणची पाहाणी करून घ्यावी आणि त्यांच्या म्हणण्यानुसार तिथे जर काही अडचण नसेल तर ओपन जिम करणे आणि पेव्हर ब्लॉक बसविणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- बरोबर बस एवढच पाहीजे होत.

**मा.उपमहापौर** :- तर जागेची पाहाणी करून प्रस्ताव सर्वानुमते मान्य करावा.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- मान्य करावा.

**मा.महापौर** :- सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचनांची प्रशासनाने नोंद घ्यावी. विषय क्रं. १८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०६७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शिवाजीनगर भागातील नागरिकांच्या मागणीनुसार छत्रपती शिवाजी महाराज उड्डाण पुल खालील ओपन जिम व त्या ठिकाणी नागरिकांना सकाळी मार्निंग वॉक साठी प्लेवर ब्लॉक बसविणे गरजेचे असल्याने छत्रपती शिवाजी महाराज उड्डाण पुल खालील ओपन जिम व प्लेवर ब्लॉक बसविणेस व यासाठी येणारा अंदाजित रक्कम रु.२०/-लक्ष मात्रचा खर्च मनपा किंवा शासकीय निधीतून करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

मात्र सभागृहात झालेल्या चर्चेनूसार व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सूचनेनूसार उपरोक्त ठिकाणी पेव्हर ब्लॉक तसेच ओपन जिम चे साहित्य बसविणेकामी प्रशासनाने सदर जागेची प्रत्यक्ष पाहणी करून नागरीकांना रहदारीस अडथळा येणार नाही याची दक्षता घ्यावी व त्याअनुषंगाने परवानगी दयावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव, विषय क्रं.१९ :-** सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे लेख्यास (जमा व खर्च) मंजूरी देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. १९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०६८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेचे सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाचे वार्षिक लेखा विवरणपत्रात आरंभिची शिल्लक रु.३०४,३५,७६,९५४/- व भाग अ व क ची एकुण रक्कम रु.५३८,०६,२२,३३७/- मात्र इतकी रक्कम जमा असुन झालेला खर्च रक्कम रु.५९७,९९,०४,१६१/- मात्र इतका आहे. वर्ष अखेर शिल्लक रक्कम रु.२४४,४२,९५,१३०/- इतकी आहे. सदर शिल्लकेत जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.जळगांव चे शेअर्स ची रक्कम रु.२,८१,७८,१००/- मात्र दर्शविलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ (१) चे तरतुदी नुसार सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे लेख्यास (जमा व खर्च) मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव, विषय क्रं.२० :-** प्रभाग क्र.०७ अंतर्गत आशाबाबा नगर येथील आशाबाबा मंदिर ते अथर्व मेडिकल रस्त्याचे डांबरीकरण करणे कामी एकूण रक्कम रु.४८,४९,९८१/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- वषय क्रं. २० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०६९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.०७ अंतर्गत आशाबाबा नगर येथील आशाबाबा मंदिर ते अथर्व मेडिकल रस्त्याचे डांबरीकरण करणे कामी मक्तेदार श्री.बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे दर कामाचे निविदा रक्कमेवर ८% जास्तीचे दर सर्वात कमी आलेले आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने शहर अभियंता यांनी मक्तेदार यांना पत्र क्र.जा.क्र./जशमनपा/सा.बा./जा.क्र./०६ दि.०३/०४/२०२३ रोजी दराबाबत वाटाघाटीसाठी बोलविले असता मक्तेदार यांनी निविदा रक्कमेइतकेचेच दरात काम करण्यासाठी दि.०५/०४/२०२३ चे लेखी पत्रान्वये काम करण्याची संमती दर्शविली असता अंदाजीत रक्कम रु.३९,५८,३९४/- मात्र इतका खर्च येणार आहे. निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी, कामगार विमा, टेस्टींग चार्जेस व रॉयल्टी यांच्या रक्कमा समाविष्ठ करुन रक्कम रु.४८,४९,९८१/- मात्रचा खर्च अपेक्षीत असुन सदरचा खर्च हा सन २०२२-२३ चे लेखाशिर्ष नविन रस्ते या लेखाशिर्षाखाली करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव, विषय क्रं.२१ :-** प्रभाग क्र.११ मधील किलबील शाळे पासुन ते काशिविश्वेश्वर मंदिरा पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे कामी मक्तेदार बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे निविदा रक्कमेइतकेचेच आलेले निविदा दरास व याकामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.२९,९९,८७४/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. २१ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०७० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.११ मधील किलबील शाळे पासुन ते काशिविश्वेश्वर मंदिरा पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणेकामी मक्तेदार श्री.बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे दर कामाचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात जास्तचे आलेले आहे. सदर कामाची अंदाजीत रक्कम रु.२४,९१,७७७/- मात्र इतका खर्च येणार आहे. निविदेत नमुदप्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी, कामगार विमा, टेस्टींग चार्जेस व रॉयल्टी यांच्या रक्कमा समाविष्ठ करुन रक्कम रु.२९,९९,८७४/- मात्रचा खर्च अपेक्षीत असुन सदरचा खर्च हा सन २०२२-२३ चे लेखाशिर्ष नविन रस्ते या लेखाशिर्षाखाली करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव, विषय क्रं.२२ :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास योजने अंतर्गत शासनाने वितरीत केलेल्या ११.०२५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.१९ अंतर्गत सुप्रिम कॉलनी मधील पोलीस कॉलनी मधील रस्ते डांबरीकरण करणे कामी मक्तेदार डी.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे वाटाघाटी अंती निविदा रक्कमेइतकेचेच दरास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- महापौरताई विषय क्रं. २२, २३, २४, २५ , २६ हे संपुर्ण विकास कामांचे प्रस्ताव आहेत. ते सगळे मान्य करण्यात यावेत.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- पुन्हा २७ ही तसाच आहे. प्रशासनाकडून आलेले आहेत २७ , २८ ही तसाच आहे. ४० पर्यंतचे जे प्रस्ताव आहेत ना ते मान्य करण्यात यावे.

**सौ.गायत्री शिंदे** :- महापौरताई मला बोलायचे आहे.

**मा.महापौर** :- कोणत्या विषयावर बोलायचे आहे.

**सौ.गायत्री शिंदे** :- २८ वर बोलायचे आहे मी तुम्हाला लेटरही दिलेले आहे. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन अंतर्गत प्रभाग क्रं. ०२ मध्ये धनाजी काळे नगर विहीरीपासुन ते राजु शिंपी यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे हा प्रस्ताव आला आहे परंतू सदर रस्ता अमृत योजने अंतर्गत खणण्यात आलेला आहे. सदर रस्ता ऐवजी राम शिंदे याच्या घरापासुन ते कन्या छात्रालयापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे हा प्रस्ताव घेण्यात यावा तसेच हमाल वाडा सार्वजनिक शौचालयापासुन ते गायत्री प्रोव्हिजन पर्यंतचा रस्ता करणे ऐवजी श्री. सावंत साहेब यांचे घरापासुन ते बगिच्यापर्यंतचा रस्ता करण्यात यावा.

**श्री.नितीन लढ्ढा** :- म्हणजे ताईंच म्हणणे आहे की हा रस्ता ऑलरेडी कॉँक्रीट झालेला आहे.

**सौ.गायत्री शिंदे** :- धनाजी काळे नगर विहीरीपासुन ते राजु शिंपी यांचे घरापर्यंत रस्ता अमृत योजने अंतर्गत झालेला आहे मॅडम मला अस वाटत की तो मनपा निधीतुन झालेला आहे आणि तो पुढेपण होणार आहे तर मला वाटत की.

**श्री.नितीन लढ्ढा** :- मला अस वाटत ताई की याच्यामध्ये यांच जे म्हणण असेल ते प्रशासनाने विषय क्रं. २८ ची प्रत्यक्षात जावुन परिस्थितीची खत्री करून घ्यावी. प्रत्यक्षात जावुन परिस्थितीची खत्री करून तसा अहवाल द्यावा आणि जर तो रस्ता झालेला असेल आणि ताई त्याच्या मोबदल्यात ताई दुसरे काम सुचवत असेल तर तसा प्रस्ताव पुढच्या महासभेमध्ये पटलावर घेण्यात यावा.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- आता हे जे काम सुचवित आहे त्याची वर्कऑर्डर झालेली आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- झालेली असेल तर प्रशासनाने त्याची खात्री करून घ्यायची आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- शाम शिंदे ते गायत्री प्रोव्हिजन याची वर्कऑर्डर झालेली आहे. साहेब सांगा तुम्ही

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- सन्मा.सदस्या. सौ. गायत्री शिंदे यांनी अर्ज दिलेला होता तो माझ्याकडे प्राप्त झालेला आहे आणि मी ते पत्र बघितले तर या ईस्टिमेटच्यामध्ये जे स्लॉट केलेले आहेत परंतू ते बजेटच्या मध्ये येत नाही आणि हा एकच रस्ता नाहीये त्याच्यामध्ये आजुबाजुचे रस्तेपण आहेत आणि त्यांनी नांव दिले की याच्या घरापासुन त्याच्याघरापर्यंत परंतू ईस्टिमेटमध्ये चार पाच रस्ते आहेत. म्हणुन आता हा रस्ता झालेला आहे ते बरोबर सांगताहेत ताई

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- अर्धा झाला आहे साहेब

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- हो तो रस्ता अर्धा झालेला आहे हि बात सत्य आहे आणि हा रस्ता तयार करत असतांना तो झालेला नव्हता. परंतू आता जे काम तिथे सुरू केलेले आहे त्याच्यामुळे एका रस्त्यासाठी पुर्ण प्रस्ताव थांबवणे योग्य होणार नाही आणि आपण तो रस्ता वगळुन घेवु आणि इतर रस्त्यांचे ईस्टिमेट जे आहे. ते तयार करणार.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- नाही नाही आपण महापौर आणि आयुक्तांनी पाहणी करावी त्या रोडाची त्याची परिस्थिती काय आहे त्यानंतरच त्याच्यावर निर्णय घ्यावा. काळे नगर पासुन ते शिंपी यांच्या घरापर्यंत

**श्री.नितीन लढ्ढा** :- सोनगिरे साहेब या रस्त्याची पाहणी करून स्वंयस्पष्ट तसा अहवाल द्यावा. सदर प्रस्ताव जो आहे तो तहकुब ठेवण्यात यावा. या रस्त्याची प्रशासनाने प्रत्यक्ष जावुन पुर्ण खातरजमा करून घ्यावी आणि स्वंयस्पष्ट अहवाल आणि स्पष्ट अभिप्रायासह आपल्याकडे तसा प्रस्ताव सादर करावा.

**मा.महापौर** :- विषय क्रं. २८ मध्ये सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचनांची प्रशासनाने नोंद घ्यावी आणि विषय क्रं. २८ सर्वानुमते तहकुब ठेवण्यात यावा.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- महापौर मॅडम त्या रस्त्याची पाहणी करून काम करण्यात यावे.

**मा.महापौर** :- मग तेच सांगीतले ना मी

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- आता त्याच्यावर प्रोसिजर झाल्यानंतर वापिस कशाला करता आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- अहवाल देतील ना ते

**मा.महापौर** :- विषय क्रं. २२ पासुन ते

**श्री.नितीन लढ्ढा** :- विषय क्रं. २२ पासुन ते विषय क्रं. ४० मान्य करण्यात यावे फक्त विषय क्रं. २८ तहकुब करण्यात यावा.

**मा.महापौर** :- विषय क्रं. २२ ते विषय क्रं. ४० यातील फक्त विषय क्रं. २८ हा तहकुब करण्यात यावा उर्वरित जे विषय आहेत हे सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०७१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास योजने अंतर्गत शासनाने वितरीत केलेल्या ११.०२५ कोटी अनुदाना अंतर्गत प्रभाग क्रं.०१,०३,०४,०८,११,१४ व १९ मध्ये विविध

०१ ते १९ कामांचा प्रस्तावास जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडील पत्र क्रं.पालिका/कावि-०४/५२/२०२३ दि.२०/०२/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार प्रभाग क्र.१९ अंतर्गत सुप्रिम कॉलनी मधील पोलीस कॉलनी मधील रस्ते डांबरीकरण करणे कामाची ई निविदा प्रसिध्द करण्यास आयुक्त,मनपा यांचे दि.०१/०३/२०२३ च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.२०९ (Tender ID - २०२३ _ JCMCJ _ ८८१८१० _१) सन २०२२-२३ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई - निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/१९६३ दि.०८/०३/२०२३ चे पत्रान्वये दै.लोकमत राज्यस्तरीय या वर्तमान पत्रात दि.०९/०३/२०२३ रोजी प्रसिध्द केल्यानुसार संगणकाव्दारे निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ई-निविदांचे संगणकावर कागदपत्रांची छाननी केली असता खाली नमुद मक्तेदार यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असुन आलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.५६,३२,०४०/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | डी.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन प्रोपा विशाल दगडु पाटील | निविदा रक्कमेवर ३८% जास्तीचे दराने | ७७,७२,५१५/- |
| २ | श्री.बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर | निविदा रक्कमेवर ४५% जास्तीचे दराने | ८१,६६,४५८/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार डी.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेवर ३८% जास्तीचे दर सर्वात कमी आलेले आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने मक्तेदार यांना वाटाघाटीसाठी बोलविले असता मक्तेदार यांनी प्रत्यक्ष वाटाघाटीला येवुन वाटाघाटी अंती निविदा रक्कमेइतकेचेच दरात काम करण्यास त्यांनी दि.०६/०४/२०२३ रोजी सा.बा.आ.क्रं./५६ दि.०६/०४/२०२३ अन्वये लेखी संमती दिली आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | वाटाघाटी अंती निविदा रक्कमेइतकेचेच दर त्यानुसार अपेक्षीत खर्च रक्कम | ५६,३२,०४०/- |
| ०२ | जि.एस.टी. १८% | १०,१३,७६७/- |
| ०३ | कामगार विमा ०.५०% | २८,१६०/- |
| ०४ | टेस्टींग चार्जेस | ११,४७०/- |
| ०५ | रॉयल्टी चार्जेस | ४,३९,०५६/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु :- | ७१,२४,४९३/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.२,९०,०४,७०४/- मात्रला मान्यता प्रदान करण्यात येत असून सदर रक्कमेपैकी रक्कम रु.१,७३,४१,९०४/- मात्र हिस्सा महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास योजने अंतर्गत शासनाने वितरीत केलेल्या २.८० कोटी अनुदाना अंतर्गतच्या निधीतुन पैकी ७५% म्हणजेच रक्कम रु.१,३०,०६,४२८/- व याच योजनेतील मनपा हिस्सा २५% रक्कम रु.४३,३५,४७६/- मात्र हिस्सा मनपा निधीतुन सन २०२२-२३ चे लेखाशिर्ष मुलभुत सोई सुविधांचा विकास कार्यक्रम मनपा हिस्सा या लेखाशिर्षतुन करणेस तसेच अनुक्रमांक ०१ ते ०३ कामांचे निविदा रक्कमेवर वाटाघाटी अंती जादा दरानुसार रक्कम रु.३५,६७,५२१/- मात्र मनपा लेखाशिर्ष नविन रस्ते सन २०२३-२४ मधुन करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच उर्वरीत सलंग्नीत परिशिष्टात नमुद कामाचे अनुक्रमांक ०४ व ०६ हि कामे मनपा निधीतुन प्रस्तावीत असुन त्या तिन कामांचा खर्च सदर निविदेनुसार / मक्तेदाराने वाटाघाटी करुन दिलेले दरानुसार / सर्व करांसह रक्कम रु.८०,९५,२७९/- मात्र मनपा लेखाशिर्ष नविन रस्ते सन २०२३-२४ मधुन खर्च करणेस व त्याअनुषंगाने मक्तेदार श्री.चेतनकुमार नगिनचंद चौधरी यांचे परिशिष्ट ब मधील रकाना क्रं.११ मध्ये नमुद प्रमाणेचे दर स्विकृत करणेस तसेच प्रस्तावीत मनपा निधीतुन कामांकरीता होणारा खर्च रक्कम

रु.१,५९,९८,२७६/- मात्र मनपा निधीतुन करणेस तसेच सदर दरास व त्यानुसार होणाऱ्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव, विषय क्रं.३४ :-** नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०१ मधील सर्व्हे नं.३०१ राधाकृष्ण नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे कामी मक्तेदार जितेश राजेंद्र महाजन यांचे वाटाघाटी अंति निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दरास व याकामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.९३,४१,८६१/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ३४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०८३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०१ मधील सर्व्हे नं.३०१ राधाकृष्ण नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे कामास जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडील पत्र क्रं.नपा/नादवसुयो/आर.आर./१९९/२०२३ दि.२०/०३/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त,मनपा यांचे दि.२३/०३/२०२३ च्या मान्यतेअन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.२३२ (Tender ID - २०२३ _ JCMCJ _ ८८७२४३ _१) सन २०२२-२३ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई - निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/२१४४ दि.२४/०३/२०२३ चे पत्रान्वये दै.पुण्यनगरी राज्यस्तरीय या वर्तमानपत्रात दि.२५/०३/२०२३ रोजी प्रसिध्द केल्यानुसार संगणकाव्दारे निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ई-निविदांचे संगणकावर कागदपत्रांची छाननी केली असता खाली नमुद मक्तेदार यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असुन आलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.७२,२२,६७९/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | रोहित शरद पाटील | निविदा रक्कमेवर २०.५००% जास्तीचे दराने | ८७,०३,३२८/- |
| २ | जितेश राजेंद्र महाजन | निविदा रक्कमेवर १७% जास्तीचे दराने | ८४,५०,५३४/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार जितेश राजेंद्र महाजन यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेवर १७% जास्तीचे दर सर्वात कमी आलेले आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने मक्तेदार यांना वाटाघाटीसाठी बोलविले असता मक्तेदार यांनी प्रत्यक्ष वाटाघाटीला येवुन वाटाघाटी अंती निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दरात काम करण्यास त्यांनी दि.१२/०४/२०२३ रोजी सा.बा.आ.क्रं./१३० दि.१२/०४/२०२३ अन्वये लेखी संमती दिली आहे. निविदेत नमुद दर व चालु प्रचलीत राज्य दर सुचितील दर यांच्या कनिष्ठ अभियंता यांनी तुलना केली असता सोबत तुलनात्मक तक्ता जोडलेला असुन त्यात चालु प्रचलीत दर हे ९.११% जास्तीने येत असल्याने मक्तेदार यांनी दिलेले वाटाघाटी अंति निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दर चालु प्रचलीत राज्य दर सुचिच्या रक्कमेपेक्षा २.११% ने कमी येत असल्याने मक्तेदार यांनी वाटाघाटी

अंति दिलेले दर हे वाजवी असल्याने त्यानुसार होणारी रक्कम रु.७७,२८,२६७/- मात्रची अपेक्षीत खर्च आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | वाटाघाटी अंती जास्तीने अपेक्षीत खर्च रक्कम | ७७,२८,२६७/- |
| ०२ | जि.एस.टी. १८% | १३,९१,०८८/- |
| ०३ | कामगार विमा ०.५०% | ३८,६४१/- |
| ०४ | टेस्टींग चार्जेस | १२,८५०/- |
| ०५ | रॉयल्टी चार्जेस | १,७१,०१५/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु :- | ९३,४१,८६१/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.९३,४१,८६१/- मात्रला मान्यता प्रदान करण्यात येत असून सदर रक्कमेपैकी रक्कम रु.८७,४२,७४०/- मात्र हा नागरी दलित वस्ती सुधारणा योजना अंतर्गतच्या निधीतुन व उर्वरीत रक्कम रु.५,९९,१२१/- मात्र मनपा अर्थ संकल्पातील नविन रस्ते या लेखाशिर्षातुन सन २०२३-२४ अंतर्गत करणेस व त्यानुसार मक्तेदार जितेश राजेंद्र महाजन यांचे वाटाघाटी अंती निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दर स्विकृत करणेस तसेच जादा दरानुसार व मनपा निधीतुन कामांकरीता होणारा खर्च रक्कम रु.५,९९,१२१/- मात्र मनपा निधीतुन करणेस व त्यानुसार होणाऱ्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव, विषय क्रं.३५ :-** नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०१ नामदेव नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे कामी मक्तेदार वासुदेव प्रभाकर पाटील यांचे वाटाघाटी अंति निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दरास व याकामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.४६,०८,२३९/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ३५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०८४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०१ नामदेव नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे कामास जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडील पत्र क्रं.नपा/नादवसुयो/आर.आर./१९९/२०२३ दि.२०/०३/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त,मनपा यांचे दि.२३/०३/२०२३ च्या मान्यतेअन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.२३३ (Tender ID - २०२३ _ JCMCJ _ ८८७२५७ _१) सन २०२२-२३ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई - निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/२१४४ दि.२४/०३/२०२३ चे पत्रान्वये दै.पुण्यनगरी राज्यस्तरीय या वर्तमानपत्रात दि.२५/०३/२०२३ रोजी प्रसिध्द केल्यानुसार संगणकाव्दारे निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या

ई-निविदांचे संगणकावर कागदपत्रांची छाननी केली असता खाली नमुद मक्तेदार यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असुन आलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.३६,०४,५७८/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | रोहित शरद पाटील | निविदा रक्कमेवर २२.५००% जास्तीचे दराने | ४४,१५,६०८/- |
| २ | वासुदेव प्रभाकर पाटील | निविदा रक्कमेवर १७% जास्तीचे दराने | ४२,१७,३५६/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार वासुदेव प्रभाकर पाटील यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेवर १७% जास्तीचे दर सर्वात कमी आलेले आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने मक्तेदार यांना वाटाघाटीसाठी बोलविले असता मक्तेदार यांनी प्रत्यक्ष वाटाघाटीला येवुन वाटाघाटी अंती निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दरात काम करण्यास त्यांनी दि.१२/०४/२०२३ रोजी सा.बा.आ.क्रं./१२६ दि.१२/०४/२०२३ अन्वये लेखी संमती दिली आहे. निविदेत नमुद दर व चालु प्रचलीत राज्य दर सुचितील दर यांच्या कनिष्ठ अभियंता यांनी तुलना केली असता सोबत तुलनात्मक तक्ता जोडलेला असुन निविदा रक्कमेपेक्षा चालु प्रचलीत दर हे ११.०५% जास्तीने येत असल्याने मक्तेदार यांनी दिलेले वाटाघाटी अंति निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दर चालु प्रचलीत राज्य दर सुचिच्या रक्कमेपेक्षा ४.०५% ने कमी येत असल्याने मक्तेदार यांनी वाटाघाटी अंति दिलेले दर हे वाजवी असल्याने त्यानुसार होणारी रक्कम रु.३८,५६,८९८/- मात्रची अपेक्षीत खर्च आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | वाटाघाटी अंती जास्तीने अपेक्षीत खर्च रक्कम | ३८,५६,८९८/- |
| ०२ | जि.एस.टी. १८% | ६,९४,२४२/- |
| ०३ | कामगार विमा ०.५०% | १९,२८४/- |
| ०४ | टेस्टींग चार्जेस | १०,१००/- |
| ०५ | रॉयल्टी चार्जेस | २७,७१५/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु :- | ४६,०८,२३९/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.४६,०८,२३९/- मात्रला मान्यता प्रदान करण्यात येत असून सदर रक्कमेपैकी रक्कम रु.४३,०९,२४२/- मात्र हा नागरी दलित वस्ती सुधारणा योजना अंतर्गतच्या निधीतुन व उर्वरीत रक्कम रु.२,९८,९९७/- मात्र मनपा अर्थ संकल्पातील नविन रस्ते या लेखाशिर्षातुन सन २०२३-२४ अंतर्गत करणेस व त्यानुसार मक्तेदार वासुदेव प्रभाकर पाटील यांचे वाटाघाटी अंती निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दर स्विकृत करणेस तसेच जादा दरानुसार व मनपा निधीतुन कामांकरीता होणारा खर्च रक्कम रु.२,९८,९९७/- मात्र मनपा निधीतुन करणेस व त्यानुसार होणाऱ्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

| | | |
|---|---|---|
| **अनुकूल** | **-** | **६०** |
| **सूचक** | **:-** | **लढ्ढा नितीन बालमुकुंद** |
| **अनुमोदक** | **:-** | **पाटील कुलभुषण विरभान** |

**नगरसचिव, विषय क्रं.३६ :-** नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०१ महाविर नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे कामी मक्तेदार जितेश राजेंद्र महाजन यांचे वाटाघाटी अंति निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दरास

व याकामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.७४,९८,४१५/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ३६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०८५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०१ महाविर नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे कामास जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडील पत्र क्रं.नपा/नादवसुयो/आर.आर./१९९/२०२३ दि.२०/०३/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त,मनपा यांचे दि.२३/०३/२०२३ च्या मान्यतेअन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.२३४ (Tender ID - २०२३ _ JCMCJ _ ८८७२८२ _१) सन २०२२-२३ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई - निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/२१४४ दि.२४/०३/२०२३ चे पत्रान्वये दै.पुण्यनगरी राज्यस्तरीय या वर्तमानपत्रात दि.२५/०३/२०२३ रोजी प्रसिध्द केल्यानुसार संगणकाव्दारे निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ई-निविदांचे संगणकावर कागदपत्रांची छाननी केली असता खाली नमुद मक्तेदार यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असुन आलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.५८,८५,५८५/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | रोहित शरद पाटील | निविदा रक्कमेवर २१.५००% जास्तीचे दराने | ७१,५०,९८६/- |
| २ | जितेश राजेंद्र महाजन | निविदा रक्कमेवर १७% जास्तीचे दराने | ६८,८६,१३४/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार जितेश राजेंद्र महाजन यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेवर १७% जास्तीचे दर सर्वात कमी आलेले आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने मक्तेदार यांना वाटाघाटीसाठी बोलविले असता मक्तेदार यांनी प्रत्यक्ष वाटाघाटीला येवुन वाटाघाटीअंती निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दरात काम करण्यास त्यांनी दि.१२/०४/२०२३ रोजी सा.बा.आ.क्रं./१२९ दि.१२/०४/२०२३ अन्वये लेखी संमती दिली आहे. निविदेत नमुद दर व चालु प्रचलीत राज्य दर सुचितील दर यांच्या कनिष्ठ अभियंता यांनी तुलना केली असता सोबत तुलनात्मक तक्ता जोडलेला असुन निविदा रक्कमेपेक्षा चालु प्रचलीत दर हे ११.०९% जास्तीने येत असल्याने मक्तेदार यांनी दिलेले वाटाघाटी अंति निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दर चालु प्रचलीत राज्य दर सुचिच्या रक्कमेपेक्षा ४.०९% ने कमी येत असल्याने मक्तेदार यांनी वाटाघाटी अंति दिलेले दर हे वाजवी असल्याने त्यानुसार होणारी रक्कम रु.६२,९७,५७६/- मात्रची अपेक्षीत खर्च आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | वाटाघाटी अंती जास्तीने अपेक्षीत खर्च रक्कम | ६२,९७,५७६/- |
| ०२ | जि.एस.टी. १८% | ११,३३,५६४/- |
| ०३ | कामगार विमा ०.५०% | ३१,४८८/- |
| ०४ | टेस्टींग चार्जेस | १०,१००/- |
| ०५ | रॉयल्टी चार्जेस | २५,६८७/- |

| | | |
|---|---|---|
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु :- | ७४,९८,४१५/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.७४,९८,४१५/- मात्रला मान्यता प्रदान करण्यात येत असून सदर रक्कमेपैकी रक्कम रु.७०,१०,२०६/- मात्र हा नागरी दलित वस्ती सुधारणा योजना अंतर्गतच्या निधीतुन व उर्वरीत रक्कम रु.४,८८,२०९/- मात्र मनपा अर्थ संकल्पातील नविन रस्ते या लेखाशिर्षातुन सन २०२३-२४ अंतर्गत करणेस व त्यानुसार मक्तेदार जितेश राजेंद्र महाजन यांचे वाटाघाटी अंती निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दर स्विकृत करणेस तसेच जादा दरानुसार व मनपा निधीतुन कामांकरीता होणारा खर्च रक्कम रु.४,८८,२०९/- मात्र मनपा निधीतुन करणेस व त्यानुसार होणाऱ्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव, विषय क्रं.३७ :-** नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०१ त्रिभुवन कॉलनी मधील रस्ते डांबरीकरण करणे (सर्वे नं.३२६/२) कामी मक्तेदार वासुदेव प्रभाकर पाटील यांचे वाटाघाटी अंति निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दरास व याकामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.३९,४१,४९५/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ३७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०८६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०१ त्रिभुवन कॉलनी मधील रस्ते डांबरीकरण करणे (सर्वे नं.३२६/२) कामास जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडील पत्र क्रं.नपा/नादवसुयो/आर.आर./१९९/२०२३ दि.२०/०३/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त,मनपा यांचे दि.२३/०३/२०२३ च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.२३५ (Tender ID - २०२३ _ JCMCJ _ ८८७३०२ _१) सन २०२२-२३ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई - निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/२१४४ दि.२४/०३/२०२३ चे पत्रान्वये दै.पुण्यनगरी राज्यस्तरीय या वर्तमान पत्रात दि.२५/०३/२०२३ रोजी प्रसिध्द केल्यानुसार संगणकाव्दारे निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ई-निविदांचे संगणकावर कागदपत्रांची छाननी केली असता खाली नमुद मक्तेदार यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असुन आलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.३०,१५,९११/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | रोहित शरद पाटील | निविदा रक्कमेवर २२% जास्तीचे दराने | ३६,७९,४११/- |
| २ | वासुदेव प्रभाकर पाटील | निविदा रक्कमेवर १७% जास्तीचे दराने | ३५,२८,६१६/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार वासुदेव प्रभाकर पाटील यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेवर १७% जास्तीचे दर सर्वात कमी आलेले आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने

मक्तेदार यांना वाटाघाटीसाठी बोलविले असता मक्तेदार यांनी प्रत्यक्ष वाटाघाटीला येवुन वाटाघाटी अंती निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दरात काम करण्यास त्यांनी दि.१२/०४/२०२३ रोजी सा.बा.आ.क्रं./१२५ दि.१२/०४/२०२३ अन्वये लेखी संमती दिली आहे. निविदेत नमुद दर व चालु प्रचलीत राज्य दर सुचितील दर यांच्या कनिष्ठ अभियंता यांनी तुलना केली असता सोबत तुलनात्मक तक्ता जोडलेला असुन निविदा रक्कमेपेक्षा चालु प्रचलीत दर हे ९.२८% जास्तीने येत असल्याने मक्तेदार यांनी दिलेले वाटाघाटी अंति निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दर चालु प्रचलीत राज्य दर सुचिच्या रक्कमेपेक्षा २.२८% ने कमी येत असल्याने मक्तेदार यांनी वाटाघाटी अंति दिलेले दर हे वाजवी असल्याने त्यानुसार होणारी रक्कम रु.३२,२७,०२५/- मात्रची अपेक्षीत खर्च आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | वाटाघाटी अंती जास्तीने अपेक्षीत खर्च रक्कम | ३२,२७,०२५/- |
| ०२ | जि.एस.टी. १८% | ५,८०,८६५ |
| ०३ | कामगार विमा ०.५०% | १६,१३५/- |
| ०४ | टेस्टींग चार्जेस | १०,१००/- |
| ०५ | रॉयल्टी चार्जेस | १,०७,३७०/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु :- | ३९,४१,४९५/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.३९,४१,४९५/- मात्रला मान्यता प्रदान करण्यात येत असून सदर रक्कमेपैकी रक्कम रु.३६,९१,३२४/- मात्र हा नागरी दलित वस्ती सुधारणा योजना अंतर्गतच्या निधीतुन व उर्वरीत रक्कम रु.२,५०,१७१/- मात्र मनपा अर्थ संकल्पातील नविन रस्ते या लेखाशिर्षातुन सन २०२३-२४ अंतर्गत करणेस व त्यानुसार मक्तेदार वासुदेव प्रभाकर पाटील यांचे वाटाघाटी अंती निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दर स्विकृत करणेस तसेच जादा दरानुसार व मनपा निधीतुन कामांकरीता होणारा खर्च रक्कम रु.२,५०,१७१/- मात्र मनपा निधीतुन करणेस व त्यानुसार होणाऱ्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६०**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव, विषय क्रं.३८ :-** नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०१ मधील सिध्दी विनायक पार्क व हरीओम नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे कामी मक्तेदार वासुदेव प्रभाकर पाटील यांचे वाटाघाटी अंति निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दरास व याकामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.६६,७१,४४८/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ३८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०८७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०१ मधील सिध्दी विनायकपार्क व हरीओम नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे कामास जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडील पत्र क्रं.नपा/नादवसुयो/आर.आर./१९९/२०२३ दि.२०/०३/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त,मनपा यांचे दि.२३/०३/२०२३ च्या मान्यतेअन्वये उक्त कामाची ई निविदा

सुचना क्रं.२३६ (Tender ID - २०२३ _ JCMCJ _ ८८७३२१ _१) सन २०२२-२३ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई - निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/२१४४ दि.२४/०३/२०२३ चे पत्रान्वये दै.पुण्यनगरी राज्यस्तरीय या वर्तमानपत्रात दि.२५/०३/२०२३ रोजी प्रसिध्द केल्यानुसार संगणकाव्दारे निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ई-निविदांचे संगणकावर कागदपत्रांची छाननी केली असता खाली नमुद मक्तेदार यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असुन आलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.५१,५६,८७६/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | रोहित शरद पाटील | निविदा रक्कमेवर २३% जास्तीचे दराने | ६३,४२,९५७/- |
| २ | वासुदेव प्रभाकर पाटील | निविदा रक्कमेवर १७% जास्तीचे दराने | ६०,३३,५४५/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार वासुदेव प्रभाकर पाटील यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेवर १७% जास्तीचे दर सर्वात कमी आलेले आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने मक्तेदार यांना वाटाघाटीसाठी बोलविले असता मक्तेदार यांनी प्रत्यक्ष वाटाघाटीला येवुन वाटाघाटीअंती निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दरात काम करण्यास त्यांनी दि.१२/०४/२०२३ रोजी सा.बा.आ.क्रं./१२७ दि.१२/०४/२०२३ अन्वये लेखी संमती दिली आहे. निविदेत नमुद दर व चालु प्रचलीत राज्य दर सुचितील दर यांच्या कनिष्ठ अभियंता यांनी तुलना केली असता सोबत तुलनात्मक तक्ता जोडलेला असुन निविदा रक्कमेपेक्षा चालु प्रचलीत दर हे ९.३४% जास्तीने येत असल्याने मक्तेदार यांनी दिलेले वाटाघाटी अंति निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दर चालु प्रचलीत राज्य दर सुचिच्या रक्कमेपेक्षा २.३४% ने कमी येत असल्याने मक्तेदार यांनी वाटाघाटी अंति दिलेले दर हे वाजवी असल्याने त्यानुसार होणारी रक्कम रु.५५,१७,८५७/- मात्रची अपेक्षीत खर्च आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| ०१ | वाटाघाटी अंती जास्तीने अपेक्षीत खर्च रक्कम | ५५,१७,८५७/- |
|---|---|---|
| ०२ | जि.एस.टी. १८% | ९,९३,२१४/- |
| ०३ | कामगार विमा ०.५०% | २७,५८९/- |
| ०४ | टेस्टींग चार्जेस | १०,१००/- |
| ०५ | रॉयल्टी चार्जेस | १,२२,६८८/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु :- | ६६,७१,४४८/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.६६,७१,४४८/- मात्रला मान्यता प्रदान करण्यात येत असून सदर रक्कमेपैकी रक्कम रु.६२,४३,६८७/- मात्र हा नागरी दलित वस्ती सुधारणा योजना अंतर्गतच्या निधीतुन व उर्वरीत रक्कम रु.४,२७,७६१/- मात्र मनपा अर्थ संकल्पातील नविन रस्ते या लेखाशिर्षातुन सन २०२३-२४ अंतर्गत करणेस व त्यानुसार मक्तेदार वासुदेव प्रभाकर पाटील यांचे वाटाघाटी अंती निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दर स्विकृत करणेस तसेच जादा दरानुसार व मनपा निधीतुन कामांकरीता होणारा खर्च रक्कम रु.४,२७,७६१/- मात्र मनपा निधीतुन करणेस व त्यानुसार होणाऱ्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव, विषय क्रं.३९ :-** नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०१ शिवाजीनगर मधील दत्तात्रय नगर व शिव शंकर कॉलनी मधील रस्ते डांबरीकरण करणे कामी मक्तेदार वासुदेव प्रभाकर पाटील यांचे वाटाघाटी अंति निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दरास व याकामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.६३,३५,६६३/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ३९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०८८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०१ शिवाजीनगर मधील दत्तात्रय नगर व शिवशंकर कॉलनी मधील रस्ते डांबरीकरण करणे कामास जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडील पत्र क्रं.नपा/नादवसुयो/आर.आर./१९९/२०२३ दि.२०/०३/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त,मनपा यांचे दि.२३/०३/२०२३ च्या मान्यतेअन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.२३७ (Tender ID - २०२३ _ JCMCJ _ ८८७३४१ _१) सन २०२२-२३ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई - निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/२१४४ दि.२४/०३/२०२३ चे पत्रान्वये दै.पुण्यनगरी राज्यस्तरीय या वर्तमानपत्रात दि.२५/०३/२०२३ रोजी प्रसिध्द केल्यानुसार संगणकाव्दारे निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ई-निविदांचे संगणकावर कागदपत्रांची छाननी केली असता खाली नमुद मक्तेदार यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असुन आलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.४८,८१,१३०/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | रोहित शरद पाटील | निविदा रक्कमेवर २२% जास्तीचे दराने | ५९,५४,९७८/- |
| २ | वासुदेव प्रभाकर पाटील | निविदा रक्कमेवर १७% जास्तीचे दराने | ५७,१०,९२२/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार वासुदेव प्रभाकर पाटील यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेवर १७% जास्तीचे दर सर्वात कमी आलेले आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने मक्तेदार यांना वाटाघाटीसाठी बोलविले असता मक्तेदार यांनी प्रत्यक्ष वाटाघाटीला येवुन वाटाघाटीअंती निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दरात काम करण्यास त्यांनी दि.१२/०४/२०२३ रोजी सा.बा.आ.क्रं./१२८ दि.१२/०४/२०२३ अन्वये लेखी संमती दिली आहे. निविदेत नमुद दर व चालु प्रचलीत राज्यदर सुचितील दर यांच्या कनिष्ठ अभियंता यांनी तुलना केली असता सोबत तुलनात्मक तक्ता जोडलेला असुन निविदा रक्कमेपेक्षा चालु प्रचलीत दर हे ९.१०% जास्तीने येत असल्याने मक्तेदार यांनी दिलेले वाटाघाटीअंति निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दर चालु प्रचलीत राज्य दर सुचिच्या रक्कमेपेक्षा २.१०% ने कमी येत असल्याने मक्तेदार यांनी वाटाघाटी अंति दिलेले दर हे वाजवी असल्याने त्यानुसार होणारी रक्कम

रु.५२,२२,८०९/- मात्रची अपेक्षीत खर्च आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | वाटाघाटी अंती जास्तीने अपेक्षीत खर्च रक्कम | ५२,२२,८०९/- |
| ०२ | जि.एस.टी. १८% | ९,४०,१०६/- |
| ०३ | कामगार विमा ०.५०% | २६,११४/- |
| ०४ | टेस्टींग चार्जेस | १०,१००/- |
| ०५ | रॉयल्टी चार्जेस | १,३६,५३४/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु :- | ६३,३५,६६३/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.६३,३५,६६३/- मात्रला मान्यता प्रदान करण्यात येत असून सदर रक्कमेपैकी रक्कम रु.५९,३०,७७४/- मात्र हा नागरी दलित वस्ती सुधारणा योजना अंतर्गतच्या निधीतुन व उर्वरीत रक्कम रु.४,०४,८८९/- मात्र मनपा अर्थ संकल्पातील नविन रस्ते या लेखाशिर्षातुन सन २०२३-२४ अंतर्गत करणेस व त्यानुसार मक्तेदार वासुदेव प्रभाकर पाटील यांचे वाटाघाटीअंती निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दर स्विकृत करणेस तसेच जादा दरानुसार व मनपा निधीतुन कामांकरीता होणारा खर्च रक्कम रु.४,०४,८८९/- मात्र मनपा निधीतुन करणेस व त्यानुसार होणाऱ्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६०**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव, विषय क्रं.४० :-** मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.०३ जुना आसोदा रस्त्यावर जळगांव स.नं.१००,१०१ मध्ये आरक्षीत जागा (आरक्षण क्र.४३) मधील जागेवर जॉगींग ट्रॅक तयार करणे कामी मक्तेदार श्री.बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे कामाचे निविदा रक्कमेइतकेचेच दरास व याकामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.३०,६०,२७२/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ४० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०८९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकाअंतर्गत मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.०३ जुना आसोदा रस्त्यावर जळगांव स.नं.१००,१०१ मध्ये आरक्षीत जागा (आरक्षण क्र.४३) मधील जागेवर जॉगींग ट्रॅक तयार करणे कामी मक्तेदार श्री.बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे दर कामाचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात जास्तचे आलेले आहे. सदर कामाची अंदाजीत रक्कम रु.२५,१८,६९५/- मात्र इतका खर्च येणार आहे. निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस व रॉयल्टी यांच्या रक्कमा समाविष्ठ करुन रक्कम रु.३०,६०,२७२/- मात्रचा खर्च अपेक्षीत असुन सदरचा खर्च हा सन २०२३-२४ चे लेखाशिर्ष नविन रस्ते या लेखाशिर्षाखाली करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव, विषय क्रं.४१ :-** नविन मालक श्री.मनोजकुमार रामदास टोके, रा.गणेश वाडी, जळगांव यांची मिळकत क्र.०२/०८ मालमत्ता क्र.११७५ जुना मालक सौ.दिपा राजेशकुमार मंडोरे व सौ.वैशाली मनोज मंडोरे यांचे कडून मिळकत खरेदी केलेली असून त्या इमारतीला मोठया निवासी कराची आकारणी रद्द करण्यांबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ४१ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०९० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग समिती क्र.२ अंतर्गत वसुली प्रभाग क्र.०२/०८ श्री.मनोजकुमार रामदास टोके, रा.गणेश वाडी, जळगांव यांची मिळकत क्र.०२/०८ मालमत्ता क्र.११७५ ही सौ.दिपा राजेशकुमार मंडोरे व सौ.वैशाली मनोज मंडोरे यांचे कडून मिळकत खरेदी केलेली असुन त्या इमारतीला मोठया निवासी कराची आकारणी करण्यांत आलेली आहे. वास्तविक पाहता सदर इमारतीचा वापर वाणिज्य (अरहिवास) असुन मंगलकार्यालय व दवाखाना या प्रमाणे डेटा रजिस्टरला नोंद करण्यात आलेली आहे. मात्र रहिवासी क्षेत्र १५० चौ.मी. च्या वर असल्यास अशा मिळकतींना मोठया निवासी कर लागु करता येतो. मात्र सदर इमारतीवर सन २०१०-११ पासुन नजरचुकीने वाणिज्य मिळकतीवर निवासी कर लावण्यात आलेला असल्याने सन २०१०-११ ते २०२२-२३ ची मोठया इमारतीवरील आकारण्यात आलेली कराची रक्कम रु.१,३३,२१५/- मात्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १५२ नुसार निर्लेखित करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव, विषय क्रं.४२ :-** जळगांव शहर हद्दीतील १)नेरी नाका स्मशानभुमी, २)मेहरुण स्मशानभुमी, ३)पिंप्राळा स्मशानभुमी, ४)शिवाजी नगर स्मशानभुमी येथे लाकूड व गोवऱ्या इ.पुरवठा करणे कामी परवाना देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**श्री.राजेंद्र पाटील** :- मला बोलायचे आहे महापौर महोदया, आपण सभागृहामध्ये ठराव करत असतो. आता हा मेहरूण स्मशानभुमि, पिंप्राळा स्मशानभुमि, शिवाजी नगर स्मशानभुमि येथे आपण अंत्यसंस्कारासाठी १३५०/- रूपयांमध्ये ८ मण लाकुड आणि २ पोते गौऱ्या म्हणजे जवळपास ५० गौऱ्या त्याच्यामध्ये असतील.

**श्री.नितीन लढ्ढा** :- बरोबर आहे.

**श्री.राजेंद्र पाटील** :- असा आपण ठराव करतोय. परंतू त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी तिथे होत नाही. नागरीकांकडून तिन- तिन हजार रूपये तिथे घेतले जातात. मागेही आपण अशाच पध्दतीचे ठराव केलेले आहेत. परंतू नागरीकांकडून हि रक्कम न घेता नागरीकांकडून तिन हजार रूपये घेतले जातात. नागरीकांचे आम्हाला फोन येतात. आम्ही त्यांना बोलतो तेव्हा कुठे ते काहीतरी तडजोड करतात आणि ते पैसे देतात.

**श्री.नितीन लढ्ढा** :- बरोबर आहे राजुभाऊ काय आहे की आम्हालाही फोन येतात आणि तिथली परिस्थिती जी आहे.

**श्री.राजेंद्र पाटील** :- त्यासाठी भाऊ, मी स्थायी समिती सभापती असतांना या बाबतीत सुचना पण केलेल्या होत्या प्रशासनाला की संबंधित ठेकेदाराने प्रत्येक स्मशानभुमि मध्ये आपल्या ज्या अटी-शर्ती आहेत. त्याच एक फलक तयार करायच आणि ते संबंधित स्मशानभुमिमध्ये लावयच.

**श्री.नितीन लढ्ढा** :- बरोबर आहे

**श्री.राजेंद्र पाटील** :- परंतू त्याची अंमलबजावणी होत नाही भाऊ आणि त्याच्यामुळे नागरीकांची पिळवणुक केली जाते आणि तो वेळ असा असतो की त्यावेळी त्यांना सुविधा मिळण महत्वाच असत.

**श्री.नितीन लढ्ढा** :- बरोबर आहे

**श्री.राजेंद्र पाटील** :- म्हणुन लोक देवुन टाकतात.तर नागरीकांची पिळवणुक होवू नये. आपण चांगल्या भावनेतुन करतो परंतू त्याची ईम्प्लिमेंट होत नाही. तर आपण त्याची काळजी घ्यावी. प्रशासनाने संबंधित ठेकेदाराला तिथे सुचना करून आपण ज्या अटी-शर्ती घातलेल्या आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा** :- त्याचे फलक लावण्यात यावे.

**श्री.राजेंद्र पाटील** :- फलक लावण्यात यावे.

**मा.आयुक्त** :- स्मशानभुमिमध्ये जे कंपाऊंड वॉल असेल ना तिथे पब्लिश करून द्यायचे.

**श्री.राजेंद्र पाटील** :- आणि त्या फलकावर खाली नंबर देण्यात यावा की जर नागरीकांची काही तक्रार असेल तर त्याने महापालिका प्रशासनाला त्याची माहिती देण्यात यावी.

(सभागृहामध्ये अनेक सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**ॲड.शुचिता हाडा** :- या विषयाच्या अनुषंगाने महापौरताई, आयुक्त महोदया एक विषय असा लक्षात आणुन द्यायचा आहे की आपल्या नेरी नाका स्मशानभुमि येथे गॅस दाहिनी सुध्दा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे केशव स्मृती प्रतिष्ठानच्या माध्यमातुन तर तिथे अडचणी अशा येता आहेत की हे जे पुरवठादार आहे गौऱ्या आणि लाकुड यांची माणस ज्यावेळी अंत्यविधीकरीता नागरीक येतात. त्यावेळी नागरीक म्हणतात की आम्हाला गॅस दाहिनी मध्ये करायचे आहे. आयुक्त महोदया मी आपल लक्ष येथे वेधू ईच्छिते की याच्यावर प्रशासनाचा काहीतरी वचक असला पाहीजे. गॅस दाहिनी हि बंद आहे तिथे करता येणार नाही अशीच माहिती लोकांना त्या लोकांकडून पुरवली जाते आणि काहीवेळेला जबरदस्ती केली जाते की यात करू नका यात जी प्रोसिजर आहे गौऱ्या वगैरेवर हि पध्दत आहे तर ईथेच करा. म्हणजे जे नागरीक अत्याधुनिक सोईचा लाभ घेवु ईच्छिता त्यांना सुध्दा त्यापासुन जाणीवपुर्वक वंचित ठेवल जात. तर त्यांची ईच्छा तिथे करायची आहे. त्यांना तिथेच करू दिल पाहीजे आणि त्याकामी प्रशासनाचा या पुरवठादारावर वचक हा असला पाहीजे.

(सभागृहामध्ये अनेक सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- आयुक्त मॅडम आता मी पाहिले की दोन गोडाऊन गौऱ्याचे भरलेले आहे. त्याचा गौऱ्यांचा धंदा आहे तो व्यवसाय करतो आपण ते जावुन पाहू शकतात. ताई जे बोलत आहेत ते बरोबर बोलत आहेत.

**ॲड.शुचिता हाडा** :- काय आहे की आपल्याला ते करायच असत आणि परिस्थिती अशी असते की ज्याच्या घरातील माणुस गेलेला आहे तो तिथे वाद घालण्याच्या परिस्थितीत नसतो आणि त्याला सांगीतले जाते की गॅस दाहिनी बंद आहे खराब झालेली आहे त्यात बऱ्याच अडचणी आहे. तुम्हाला हेच कराव लागेल. हेच कंम्पलसरी आहे त्यामुळे मग तो त्या अत्याधुनिक सोईपासुन तो वंचित राहतो आहे. तर प्रशासकीय वचकच तिथे गरजेच आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- काय असत त्याठिकाणी लोकांना कळत नाही त्यामुळे त्याला काय खर्च येईल दोन-चार बोर्डाचा महापालिकेने स्वत:च्या खर्चाने बोर्ड टाकुन द्यावा तिथे की याच्या व्यतिरीक्त जे सामान आहे याचा महापालिकेचा काही संबध राहणार नाही. गौऱ्या आणि लाकुड इतक्या रूपयात दिले पाहीजे महापालिकेने या दरामध्ये त्याला पैसे दिले पाहीजे असा नंबर टाकावा की कुणाची तक्रार असल्यास या ठिकाणी संपर्क साधावा.

**मा.आयुक्त** :- हा जो विषय आहे त्यासाठी आपण एक कर्मचारी नियुक्त करू आणि पब्लिश करू.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- सगळ्या सुचना टाकुन घ्या त्याच्यामध्ये की आपण ज्या अटी-शर्ती दिल्या आहेत त्या अटी-शर्ती तिथे आल्या पाहीजे.

**मा.उपमहापौर** :- याबाबतीत सर्व स्मशामभुमिंमध्ये फलक लावण्यासाठी तयार करण्यात यावे आणि त्यात सर्व नियम व अटी-शर्ती यांचा समावेश करण्यात यावा आणि नंतर त्याला कार्यादेश देण्यात यावे.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- भाऊ मागचा जो ठेकेदार होता त्याला गौऱ्या ठेवण्यासाठी पण शेवटपर्यंत जागा दिली नाही शेड ठोकण्यासाठी जागा दिली नाही. मी तुम्हाला आज सांगतो मी त्याला पुढच्या महासभेत उभा करतो मी

**श्री.नितीन लढ्ढा** :- विषय क्रं.४२ मंजुर करण्यात यावा.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ४२ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०९१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरातील स्मशानभुमी (१.नेरी नाका स्मशानभुमी, २.मेहरुण स्मशानभुमी, ३.पिंप्राळा स्मशानभुमी, ४.शिवाजी नगर स्मशानभुमी) येथे मृत देहांवर अंत्यसंस्कार करणेसाठी मृतांचे नातेवाईकांना कमी खर्चामध्ये अंत्यसंस्कार करता यावे याकरिता लागणारे ८ मण लाकुड (वड,पिंपळ सोडून) व २ पोते (अंदाजे ५० नग) गोवऱ्या पुरवठा करणाऱ्या मक्तेदारास विक्री परवाना देणे कामी महासभा ठराव क्र.४७० दि.१२/०५/२०२१ नुसार मान्यता प्रदान करण्यात आलेली होती. त्यानुसार आयुक्त यांचे दि.१४/०२/२०२३ रोजीच्या मान्यतेने दैनिक लोकमत या वृत्तपत्रात जाहिर प्रसिध्द सूचना जा.क्र.८९४ दि.२८/०२/२०२३ नूसार दि.२८/०२/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेले होते. त्यानुसार दि.१०/०३/२०२३ रोजी दुपारी ५.०० वाजेपर्यंत सिलबंद पाकिटातून दर मागणी केले असता ३ दरपत्रकधारकाचे कोटेशन मुदतीत प्राप्त झालेली असून सहा.आयुक्त (आरोग्य) यांचे समक्ष दि.१४/०३/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता दरपत्रकधारक यांचे समक्ष उघडण्यात आलेले होते.

तसेच आलेले सर्वात कमीचे दर मे.मुजाहिद मजिद जहागिरदार,जळगांव यांचे ८ मण लाकुड (वड,पिंपळ सोडून) व २ पोते (अंदाजे ५० नग) गोवऱ्या प्रती मृत देह दर रु.१४००/- नमुद केलेले असुन सदरचे दर म.न.पा.स जास्त वाटत असल्याने सदर दराच्या विश्लेषण करिता मक्तेदार यांना इकडील जा.क्र./९१९ दि.१४/०३/२०२३ रोजी पत्र देण्यात आलेले असून दि.१४/०३/२०२३ रोजी उपस्थित राहून सहा.आयुक्त यांचे समक्ष रक्कम रु.१४००/- दराऐवजी रु.१३५०/- दरात काम करणेस लेखी पत्र देवून सहमती दर्शवलेली आहे.

तसेच मे.मुजाहिद मजिद जहागिरदार,जळगांव यांना ४ स्मशानभुमी येथे प्रती मृतदेहावर ८ मण लाकुड (वड,पिंपळ सोडून) व २ पोते (अंदाजे ५० नग) गोवऱ्या पुरवठा करणेसाठी व विक्री करणेस निविदा मधील खालील नियम अटीस अधिन राहून परवाना देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**अ) सर्व साधारण अटी व शर्ती**

१. सर्वात कमी दरात लाकूड व गोवऱ्या पुरवठा करणाऱ्या मक्तेदारास मनपाकडून विक्री परवाना देण्यात येईल.
२. मनपा मार्फत सदर मक्तेदाराला सर्व स्माशानभुमींमध्ये १५X३० स्क्वे.फुट मोफत जागा देण्यात येईल. तसेच तेथे शेड उभारण्याची परवानगी देण्यात येईल.
३. कमीत कमी दरात लाकूड व गोवऱ्या विक्री करणाऱ्या पुरवठादाराची नेमणुक नागरिकांची सोय म्हणुन करण्यात येत आहे. सदर पुरवठादाराकडुनच सदरचे साहित्य करण्याची नागरीकांना सक्ती असणार नाही. नागरिक आपल्या सोयीप्रमाणे इतर ठिकाणांहूनही साहित्य उपलब्ध करुन घेवू शकतील.
४. सदर परवाना १ वर्ष कालावधीसाठी मर्यादित राहील.
५. १ वर्षानंतर मक्तेदारास मनपाने दिलेली जागा खाली करुन मनपाच्या ताब्यात देणे बंधनकारक राहील.
६. मक्तेदारास सदर जागेवर कोणत्याही प्रकारे मालकी / भाडेपट्टा हक्क सांगता येणार नाही.
७. म.न.पा.ने मान्य केलेल्या दराप्रमाणे साहित्य पुरवठा करणे बंधनकारक असेल.
८. साहित्य पुरवठाचे देयक संबंधीत मृत व्यक्तींचे नातेवाईक यांचेकडून अदा करण्यात येईल. त्याची जबाबदारी महापालिकेची असणार नाही.
९. परवान्यातील अटी शर्तीचे पालन न केल्यास व आपल्याला दिलेल्या कामाबद्दल तक्रारी प्राप्त झाल्यास सदरचा परवाना रद्द करण्याचे अधिकार आयुक्त यांचेकडे राहिल.

मे.मुजाहिद मजिद जहागिरदार,जळगांव यांना मनपा मार्फत सदर मक्तेदाराला नेरी नाका, मेहरुण, पिंप्राळा, शिवाजी नगर या स्मशानभुमींमध्ये १५x३० स्क्वे. फुट मोफत जागा देणे व रु.१३५०/- प्रती

मृतदेहावर ८ मण लाकुड (वड, पिंपळ सोडून) व २ पोते (अंदाजे ५० नग) गोवऱ्या पुरवठा करणेसाठी व विक्री परवाना देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने मक्तेदारास उक्त चारही स्मशानभुमींमध्ये दर्शनीय ठिकाणी नागरीकांना सहज दिसेल अशा ठिकाणी उपरोक्तप्रमाणे लाकुड व गोवऱ्यांसाठी लागणारे दर रक्कम रु.१३५०/- घेणे संदर्भात फलक लावणेस तसेच सदरचे फलकावर फोन नंबर टाकणेस बंधनकारक करावे.

**सर्वानुमते मंजुर**

| | | |
|---|---|---|
| **अनुकूल** | **-** | **६०** |
| **सूचक** | **:-** | **लढ्ढा नितीन बालमुकुंद** |
| **अनुमोदक** | **:-** | **पाटील कुलभुषण विरभान** |

**नगरसचिव, विषय क्रं.४३ :-** बांधकाम विकास परवानगीसाठी ऑनलाईन बिल्डींग प्लॅन मॅनेजमेंट सिस्टीम करीता १ (एक) तांत्रिक मनुष्यबळा करीता येणाऱ्या एकूण रक्कम रु.६,९०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ४३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०९२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, राज्यातील ड वर्ग महानगरपालिकांसाठी बांधकाम परवानगी देणे करीता संगणकीय आज्ञावलीची अंमलबजावणी सुरु करणे बाबतचे क्र.टी.पी.एस.-१८१७/१८२/मु.स./नवि-१३ चे दि.२८/०३/२०१८ रोजीचे प्राप्त पत्राच्या अनुषंगाने संगणकीय आज्ञावलीची प्रक्रिया सुरु करणे बाबत शासनाने आदेशीत केलेले आहे. तसेच शासनाच्या महा.आय.टी. विभागाकडून महा.आय.टी./ पी.आर.जे/ ०१/००३-२०१६ दि.०५/०५/२०१८ च्या पत्रानुसार सर्व संबंधीत महापालिकांनी दि.०१/०८/२०१८ किंवा त्यापुर्वी ऑनलाईन बिल्डींग प्लॅन मॅनेजमेंट सिस्टीम कार्यान्वीत करण्याचे आदेश दिलेले होते.

त्यानुसार ऑनलाईन बिल्डींग प्लॅन मॅनेजमेंट सिस्टीम राबविणेसाठी दि.०३/०४/२०१८ च्या शासन निर्णया नुसार ०२ तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणेसाठी प्रधान सचिव माहिती तंत्रज्ञान विभागाकडे दि.०५/०९/२०१८ रोजी मागणी करण्यात आलेली होती.

त्यानुसार दोन तांत्रिक मन्युषबळ महा आय.टी.ने उपलब्ध करुन दिलेले होते.

शासनाचे पत्र क्र.टीपीएस-१८१५/५२७/प्र.क्र./१३९/१५/नवि-१३, दि.२१/०१/२०२२ अन्वये सर्व विकास परवानगी प्रस्ताव महा आय.टी.ने विकसीत केलेल्या बी.पी.एम.एस संगणक प्रणालीव्दारे ऑनलाईन स्विकारुन अशा प्रस्तावांना मंजुरी देण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. उक्त संगणकीय प्रणालीव्दारे परवानगी देणे कामी मनुष्यबळा संदर्भात खालील प्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

१) उपरोक्त सर्व प्राधिकरणांनी महाआयटीकडे संपर्क साधुन Unified DCPR प्रमाणे महाआयटीने तयार केलेल्या संगणक प्रणालीनुसार (BPMS) ऑनलाईन विकास परवानगी देण्याबाबत कार्यवाही करावी.

२) उपरोक्त संचालक,नगररचना व त्यांचे अधिपत्याखालील कार्यालये वगळता सर्व प्राधिकरणांना (महानगरपालिका,विशेष नियोजन प्राधिकरणे,क्षेत्र विकास प्राधिकरणे इ.) या प्रणालीच्या तांत्रिक मदतीकरीता प्रत्येकी एक या प्रमाणात मनुष्यबळ उपलब्ध राहिल. या प्रमाणे महाआयटीकडून नियुक्त करण्यात आलेल्या/येणाऱ्या मनुष्यबळास आवश्यक ते सहाय्य करण्यात यावे. अशा मनुष्यबळाचा खर्च त्यांचे निधीतुन,महाआयटी कळवेल त्यानुसार संबंधित प्राधिकरणांनी महाआयटीकडे जमा करावा.

३) महाआयटीकडून नियुक्त करण्यात आलेल्या/येणाऱ्या मनुष्यबळाव्यतिरीक्त अतिरीक्त मनुष्यबळ आवश्यक असल्यास त्याबाबतचा निर्णय संबंधीत प्राधिकरणांनी त्यांचे स्तरावर घेऊन अशा अतिरीक्त मनुष्यबळाचा खर्च संबंधीत प्राधिकरणांनी त्यांचे निधीतुन महाआयटीकडे जमा करावा.

४) प्रादेशिक योजना क्षेत्राकरीता जिल्हाधिकारी अथवा त्यांनी नामनिर्देशीत केलेल्या अधिकाऱ्याच्या कार्यालयाच्या स्तरावर या प्रणालीचा तांत्रिक मदतीकरीता मनुष्यबळ आवश्यक असल्यास त्याप्रमाणे त्यांचे स्तरावर निर्णय घेऊन महाआयटीकडे कळवावे. व त्यानुसार महाआयटीकडून नियुक्त करण्यात येणाऱ्या मनुष्यबळास आवश्यक ते सहाय्य करण्यात यावे. अशा मनुष्यबळाचा खर्च संबंधित कार्यालयांनी त्यांचे निधीतून, महाआयटी कळवेल त्यानुसार महाआयटीकडे जमा करावा.

५) संचालक,नगररचना यांचे अधिपत्याखालील नगररचना विभागाच्या शाखा कार्यालयांच्या स्तरावर या प्रणालीच्या तांत्रिक मदतीकरीता प्रत्येकी एक या प्रमाणात मनुष्यबळ उपलब्ध राहिल याप्रमाणे महाआयटीकडून नियुक्त करण्यात आलेल्या/येणाऱ्या मनुष्यबळास आवश्यक ते सहाय्य करण्यात यावे. अशा मनुष्यबळाचा खर्च नगरविकास विभागाच्या संगणकीकरणाच्या निधीतून,महाआयटी कळवेल त्यानुसार महाआयटीकडे जमा करावा.

विषयांकीत प्रकरणी महाआयटी यांनी एका मनुष्यबळा करीता Proforma invoice नुसार दि.०१/०४/२०२३ ते दि.३१/०३/२०२४ पर्यंतचा एकुण खर्च रक्कम रु.६,८८,७१४/- इतका अपेक्षित आहे.

त्या अनुषंगाने दि.०१/०४/२०२३ ते दि.३१/०३/२०२४ पर्यंत पुढील १२ महिन्या करीता १ (एक) तांत्रिक कर्मचारी यांना मुदतवाढ व १२ महिन्याचे वेतना पोटी येणाऱ्या एकूण रक्कम रु.६,९०,०००/- मात्र (अक्षरी रुपये सहा लक्ष नव्वद हजार मात्र) च्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६०**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव, विषय क्रं.४४ :-** महानगरपालिका विविध विभागात कार्यरत वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) १२००० लिटर खरेदी करणे कामी येणाऱ्या रक्कम रु.११,२९,३२०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- विषय क्रं. ४४ आणि ४५ सारखाच आहे .

(सभागृहामध्ये अनेक सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.विशाल त्रिपाठी** :- ४९ पर्यंत काहीच विषय नाहीये.

(सभागृहामध्ये अनेक सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.दिलीप पोकळे** :- प्रभाग समितीचा विषय आहे की आपल्या एवढ्या समिती आहेत ४ जे सभापती आहेत त्यांना वाहन व्यवस्था पुरवण्यात यावी आणि ४ गाड्या आहेत तरी डिझेल कुठे जाते. दर महासभेला १२ हजार लिटर डिझ ेलचा प्रस्ताव मान्य करण्यात येत असतो.

**श्री.नितीन लढ्ढा** :- पोकळे साहेब सभागृहातील सदस्यांची संख्या वाढुन जाईल पुढच्या टर्मला

**श्री.दिलीप पोकळे** :- भाऊ बरोबर आहे आणि एरियाही मोठे आहेत आपण जेवढ्या सोई देवु तेवढे जास्त काम करतील ते अधिकाऱ्यांना दिले आहेत त्यात काही अडचण नाहीये पण सार्वजनिक रित्या विचार करावा अशी माझी विनंती आहे.

**श्री.अनंत जोशी** :- महापौर साहेबा , लोकसहभातुन दोन बगिच्यांचे काम सुरू आहेत माझ्या प्रभागामध्ये मी गेल्या वेळेसही म्हणालो होतो. ते विस-विस लाख रूपये खर्च करून आपल्याला बगिचे करून देत आहेत. आपल्याकडुन

फक्त पाणी पुरवायचे आहे . विज कनेक्शन पुरवायच आहे ते सुध्दा आपल्याकडुन होत नाहीये. करारनाम्याबाबतीत मी स्वत: तुमच्याशी बोललो आहे आणि मला करारनामा मिळत नाहीये. स्टँम्प आणलेले आहे फक्त टाईप करून सही करून द्यायचे आहे. ते मला मिळत नाही. मला मॅडम कस आहे या गोष्टी मी वैयक्तिक सोनगिरे साहेबांशी बोलू शकतो. आपल्याशीपण बोलू शकतो. सभागृहात हा विषय मांडण्याची गरज नाहीये मला पण जर नाही होत आहे तर निदर्शनास आणुन दिल पाहीजे. सोनगिरे साहेब समोर बसले आहेत विचारा त्यांना की या विषयी मी त्यांना किती फोन केलेले आहे मी हे मलाही योग्य वाटत नाहीये हा विषय ईथे बोलण्यासारखा नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा** :- सोनगिरे साहेब सोमवार पर्यंत त्यांचा करारनामा करून द्या.

**श्री.अनंत जोशी** :- ते लोक विस-विस लाख रूपये खर्च करत आहेत ते काही वेडे नाहीयेत. ते सगळ करत आहेत आपण फक्त त्यांना मिटर द्यायचे आहे आणि नळ कनेक्शन द्यायचे आहे. ते एस.एस.पाटील साहेब मागे बसलेले आहेत विचारा मिटरसाठी किती दिवस झाले मी भेटुन, नेमाडे साहेब पण आहेत विचारा किती दिवस झाले बोरींगसाठी फिरतोय मी आपण बोरींगही देवु शकत नाही त्यांना, त्यांचे काम सुरू आहेत ते समोरून पाणी घेताहेत शेजारून पाणी घेताहेत. शेजाऱ्यांकडून विज कनेक्शन घेताहेत. म्हणजे विचार करा तुम्ही की ते लोक काय विचार करत असतील.

**मा.आयुक्त** :- आपण पाठपुरावा करत आहात तो काही विषय नाहीये.

**श्री.अनंत जोशी** :- मी फोन करून थकलो, तिन चार वेळेस पत्रव्यवहार केलेला आहे मी दोन्ही ठिकाणी

**श्री.मनोज चौधरी** :- महापौर महोदया, जळगांव शहरात सगळयाच ठिकाणी ओपन स्पेस आहेत.

**श्री.अनंत जोशी** :- भाऊ त्यांना उत्तर तर देवु द्या.

**श्री.मनोज चौधरी** :- भाऊ मी त्याच विषयावर बोलतोय ओपनस्पेसच्या

(सभागृहामध्ये अनेक सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.अनंत जोशी** :- सोनगिरेसाहेब करारनामा कधी होईल.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- सोमवारी करून देतो.

**श्री.नितीन बरडे**:- सोनगिरेसाहेब

**श्री.अनंत जोशी** :- एस.एस.पाटील साहेब मला लाईट कनेक्शन कधीपर्यंत येईल आणि तुमच्या घराशेजारचाच एक बगिचा आहे मला माहिती आहे.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- करारनाम्याला काही अडचण नाहीये फक्त आयुक्त मॅडमांची सही घेवुन सोमवारी तुम्हाला देवु शकतो. राहीला दुसरा जो बोरींगचा आणि विज कनेक्शनचा विषय जो तुम्ही म्हणत आहेत तर बोरींगचा विषय असा आहे की पाणी पुरवठा विभागाकडुन येवुन बांधकाम विभागाकडे पाठवुन त्याचा अहवाल मागवला जाईल. त्याची खरोखर आवश्यकता आहे का त्या ठिकाणी

**श्री.अनंत जोशी** :- तिथे आवश्यकता का नाहीये.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- नाही, नाही काय आहे की काही ठिकाणी अनावश्यक बोरींगा यापुर्वी झालेल्या आहेत आणि त्यांचा उपयोग होत नाही.

**श्री.अनंत जोशी** :- त्यांच काही नाही आता जे काम सुरू आहे तिथे आवश्यकता नाहीये का?

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता** :- तिथे आवश्यकता आहे.

**श्री.अनंत जोशी** :- साहेब मी जेव्हा जेव्हा फोन केले आहे नेमाडे साहेबांना विचारले होते तर ते म्हणाले की पाठवलेले आहे. आर.टी.पाटील साहेबांना विचारले तर ते म्हणता की बघुन सांगतो आणि तुम्ही म्हणता की आले नाही योग्य नाहीये साहेब काय आहे की तिथे आपण पाणी देत नाही लाईट देत नाही मला लाज वाटणार नाही का? की मी त्यांच्याकडुन विस-विस लाख रूपये खर्च करून घेतोय आणि आपण विज ,पाणी देत नाहीये. एस.एस.पाटील साहेब मॅडमांसमोर शब्द द्या. तुमच्या घरासमोर चा बगिचा आहे म्हणजे सकाळी उठल्याबरोबर तुम्हाला आणि मॅडमांना एकंदर सुंदर बगिचा दिसेल. साहेबांच्या घराला लागुन बगिचा आहे. इतके वर्ष झाले होत नव्हता.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख** :- नंदनवन कॉलनीतील बगिचा जो आहे आपण त्याचा प्रस्ताव महावितरणला दिलेला आहे. तर त्यांना एक अशी अडचण आलेली आहे की

**श्री.अनंत जोशी** :- साहेब ती अडचण मी सांगतो, आयुक्त मॅडम एस.एस.पाटील साहेब नंदनवन कॉलनीतील जो बगिचा आहे त्याची अडचण मी सांगतो. त्याठिकाणी पतपेढी होती ती जागा आपण ताब्यात घेतली तर त्यांनी त्यावेळेला मिटर घेतलेल होत. त्यांच साडेसोळाशे रूपये बिल बाकी आहे. ते लोक मुद्दाम भरत नाहीये पतपेढीवाले की यांच काय

करायचे आमचा अधिकार आहे आणि आम्ही कोर्ट कचेऱ्या खेळु म्हणुन, साढेसोळाशे रूपये आहेत. ती बेंडाळे साहेब यांचेकडे इंजिनियर आहेत बेंडाळे त्यांना मी साडेसोळाशे रूपये मी म्हंटलो की मी देतो तुम्ही कॅश भरा तिथे आणि ते मिटर बंद करा आणि नविन मिटर घ्या. मोठा विषय आहे का मॅडम फार काही नाही.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख**:- विषय पैसे भरायचा हा एक विषय झाला पण ते मिटर त्या पतपेढीच्या नावावर आहे ते त्यांच्या रेकॉर्डला अधिकृतपणे बंद करावे लागणार आहे.

**श्री.अनंत जोशी**:- मला हे बेंडाळे साहेबांनीही सांगीतले की साडेसोळाशे रूपये मी देतो तुम्ही भरून द्या कॅश मी द्यायला तयार होतो.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख**:- हो पण साडेसोळाशे रूपये भरल्यानंतर ते अधिकृतपणे बिल करतील त्याच्यानंतर त्यांच्या नावावर जे कनेक्शन आहे ते अधिकृत पणे बंद करतील त्याच्यानंतर ते आपल्याला नविन मिटर देतील.

**श्री.अनंत जोशी**:- कधी

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख**:- या दहा पंधरा दिवसात भेटुन जाईल.

**श्री.अनंत जोशी**:- आणि वल्लभ नगरचा विषय काय आहे.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख**:- आता आपणच सांगीतल्याप्रमाणे तो संबंधित डेव्हलप करून देत आहेत तर आता मला त्याच्यामधील नगररचना विभागातील मला काही माहिती नाहीये. म्हणजे जे आपण डेव्हलपमेंट करून देत असता तरी त्या जागा ज्या असता त्या ओपनस्पेसची जागा आहे ती तेथील रहिवाश्यांना दिलेली आहे ती त्यांनी ताब्यात घेतलेली आहे आपल्याकडुन त्याच्यामुळे तिथला विषय जो आहे तर त्याठिकाणी विज कनेक्शन त्यांना घ्याव लागेल आणि त्याचे जे लाईटस वगैरे जे असतील ते त्यांच्यावर जोडावे लागेल आपण त्यांना जागा ताब्यात दिल्यानंतर तिथले विज बिल त्यांना भरावे लागेल.

**श्री.अनंत जोशी**:- मग हे तुम्ही आधी क्लियर करायला पाहीजे होते ना.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख**:- नाही मी आता त्याच्याकरता काय बोललो की मी माहिती घेतली आणि मग

**श्री.अनंत जोशी**:- तुम्ही हा विषय आधी क्लियर केला असता तर मी त्या बगिच्या वाल्यांशी बोललो असतो.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख**:- नाही भाऊ मी माहिती घेतली पुर्वी जे तिथ मिटर घेतले होते ज्यांच्या ताब्यात जागा होती त्यांनी आणि नंतर काय झाल की काही काळानंतर ते कनेक्शन बंद झाल होत आणि आता ज्यांनी जागा ताब्यात घेतली त्यांनी आता जे काही डेव्हलपमेंट आहे पुर्वीची त्याठिकाणी तर तिथे विज पुरवठा नाहीये. उलट मी त्यांना निरोप पाठवला की तुम्ही येथील विज पुरवठा चालु ठेवा.

**श्री.अनंत जोशी**:- ठिक आहे विज पुरवठ्याचा काय विषय आहे काय नाही ते तुम्ही लवकरात लवकर मार्गी लागावा म्हणुन काय ते करा आणि लाईटची व्यवस्था होत असेल तर ती करून द्या. २ लावायचे सहा लावायचे १० लावायचे ते तुम्ही करा. जे डोक्यात असेल तर ते आता तुम्ही खालुन घेणार आहेत. त्याठिकाणी गार्डनच काम करायच आहे, लाईटचही काम करायचे आहे आणि त्याठिकाणी काय काय कस कस राहणार आहे तर मी पुढच काम सुरू होणार आहे. त्यांच ऑलरेडी काम सुरू आहे. त्यांनी मंदिर बांधुन घेतलेल आहे. गार्डनच काम बाकी आहे आता तुम्हाला मिटरच काम मी एक-दोन दिवसात क्लियर करतो. तम्ही मला लाईटच काम क्लियर करून द्या.

**श्री.नितीन लढ्ढा**:- बंटीभाऊ मार्ग असाही काढता येईल की

**श्री.मनोज चौधरी**:- नितीनभाऊ

**श्री.नवनाथ दारकुंडे**:- आमच्या वॉर्डात सहा महिने होवुन गेले सांगुन अजुन चालु झाले नाही लाईट

(सभागृहामध्ये अनेक सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा**:- एक मिनिंट यांच होवुन जावु द्या. म्हणजे ती जागा आपण संस्थेला दिलेली असल्याकारणाने आपण त्याच्यावर खर्च करू शकत नाही अस म्हणण आहे ना.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख**:- नाही भाऊ आपण जी संस्था आहे ती संस्थेने दोन प्रकारे घेतलेली आहे. तेथील जे रहिवासी आहेत ती ओपनस्पेस त्यांच्याकडून ताब्यात घेवुन आपण दिलेली असली तरी तिथल्या रहिवाश्यांनी ती संस्थेच्या ताब्यात दिली.

**श्री.नितीन लढ्ढा**:- मी काय म्हणतो की या विषयावर चर्चा करतोय की जळगांव शहर महानगरपालिकेने ती जागा ताब्यात घेतली आणि आपण ताब्यात घेतल्यानंतर आपण दुसऱ्याला ताब्यात दिली आहे.

**श्री.अनंत जोशी**:- नाही ना भाऊ ती जागा बऱ्याच वर्षांपुर्वी तिथल्या रहिवाश्यांना दिलेली होती. ललीतभाऊ महापौर होते ना तेव्हा मी ती जागा ताब्यात घेतलेली आहे आणि मी त्यांना आता ताब्यात दिलेली आहे कारण आपला जो दहा बारा वर्षांचा जो करार होता त्यामुळे महापालिकेत अधिकृतपणे त्याची काही नोंद नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा**:- ठिक आहे काही हरकत नाही.

**श्री.अनंत जोशी**:- जागा मी ताब्यात दिलेली आहे. नेमाडेसाहेब बोरींगच सांगा मॅडमांना

**श्री.संजय नेमाडे, उपअभियंता,पा.पु.विभाग**:- अहवाल आल्यानंतर करून देतो.

**श्री.अनंत जोशी**:- अहवाल आल्यानंतर अहवाल कधी येणार साहेब आर.टी.पाटील साहेबांना सांगा ना, सहा महिन्यांपुर्वी तुम्ही आर.टी.पाटील साहेबांना सांगीतले होते. तुम्ही मला आठ दहा दिवसापुर्वी असे सांगितले होते. तुम्हाला लेटरहेड वर पत्र दिलेले होते की, दोन गोष्टी पेन्डींग आहे. त्यासाठी दोन दिवसात कामासाठी पाठवा. हे पत्र देऊन तुम्हाला १५ दिवस झालेले आहे. त्यांनी जर सहा महिने अहवाल दिले नाही तर तुम्ही मला काम करुन देणार नाही का?

**श्री.संजय नेमाडे, उपअभियंता,पा.पु.विभाग**:- मी बोललो त्यांना की रिपोर्ट पाठवा मी तात्काळ करून देतो.

**श्री.अनंत जोशी**:- कठीण काम आहे.

**श्री.मनोज चौधरी**:- महापौरताई

**श्री.नितीन बरडे**:- पाटील साहेबांच्या घराजवळचा बगिचा आहे तो

**श्री.मनोज चौधरी**:- ज्या ओपनस्पेस असतील आणि काही हनुमान मंदिर आहेत तर त्यांना आपल्याला ताब्यात देता येतील का पावत्या फाडून

**श्री.नितीन लढ्ढा**:- नाही ना भाऊ देता येणार नाही.

**श्री.मनोज चौधरी**:- भाऊ एक मिनिंट आता आपल्या प्रत्येक प्रभागामध्ये बरेच ओपनस्पेस असता तिथे काही मंदिर असतात आणि जे काही ठिकाणी बगिचे असतील ते डेव्हलप झाले असतील ते वगळुन ज्याठिकाणी काही पाण्याची सोय नाहीये तर आपल्याला तिथे कनेक्शन देता येतील का मॅडम

**श्री.नितीन लढ्ढा**:- संस्थेला देता येतील.

**श्री.मनोज चौधरी**:- संस्था असेल तर संस्थेला देता येतील का.

**श्री.नितीन लढ्ढा**:- संस्थेला देता येतील.

**श्री.मनोज चौधरी**:- ठिक आहे आणि पाटील साहेब जवळपास एक ते दिड महिन्यापासुन स्ट्रिट लाईट चालु झाले आहे नॅशनल हायवे वरचे आता सहा ते सात दिवसांपासुन लाईट बंद झाले आहे दोघही ब्रिजवरील काय कारण आहे.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख**:- भाऊ मला माहिती नाही माहिती घेवुन सांगतो.

**श्री.मनोज चौधरी**:- माहिती नाहीये का तुम्हाला, माझ्याकडे व्हिडीओ आहे दाखवतो.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख**:- भाऊ मी सात दिवस सुटीवर होतो मी

**श्री.मनोज चौधरी**:- तुम्ही जर अस बोलले तर चालणार नाही ना हो

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख**:- नाही ना भाऊ आता मला माहित नाहीये.

**श्री.मनोज चौधरी**:- आता सात दिवसांपासुन ते लाईट बंद आहेत. नितीनभाऊ दोघी ब्रिजवरील लाईट बंद आहेत. फक्त ब्रिजवरचे रोडावरील चालु आहे. फक्त ब्रिजवरचे बंद आहेत.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख**:- बघुन घेतो मी

**श्री.मनोज चौधरी**:- ब्रिजवरचे दोघी ब्रिजवरचे लाईट बंद आहेत आणि रोडावरचे चालु आहे आता चालु व्हायला दिड दोन महिने झाले आहे लोक शिव्या घालत आहेत आमच्या घराकडचे नगरसेवकांना आम्ही काय सांगणार त्यांना की प्रशासन अगदी सुस्त झालेले आहे.

**श्री.अनंत जोशी**:- मॅडम सोनगिरे साहेबांनी, एस.एस.पाटील साहेबांनी आणि नेमाडे साहेबांनी या तिघांनी आम्हाला सभागृहात शब्द दिलेला आहे तर हे तिघेही विषय मार्गी लावावे हि विनंती आहे आपल्याला आणि परत परत छोटे-छोटे विषय आणायला पटत नाही आणि मला आवडत पण नाही. हे जे विषय आहेत हे सभागृहात मांडणे काही योग्य नाही पण या वैयक्तिक तक्रारी आहेत म्हणुन आज मांडले आहे मी, काय म्हणत आहेत सोनगिरे साहेब

**श्री.दिलीप पोकळे** :- माझ्या प्रभागात के.सी. पार्कचा भाग आहे.

**मा.आयुक्त**:- सोनगिरेसाहेब यांचा काय विषय आहे. आठ दिवसात फायनल करावा.

**श्री.दिलीप पोकळे** :- के.सी. पार्कचा भाग आहे मेन रोडावर लाईट नाहीत आणि तो रोड आहे आणि अजुन पाच सहा रोड आहेत. तिथे फक्त ६० एलईडीचे बल्ब लागले आहे मॅडम , शंभर लाईट लागत आहेत. सांगा ना तुम्ही एस.एस.पाटील साहेब

**मा.महापौर** :- पोकळे साहेब सगळे विषय मंजुर करून घ्यायचे आणि मग नंतर चर्चा करू.

**श्री.नितीन लढ्ढा**:- हो विषय मंजुर करून घ्या आणि मग चर्चा करू.

**मा.महापौर** :- मग चर्चा सुरू राहील.

**मा.उपमहापौर** :- सर्व विषय मंजुर करून घेवु पोकळेसाहेब

**श्री.दिलीप पोकळे** :- भाऊ दोन मिनिंट ते फक्त के.सी.पार्कच

**श्री.नितीन लढ्ढा**:- पोकळे साहेब आपण लागल तर त्याच्यावर अर्धातास चर्चा करू.

**मा.महापौर** :- पोकळेसाहेब हा विषय या विषयांशी संबंधित नाही. आपण विषयपत्रिकेवरील विषय घेऊ या.

**श्री.दिलीप पोकळे** :- एलईडी चा विषयावर चर्चा करू.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ४४ ते ४८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- महापौर महोदया , एक मिनिंट नाले एक्सेव्हेटरच्या संदर्भात गेल्या तिन वर्षापासुन सांगतोय. लासुरे साहेब सांगता मला की अजुन बजेट नाहीये, बजेट नाहीये तिन वर्ष झाले बजेटचेच नांव सांगता आहे हे काम कधी होणार आता पावसाळा आहे तोंडावर काय झाल साहेब तुम्ही सांगा काय झाल ते तुमच्या समोरचा विषय आहे त्या दिवसाचा

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता**:- भाऊ आपण त्याचा प्रस्ताव आता सुधारीत तयार करून मॅडमांची सही झालेली आहे त्याच्यावर आता आपण त्याला महासभेपुढे आणुन ठराव करून ते टेंडर काढु.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- लवकरात लवकर करा. पावसाळ्यात ते लागतील आता

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता**:- हो

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०९३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा वाहनांसाठी डिझेल पुरवठा (साठा) करणे बाबत पंप ऑपरेटर यांनी मागणी दिलेली असून दि.०८/०३/२०२३ रोजीचे अखेर डिझेल साठा शिल्लक २८६० लिटर असुन सदर साठा ०३ ते ०४ दिवसांसाठी पुरेल इतका शिल्लक आहे.

जळगांव शहर महानगरपालिकेकडील कार्यरत असलेली विविध वाहनांसाठी मा.महासभा ठराव क्र.७४३ दि.१४/०२/२०२२ अन्वये इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड यांचेमार्फत (ठोक/बल्क) स्वरुपात डिझेल खरेदी केली जाते. दि.०९/०३/२०२३ रोजी डिझेल (ठोक/बल्क) खरेदी आणि किरकोळ डिझेल खरेदी यांच्या दराचा (रेट) तफावत दर्शविणारा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड (ठोक/बल्क) डिझेल खरेदी दर | सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव (किरकोळ) डिझेल खरेदी दर |
|---|---|---|
| १ | प्रती लिटर दर रु.९७.७५९४६/- | प्रती लिटर दर रु.९४.११/- |
| २ | १२००० लिटरसाठी खर्च रक्कम रु.११,७३,११३.६२/- | १२००० लिटरसाठी खर्च रक्कम रु.११,२९,३२०/- |
| ३ | १२००० लिटर प्रमाणे तफावत रक्कम रु.४३,७९३.६२/- | १२००० लिटर प्रमाणे तफावत रक्कम निरंक |

नमुद तक्ता पाहता इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.लि.पानेवाडी डेपो मनमाड यांचेमार्फत (ठोक/बल्क) डिझेल खरेदी एकत्रीत करतांना रक्कम रु.४३,७९३.६२/- मात्र अधिक खर्च १२००० लिटर डिझेल खरेदी करतांना होणार आहे. वाढीव खर्च टाळण्यासाठी एस.टी. महामंडळाने त्यांची वाहने खाजगी अधिकृत विक्रेत्या पंपावरुन डिझेल खरेदी करणे सुरु केलेले आहे. महानगरपालिकेला देखील आपल्या वाहनांसाठी डिझेलच्या वाढीव भावाला टाळण्याच्या दृष्टीने व आर्थिक बचत करण्याच्या दृष्टीने स्थानिक खाजगी मात्र अधिकृत विक्रेत्यांकडून डिझेल खरेदी करता येईल. त्यामुळे १२००० लिटरच्या मागे सध्याच्या प्रचलीत दरानुसार रक्कम रु.४३,७९३.६२/- मात्र महानगरपालिकेची आर्थिक बचत होईल. तसेच वेळोवेळी डिझेलचे किरकोळ दर चढ-उतार (परिवर्तन) होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्यावेळी डिझेल (ठोक/बल्क) खरेदीचे दर किरकोळ दरापेक्षा न्युनतम होतील त्यावेळी पुन्हा इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड यांचे मार्फत (ठोक/बल्क) डिझेल खरेदी करता येईल.

महानगरपालिकेने यापुर्वी स्थायी समिती ठराव क्रं.११२२ दि.०८/०२/२०१३, स्थायी समिती ठराव क्रं.११८२ दि.२६/०४/२०१३, स्थायी समिती ठराव क्रं.९१ दि.१९/०७/२०१४ अन्वये पारीत ठरावाच्या अनुषंगाने इंडीयन ऑईल कॉर्पोरेशनचे अधिकृत विक्रेते सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडून महानगरपालिकेस आवश्यक असलेले इंधन (डिझेल) स्थायी समितीच्या पारीत ठरावानुसार निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी केलेली आहे.

किरकोळ डिझेल खरेदी दर (बाजारभाव) व बल्क दर यामध्ये जोपर्यंत तफावत राहील तोपर्यंत बाजारभावातुन किरकोळ इंधन खरेदी करणे महानगरपालिकेस फायदेशीर राहील.

| प्राप्त झालेल्या इंधन (डिझेल) दराचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | कामाचे नांव | Quantity | मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन, (आय.ओ.सी.डिलर) जळगांव |
| १ | महानगरपालिका कार्यरत विविध वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) खरेदी करणे बाबत. | १२००० लि. | प्रति लिटर दर रु.९४.११/- |
| | | | ११,२९,३२०/- |
| | | एकूण रक्कम रुपये - | ११,२९,३२०/- |

महासभा ठराव क्रं.८८६ दि.०८/०८/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल, महासभा ठराव क्र.८८७ दि.०८/०८/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल मा.महासभा ठराव क्रं.९२७ दि.०७/१०/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल, मा.महासभा ठराव क्रं.९४१ दि.२१/१०/२०२२, मा.महासभा ठराव क्रं.९७७ दि.२३/१२/२०२२ मा.महासभा ठराव क्र.१००१ दि.१५/०२/२०२३ अन्वये १२००० लिटर्स डिझेल मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून किरकोळ दरात डिझेल खरेदी करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशानुसार त्यांनी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील वाहन चालक व विभागप्रमुखांच्या मागणीनुसार दि.१६/०२/२०२३ ते आजपावेतो किरकोळ स्वरुपात इंधन (डिझेल) चा पुरवठा केलेला आहे. त्यानुसार मनपा वाहनांसाठी डिझेल पुरवठा करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव हा पंप एम.आय.डी.सी.रोडवर असल्याने सदर पंपावरुन डिझेल घेणे सोयीचे होईल.

तरी इंधन (डिझेल) खरेदी करणे कामी जाहिर निविदा मागविली असता मुदतीत ०३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल खालील प्रमाणे-

| अ.क्र. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|
| १ | मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव |
| २ | मे.अमल ऑटो जळगांव |
| ३ | मे.अब्दुल पेट्रोलियम सर्वो,चिंचोली,जळगांव |

वर नमुद तीन्ही निविदाधारकांचे लिफाफा क्रं.१ (दस्ताऐवज) उघडण्यात आले असुन ०३ निविदाकारांपैकी अनुक्रमांक १,२ यांनी पुर्ण दस्ताऐवज सादर केलेले असल्यामुळे अ.क्र.१ व २ हे निविदाधारक पात्र आहे. परंतु अनुक्रमांक ३ निविदाधारकाचे दस्ताऐवज अपुर्ण असल्यामुळे अ.क्र.३ हे निविदाधारक अपात्र आहेत. त्यामुळे सबब इंधन (डिझेल) खरेदी कामी निविदा प्रक्रीया अंतिम होईपावेतो तात्पुरत्या स्वरुपात व तातडीने आवश्यक असलेले इंधन (डिझेल) किरकोळ स्वरुपात खरेदी करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस नं.२०२२-२३/१९ दि.०९/०३/२०२३ अन्वये १२००० लिटर डिझेल खरेदी कामी रक्कम रु.११,२९,३२०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास तसेच इंडियन ऑईल कॉर्पोरेशनचे अधिकृत विक्रेते मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव, विषय क्रं.४५ :-** महानगरपालिका विविध विभागात कार्यरत वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) १२००० लिटर खरेदी करणे कामी येणाऱ्या रक्कम रु.११,२९,३२०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ४५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०९४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा वाहनांसाठी डिझेल पुरवठा (साठा) करणे बाबत पंप ऑपरेटर यांनी मागणी दिलेली असून दि.०५/०४/२०२३ रोजीचे अखेर डिझेल साठा शिल्लक १५८५ लिटर असुन सदर साठा ०२ ते ०३ दिवसांसाठी पुरेल इतका शिल्लक आहे.

जळगांव शहर महानगरपालिकेकडील कार्यरत असलेली विविध वाहनांसाठी मा.महासभा ठराव क्र.७४३ दि.१४/०२/२०२२ अन्वये इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड यांचेमार्फत (ठोक/बल्क) स्वरुपात डिझेल खरेदी केली जाते. दि.०५/०४/२०२३ रोजी डिझेल (ठोक/बल्क) खरेदी आणि किरकोळ डिझेल खरेदी यांच्या दराचा (रेट) तफावत दर्शविणारा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड (ठोक/बल्क) डिझेल खरेदी दर | सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव (किरकोळ) डिझेल खरेदी दर |
|---|---|---|
| १ | प्रती लिटर दर रु.९४.२४७१४/- | प्रती लिटर दर रु.९४.११/- |
| २ | १२००० लिटरसाठी खर्च रक्कम रु.११,३०,९६५.६९/- | १२००० लिटरसाठी खर्च रक्कम रु.११,२९,३२०/- |
| ३ | १२००० लिटर प्रमाणे तफावत रक्कम रु.१,६४५.६९/- | १२००० लिटर प्रमाणे तफावत रक्कम निरंक |

नमुद तक्ता पाहता इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.लि.पानेवाडी डेपो मनमाड यांचेमार्फत (ठोक/बल्क) डिझेल खरेदी एकत्रीत करतांना रक्कम रु.१६४५.६९/- मात्र अधिक खर्च १२००० लिटर डिझेल खरेदी करतांना होणार आहे. महानगरपालिकेला देखील आपल्या वाहनांसाठी डिझेलच्या वाढीव भावाला टाळण्याच्या दृष्टीने व आर्थिक बचत करण्याच्या दृष्टीने स्थानिक खाजगी मात्र अधिकृत विक्रेत्यांकडून डिझेल खरेदी करता येईल. त्यामुळे १२००० लिटरच्या मागे सध्याच्या प्रचलीत दरानुसार रक्कम रु.१६४५.६९/-/- मात्र महानगरपालिकेची आर्थिक बचत होईल. तसेच वेळोवेळी डिझेलचे किरकोळ दर चढ-उतार (परिवर्तन) होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्यावेळी डिझेल (ठोक/बल्क) खरेदीचे दर किरकोळ दरापेक्षा न्युनतम होतील त्यावेळी पुन्हा इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड यांचे मार्फत (ठोक/बल्क) डिझेल खरेदी करता येईल.

महानगरपालिकेने यापुर्वी स्थायी समिती ठराव क्रं.११२२ दि.०८/०२/२०१३, स्थायी समिती ठराव क्रं.११८२ दि.२६/०४/२०१३, स्थायी समिती ठराव क्रं.९१ दि.१९/०७/२०१४ अन्वये पारीत ठरावाच्या अनुषंगाने इंडीयन ऑईल कॉर्पोरेशनचे अधिकृत विक्रेते सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडून महानगरपालिकेस आवश्यक असलेले इंधन (डिझेल) स्थायी समितीच्या पारीत ठरावानुसार निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी केलेली आहे.

किरकोळ डिझेल खरेदी दर (बाजारभाव) व बल्क दर यामध्ये जोपर्यंत तफावत राहील तोपर्यंत बाजारभावातुन किरकोळ इंधन खरेदी करणे महानगरपालिकेस फायदेशीर राहील.

| प्राप्त झालेल्या इंधन (डिझेल) दराचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | कामाचे नांव | Quantity | मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन, (आय.ओ.सी.डिलर) जळगांव |
| १ | महानगरपालिका कार्यरत विविध वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) खरेदी करणे बाबत. | १२००० लि. | प्रति लिटर दर रु.९४.११/- |
| | | | ११,२९,३२०/- |
| एकूण रक्कम रुपये - | | | ११,२९,३२०/- |

महासभा ठराव क्रं.८८६ दि.०८/०८/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल, महासभा ठराव क्र.८८७ दि.०८/०८/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल मा.महासभा ठराव क्रं.९२७ दि.०७/१०/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल, मा.महासभा ठराव क्रं.९४१ दि.२१/१०/२०२२, मा.महासभा ठराव क्रं.९७७ दि.२३/१२/२०२२, महासभा ठराव क्र.१००१ दि.१५/०२/२०२३, महासभा ठराव क्र.१०४४ दि.२१/०३/२०२३ अन्वये १२००० लिटर्स डिझेल मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून किरकोळ दरात डिझेल खरेदी करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशानुसार त्यांनी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील वाहन चालक व विभागप्रमुखांच्या मागणी नुसार दि.१६/०२/२०२३ ते आजपावेतो किरकोळ स्वरुपात इंधन (डिझेल) चा पुरवठा केलेला आहे. त्यानुसार मनपा वाहनांसाठी डिझेल पुरवठा करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव हा पंप एम.आय.डी.सी.रोडवर असल्याने सदर पंपावरुन डिझेल घेणे सोयीचे होईल.

तरी इंधन (डिझेल) खरेदी करणे कामी जाहिर निविदा मागविली असता मुदतीत ०३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल खालील प्रमाणे-

| अ.क्र. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|
| १ | मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव |
| २ | मे.अमल ऑटो जळगांव |
| ३ | मे.अब्दुल पेट्रोलियम सर्वो,चिंचोली,जळगांव |

वर नमुद तीन्ही निविदाधारकांचे लिफाफा क्रं.१ (दस्ताऐवज) उघडण्यात आले असुन ०३ निविदाकारांपैकी अनुक्रमांक १,२ यांनी पुर्ण दस्ताऐवज सादर केलेले असल्यामुळे अ.क्र.१ व २ हे निविदाधारक पात्र आहे. परंतु अनुक्रमांक ३ निविदाधारकाचे दस्ताऐवज अपुर्ण असल्यामुळे अ.क्र.३ हे निविदाधारक अपात्र आहेत. त्यामुळे सबब इंधन (डिझेल) खरेदी कामी निविदा प्रक्रीया अंतिम होईपावेतो तात्पुरत्या स्वरुपात व तातडीने आवश्यक असलेले इंधन (डिझेल) किरकोळ स्वरुपात खरेदी करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस नं.२०२२-२३/२० दि.०५/०४/२०२३ अन्वये १२००० लिटर डिझेल खरेदी कामी रक्कम रु.११,२९,३२०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास तसेच इंडियन ऑईल कॉर्पोरेशनचे अधिकृत विक्रेते मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

| | | |
|---|---|---|
| **अनुकूल** | **-** | **६०** |
| **सूचक** | **:-** | **लढ्ढा नितीन बालमुकुंद** |
| **अनुमोदक** | **:-** | **पाटील कुलभुषण विरभान** |

**नगरसचिव, विषय क्रं.४६ :-** मनपा दवाखाने विभागाकडील वाहन क्रं.एम.एच.१९ सी.वाय.६९९४ (रुग्णवाहीका) या वाहनाची दुरुस्ती करणे कामी येणाऱ्या रक्कम रु.३१,०८१/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ४६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १०९५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मा.आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन-२०२०-२१ या योजनेअंतर्गत श्री.सुरेश दामु भोळे (राजुमामा), विधानसभा मतदारसंघ जळगांव शहर या मतदार संघाकरिता उपलब्ध होणाऱ्या निधीतुन सदर रुग्णवाहीका खरेदी बाबत आवश्यक त्या सर्व मान्यता घेवून GeM पोर्टलव्दारे Bid No-GeM/२०२१/B/९५१३४३ Date-०२/०१/२०२१ नुसार महानगरपालिका दवाखाने विभागाकरिता TATA Magic Express AMB ६+P Type B -०१ नग खरेदी करण्यात आली आहे.

सदर रुग्णवाहीका दवाखाने विभागात दि.२७/०७/२०२१ पासुन कार्यरत आहे. वाहन चालक यांची मागणी क्रं.३००१, दि.१२/०८/२०२२ व दवाखाने विभागाचा अहवाल वाहन विभागास प्राप्त झालेनुसार वाहन विभाग प्रमुख यांनी दिलेल्या निर्देशानुसार सदर वाहनाची दि.२२/०८/२०२२ रोजी प्राथमिक तांत्रिक तपासणीअंती वाहन ओव्हर हीट झाल्याने पिकअप करत नाही असा अहवाल देण्यात आला होता. सदर अहवालास सहा.आयुक्त (वाहन) यांच्या दि.०५/०९/२०२२ रोजीच्या मान्यतेने जा.क्र./ज.श.म.न.पा./वा.व्य.वि./७२/२०२२-२३ दि.०५/०९/२०२२ रोजीचे पत्र मे.उज्वल ऑटोमोटीव्ह प्रा.लि.जळगांव यांना देण्यात आले होते. त्यानुसार मे.उज्वल ओटोमोटीव्ह प्रा.लि.जळगांव यांनी दि.०५/०९/२०२२ रोजी महानगरपालिका वाहन विभागास वाहन क्रं.एम.एच.१९ एम ६९९४ ही गाडी पुअर पिकअपच्या कामासाठी आली असता गाडी चेक करत असतांना हिटर प्लग तुटल्याचे निर्देशनास आले. त्यामुळे वाहनाचे इंजिन हेड, ब्लॉक असेंम्बली उघडून पाहणी केली असता इंजिन बोअर व पिस्टन टॉपला क्रॅचेस आल्याचे निर्देशनास आले आहे. वाहन वॉरंटी कालावधीमध्ये असल्याने टाटा मोटर्स कंपनी व मे.उज्वल ओटोमोटीव्ह प्रा.लि.जळगांव यांचेकडेस वारंवार पाठपुरावा केल्यानंतर कंपनी डिलर यांचेकडून काही स्पेअर पार्टससाठी किमान रक्कम रु.३१,०८१/- मात्रचा खर्च हा महानगरपालिकेला करावा लागेल. त्याअनुषंगाने मे.उज्वल ओटोमोटीव्ह प्रा.लि.जळगांव यांच्याकडील इस्टिमेट दि.२३/०८/२०२२ अन्वये खर्च रक्कम रु.३१,०८१/- मात्र अपेक्षित असुन सदरचे दर बाजारभावाशी सुसंगत आहे.

सदर वाहनाच्या दुरुस्ती कामी रक्कम रु.१,०८,०९४/- मात्रच्या खर्चामधून उत्पादीत कंपनी टाटा मोटर्स व डिलर मे.उज्वल ओटोमोटीव्ह प्रा.लि.जळगांव यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करुन वाहनातील वॉरंटी कालावधी मधील स्पेअर पार्टस उपलब्ध करुन घेण्यात आलेले आहे. वारंटी स्पेअर व्यतिरिक्त उर्वरित साहित्यपोटी (ऑईल, ऑईल फिल्टर, सील, गॅसकीट, एअर फिल्टर इ.बाबींसाठी) रक्कम रु.३१,०८१/- चे इस्टिमेट मे.उज्वल ओटोमोटीव्ह प्रा.लि.जळगांव यांनी दिलेले असून त्याअनुषंगाने मनपा वाहन क्रं.एम.एच.१९ सी.वाय.६९९४ (रुग्णवाहीका) वाहन मे.उज्वल ओटोमोटीव्ह प्रा.लि.जळगांव यांचेकडून दुरुस्ती करणेकामी येणाऱ्या रक्कम रु.३१,०८१/- मात्रचे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२) नुसार निविदा न मागविता करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने यापूढे सर्व वाहने मुदतीत सर्व्हिसींग होतील याबाबत दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६०**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव, विषय क्रं.४७ :-** महानगरपालिका आरोग्य विभागाकडील मशिन अनुक्रमे १) एम एच १९ सी.व्ही.२०२८, २) एम एच १९ सी.व्ही.२०२९ (Backhole Loader) करीता लहान बकेट-०२ नग खरेदी करणे कामी येणाऱ्या रक्कम रु.६४,१२६/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ४७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०९६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, आरोग्य विभागामार्फत मान्सुन पुर्व जळगांव शहरातील उपनाले साफ-सफाई करावयाची असल्याने व आरोग्य विभागाकडील नाला एस्केव्हेटर हे बराच कालावधी पासून नादुरुस्त अवस्थेत बंद पडलेले आहेत. तरी उपनाले साफ-सफाई कामी आरोग्य विभागाकडील कार्यरत १)एम एच १९ सी.व्ही.२०२८, २) एम एच १९ सी.व्ही.२०२९ (Backhole Loader) जे.सी.बी. साठी लहान बकेटची आवश्यकता असल्याचे व प्रस्तावित काम हे कालमर्यादीत असल्याने त्वरित ०२ बकेट खरेदी करणेबाबत नमूद केले आहे.

त्या अनुषंगाने आरोग्य विभागाकडील कार्यरत Backhole Loader हे Action Construction Equipment (ACE) हया कंपनीचे असून कंपनीचे अधिकृत डिलर KPS Infrastructure Nashik यांचेकडून येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. भ्रमणध्वनीव्दारे डिलर यांचेशी झालेल्या चर्चेनुसार सदर बकेट खरेदी करणे कामी अंदाजित खर्च प्रति नग रक्कम रु.३२,०६३/- असा असून ०२ बकेट खरेदी कामी एकूण रक्कम रु.६४,१२६/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे. सदर बकेट खरेदी ही (कालमर्यादीत) तात्काळ करावयाची असल्याने सदर खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२) नुसार निविदा न मागविता अधिकृत विक्रेते मे. KPS Infrastructure Nashik यांना रक्कम रु.६४,१२६/- मात्रचा कार्यादेश देण्यास कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६०**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव, विषय क्रं.४८ :-** मनपा अग्निशमन विभागाकडील वाहन क्रं.एम.एच.१९ सी.वाय.५८६० (फायर फायटर) या वाहनाची दुरुस्ती करणे कामी येणाऱ्या रक्कम रु.६६,२६४/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ४८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०९७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका अग्निशमन विभागाकडील वाहन क्रं.एम.एच.१९ सी.वाय.५८६० (फायर फायटर) हे वाहन अग्निशमन विभागात अत्यावश्यक सेवेत कार्यरत आहे. सदर वाहनाचे दुरुस्तीचे कामे नविन स्पेअर पार्टसह व मजुरीसह करणे कामी वाहन चालक यांची मागणी क्रं.१५६०१ दि.२८/०२/२०२३ नूसार वाहनाचे दुरुस्तीचे कामे नविन स्पेअर पार्टसह मजुरीसह करणे आवश्यक

व गरजेचे असल्याने वाहन चालक यांनी दिलेल्या मागणी व टिप्पणी रिपोर्ट प्रमाणे दुरुस्तीची कामे नविन पार्टस् / मजुरीसह करणे कामी अधिकृत विक्रेते मे.उज्वल ऑटोमोटीव्ह प्रा.लि.जळगांव यांच्याकडील इस्टिमेट दि.०२/०३/२०२३ अन्वये खर्च रक्कम रु.६६,२६४/- मात्र अपेक्षित असुन सदरचे दर बाजारभावाशी सुसंगत असल्याने सदर खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२) नुसार निविदा न मागविता अधिकृत विक्रेते मे.उज्वल ऑटोमोटीव्ह प्रा.लि.जळगांव यांना कार्यादेश देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

| | | |
|---|---|---|
| **अनुकूल** | **-** | **६०** |
| **सूचक** | **:-** | **लढ्ढा नितीन बालमुकुंद** |
| **अनुमोदक** | **:-** | **पाटील कुलभुषण विरभान** |

**नगरसचिव, विषय क्रं.४९ :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.**

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- विषय क्रं. ४९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१०९८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१. प्रशासकीय आदेश क्र./१४३ दि.३१/०३/२०२३ अन्वये पाणी पुरवठा विभागा अंतर्गत डिएसपी चौक महाबळ रोड बुस्टर पंपींग स्टेशन येथे ७५ एचपी विदयुत मोटार व सि.एफ कपल पंपसेट पुरविणे व बसविणे कामी मक्तेदार मे.श्री.भैरव इंलेक्ट्रोमेक, जळगांव यांचे वाटाघाटी अंती अंदाजित रक्कमेवर ३% जास्त सर्वात कमीचे दर स्विकृत करुन रक्कम रु.१०,९९,७९३/- मात्र खर्चाची संविदा.

**सर्वानुमते मंजुर**

| | | |
|---|---|---|
| **अनुकूल** | **-** | **६०** |
| **सूचक** | **:-** | **लढ्ढा नितीन बालमुकुंद** |
| **अनुमोदक** | **:-** | **पाटील कुलभुषण विरभान** |

**श्री.दिलीप पोकळे** :- एलईडी चा विषयावर खुलासा पाहीजे.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख** :- सन्मा.सभागृह एलईडीच्या संदर्भात भाऊंनी जो विषय केलेला आहे. आपण एलईडीच्या संदर्भात एक ऐसो प्रोजेक्ट राबवला आहे. तर ऐसो प्रोजेक्टला आपण ज्यावेळेला सुरूवात केली होती त्यावेळेला त्यामध्ये आपला जो पुर्ण एरिया होता त्याच्यामध्ये जी त्यावेळेची सद्यस्थिती होती ती त्या सद्यस्थिती नुसार आपण त्यांना साढेपंधरा हजार एलईडी लाईट बसवण्याची वर्कऑर्डर आपण त्यांना दिली होती. त्यानंतर ऐसो प्रोजेक्ट झाला तो सुरू झाल्यानंतर आपण त्याच्यामध्ये बदल करून सतरा हजार सातशे साधारण लाईट लावलेले आहेत. त्याच्यानंतर आपला जसा जसा एरिया वाढत गेला.

**श्री.दिलीप पोकळे** :- हे उत्तर किती वर्ष झाले ऐकत आहेत. आता

(सभागृहामध्ये अनेक सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख** :- एक मिनिंट मला बोलु तर द्या. साढे सतरा हजार लाईट लावल्यानंतर पुन्हा जळगांव शहराचा जो वाढीव एरिया आहे. वाढीव एरिया आणि जळगांव शहरामध्ये जे काही पुर्वी काही पोल लागलेले होते ज्याच्यावर टि-५ लाईट लागलेले होते आणि काही पोल शिल्लक होता अशा पोलवर आपण लाईट बसविलेले होते. असे साढेसहा हजार लाईटांचा प्रस्ताव आपण त्यांना ESSL दिला होता की तुम्ही साढेसहा हजार लाईट जे आहेत ते या ऐसो प्रोजेक्टमध्येच तुम्ही आम्हाला बसवुन द्या आणि त्या ऐसो प्रोजेक्टमध्ये मेंन्टेंनंस सात वर्ष

होत. आपण त्यांना याचा वेळोवेळी पाठपुरावा केला. आपण डिएमए ऑफीसलाही केला, ऐसो च्या मेन ऑफीसलाही केला, ESSL च्या वरिष्ठ कार्यालयात केला. परंतू त्यांनी आपल्याला त्यांनी त्याचा चांगला प्रतिसाद दिलेला नाही. म्हणुन आपण चालु आर्थिक वर्षाच जे बजेट आहे. शेवटी त्यांनी ते न दिल्यामुळे आपण एलईडी वाढीव परिसरात बसवायचे आहे तर चालु आर्थिक बजेटमध्ये आपण २ कोटींची तरतूद केलेली आहे आणि ती २ कोटींची तरतूद सभागृहाने मंजुर केलेली आहे आणि त्या एलईडी दराचे जे आहे आपण आता वार्षिक दराची निविदा काढु आता आपल बजेट आल की जी तरतूद झालेली आहे ती तरतूदीनुसार आपण वार्षिक रेट मंजुर केल्यानंतर आपण एलईडी बसवायचे काम करण्यात येईल.

**श्री.दिलीप पोकळे** :- मला एक सांगा ज्या कंपनीला आपण काम दिलेल होत ती महापालिकेच काम करत आहे का

**श्री.नितीन लढ्ढा** :- आहे ना आहे.

**श्री.दिलीप पोकळे** :- ज्या कंपनीला आपण काम दिलेल होत ज्यांनी एलईडी लावायचे आहे. त्यानी मेनटेनन्स करायचे आहे. तो करारनामा संपुष्टात आला आहे का ?

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख**:- संपुष्टात नाही आलेला आहे.

**श्री.दिलीप पोकळे** :- मग महानगरपालिकेचा प्रश्न कसा आला. करारनामा संपुष्टात आला आहे का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** पाटील साहेब त्यांचा मुळ प्रश्न काय हे समजुन घ्या.

**श्री.दिलीप पोकळे** :- आमची अडचण अशी आहे भाऊ की, आमचे काही जुने भाग आहे, काही वाढीव भाग आहे. अजुन ५० वर्षापुर्वीचे पोल आहे तेथे एल.ई.डी.नाही. तुम्ही जुन्या भागात जा, तुम्ही के.सी.पार्क रोडला जा. त्याचे काय झाले आहे निकाल लाऊन टाका,

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख**:- मी तेच सांगत आहे, आपण पुर्ण ६५०० लाईट मटेरियल पुरविले होते. आपण ज्यांना दिले होते त्यांनी त्याला प्रतिसाद दिला नाही.

**श्री.दिलीप पोकळे :-** मग तुम्ही त्यावेळेस पुर्ण पाहणी नाही केली होती का ?

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख**:- आपण पुर्ण पाहणी केली होती. त्याच्यानंतर आपण विविध योजनेमध्ये, २५ कोटी मध्ये, शहराच्या विविध एरियांमध्ये आपण ते कामे वळवले, त्यामुळे पोल संख्या वाढली.

**श्री.दिलीप पोकळे :-** माझा प्रश्न असा आहे, १५००० आपण दिले मग १७००० लावले कसे.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख**:- १५५०० जी होती ती आपण दिली होती. त्याच्यानंतर आपण जळगांव शहराचे पुर्ण सर्वेक्षण केले, सर्वेक्षणमध्ये त्यावेळेला जे सापडले, तेथे आपण लाईट बसविले,

**श्री.दिलीप पोकळे :-** तुम्ही सर्वे केला ना, मला त्या सर्वे केल्याची कॉपी द्या. त्या सर्वे मध्ये जर जुने पोल सापडले तर तुमच्यावर कार्यवाही करण्यात येईल. जुने पोल जर सापडले तर तुम्ही त्यावर लाईट लावलेले नाही. तर तुमच्यावर कार्यवाही होईल. महापौर महोदया, आयुक्त मॅडम, हे जे सांगत आहे की, आम्ही सर्वे केलेला आहे. या सर्वे मध्ये जर जुने पोल सापडले, आणि तेथे एल.ई.डी.लावलेले नाही असे लक्षात आले तर यांच्यावर कार्यवाही करावी.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** ८ महिन्या पहिले यांनी सभागृहाला सांगितले होते की, त्यांना आम्ही पत्र पाठविलेले आहे. त्याची पुर्तता झालेली आहे. यांनीच सांगितले होते पुर्ण सभागृहाला. आणि मग कसे काय लावले त्यानी.

**श्री.दिलीप पोकळे :-** लोकं अंधारात मरत आहे लाईट नाही तेथे. मॅडम माझ्या मते विद्युत व्यवस्था ही अत्यावश्यक सेवेमध्ये आहे. आणि अत्यावश्यक सेवा जर आपण असे कारणांमुळे देऊ शकत नसाल. तर मग संबंधीत लोकांवर कार्यवाही करायला पाहिजे. गोडाऊन भरलेले आहे एल.ई.डी.ने. पुर्ण गोडाऊन भरलेले आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हे बघा जर सर्वेक्षण झाले असेल तर आमच्याकडेही सर्वेक्षण झाले असेल, मग प्रॉयर्टी बदलल्या गेल्या. आम्हाला वंचित ठेवले गेले आणि दुसरीकडे लावले गेले. हा त्याचा मुख्यता आरोप आहे.

**मा.आयुक्त :-** लाईटच्या बाबतीमध्ये ई.एस.एल.ला पत्र दिले होते. माझी दुसरी की, तिसरीच सभा होती. आपण म्हटले होते की, आपण दिलेल्या पत्राचे फॉलोअप घ्या मॅडम. मी विचारले तरी पण ते मंजुर करत नव्हते. आपण एम.सी. मधुन सॅन्कशन केले. ते टेन्डर मागविलेले आहे. एम.सी.तुन करु आपण ते. त्यांनी जर जास्त दर मागितले.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी काय बोललो, आता जी आहे ना ती अत्यंत योग्य आहे. यांची मागणी सुध्दा तशी बघितली तर वाईट आहे.

**मा.आयुक्त :-** आमचे पोल सुटले.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सर्वेक्षण झाल्यावर सुध्दा आमची प्रायर्टी डावळली गेली. आणि जो काही नविन भाग झाला असेल तेथे लावले गेले.

**श्री.दिलीप पोकळे :-** फक्त मला दोन माहिती हवी आहे. एक केलेल्या सर्वेची कॉपी पाहिजे. जो करारनामा संपुष्टात आलेला आहे. त्याच्याकडे महानगरपालिकेचे कुठेलेही थकबाकी नाही याची माहिती पाहिजे. सर्वेची कॉपी द्या ई.एस.एल.सोबत संपलेल्या करारनाम्याची कॉपी द्या. जो काही तुमचा करारनामा झाला असेल, त्याची कॉपी द्या.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख**:- पहिली गोष्ट आपला करारनामा संपलेला नाही. सात वर्ष त्यांचेकडे मेनटेनन्स आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** करारनामा अस्तीत्वात आहे. काय झालेले आहे. या पत्राप्रमाणे हे वाढत गेलेले आहे. आणि वाढीव प्रभागाच्या संदर्भात ज्या वेळेला आपण म्हणतो की, पुर्वीच्या दरामध्ये हे काम कर. तर त्याचे म्हणणे आहे की, मी मेनटेनन्सचा करारनामा पुर्वी ७ वर्षाचा केलेला होता.परंतु ते ७ वर्षाचा करारनामा मला आता राबविणे नविन टेन्डर मध्ये शक्य नाही. मी लाईटचा पुढचा ७ वर्षाचा जरी कालावधी असेल,परंतु या वाढीवला मी ५ वर्षाचाच मेनटेनन्स देईल. त्याच्यावर वाद चाललेला आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मग आज विषय काढला तर सांगितले, इतके दिवसापासुन काय करत होते हे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता याच्यातुन मार्ग काढण्याच्या संदर्भात महानगरपालिकेने बजेटमध्ये तरतुद केलेली आहे २ कोटीची आणि आता उर्वरित पोलवर महानगरपालिकेच्या देखरेखेखाली त्याची व्यवस्था बघेल.

**श्री.महेश चौधरी :-** महापौरताई एकच मिनीट, परिसरात नगरपालिकेचा संत जंजाडे महाराज उद्यान खुप चांगल्या प्रकारे डेव्हलप झाला आहे. बगिचा चांगल्या प्रकारे आहे. पण आता बोरवेलच्या पाण्याची लेव्हल खाली गेल्यामुळे तेथील झाडे जळत आहे. मी तसेपत्र दिलेले आहे मॅडम आपल्याला, आणि तेथे काय झाले तेथे कर्मचारी नसल्याने तेथे जवळच एक महाविद्यालय आहे. काही मुल मुली तेथे बसलेले असतात. त्याच्यामुळे तेथे काही अनुचित प्रकार सुध्दा घडु शकतो. त्यामुळे त्या ठिकाणी कायमस्वरुपी कर्मचाऱ्याची व्यवस्था करावी. नविन बोरवेल बनवा किंवा अमृतचे कनेक्शन त्या ठिकाणी देण्यात यावे. ते महानगरपालिकेचा बगिचा असल्याने तेथे काही अडचण येईल मला वाटत नाही.

**मा.महापौर :-** उन्हाळा सुरु असल्यामुळे लेव्हल खाली गेलेली असेल.

**श्री.महेश चौधरी :-** दर वर्षी हा त्रास होत आहे. अमृतचे कनेक्शन करुन घ्या त्या ठिकाणी.

**मा.महापौर :-** प्रशासनाने याची नोंद घ्यावी.

**श्री.महेश चौधरी :-** आणि जळगांव शहरामध्ये जेवढे दुभाजक आहे. त्या दुभाजकांना लागुन खुप मोठया प्रमाणात धुळ जमा होते. आणि ते काय होतं, जेव्हाही मोठया गाडया जातात तर ती धुळ उडते. अश्यामुळे दोन तीन टु व्हीलर वाल्यांचे ॲक्सीडेन्ट झाला. तर ती धुळ साफ करण्यात यावी. संपुर्ण दुभाजकांची. आपण त्याची कलरींग केली होती. ते कलर खराब झाले असेल तर पुन्हा कलर करुन घ्यावा.

**श्री.प्रविण कोल्हे :-** मुख्य डी.पी.रस्ता जो आहे. त्याच्यावरचा जे अतिक्रमण आहे ते काढण्याचे आदेश दिले होते.

**मा.महापौर :-** बरेच वर्ष झाले ते मांडत आहे. काहीच होत नाही त्या अतिक्रमणाचे.

**श्री.किशोर बाविस्कर :-** मॅडम, महापौर साहेब, आसोदा रोडच्या झोपडपट्टीचा विषय आहे. तेथे जाण्यासाठी रस्ताच नाही.

**श्री.प्रविण कोल्हे :-** ते तर १५-२० वर्षापासुन पेन्डींग आहे. मग आता आपण काय कार्यवाही केली.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** आता काढायला काही हरकत नाही.

**मा.उपमहापौर :-** फ्रेश म्हणजे आता परत पहिल्यापासुन सुरु करायचे का ते.

**मा.महापौर :-** अतिक्रमण विभागाला काढायला हरकत आहे का ? काढु शकतात का ? कोण आहे अतिक्रमण विभाग.

**मा.उपमहापौर :-** तुम्ही दोघी जण मिळुन आताच्या आता काय कार्यवाही करता येईल. दोघीचे दोघी आता उत्तर द्या.

**मा.महापौर :-** म्हणजे बरेच वर्ष म्हणजे, ३ वर्ष झाले असतील ना.

**मा.उपमहापौर :-** दोन तीन महासभेपासुन ते बोलत आहे. तेथे नागरीक महापौर कार्यालय उपमहापौर दालनात येऊन फिरत आहे. परत परत तेच सांगायचे का ? नोटीस पाठवली जाते. नोटीस पाठविल्यानंतर कार्यवाही काय करायची. ते म्हणतात आम्हाला पत्र मिळालेले नाही. नागरीक म्हणतात बांधकाम विभागाने करायचे, बाकी म्हणतात अतिक्रमण विभागाने करायचे. करायचे काय नेमके.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** बांधकाम विभागाला आणि अतिक्रमण विभागाला आदेश तयार करुन देतो.

**मा.उपमहापौर :-** किती दिवसात.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** पुढच्या आठवडयात देतो.

**मा.**उपमहापौर :- पुढच्या आठवडयात.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** पत्र पण आणि ऑर्डर पण देतो.

**श्री.प्रविण कोल्हे :-** अतिक्रमण मध्ये आहे तो रस्ता साहेब, पुढे अडचण येईल आपल्याला. त्या रस्त्याचे नियोजन आहे.

**मा.उपमहापौर :-** बोला किशोर भाऊ.

**श्री.किशोर बाविस्कर :-** महापौर साहेब, अतिक्रमणचा विषय निघाला म्हणुन आमच्या आसोदा रोडच्या झोपडपट्टी कडुन जाणारा रस्ता जो आहे. या रस्त्यावर घरे अडचणीची आहे. ते घरे उचलण्यासाठी मी आपल्याला दोन वेळा पत्र दिले. आयुक्त मॅडमांच्या कानावर टाकले. सोनगीरे साहेबांना साईडवर घेऊन गेले. त्या झोपड्डया उचलुन बाजुला ठेवायच्या आहे. आपण त्यांना उचलुन दुसऱ्या ठिकाणी टाकत आहे पण त्या ठिकाणी रस्ता पुर्ण बंद झाला आहे जाण्या येण्यासाठी, अग्निशमनची गाडी सुध्दा जायला जागा नाही. आता मागच्या आठवडयात आग लागली होती. ती गाडी खुप फिरुन आली त्या ठिकाणी खुप नुकसान झालेला आहे. आणि आता अग्निशमनची गाडी जाऊच शकत नाही. तुम्ही तेथे जागा करुन घ्यावी नाही तर दोन झोपड्डया उचलुन द्याव्यात

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया, त्यालाच धरुन आहे. माझ्या वार्डात आता जे रस्ते बनवत आहे.तुम्हाला पत्र दिले आहे. त्या रस्त्याला जे अतिक्रमण नडत आहे. झोपडपट्टी धारक म्हणुन ज्यांनी घरे घेतलेले आहे. ते लोकं परत तेथे झोपड्डया ठोकुन राहत आहे. ते तुम्ही मला रिकामे करुन द्या. भविष्यात ताण होणार नाही. मोकळे करुन घ्या ते.

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई, अतिक्रमणचे एक शॉर्टकट आहे.

**मा.महापौर :-** सोनगिरे साहेब, सगळे लक्षात राहिले पाहिजे. उत्तर तर द्यावे लागेल ना आपल्याला.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** खेडीच्या बाबतीत मी जसे सांगितले आयुक्त मॅडमांना, अतिक्रमण आणि बांधकाम विभागाला संयुक्तीक कार्यवाही करण्यासाठी आदेशीत करण्यात येईल. किशोरभाऊ तुमचा जो आसोदा रस्त्याच्या बऱ्याच झोपड्डया रस्त्यावर आहे. परंतु आपण जी पाहणी केली होती त्या ठिकाणी एका घराचे नविन बांधकाम केलेले आहे स्वत:च्या जागेत. त्यानी स्वत:च्या जागेत घर बांधल्यामुळे त्यांची अस्तीत्वातला जो वापराचा रस्ता होता तो रस्ता नाही. जो वापराचा रस्ता होता त्याचा, आणि अधिकृत रस्ता जो आहे तो १२ मिटरचा रस्ता होता जो नकाश्यावर दिसतो. परंतु त्या साईडला रोडने सरळ झोपड्डया आहे. म्हणुन तो रस्ता आज रोजी बंद आहे. प्रत्येक ठिकाणी ठिक आहे. परंतु महानगरपालिका म्हणुन काही अतिक्रमण काढतांना काही गोष्टींचा विचार करावा लागतो. सन २००० पुर्वीच्या झोपडपट्टया आहे. त्यांना शासनाने काही तरी संरक्षण दिलेले आहे. म्हणजे आपण त्याला डायरेक्ट उचलुन वेगळे करु शकत नाही. पहिला मुद्दा, दुसरा मुद्दा.

**श्री.किशोर बाविस्कर :-** त्या जागेहुन त्यांना साईडला करा, मी तुम्हाला त्या जागेवर सुध्दा नेले आहे. आपल्याला नुकसान कोणा गरीबाचे करायचे नाही. फक्त एक झोपडी उचलुन साईडला ठेवायची आहे आपल्याला. आपला रस्ता चालु होऊन जाईल. नियमांच्या बाहेर कसे तोडता येईल.तुम्ही बोला ना. आता त्या भागामध्ये भाऊ जायला पण रस्ता नाही. दत्तु सावरकराच्या घराकडुन, उचला ना साहेब, दोन झोपड्डयांसाठी तुम्ही दोन हजार लोकांच्या घरांचा विचार करत आहे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** तश्या झोपड्डया उचलायला हरकत नाही.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** तोच विषय येतो ना. रस्त्यामध्ये जर की झोपड्डया असेल रस्ता मोकळा करायचा असेल, आणि तेथे फायरची गाडी, ॲमब्युलन्स जात नसेल, तर त्याला काय कायदा आहे. झोपडपट्टीचा काय कायदा आला.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** नाही अडचण काही नाही. नगररचना विभागाकडुन डिमार्केशन करुन घेईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** रस्त्याचे डिमार्केशन करुन घ्या, कायदेशीर त्याला नोटीस द्या. आणि काढुन टाका. आणि रस्त्यावरच्या अतिक्रमणाला नोटीस देण्याची सुध्दा गरज नाही.

(सभागृहात एकाच वेळी अनेक सन्मा.सदस्य व अधिकारी बोलत असतांना कोण काय बोलले समजत नाही.)

**श्री.किशोर बाविस्कर :-** काय म्हणणे आहे तुमचे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** त्या रस्त्याची जागा मोजुन घ्यायची. आणि मग त्या रस्त्यामध्ये जे काही अतिक्रमण आले ते काढुन द्यायचे.

**मा.महापौर :-** नगरसचिवांनी राष्ट्रगीतला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांनी राष्ट्रगीतसाठी उभे राहावे ही विनंती.

**सही/-**
**(महाजन जयश्री सुनिल)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**